14-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1
DGS/ MAP/ KGS/ 13:00

**सभापतीस्थानी मा. सभापती**

**प्रश्नोत्तरे**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**विदर्भ सिंचन विकास महामंडळाचे ३०० कोटी रुपये शासनाने परत घेतल्याबाबत**

**(१) * ५५७३ श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. जगदिश गुप्ता , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्जाच्या परतफेडीचा ताळमेळ साधण्यासाठी राज्य शासनाने माहे मे,२००५ च्या प्रथम सप्ताहात विदर्भ सिंचन विकास महामंडळाकडून ३०० कोटी रुपये परत घेतले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी विदर्भ सिंचन महामंडळाला ५०० कोटी रुपये प्राप्त झाले होते त्यापैकी २०० कोटी रुपये खर्च करण्यात आले होते व उर्वरीत ३०० कोटी रुपये विविध १८ प्रकल्पांची रखडलेली कामे पूर्ण करण्यासाठी वापरण्यात यावयाचे होते हे ही खरे आहे ज़ाय,

(३) असल्यास, विदर्भात सिंचनाचा प्रचंड अनुशेष असताना सिंचनाच्या अनुशेषाचे पैसे न घेता दुसरी व्यवस्था का करण्यात आली नाही,

(४) तसेच, विदर्भातील सिंचन प्रकल्पांची रखडलेली कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने पर्यायी कोणती व्यवस्था केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. सुनील देशमुख**, **श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) राज्यातील विविध महामंडळांकडे अतिरिक्त रहाणारा निधी शासनाच्या तिजोरीत ठेव म्हणून ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्यास अनुसरुन विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून रु.३०० कोटी दि. २९.४.२००५ रोजी ठेव म्हणून घेण्यात आले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(२) शासनातर्फे रोख्याद्वारे व शासन अंशदानाद्वारे वर्ष २००४-२००५ मध्ये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकरीता एकूण ११०६.६० कोटी एवढा निधी वितरित करण्यात आला. त्यापैकी रु.६८२.७६ कोटी एवढा निधी मार्च, २००५ मध्ये देण्यात आला. सदर निधीतून वर्ष २००५-२००६ मध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** ५५७३ ....**

आतापर्यंत रु.३६८.०० कोटी खर्च करण्यात आले. उर्वरित निधी सर्व बांधकामाधीन प्रकल्पावर खर्च करण्यात येत आहे. रु.३०० कोटी या ठेव रकमेचा परतावा दि. ३०.६.२००५ रोजी महामंडळाला करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) स-न २००४-२००५ नियोजनातील रु.६८२.७६ कोटी निधी या वर्षी मार्च, २००५ मध्ये प्राप्त झाला आहे. त्यानुसार प्रकल्पाची कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच वर्ष २००५-२००६ मध्ये शास-न अंशदानाद्वारे रु.६९९.९१ कोटी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये "राज्यातील विविध महामंडळांकडे अतिरिक्त रहाणारा निधी शासनाच्या तिजोरीत ठेव म्हणून ठेवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे त्यास अनुसरुन विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून रु. 300 कोटी दि.29.4.2005 रोजी ठेव म्हणून घेण्यात आले" असे म्हटले आहे. परंतु या उत्तरामधील शेवटचे वाक्य मंत्रिमहोदयांनी कां घातले हे आम्हाला समजत नाही. याच प्रश्नोत्तरांच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक 5596 च्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, "विदर्भाचा 2005 अखेरचा अनुशेष 3044.44 कोटींचा आहे" 2005 अखेर इतका अनुशेष असतांना 300 कोटींचा अतिरिक्त निधी नेण्याचा प्रयत्न कां केला? याला अतिरिक्त ठेव कशी म्हणता येईल? प्रश्न क्रमांक 3 मध्ये विचारण्यात आले होते की, शासनाच्या तिजोरीमध्ये विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकरिता ठेव असलेली रक्कम काढून घेण्याऐवजी आपण ती दुसरीकडून कां घेतली नाही? ज्या भागांचा अनुशेष आहे, त्यासाठी राखून ठेवलेले पैसे न घेता आपण दुसऱ्या भागासाठी असलेल्या पैश्यामधून कां घेतले नाहीत? शासनाच्या माध्यमातून विदर्भावर जाणीवपूर्वक अन्याय होत आहे हे खरे आहे काय? सभापती महोदय, हा निधी 30.6.2005 रोजी परत करण्यात आला. आम्ही प्रश्न उपस्थित केल्यानंतर बोंबाबोंब होईल म्हणून हा निधी परत करण्यात आला. प्रश्न असा आहे की, 2005 अखेर विदर्भाचा 3 हजार कोटींचा अनुशेष असतांना 300 कोटींचा अतिरिक्त निधी शासनाने कां नेला?

**सभापती** : "बोंबाबोंब" हा असंसदीय शब्द असल्यामुळे तो कामकाजाच्या नोंदीमधून वगळण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

*** ५५७३ ......**

श्री. अजित पवार : सभापती महोदय, 2004-05 मध्ये एकूण 1106 कोटी रुपये विदर्भाला द्यावयाचे होते. त्यापैकी 682 कोटी रुपये मार्च 2005 अखेर म्हणजे वर्ष संपत आले असतांना दिले. त्यानंतरच्या काळात शासनाला काही रकमेची गरज निर्माण झाली त्यावेळी फक्त विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडूनच नाहीतर एमएमआरडीए वगैरे ठिकाणाहून देखील काही दिवसांसाठी निधी घेतला. अशाप्रकारे निधी घेतल्यामुळे संबंधित महामंडळाचे नुकसान होणार नाही अशाप्रकारची माहिती घेतली व शासनाने लगेच 682 कोटी रुपये परत दिले आहेत.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5573 . . . .

श्री.अजित पवार . . . .

ते पैसे खर्च करीत असताना, त्यामध्ये शेतक-यांच्या जमिनीचे जे भूसंपादन करण्यात आले आहे, त्याचे पैसे द्यावयाचे आहेत किंवा केलेल्या कामाच्या संदर्भात कॉन्ट्रॅक्टरची बिले द्यावयाची आहेत. यासाठी 368 कोटी रुपये खर्च करण्यात आले आणि 662 कोटी रुपये आपल्याकडे विदर्भ इरिगेशन डेव्हलपमेंट बोर्डचे होते. त्यानंतर अर्थ विभागाने विनंती केली की, तुमचा तो निधी संपावयाच्या आत थोडीशी परिस्थिती सुधारली. 382 कोटीतील 368 कोटी रुपये संपलेले होते. साधारणपणे 14 कोटी रुपये त्या अकाऊंटमध्ये शिल्लक होते. ते शिल्लक असताना घेतलेली 300 कोटीची रक्कम परत आली. अशी थोडीशी ॲडजेस्टमेंट झाली आणि ही वस्तुस्थिती मी सभागृहापासून लपवू इच्छित नाही. येथून पुढे विदर्भ विकास महामंडळाच्या बाबतीत अशा प्रकारची घटना घडणार नाही. अशा प्रकारची खबरदारी निश्चितपणे घेतली जाईल असा शब्द मी या सभागृहाला देऊ इच्छितो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल, नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी माननीय मंत्री महोदयांना विनंती केली होती की, या अधिवेशनाच्या निमित्ताने, हे अधिवेशन संपण्यापूर्वी कमीतकमी बॅकलॉगमधील काही निधी विदर्भ, मराठवाडा आणि कोकणाला द्यावी. मी अशी मागणी केल्यावर त्यांनी उत्तर दिले होते. मी मागणी केल्यानंतर डिसेंबरनंतर 31 मार्चला त्यांनी हा निधी दिला. मागच्या अधिवेशनामध्ये यावर चर्चा होत असताना मी ही मागणी केली आणि त्यावेळी सन्माननीय मंत्री श्री.अजितदादा पवार आणि सन्माननीय मंत्री श्री.रामराजे निंबाळकर या दोघांनी उभे राहून सांगितले की, आम्ही निधी दिला आहे, आम्ही निधी दिला आहे. तुम्ही बोललात त्याप्रमाणे निधी दिला आहे. आम्हाला वाटले की, राजा उदार झाला आणि आम्हाला निधी दिला. पण प्रत्यक्षात अधिवेशन संपल्यावर निधी काढून घेतला. पहिला मुद्दा असा की, विदर्भ सिंचन कॉर्पोरेशनमध्ये ठेकेदारांची, कॉन्ट्रॅक्टरची एकूण किती बिले थकीत आहेत ? लॅण्ड ॲक्वीझिशन अवॉर्ड झाले आहे. तर अशा किती शेतक-यांना पैसे देणे शिल्लक आहे ? गोसीखूर्द प्रकल्पाच्या बाबतीत पैसे रिलीज केले असे म्हणता, पण अजूनपर्यंत कॉन्ट्रॅक्टरचे बरेचसे पैसे दिलेले नाहीत. लॅण्ड ॲक्वीझिशन अवॉर्ड होऊन सुध्दा पैसे दिलेले नाहीत. एकीकडे पैसे देता आणि दुसरीकडे दिलेले पैसे परत घेता. विदर्भ सिंचन महामंडळाची स्वायत्तता अशी आहे की,

. . . .बी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मंत्रालयातून सांगितल्याशिवाय तेथे काहीही पान हालत नाही. पैसे परत द्या असे म्हटल्यानंतर आमचे एम.डी.धावत आले, पैसे परत दिले. विदर्भातील अनुशेषाचे जे आकडे आहेत, ते जुन्या किंमतीच्या आधारावर आहेत. त्याबाबतीत जर अनुशेष निर्देशांक कमिटीचे निकष लावले तर हा अनुशेष वाढणार आहे, नवीन किंमतीनुसार हा अनुशेष वाढणार आहे. आज अशी स्थिती आहे की, कॉन्ट्रॅक्टरची बिले थकलेली आहेत, कामे बंद केलेली आहेत. लॅण्ड ॲक्वीझिशनचे अवॉर्ड झालेले नाही. तेव्हा विदर्भ सिंचन महामंडळाला एकूण किती देणे आहे ? या महामंडळाला पैसे दिल्यानंतर ते परत घेतले. विदर्भ सिंचन विकास महामंडळ झाल्यापासून किती देणे बाकी आहे ? 60 कोटी रुपये घेतले होते, 40 कोटी रुपये दिले. तेव्हा जेवढे उधारीवर पैसे घेतले होते, तेवढे ते परत दिले आहेत का ? आता महामंडळाला काहीही देणे नाही का ? यावर्षी सिंचन कॉर्पोरेशनला आश्वासन दिले आहे की, अशा प्रकारे निधी घेणार नाही. कामे करु. तर आता यावर्षी किती पैसे जास्तीचे दिलेले आहेत ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, यामध्ये जी रक्कम गेली, त्यात साधारण यंदाच्या वर्षी जेवढी कामे करावयाची होती, त्या कामांकरता जमिनीचे भूसंपादन करुन, ज्या शेतक-यांना मोबदला देण्याची गरज होती, अशा शेतक-यांची सर्वच्यासर्व रक्कम भूसंपादनाच्या कामात देण्यात आली आहे. जवळपास 231 कोटी रुपये त्याबाबतीत दिलेले आहेत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी मुद्दा उपस्थित केला, त्यामध्ये भूसंपादनाचे निवाडे जाहीर झालेले आहेत पण शासनाने ती जमीन ताब्यात घेतलेली नाही, चालू वर्षी प्रकल्पांच्या कामानुसार आवश्यकता नाही, त्याबाबतची देखील आकडेवारी आहे. गोसीखूर्दच्या बाबतीत एकूण 67 कोटी 83 लाख रुपये देणे बाकी आहे. खडकपूर्णा प्रकल्पाच्या बाबतीत 3 कोटी 93 लाख रुपये देणे बाकी आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5573 (पुढे चालू...

श्री.अजित पवार (पुढे चालू...

बेंबळा प्रकल्पाचे 49.67 कोटी, निम्न वर्धा 23.13 कोटी रुपये द्यायचे आहेत. ते पैसे दिले गेले पाहिजेत याबद्दल दुमत नाही. जमिनी ताब्यात घेतल्यानंतर] त्या ठिकाणी बांधकाम होऊन पाणी जाणार आहे,ते यंदाच्या वर्षी जात नाही. यंदाच्या वर्षी जेवढे काही बांधकामाला पैसे द्यावे लागतील ते खर्च व्हावेत आणि बाकीची रक्कम भूसंपादन केलेल्या जमिनीचा मोबदल्यासाठी खर्च करावी, अशाप्रकारचा समन्वय ठेवण्याचा प्रयत्न केला. यंदाच्या वर्षी 144 कोटी रुपये द्यायचे राहिलेले आहेत ते देण्याची शासन निश्चितपणे कार्यवाही करेल.

श्री.नितीन गडकरी : विदर्भ सिंचन महामंडळाला 3 कोटी रुपये दिलेले आहेत. मा. राज्यमंत्री श्री.कांबळेसाहेब येथे उपस्थित आहे. त्यांच्या पुलगाव मतदार संघामध्ये आणि सन्माननीय राज्यमंत्री श्री.सुनील देशमुख यांच्या मतदार संघातील आणि आर्वी मतदार संघातील भूसंपादनाच्या केसेस आहेत.त्या शेतकऱ्यांना अजूनही त्या जमिनीचे पैसे मिळालेले नाहीत, ते अडकून पडलेले आहेत. अगोदर बांधकाम करायचे असे म्हणून लॅन्ड ॲक्वीझिशनचे पैसे द्यायचे नाहीत हे बरोबर नाही. काही शेतकऱ्यांनी यासाठी आत्महत्त्या केलेल्या आहेत. आपल्याकडे लॅड ॲक्वीझिशनचे पैसे आलेले आहेत, ते पैसे प्राधान्याने द्यायला पाहिजेत. 10 कोटी 20 कोटी रुपयाची कमी तरतूद केली तर समजू शकतो. परंतु आपण धरण करायचे म्हणून अनेक वर्षापासून शेतकऱ्यांना नोटिसा देतो,त्यांच्या जमिनी ताब्यात घेतो, त्यांच्या जमिनीचे अर्वार्ड झाल्यानंतर त्यांना जमिनीचा मोबदला दिला पाहिजे. आर्वी येथील शेतकऱ्यांनी मोबदला मिळण्यासाठी सिंचन कार्यालयामध्ये जाऊन आंदोलन केलेले होते .काहींनी आमरण उपोषणासाठी बसलेले होते. त्यातील काही शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. आपल्याकडे लॅन्ड ॲक्वीझिशनसाठी पैसे आलेले आहेत ते पैसे प्रायोरिटीने देण्याऐवजी ते पैसे आपण परत मागवून घेतो. परंतु ते पैसे दिले गेले पाहिजेत. मला माहीत आहे की,जे पहिले प्रकल्प होऊ शकतात,त्याकरिता जास्त पैसे द्यावेत, नवीन प्रकल्प असतील तर त्याकरिता कमी तरतूद केली हे मी समजू शकतो. परंतु शेतकऱ्यांच्याबाबतीमध्ये माझी विनंती आहे की,विदर्भ सिंचन महामंडळाला लॅंड ॲक्वीझिशनसाठी पैसे उपलब्ध करुन द्यावेत. पुनर्वसनाचा प्रश्न आहे तोही जटिल आहे. अनेक ठिकाणी अर्धवट कामे झालेली आहेत, त्या गावामध्ये रस्ता आहे परंतु लाईट नाही, अनेक गोष्टी त्या ठिकाणी करावयाच्या आहेत. लॅन्ड ॲक्वीझिशनचे 450-500 कोटी द्यायला पाहिजे. हा पैसा गरीब शेतकऱ्यांचा आहे तेव्हा लॅन्ड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र.5573 (पुढे चालू...

श्री. गडकरी (पुढे चालू

ॲक्वीझिशनचे पैसे विदर्भ सिंचन महामंडळाला उपलब्ध करुन देऊन,त्या गरीब शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत आपण आदेश द्याल काय ?

श्री.अजित पवार : सभागृहाचे मत असेल तर माझी काही हरकत नाही. भूसंपादनाचे पैसे देण्यामध्ये काही अडचण येणार नाही. परंतु आता आपण काही नवीन धरणांचे बांधकाम हाती घेतलेले आहे, त्या कामाला गती आलेली आहे, ती गती कमी करावी लागेल. कारण सन्माननीय सदस्य श्री.गडकरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे, यंदाच्या वर्षापासून विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाला शासनाच्या वतीने सांगितले जाईल की, जो शिल्लक निधी आहे, तो भूसंपादनाच्या कामाकरिता जास्तीत जास्त अग्रक्रमाने देण्याबाबत निश्चित कार्यवाही करण्याबाबत सांगितले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : 300 कोटी रुपये परत केले असल्यामुळे त्याबाबत काही बोलत नाही. परंतु विदर्भ सिंचन महामंडळाला स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, पुन्हा असा प्रकार होणार नाही,हे पहावे. त्या भागातील शेतकऱ्यांचा अतिशय सेन्सीटिव्ह अशाप्रकारचा हा विषय झालेला आहे. 1988 पासून ते आतापर्यंत म्हणजेच 2005 पर्यन्तचा विदर्भाचा अनुशेष शिल्लक आहे. हा अनुशष 1994 च्या सरासरी किंमतीनुसार काढलेला आहे. आजच्या सरासरीनुसार नाही.त्यावेळच्या सरासरीनुसार 3044 कोटी विदभार्चा आणि मराठवाडयाचा 1277 कोटीचा अनुशेष आहे.उर्वरित महाराष्ट्राचा 8 कोटीचा अनुशेष आहे. मा.राज्यपालांनी जे डायरेक्शन ठरवून दिलेले आहेत ,त्याप्रमाणे पैसे मिळत नाहीत. मिळाले तरी तुटपुंजे पैसे दिले जातात. दुसरे असे की, मा.राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे अधिकारी काही करत नाहीत. माझी माहिती आहे की, काही अधिकारी डायरेक्शन बाजूला सारुन जिल्ह्याजिल्ह्याला पुन्हा निधी वाटप करुन भेदभाव करतात. निश्चितपणे भूसंपादनाचा मोबदला येत्या आठ दिवसात 15 दिवसात दिला जाईल काय ? या बाबतचे सक्त आदेश काढण्यात येतील काय?

यानंतर कु.थोरात.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदारे... 13:15
ता.प्र.क्र.5573...

श्री. अजित पवार : सभापती महोदय, श्री. नितीन गडकरी यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देतांना भूमिसंपादनाच्या संदर्भात मी सांगितलेले आहे. विदर्भामध्ये जो पैसा जातो त्यामध्ये अमरावती विभाग आणि नागपूर विभागाचा विचार करतो. अमरावती विभागात अनुशेष जास्त मोठया प्रमाणात आहे. तेथे जास्त निधी दिला गेला पाहिजे अशा प्रकारची साधारणपणे मागणी आहे, ती मागणी रास्त आहे. त्याबद्दल शासनाचे दुमत असण्याचे कारण नाही. गोषीखुर्द सारखा मोठा प्रकल्प आहे. अलीकडच्या काळात राष्ट्रीय प्रकल्प म्हणून त्याला मान्यता देण्याच्या संदर्भात त्या विभागाचे श्री. प्रियरंजनदास मुन्सीसाहेबांनी स्वतः प्रयत्न चालविलेले आहेत. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे सगळेजण त्या पध्दतीने पाठपुरावा करीत आहेत. आम्ही पण त्या विभागाचे मंत्री, राज्यमंत्री या नात्याने पाठपुरावा करीत आहोत. पण तेथे गेलेला निधी अमरावती विभागात सर्वच्यासर्व खर्च होत नाही, आणि काही निधी नागपूर विभागात खर्च केला जातो, म्हणून प्रा. बी. टी. देशमुखसाहेबांची किंवा त्या भागातील सगळया लोकप्रतिनिधींची अशी मागणी आहे की, आमच्या भागामध्ये काही प्रकल्प सुरु केले गेले पाहिजेत. आमच्या हिश्याचा निधी, विदर्भाचा निधी, विदर्भाला दिला पाहिजे. पण विदर्भासाठी निधी दिल्या नंतर विदर्भामध्ये असणा-या अमरावती विभागाचा अनुशेष भरुन काढण्याकरिता जास्तीचा निधी दिला गेला पाहिजे, ही प्रा.बी.टी.देशमुख साहेबांची मागणी आहे. ती मागणी मान्य करण्याच्या संदर्भातील सूचना संबंधितांना निश्चितपणे दिल्या जातील.

श्री. पांडुरंग फुंडकर :सभापती महोदय, या ठिकाणी आत्ताच माननीय मंत्रिमहोदयांनी जमिनीच्या भूसंपदान व पुनर्वसनाच्यासंदर्भात सांगितले आहे. प्रकल्पासाठी जमिनी घेऊन 8/8,10/10 वर्षे झालेली आहेत, त्या लोकांनी ती गावे खाली केलेली आहेत आणि त्यांची गावे ताब्यात घेतली गेली आहेत. ते त्या गावातून निर्वासित झाले आहेत. तरी त्यांच्या घरांचे पैसे त्या लोकांना मिळालेले नाहीत. ज्या गावात त्यांना प्लॉट दिले गेले आहेत, तेथे रस्ता नाही, इलेक्ट्रिसिटी नाही. माझ्या मतदारसंघातील एका गावामध्ये बिबळया घुसला. त्या ठिकाणी अंधार आहे. तेथे इलेक्ट्रिसिटी दिली गेली नाही. त्या ठिकाणी बिबळया घुसला आणि त्याने दोन मुलांना ठार मारले. शेतक-यांची अवस्था अतिशय वाईट आहे. ज्या गावांचे पुनर्वसन झालेले आहे, त्या गावात सर्व व्यवस्था झाल्या नाहीत. जमिनी देऊन 8/8, 10/10 वर्षे झालेले आहेत, ॲवॉर्ड

डिक्लेअर झालेले आहेत, त्यानंतर सुध्दा त्या जमिनीचे पैसे रोकले जातात.त्या ठिकाणचे लॅन्ड





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदारे... 13:15

ता.प्र.क्र.5573...

श्री. पांडुरंग फुंडकर...

ॲक्विजिशनचे अधिकारी सरळ सांगतात की, आम्हाला वरुन आदेश आहेत की, हे पैसे देऊ नका. सभापती महोदय, यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, 300 कोटी रुपये परत न नेता असे आदेश दिले असते की, मागच्या एका महिन्यात शेतक-यांचे भूसंपादनाचे पैसे ताबडतोबिने द्यावेत, तर मला असे वाटते की, मागच्या महिन्यात शेतक-यांना ते पैसे मिळाले असते. म्हणून स्पेसिफिक एक/दीड महिन्यात भूसंपादनाचे जेवढे पैसे द्यावयाचे असतील, ॲवॉर्ड झालेल्या केसेस असतील ते सर्व पैसे दिले जातील काय?

श्री. अजित पवार :सभापती महोदय, श्री. नितीन गडकरी साहेबांच्या प्रश्नाला उत्तर देत असतांना तसेच विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेबांनी जो प्रश्न विचारला होता त्यालाही मी उत्तर दिलेले आहे. गेले 9 महिने या विभागाचा कार्यभार सांभाळल्यानंतर एक गोष्ट आमच्या लक्षात आलेली आहे की, त्या भागातील स्थानिक लोक प्रतिनिधींची सहकार्याची थोडीशी गरज आहे. मी या प्रश्नाच्या उत्तराच्या निमित्ताने एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देईल की, दर दोन महिन्याने नागपूर आणि अमरावती विभागाची विदर्भात बैठक घेतली जाईल. त्या बैठकीला त्या भागातील लोकप्रतिनिधींना ज्याच्या ज्यांच्या भागातील हे प्रकल्प आहेत, त्यांना बोलावले जाईल. राज्यातील इतर भागातील अशा प्रकारचे प्रश्न सुटत असतांना, त्या त्या भागातील स्थानिक लोकप्रतिनिधी जमिनीच्या संदर्भातील, गावाच्या संदर्भातील किंवा पुनर्वसनाच्या संदर्भातील किंवा कोणी कोर्ट कचेरीत गेले असतील, तर त्यांना समजावून सांगण्याच्या संदर्भात त्यांची मदत होऊ शकते. ही गोष्ट मला मान्य करण्यास अडचण वाटत नाही की, तेथील संबंधित अधिका-यांनी जेवढया जास्त गतीने लक्ष देण्याची गरज आहे, तशा पध्दतीने लक्ष दिले नाही. म्हणून दर दोन महिन्यांनी नागपूर विभागाची, अमरावती विभागाची विदर्भ इरिगेशन डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या संदर्भातील बैठक घेतली जाईल आणि त्या बैठकीला सर्व लोकप्रतिनिधींना आणि अधिका-यांना बोलावले जाईल. रेव्हेन्यू विभागाच्या अधिका-यांना बोलावले जाईल. इरिगेशन विभागाच्या अधिका-यांना बोलावले जाईल. आणि कधी कधी इरिगेशनचे पैसे दिले जातात परंतू भूमिसंपादन करुन घेण्याकरिता पूनर्वसन विभागाच्या किंवा महसूल विभागाच्या संदर्भातील अडचणी असतात त्या करिता तेथील कलेक्टर आणि रेव्हेन्यूच्या अधिका-यांना सुध्दा त्या बैठकीला बोलावले जाईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5573 ..... श्री. अजित पवार ...

त्यातून आढावा घेऊन सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी जे सांगितले की, काही माणसे वगैरे कमी आहेत त्यासंदर्भात ज्या ठिकाणी तातडीने माणसे देण्याची गरज आहे आणि त्याशिवाय त्या प्रकल्पाच्या एकंदरीत कामाला गती येणार नाही, अशा ठिकाणी निश्चितपणे अग्रक्रम दिला जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी भूसंपादनाच्या संदर्भात उत्तर दिले परंतु दुस-या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही. इतर कामांकरिता किती तरतूद करणार असा प्रश्न मी विचारला होता. हा महत्वाचा प्रश्न आहे. एकंदरीत बजेट 1941 कोटी रुपयांचे आहे. त्यामध्ये 1100 कोटी नाबार्ड आणि केंद्र सरकारच्या निधीतून मिळणार आहे. म्हणजे प्रत्यक्षात बजेट 841 रुपयांचे झाले. हे 841 कोटी रुपये माननीय राज्यापाल वाटणार आहेत असे त्यांनी सांगितले आहे. एकेकाळी 2600 कोटीचे होते. मागच्या बजेटच्यावेळी 2500 कोटी रुपये माननीय वित्त मंत्र्यांनी वेगळे ठेवले होते. त्या पैशातून किंवा येणाऱ्या नवीन बजेटमध्ये या व्यतिरिक्त काही जास्तीचे पैसे देणार असाल तर ही कामे होणार आहेत. माननीय वित्त मंत्र्यांनी 2500 कोटी रुपये बजेटमध्ये वेगळे ठेवलेले होते त्यातील काही पैसे आपण अनुशेषाकरिता दिलेले आहेत काय ? या वर्षी देणार आहात काय ? ते पैसे दिले तर कामे होतील.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय वित्तमंत्र्यांकडे पाठपुरावाकरुन अधिकचा निधी विदर्भ सिंचन विकास महामंडळाच्या आणि शासनाच्या देखील विदर्भाच्या भागामध्ये चालू असणाऱ्या कामांना देण्याकरिता आम्ही विभागातर्फे निश्चितपणे प्रयत्न करु. मी विश्वास देतो की, माननीय वित्त मंत्र्यांकडून काही प्रमाणात 2500 कोटी रुपयातील निधी मिळवून घेऊ.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

**समुद्राच्या व खाडीच्या पाण्यामुळे कोकणातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाजावर होत असलेले नुकसान**

**(२) * ५७८७ श्री. मधुकर चव्हाण , श्रीमती कांता नलावडे , श्री. विनोद तावडे , श्रीमती संजीवनी रायकर , श्री. रामनाथ मोते** : सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) समुद्राच्या व खाडीच्या पाण्यामुळे कोकणातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनीचे नुकसान मोठ्या प्रमाणावर होत असून खाजण जमिनीची, रोजगार हमी योजनेअंतर्गत दुरुस्ती करण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २००५ च्या पहिल्या आठवड्यात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे डिसेंबर, २००४ मध्ये कोकणातील अनेक किनाऱ्यावर मोठमोठ्या त्सुनामी लाटांमुळे समुद्राचे पाणी आत येऊ नये म्हणून बांधलेले बंधारे फुटले असून येत्या पावसाळ्यात काही जावां-ाा धोज ा निर्माज झाला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही वा उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.हर्षवर्धन पाटील** : (१) रोजगार हमी योजनेंतर्गत खारभुमि योजना दुरुस्ती करण्याचा निर्णय शास-ाा-ने शास-ा निर्जय ज्र. रोहयो-२००१/प्र.२८/रोहयो-६, दिनांक २ मे, २००१ अन्वये प्रस्तुत केला आहे.

(२) -ाही.

तथापि, बंधारे मातीचे असल्याने रोजच्या भरती-ओहोटीने बांधाची तूटफूट होत असते. त्याची वेळोवेळी दुरुस्ती करण्याचे तसेच बंधाऱ्याच्या नुतनीकरणाची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार दरवर्षी करण्यात येतात.

(३) राज्याच्या अर्थसंकल्पात सादर कामांसाठी तरतूद उपलब्ध करुन दिली जाते. तसेच दिनांक २.५.२००१ च्या परिपत्रकानुसार रोहयो अंतर्गत कामे घेतली जातात. याशिवाय सुनामी लाटांमुळे भविष्यामध्ये समुद्राच्या/खाडी जवळच्या गावांना धोका निर्माण होऊ नये. तसेच शेतकऱ्यांच्या शेत जमिनीचे नुकसान होऊ नये म्हणून राष्ट्रीय चक्री वादळ निवारण प्रकल्पांतर्गत जागतिक बँकेच्या मिळावयाच्या अनुदानातून समुद्राच्या/खाडी जवळच्या योजनांच्या बांधाचा नूतनीकरणासाठी कोकणातील ४ जिल्ह्यांतील २६ योजना रु. १४.६६ कोटी किंमतीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडून माहे मे, २००५ मध्ये शासनास सादर करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मधुकर चव्हाण : सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 3 वर दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देत असताना असे म्हटले आहे की, "तथापि, बंधारे मातीचे असल्याने रोजच्या भरती-ओहोटीने बांधाची तूटफूट होत असते. त्याची वेळोवेळी दुरुस्ती करण्याचे तसेच बंधाऱ्याच्या नुतनीकरणाची कामे निधीच्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपलब्धतेनुसार दरवर्षी करण्यात येतात. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी ज्यावेळेला ठाण्याला बैठक घेतली त्यावेळी त्यांनी सांगितले होते की, असे नुकसान झाले आहे. पाण्यामुळे समुद्राकाठच्या जमिनीचे नुकसान होत आहे. अशा खाजण जमिनी रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत दुरुस्त करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतलेला आहे. त्या निर्णयानुसार अंमलबजावणी सुरु झाली आहे काय ? आर्थिक तरतूद किती कोटी रुपयांची करण्यात आलेली आहे ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 2001 सालच्या निर्णयाप्रमाणे रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत कामे सुरु झालेली आहेत. एकूण 13 कोटीचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. 4 जिल्हयांमध्ये कामे सुरु झालेली आहेत. रायगड जिल्हयामध्ये जवळजवळ दीड कोटीची 3 कामे सुरु आहेत. त्यापकी 80 टक्के काम झालेले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये जवळजवळ 6 वेगवेगळी कामे आहेत. त्यापैकी अकुशल कामे 5 ठिकाणी पूर्ण झालेली आहेत. एका ठिकाणी काम पूर्ण झालेले आहे. ही माहिती पटलावर ठेवता येईल. अशी जवळजवळ 23-24 कामे चालू आहेत.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदय, दुसऱ्या प्रश्नामध्ये असे विचारले आहे की, त्सुनामी लाटांमुळे समुद्राचे पाणी आत येऊ नये म्हणून बांधलेले बंधारे फुटले असून येत्या पावसाळयात काही गावांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "नाही" असे उत्तर दिलेले आहे. वस्तुस्थिती अशी आहे की, जो भोगवे किनारा आहे त्या ठिकाणी सातत्याने धूप होत आहे. त्या ठिकाणी समक्ष जाऊन पाहणी करण्याची आवश्यकता आहे. एकदा तातडीने त्यासंबंधात पाहणी केली जाईल काय ? कारण कोकणातील समुद्र किनारे अत्यंत धोकादायक बनलेले आहेत. मोठया प्रमाणावर समुद्राचे पाणी आत घुसते. ही बाब सामान्य माणसांच्या सुध्दा लक्षात येते. पृष्ठ क्रमांक 3 वर प्रश्न क्रमांक 3 च्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात 2001 मध्ये निर्णय घेण्यात आलेला आहे. मी आपल्याला एक अर्ज देऊ इच्छितो. हा 50 तरुणांचा अर्ज आहे. शासनाकडे 50 बेरोजगार तरुणांनी अर्ज दिला तर त्या तरुणांना नोकरी देण्याची, रोजगार देण्याची शासनाची जबाबदारी आहे. त्यांना नोकरी देऊ शकलो नाही तर बेरोजगार भत्ता दिला पाहिजे. यासंबंधात आपले उत्तर खात्रीपूर्वक होकारार्थी असेल काय ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 13:25

ता.प्र.क्र.5787.... डॉ.अशोक मोडक....

कोकणात रोजगार हमी योजनेचा पैसा अजूनही खर्च झालेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे 35 कोटी रुपये पडून आहेत ही वस्तुस्थिती आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मा.सदस्यांनी प्रत्यक्षात जाऊन पाहणी करण्याची सूचना केली आहे. निश्चितच प्रत्यक्षात पाहणी केली जाईल. मागील पैसे खर्च झालेले आहेत काय असा दुसरा प्रश्न विचारला आहे. जशी कामे पूर्ण होत आहेत त्याप्रमाणे पैसे खर्च केले जात आहेत. खार भूमि जमिनीबाबत वर्षभरामध्ये अकुशल कामावर 1 कोटी आणि कुशल कामावर 34 लाखाच्या आसपास खर्च झालेला आहे.

डॉ.अशोक मोडक : एका बुरंडी गावातील 50 बेकार तरुणांनी रोजगारासाठी अर्ज केलेला आहे. वास्तविक प्रत्येकाला सरकारने रोजगार दिला पाहिजे असे कायद्याचे बंधन आहे. परंतु कोकणाचे दुर्दैव असे की, त्यांना उत्तरही धड मिळत नाही. या तरुणांना रोजगार मिळावा म्हणून शासन या मागणीकडे लक्ष घालील काय ? आणि 35 कोटी रुपये रोजगार हमी योजनेचे कोकणासाठी खर्ची पडले पाहिजे होते ते पडलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : मा.सदस्यांनी 50 युवकांविषयी प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांच्या अर्जानुसार 15 दिवसाच्या आत त्यांच्या कामाची सोय करण्यात येईल. 35 कोटीबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात उत्तर देताना पान क्रमांक 3 वर असे म्हटले आहे की, "तथापि, बंधारे मातीचे असल्याने रोजच्या भरती-ओहोटीने बांधाची तुटफूट होत असते. त्याची वेळोवेळी दुरुस्ती करण्याचे तसेच बंधा-याच्या नुतनीकरणाची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार दरवर्षी करण्यात येतात." सभापती महोदय, शासनाचे हे धोरण उचित आहे काय ? हे मंत्रिमहोदयांनी सांगावे. निधीच्या उपलब्धतेनुसार बंधा-याच्या नुतनीकरणाचे काम करण्याऐवजी गरजेनुसार निधी उपलब्ध करुन देण्याची व्यवस्था शासनातर्फे केली जाणार आहे काय ? हा माझा प्रश्न आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : भरती-आहोटीमुळे बांधाची तूटफूट होते त्यामुळे दरवर्षी अशी कामे घेतली जातात. दुरुस्तीच्या कामासाठी मोठया प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे. या कामाच्या दुरुस्तीसाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात येईल.

14-07-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

ता.प्र.क्र.5787....

डॉ.दीपक सावंत : मा.सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी भोगवे गावासंबंधी प्रश्न विचारला होता. परंतु देवबागच्या बांधाची सुध्दा धूप सुरु आहे. आपण कोकणातील 4 जिल्हयातील 26 योजनांसाठी रु.14.66 कोटी किंमतीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग यांच्याकडे दिलेला आहे. यामध्ये देवबागचा समावेश आहे काय ? आणि ही योजना कधी कार्यान्वित होणार आहे ? पुढील पावसाळयापर्यंत कार्यान्वित होणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : "राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण कार्यक्रम" हा एक नवीन कार्यक्रम आपण जलसंपदा विभागाच्या माध्यमातून केंद्र सरकारला सादर करीत आहोत. त्यामध्ये कोकणातील 4 जिल्हयातील 14 कोटीचे प्रकल्प आहेत. यात ठाणे जिल्हयातील 6 कामे, रायगड जिल्हयातील 7, रत्नागिरी जिल्हयातील 6 आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील 7 कामे अशा एकूण 26 कामांचा आपल्याकडे प्रस्ताव सादर झालेला आहे. त्याच्यामध्ये काही तांत्रिक त्रुटी होत्या त्या दुरुस्त करण्यासाठी मुख्य अभियंत्यांकडे प्रस्ताव दिलेला आहे. एक महिन्याभरामध्ये दुरुस्तीसह प्रस्ताव मागविले जातील आणि या योजनेंतर्गत संपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी देता येईल.

डॉ.दीपक सावंत : यामध्ये देवबागचा समावेश आहे काय ?

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 5787....)

श्री. हर्षवर्धन पाटील : यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बागमाल नंबर-2, बालिमली, केळूस, आरोंदा नं. 2 आणि...

श्री. जितेंद्र आव्हाड : मा.सदस्यांनी देवबाग संबंधी विचारलेले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : देवबागच्या संदर्भात मा.सदस्यांची मागणी आहे. परंतु त्यासंदर्भात प्रस्ताव आला पाहिजे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर या स्कीममध्ये त्याचा अंतर्भाव करण्यात येईल.

**सभापती** : देवबागच्या संदर्भात सभागृहाया भावना लक्षात घेऊन तो भाग आपण प्राधान्याने घ्यावा. आपण तो घेतो म्हणून सांगितले. परंतु याबाबतीत तातडीने कार्यवाही कशी होईल ते आपण पहावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : या संदर्भात निश्चितपणे प्राधान्याने कारवाई केली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : रायगड जिल्ह्यामध्ये 3 कामे प्रगतीपथावर आहेत आणि 80 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत असे उत्तर देण्यात आलेले आहे. कोणती कामे पूर्ण झालेली आहेत ? तसेच रायगड जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेच्या कामाचे किती प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत ? किती ठिकाणी लोकांनी रोजगार हमी योजनेच्या कामाची मागणी केलेली आहे ? रोजगार हमी योजनेचे नॉर्म्स बदलण्याच्या संदर्भात शासनाकडे अनेक वेळा मागणी करुन सुध्दा हे नॉर्म्स बदलले गेले नाहीत. मग नॉर्म्स न बदलता कोणत्या पध्दतीने ही कामे सुरु आहेत ?

श्री. हर्षवर्धन पाटील : रायगड जिल्ह्यामध्ये 2004-05 या आर्थिक वर्षामध्ये नियोजन आराखड्यामध्ये एकूण 12 योजना प्रस्तावित केलेल्या आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : माझा हरकतीचा मुद्दा आहे. खार जमिनीची कामे वेगळ्या फंडातून केली जातात आणि रोजगार हमी योजनेची कामे वेगळ्या फंडातून केली जातात. हे दोन वेगवेगळे फंड असून मा. मंत्री महोदय उत्तर देताना यामध्ये गल्लत करीत आहेत. रोजगार हमी योजनेतून किती कामे सुरु आहेत ?





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(ता.प्र.क्र. 5787....)

श्री. हर्षवर्धन पाटील : रायगड जिल्ह्यामध्ये डोलवी दबाबा, कासू पांडापूर, सांबरी ही कामे सुरु आहेत. माजी विधानसभा सदस्य श्रीमती मिनाक्षी पाटील यांच्या आग्रहास्तव विशेष बाब म्हणून या तीन कामांना मान्यता देण्यात आली. डोलवी दबाब हे 55.65 लाखाचे, कासू पांडापूर 36.93 लाखाचे आणि सांबरी हे 60.65 लाखाचे काम आहे. 70 ते 75 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. या आर्थिक वर्षात 9 कोटी 94 लाखाची कामे प्रस्तावित केलेली आहेत.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : याठिकाणी देवबाग, तळाशीचा उल्लेख करण्यात आला. महिन्यापूर्वी खार जमीन विभागाचे मा.राज्यमंत्री श्री. दयानंद मस्के हे त्याठिकाणी आले होते आणि मी देखील त्यावेळी त्यांच्या बरोबर होतो. देवबाग, तळाशी आणि तांबर्डे हा मालवण तालुक्याचा भाग आहे. परिस्थिती अशी आहे की, हा संपूर्ण भाग बेटा सारखा आहे. एका बाजूला खाडी आणि दुस-या बाजूला समुद्र आणि मध्ये हा चिंचोळा भाग आहे. त्या भागाची वर्षानुवर्षे धूप होत आहे. धूप प्रतिबंधाचे थोडेसे काम तेथे झालेले आहे. रोजगार हमी योजनेचे करोडो रुपये शासनाकडे पडून आहेत. खार जमीन विभागाकडे निधी नसल्यामुळे त्यांना त्याठिकाणी संरक्षण भिंत बांधता येत नाही आणि रोजगार हमी योजनेमध्ये निधी असून देखील आपण काम करत नाही. मागे सुनामीच्या लाटा आल्या त्यावेळी त्या भागातील सर्व लोक भयभीत होऊन घराबाहेर पडले होते. माझा प्रश्न असा आहे की, देवबाग, तळाशी आणि तांबर्डे या तिन्ही भागाला संरक्षण देण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून संरक्षक भिंत बांधणार आहात काय ? असल्यास, त्यासंदर्भात प्रस्ताव मागवून तो शासनाकडून मंजूर करुन घेणार आहात काय ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम 13:35

ता.प्र.क्र.5787...

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामांच्या बाबतीत निकष ठरविले गेलेले आहेत. त्यात काही निकष उच्च न्यायालयाने ठरवून दिलेले आहे. त्यासंदर्भातील ॲक्ट सुध्दा पास केलेला आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना जरुर तपासून पाहिल्या जातील. केद्र शासनाचा राष्ट्रीय चक्री वादळ निवारण प्रकल्प आहे. या सदनाला मी आश्वासीत करु इच्छितो की, हा प्रकल्प केंद्र सरकारने घेण्याचे मान्य केलेले आहे म्हणून पुढच्या आठ दिवसामध्ये या परिसरातील जेवढे लोकप्रतिनिधी आहेत. या विभागातील सर्व लोकप्रतिनिधींची एक बैठक बोलाविली जाईल. या कामाच्या संदर्भातील आराखडा आम्ही तयार केलेला आहे. तो आराखडा रिव्हाईज करण्याची आमची तयारी आहे. शक्यतो सर्व प्रकल्प या माध्यमातून कसे बसतील यादृष्टीने शासनाच्या माध्यमातून प्रयत्न केले जातील. तथापि यामध्ये काही अडचणी आल्या तर जरुर रोजगार हमी योजनेच्या निकषामध्ये सुध्दा आवश्यकता भासल्यास काही ठिकाणी निकष बदलण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री. अनंत तरे : समुद्राच्या/खाडी जवळच्या योजनांच्या बांधाचा नूतनीकरणासाठी कोकणातील 4 जिल्हयातील 26 योजना रु.14.66 कोटी किंमतीचा प्रस्ताव मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडून माहे मे,2005 मध्ये शासनास प्राप्त झालेला आहे. या अनुषंगाने माझा प्रश्न असा आहे की, या विभागातील कामांसाठी 14.66 कोटी रुपयांचे अनुदान कधी मिळणार आहे व ही कामे कधी सुरु करण्यात येणार आहेत ? ठाणे जिल्हयातील पालघर-वसई येथे रोजगार हमी योजनेतून अशा प्रकारची खारभूमी दुरुस्तीची कामे केली जाणार नाहीत म्हणून ती कामे वगळावी अशा प्रकारचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील :सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, यामध्ये काही तांत्रिक त्रुटी निघाल्या होत्या. या त्रुटींची आठ दिवसात पूर्तता करु. परंतु या सदनामध्ये काही सूचना आलेल्या आहेत. त्यामुळे कदाचित हा 14 कोटीचा प्लॅन रिव्हाईज होऊ शकतो. या ठिकाणी सदस्यांनी केलेल्या सूचनांचा एकत्रितपणे विचार करण्यात येईल. या प्लॅनची किंमत वाढेल, त्यासाठी थोडा जास्त कालावधी जरी लागला तरी चालू शकेल असे मला वाटते. ही केंद्र शासनाची योजना आहे. त्यामुळे जलसंपदा विभागाच्या मदतीने यासंदर्भातील आपण रिव्हाईज प्रस्ताव तयार करु. आणि तो रिव्हाईज प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवू. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. तरे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5787... श्री. हर्षवर्धन पाटील....

यांनी सांगितले की, ठाणे जिल्हयातील खारभूमी दुरुस्तीचे कामे वगळावीत अशा सूचना देण्यात आल्या आहेत अशी माहिती दिली. अशा प्रकारच्या सूचना दिल्या गेल्या असतील तर त्यामध्ये निश्चितपणे आम्ही बदल करु.

श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी वांभर्डे,तळाशी,देवबाग या गावी संरक्षण भिंत उभी करावी अशी सूचना या ठिकाणी केलेली आहे. समुद्राच्या किना-याजवळ असलेल्या गावांसाठी संरक्षण भिंती बांधल्या गेल्या पाहिजेत याबाबतीत माझ्ो दुमत नाही. आपण या ठिकाणी संरक्षण भिंती बांधल्या आणि त्सुनामी सारखी लाट पुन्हा आली तर या संरक्षण भिंतींचा काही उपयोग होऊ शकणार नाही. या गावांचे संरक्षण व्हावे म्हणून कोणत्या प्रकारची योजना राबविली गेली तर त्याचा उपयोग होऊ शकेल याचा खरोखर अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. ही कामे रोजगार हमी योजनेतून होणारी नाहीत. त्सुनामी लाट आली तरी ही गावे त्यातून वाचू शकतील अशा प्रकारची संरक्षण योजना उपलब्ध करुन देण्यासाठी अभ्यास करुन त्यासंबंधीचा अहवाल घेऊन तसेच या संदर्भात केंद्र शासनाची मदत घेऊन महाराष्ट्र राज्य आणि केंद्र शासन यांच्या माध्यमातून कोकण विभागातील समुद्राच्या काठावरील जी गावे आहेत त्या गावांना संरक्षण देण्याबाबतची काही कायम स्वरुपी उपाययोजना केली जाईल काय ?

श्री. हर्षवर्धन पाटील : होय.

------------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथील जायकवाडी जलाशयातून शेतीला पाणी पुरवठा मिळण्यास निर्माण झालेला धोका

**(३) * ५५७५ श्री. श्रीजांत जोशी , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्ह्यातील पैठण येथील जायकवाडी जलाशयातील डाव्या कालव्यातून नियोजनाच्या अभावामुळे पाण्याचा अपव्यय होऊन भविष्यात शेतीला पाणी मिळण्यास अडचण होण्याचा धोका निर्माज झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुनील देशमुख,श्री. अजित पवार यांच्याकरिता**: (१) नाही. जायकवाडी प्रकल्पाचे सिंचनाचे नियोजन मा. विभागीय आयुक्त, यांचे अध्यक्षतेखाली असलेल्या कार्यकारी समितीच्या बैठकीत मंजूर करुन त्यानुसार सिंचन कार्यक्रम राबविण्यात येतो.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तरात पुढील प्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो.

उत्तर क्रमांक 1 मध्ये " मा.विभागीय आयुक्त " एवढाच उल्लेख आहे. त्या ठिकाणी " मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद" असे वाचावे. उर्वरित उत्तर छापल्या प्रमाणे आहे.

श्री. श्रीकांत जोशी :सभापती महोदय, जायकवाडी धरण हे मराठवाडयाचा आत्मा आहे. नशिबाने मागच्या वर्षी नाशिक येथे पाऊस पडल्यामुळे जायकवाडी धरणात पाणी साचले. सभापती महोदय, दुर्देवाची परिस्थिती अशी आहे की, लेफ्ट बँक कॅनॉल्सच्या डिझाईन प्रमाणे 3200

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5575...

श्री.श्रीकांत जोशी...

क्यूसेसचा त्याचा डिसचार्ज आहे. परंतु आपले सिंचन खाते 1500 च्या वर डिसचार्ज करु शकले नाही. हा कॅनॉल अनेक ठिकाणी चोक-अप झालेला आहे, अनेक ठिकाणी गळती आहे. त्यामुळे शेतीला किती पाणी मिळाले हा देखील संशोधनाचा विषय आहे. मी अतिशय दाव्याने सांगू शकतो की, 15 ते 20 टक्क्यांच्यावर शेतीला पाणी मिळू शकलेले नाही. सगळया मायनर-सब मायनॅर कॅनॉल्स चोक-अप झालेले आहेत. मराठवाडयाला या कॅनॉलच्या दुरुस्तींसाठी 42 कोटी रुपये देण्यात येतील असे आश्वासन दिलेले आहे. मराठवाडा पॅकेजमध्यचे घोषणा केली. माननीय मुख्यमंत्र्यांनी सत्कार करुन घेतला. मा.श्री. अजितदादा पवार यांचे फोटो त्या विभागात लागले. परंतु मराठवाडयास ते 42 कोटी रुपये मिळालेच नाही.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 13:40

ता.प्र.क्र. 5575 पुढे सुरु..

श्री. श्रीकांत जोशी..

सभापती महोदय, फोटो राहिले आणि पैसे गायब झाले. उजवा कालव्याची परिस्थिती भयानक आहे. तो दरवर्षी फुटतो. त्याच्यामध्ये 600 क्यूसेक्स पाणी सोडले गेले. पालकमंत्र्यांना माहीत आहे. मराठवाडयाच्या अस्मितेचा प्रश्न आहे. परमेश्वराच्या कृपेने ब-याच वर्षानंतर धरणात पाणी आले आहे. पण नियोजनाचे शासनाला विचारले तर विभागीय आयुक्तांवर ढकलून दिले आणि पुढे काहीच केले नाही. जायकवाडीच्या दोन्ही कॅनॉलचा किमान डाव्या कालव्याचा टोटल कमांड एरिया किती ? गेल्या वर्षी पाणी उपलब्ध असताना शेतीला किती पाणी देऊ शकला ? यावर्षी नाशिकला पूर झाल्यामुळे चांगले पाणी आले आहे. यावर्षी डिझाईन डिस्चार्जने पाणी सोडणार काय ? जेवढे कमांड एरियामध्ये अपेक्षित इरिगेशन व्हायला पाहिजे तेवढे शासन करु शकणार आहे काय ? याच्या नियोजनाची बैठक झाली पाहिजे. मला डिटेल उत्तर द्यावे. दुरुस्तीचा 42 कोटी रुपयांचा मराठवाडा पॅकेजमधील निधी आहे हा ताबडतोब वितरीत करणार काय ? कारण दोन महिन्यात जर कामे झाली नाहीत तर याचा काहीही उपयोग नाही सगळे बाष्पीभवन होऊन पाणी फुकट जाईल. शेतीला मिळणार नाही. एकूण मराठवाडयाचे डाव्या कॅनॉलमधील कमांड एरियामधील क्षेत्र किती ? त्याच्यामधील गेल्या वर्षी कमी झालेले क्षेत्र किती आणि त्याची कारणे कोणती ? यावर्षी तरी पूर्ण एरिगेशन होणार आहे काय आणि त्यासाठी नियोजन काय केले ? 42 कोटी रुपयांचा दुरुस्तीचा निधी जो मराठवाडा पॅकेजमधून दिलेला आहे तो किती दिवसात देणार आणि त्याची कामे किती वेळात पूर्ण करणार ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय,जायकवाडी प्रकल्पाचे पैठण डाव्या कालव्याचे जे क्षेत्र . आम्ही ओलिताखाली आणतो त्याचा विचार केला तर औरंगाबाद जिल्हयाचे पैठण तालुक्यासाठी 7620 हेक्टर आहे....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नाचे स्पेसिफिक उत्तर आले तर बरे होईल. मला आपण अनुमती द्या.

**सभापती** : मी आपणांला अनुमती देतो. पण आपल्या प्रश्नाचे आणि मा.सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांच्या प्रश्नाचे उत्तर एकत्र येईल.

...2

SSK/ KGS/ MAP/ 13:40

ता.प्र.क्र. 5575 पुढे सुरु...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, या धरणामध्ये पहिल्यांदाच 98.4 टक्के पाणी भरले आहे. याआधी हे धरण 14-15 टक्के भरत होते. महाराष्ट्रातील अतिशय मोठे धरण आहे. सध्या उन्हाळयामध्ये 45 टक्क्याची पातळी होती. यावर्षी गोदावरीमध्ये चांगला पाऊस झाला. हा विषय विभागीय आयुक्तांवर सोपविण्यासारखा नाही. या कॅनॉलमधून अनेक ठिकाणाहून पाणी जात आहे याचे कारण या कालव्याची देखभाल झालेली नाही. विभागाचा दोष नाही. कारण मागील वर्षी 98 टक्के पाणी भरले गेले. याच्या पूर्वी एवढे पाणी येत नव्हते. आता परिस्थिती अशी आहे की,हे धरण भरले हा ब-याच वर्षानंतर योग आला. हे धरण मराठवाडयाचा भाग्यविधाता असे धरण आहे. परभणीपर्यंत या धरणाचे पाणी जाते. याच्या ज्या सिस्टीम्स् आहेत त्या बरेच दिवस पाणी न गेल्यामुळे अनेक ठिकाणी चोकअप् झालेल्या आहेत आणि काही ठिकाणी पाण्याचे वेस्टेज होत आहे ही वस्तुस्थिती आहे. याचे डिटेल्स याठिकाणी आहेत. माझी विनंती आहे की, शासनाकडे एक्सपर्ट योजना आहेत लोक आहेत. याबाबतीतमध्ये नेमक्या अभ्यास करुन 20-25 कोटी रुपयांचा देखभालीसाठी उपयोग केला तर पाण्याचा अजून चांगला वापर होईल आणि धरणातील पाणी टिकून राहील. भविष्याचा मराठवाडयाचा हा स्टॉक आहे. यादृष्टीने याचा तांत्रिक अभ्यास विभागाने करुन वेस्टेज आणि देखभालीसाठी लक्ष केंद्रीत करावे. याबाबत आपण काय करणार ? गोदावरीवर सर्व धरणे आहेत. हे महत्वाचे धरण आहे. हे धरण भरले तर किती तरी एरिगेशन मराठवाडयामध्ये होऊ शकते. 4-5 वर्षे या धरणात पाणी येत नाही. वैतरणा नदीमध्ये सरप्लस पाणी आहे. वैतरणा नदीमध्ये दीड कि.मी.टनेल केले तर गोदावरीला एक्सेस पाणी सोडता येऊ शकेल नर्मदेचे पाणी सोडणे जास्त खर्चाचे होईल. याचा पूर्ण तांत्रिक अभ्यास करुन हे धरण दरवर्षी 98 टक्के भरले पाहिजे आणि याचा उपयोग होण्यासाठी ज्या सिस्टीम्स आहेत त्या सगळया इंप्रुव्हमेंट झाल्या पाहिजेत यासंबंधी तांत्रिक अहवाल घेऊन पाण्याचा योग्य वापर होण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

यानंतर श्री. गायकवाड ....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5575.....

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यानी जो प्रश्न विचारलेला आहे तो मूळ प्रश्नाशी सबंधित नाही. जायकवाडी धरणात जास्तीचे पाणी यावे यासाठी वैतरणेचे पाणी टनेलच्या माध्यमातून जायकवाडीमध्ये टाकता येईल काय ? अशा प्रकारची सूचना त्यांनी केलेली आहे. ही तांत्रिक बाब असून या संदर्भात अधिका-यांना सूचना देऊन ती तपासली जाईल. काही वेळा पाणी वाटपाच्या बाबतीत इतर राज्याच्या अडचणी असतात किंवा त्यासाठी लवाद नेमलेले असतात किंवा इतरही काही गोष्टी असतात .त्यामुळे ते पाणी इकडे आणत असतांना महाराष्ट्राच्या इतर भागावर अन्याय होणार नसेल तर त्या संदर्भात निश्चितपणे लक्ष घातले जाईल अशा प्रकारची खात्री मी या निमित्ताने सभागृहाला देऊ इच्छितो. जायकवाडी धरण हे गेली तीन चार वर्षे भरलेच गेले नव्हते.18 टक्के, 22 टक्के पुन्हा 18 टक्के या प्रमाणे हे धरण भरले गेले होते. हे धरण अशा प्रकारे भरले की, त्या धरणात जे पाणी आहे त्यापैकी 10 टक्के पाणी राखीव ठेवावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी तसेच कारखान्यांसाठी हे पाणी आरक्षित करावे लागते त्यामुळे शेतक-याकरता फक्त 7 ते 8 टक्के पाणी राहते. गेल्या वर्षी हे धरण चांगले भरले होते आज 14 जुलै ही तारीख असून आता हे धरण 58 टक्के भरलेले आहे आणि थोडयाच दिवसात हे धरण 100 टक्के भरेल अशी परिस्थिती आहे.गेल्या वर्षापासून हे धरण ब-या पैकी भरावयास लागले आहे. वितरण व्यवस्थेच्या बाबतीत सांगावयाचे म्हणजे त्यामध्ये मोठया प्रमाणावर गाळ होता. मध्यंतरीच्या काळात श्रमदानातून किंवा यांत्रिक विभागाच्या मार्फत ही वितरण व्यवस्था चांगली करता येईल काय यासाठी प्रयत्न झाला होता परंतु याबाबतीत जेवढे यश यावयास पाहिजे होते तेवढे यश आले नाही. त्यानंतर आमच्या असे लक्षात आले होते की, याकरता निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे म्हणून मराठवाडा पॅकेजमध्ये जायकवाडी डावा व उजवा कालव्याच्या पुनर्स्थापना व दुरुस्तीची निकड लक्षात घेऊन 45 कोटी 90 लाख रुपयांचा निधीची तरतूद त्या ठिकाणी करण्यात आली आहे.त्या संदर्भात असे नियोजन करण्यात आलेले आहे की, 2004-2005 सालापासून चार वर्षाचा कार्यक्रम यासाठी तयार करण्यात आला आहे आणि त्याला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. डाव्या कालव्यासाठी 27 कोटी 96 लाख रुपये आणि उजव्या कालव्यासाठी 15 कोटी 89 लाख रुपये ठेवण्यात आलेले आहेत.या व्यतिरिक्त 3 कोटी रुपये 2004-2005 सालामध्ये गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाकडे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.5575 श्री.अजित पवार ...

मुख्य कालव्याच्या ब्रॅच कालव्याच्या भरावाची उंची वाढविणे,हार्टिंगची उंची वाढविणे, बांधकामाची दुरुस्ती करणे गेटची दुरुस्ती करणे आणि नवीन पुलाची कामे करणे यासाठी हा निधी त्यांच्याकडे देण्यात आला होता. त्याचप्रमाणे पूरक मागण्या ज्या सादर करण्यात आल्या होत्या त्यामध्ये 70 -70 लाख रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला आहे .सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी तसेच सन्माननीय सदस्य श्री श्रीकांत जोशी यांनी एक मुद्दा उपस्थित केला होता की ही सर्व कामे केल्याशिवाय मराठवाडयातील औरंगाबाद, जालना, परभणी,बीड, नगर या पाच जिल्हयांना या डाव्या कालव्याव्दारे पाणी मिळते ते व्यवस्थित मिळणार नाही.ही सगळी कामे हातात घेतल्यानंतर त्यांची जी तक्रार होती ती ब-याच अंशी मार्गी लागेल. दोन्ही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समिती नेमण्यात आली आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की,त्या समितीमध्ये चीफ इंजिनिअर व सुपरिटेन्डीग ॲग्रिकल्चरल ऑफिसर तसेच त्या भागातील लोकप्रतिनिधी असतात.धरणामध्ये पाणी कमी साठल्यामुळे या समितीने जी पहाणी करावयास पाहिजे होती किंवा त्यासंबंधी जो निर्णय घ्यावयास पाहिजे होता तो त्यांना नाईलाजाने घेता आला नाही परंतु आता धरण चांगले भरलेले असल्यामुळे निश्चितपणें या कामास अधिक गती दिली जाईल.आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली जी समिती आहे त्या समितीच्या व्यतिरिक्त तेथील.पालक मंत्री किंवा आणखी काही लोकप्रतिनिधी असतात त्यांच्या समित्या असतात ..

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (पुढे चालू....) ता.प्र.क्र.5575 ...

काही ठिकाणी आपल्याला माहिती आहे की, ज्या कालवा समित्या आहेत, त्या समित्यांमध्ये त्या त्या ठिकाणचे लोक प्रतिनिधी, साखर कारखान्यांचे चेअरमन वगैरेंना एकत्रित केले जाते आणि त्या समित्यांच्या माध्यमातून सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये धारणातील असलेल्या पाण्याच्या साठ्याची माहिती घेऊन त्या पाण्याचे वितरण कसे करावयाचे हे ठरविले जाते. तेव्हा हे पाणी आम्हाला नीट मिळत नाही असा जो मुद्दा येथे सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला त्याबाबत मी आपल्यामार्फत त्यांना सांगू इच्छितो की, तशी गोष्ट यापुढे होऊ दिली जाणार नाही. मागील काळामध्ये धरणामध्येच पाणी अतिशय कमी असल्याने हे घडले होते. आता धरणात पाणी चांगल्या प्रकारे भरू लागले आहे, गेल्या वर्षीचा तरी आपला अनुभव चांगला आहे. तेव्हा गेल्या दोन वर्षात आपण यासाठी निधी देखील उपलब्ध करून दिलेला आहे आणि तेथील कामांचा दर्जाही चांगला होईल याची काळजी निश्चितपणे पाटबंधारे विभागाने घेतली आहे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, या कालव्याच्या दुरूस्तीसाठी असलेल्या 42 कोटी पैकी 10 कोटी रुपये ताबडतोब ऑक्टोबर पूर्वी खर्च करणार का ? कारण नंतर ही दुरूस्ती करता येत नाही. तेव्हा याबाबतीत प्रशासकीय मान्यता वगैरे देण्याचे काम हे अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक बोलावून आपण करणार का ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला हा मुद्दा योग्य आहे. त्यामुळे ते पाणी ऑक्टोबर नंतर शेतकऱ्यांना देण्यापूर्वी यातील जेवढा जास्तीचा निधी उपलब्ध करून देता येईल तो देण्याच्या दृष्टीने बैठक बोलाविली जाईल आणि मराठवाडा पॅकेजचा 10 कोटी रुपयांचा निधी माननीय मुख्यमंत्र्यांकडून आग्रह करून दिला जाईल व ती कामे सुरू केली जातील.

****

...... के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबई ृ षि उत्पन्न समितीचा विस्तार व जाजजी बाजारपेठांा परवाजी देज्याबाबत**

**(4) * 7044 श्री. मधुज र सरपोतदार, श्री. अत तरे, डॉ. नीलम जोन्हे, श्री. अरविंद सावंत, डॉ. दीपज सावंत, श्री. विलास अवचट** : स-मा-ा-ीय पज-ा मंत्री पुढील जोष्टींचा जुलासा ज रतील ज ाय :-

(1) मुंबई ृ षि उत्पन्न बाजारपेठेतील व्यापाराचा ताज लजात घेता यापुढे विभाज स्तरावर बाजार समित्या स्थाप-ा ज रज्यात येत आहे, हे जरे आहे ज ाय,

(2) असल्यास, राज्यात ृ षि जेत्राचा झपाट्या-ो होत असलेला विज ास लजात घेता शेतज ऱ्यां-ाा आपला माल विज ज्याचे स्वातंत्र्यांचा एज भाज म्हजू-ा राज्यात जाजजी बाजारपेठां-ााही यापुढे परवा-ाजी देज्यात येजार आहे, हे जरे आहे ज ाय,

(3) असल्यास, ृ षि उत्पन्न बाजार समितीबरोबर राज्यात जाजजी बाजारपेठां-ाा शास-ाा-ो परवा-ाजी दिल्या-ो शास-ा संचालित ृ षि उत्पन्न बाजार समित्यांचे अस्तित्व टिजू-ा राहजार -ााही, हेही जरे आहे ज ाय,

(4) तसेच ज ेंद्रीय ृ षी विभाजा-ो ृ षी उत्पन्न बाजार समिती विषयी -ावी-ा प्रस्ताव राज्य शास-ााज डे पाठविला आहे, हे जरे आहे ज ाय,

(5) असल्यास, उक्त प्रस्तावाची राज्य शास-ाा-ो छा-ा-ी ज ेली आहे ज ाय, असल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप ज ाय आहे व त्या-ाुसार पुढे ज ाय ज ार्यवाही ज ेली वा ज रज्यात येत आहे ?

**श्री. हर्षवर्ध पाटील** : (1) -ााही. तथापि, ज ाही बाजार समित्या प्रादेशिज ज िंवा विभाजीय स्तराच्या ज रजेबाबत प्रचलित ज ायद्यात दुरुस्ती प्रस्तावित आहे.

(2) प्रस्ताव विचाराधी-ा आहे.

(3) -ााही.

(4) होय.

(5) ज ेंद्र शास-ाा-ो मॉडेल ॲक्टचा मसुदा राज्य शास-ाास पाठविला आहे व त्या-ाुसार प्रचलित ज ायद्यात ज ाही बदल पावसाळी अधिवेश-ाातच प्रस्तावित आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : माननीय सभापती महोदय, या प्रश्नाला नामदार मंत्र्यांनी जे उत्तर दिलेले आहे ते होकारार्थी आहे तसेच नकारार्थी देखील आहे, म्हणजे नरो वा कुंजरो वा अशा प्रकारचे आहे. या ठिकाणी आमचा प्रश्न अतिशय स्पेसिफिक आहे. या प्रश्नाला उत्तर देताना प्रथमत: 'नाही' असे म्हटले आहे आणि पुढे त्याला जोडूनच म्हटलेले आहे की, '...तथापि, काही बाजार समित्या प्रादेशिक किंवा विभागीय स्तराच्या करणेबाबत प्रचलित कायद्यात दुरूस्ती प्रस्तावित आहे.' म्हणजे काय आहे ? याचा अर्थ असा आहे की, जो प्रश्न आम्ही विचारला आहे त्याला 'होय' असेच उत्तर आहे. परंतु त्याला 'परंतुक' जोडून तुम्ही आपला उद्देश स्पष्ट केला आहे. शासनाचे जे धोरण आहे ते स्पष्टपणे मांडण्याला शासनाला दलाल, अडते, शेतकरी वगैरेंची काळजी वाटते का ? याचा खुलासा माननीय मंत्र्यांनी प्रथम करावा.

...... के 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7044 ....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, यामध्ये सरकारची भूमिका स्पष्ट आहे. या संदर्भात केंद्र सरकारने जी सहानी समिती गठित केली होती त्यानंतर 2003 साली केंद्र सरकारने एक नवीन मॉडेल ॲक्ट मान्य करून देशातील सर्व राज्यांना मान्यतेसाठी आणि अमलबजावणीसाठी पाठविला. त्याप्रमाणे देशातील दोन राज्ये वगळता बाकी 16 राज्यांनी अमलबजावणी सुरू देखील केली आहे आणि बाकी राज्यांमध्ये अमलबजावणीच्या दृष्टीने कारवाई सुरू आहे. बिहार आणि झारखंड या राज्यांनी मात्र हा मॉडेल ॲक्ट मान्य केलेला नाही. आपल्या राज्यामध्ये देखील या बाबतीत मंत्रिमंडळाने निर्णय दिलेला आहे आणि त्यानुसार हा मॉडेल ॲक्ट बाबतचे विधेयक आपण या अधिवेशनातच टेबल करणार आहोत. त्यामुळे या रिजनल एपीएमसी संबंधात ही दुरूस्ती आहे.

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, या ठिकाणी वारंवार ठाणे, नवी मुंबईतील कृषी उत्पन्न बाजार समितीची मागणी होते आहे. ठाणे जिल्हा हा फार मोठा जिल्हा आहे आणि त्यातील डहाणू येथून येणारा जो कृषी माल आहे तो तेथील शेतकऱ्यांना नवी मुंबईला आणावा लागतो आणि त्यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात वाहतूक खर्चाचा बोजा सहन करावा लागतो. तेव्हा आता आपण हे जे विधेयक आणणार आहात ते या पावसाळ्यात.. म्हणजे पावसाळी अधिवेशनात आणणार आहात का ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, पावसाळ्यात नाही तर या पावसाळी अधिवेशनामध्ये निश्चितपणे हे विधेयक आपण येथे आणणार आहोत.

( यानंतर श्री. जागडे ..... एल 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, अपेक्षा अशी होती की, आपले हे विधेयक मान्य होईपर्यन्त त्या ठिकाणी तेथील शेतक-यांची जी मागणी आहे तसेच आज शेतक-यांना जो त्रास होत आहे, तो दूर करण्यासाठी पश्चिम उपनगरासाठी कोणती व्यवस्था करण्यात येणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नवी मुंबई मार्केट कमिटी स्थापन झाल्यानंतर बोरीवली आणि पश्चिम उपनगरातील शेतक-यांना आपला माल नवी मुंबई मार्केट कमिटीमध्ये आणण्यासाठी बरेच लांबवरुन यावे लागते. पश्चिम उपनगरासाठी त्या परिसरात नवीन मार्केट यार्ड स्थापन होण्याची मागणी सतत येत होती. त्या बाबत अनेक बैठका झाल्या. शासनाने नवी मुंबईत मार्केट यार्ड स्थापन केल्यानंतर पाच वर्षापर्यन्त कोणताही बदल करावयाचा नाही, असे ठरविले होते. ती पाच वर्षे आता संपली आहेत. सभापती महोदय, डोंबिवली आणि कल्याणच्या मध्ये बोपेगाव नावाचे एक गाव आहे. त्या ठिकाणी शासनाची 90 एकर जागा आहे. ॲग्रीकल्चरल मार्केट बोर्डाच्या माध्यमातून नवीन टर्मिनल त्या ठिकाणी उभारणार आहोत. तसा निर्णय शासन करीत आहे. त्याचबरोबर त्याच परिसरात मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात जर जागा उपलब्ध असेल तर नवीन एपीएमसी काढण्यासाठी कोणतीही अडचण नाही. नवीन एपीएमसीबाबतचा प्रस्ताव आल्यानंतर त्या प्रस्तावाला मान्यता देण्याचा निर्णय घेतला जाईल.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वरुड तालुक्यातील भूगर्भिय पाण्याच्या अतिशोषीत भागासाठी**

**वर्धा डायव्हर्शन कॅनॉल प्रज ल्प**

**(५) * ५५९१ श्री. नतिकोद्दीन खतिब , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक १७९७ ला दि‍ांक २८ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स-न १९९५ मध्ये ज्ेंद्र शासनाच्या भूजल सर्वेक्षण विभागाने सखोल अभ्यास करुन वरुड तालुक्याचा जो भूभाग भूगर्भिय पाण्याचा अतिशोषित भाग म्हणून जाहिर केलेला आहे त्याला लाभदायक ठरणाऱ्या वर्धा डायव्हर्शन (WRII Canal Project) कॅनॉल प्रकल्पाचा भाग असलेल्या पांढरी तलाव प्रकल्पास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्या तारखेला,

(३) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री.अजित पवार यांच्याकरिता** : (१) होय.

(२) दि-ांज १५/६/२००५

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. नतिकोद्दीन खतीब : सभापति महोदय, मैं आपके माध्यम से माननीय मंत्री महोदय को धन्यवाद देना चाहता हूँ कि उन्होंने पांढरी तलाव प्रकल्प को प्रशासकीय मान्यता दी है. लेकिन मेरी सूचना के अनुसार प्रशासकीय मान्यता के जी.आर. में ऐसा लिखा है कि पैसे की उपलब्धता होने के बाद काम शुरु होगा. इसलिए मेरा प्रश्न यह है कि क्या इस काम के लिए पैसे की उपलब्धता की गई है ? अगर पैसे की उपलब्धता की गई है तो कितना पैसा दिया गया है ? अगर पैसे की उपलब्धता नहीं की गई है तो आप कब तक पैसा देंगे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, साधारणत: या कामासाठी 180 कोटी रुपये लागणार आहेत. यामध्ये 135 हेक्टर वनक्षेत्र येत आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या वन विभागाची परवानगी घेण्याचे काम सुरु आहे. केंद्र सरकारने या बाबतची मान्यता मिळाल्यानंतर टेंडर काढून हे काम सुरु करण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, त्या परिसरात संत्र्यांचे पीक हे अतिशय महत्वाचे पीक आहे. जल सिंचन आयोगाने संत्रा या पिकाला अनन्यसाधारण महत्व दिले आहे. त्यांनी आपल्या अहवालाच्या परिच्छेद क्र. 12.8 मध्ये असे म्हटले आहे की, " अतिउपशामुळे भूजलामधील साठ्यामध्ये घट होऊन संत्रा हे पीक अडचणीत येत आहे. मोठ्या प्रकल्पाद्वारे कालवे चालवून त्याचा उपयोग भूजलाच्या साठ्यात वाढ करण्याच्या दृष्टीने काम करण्याची गरज आहे. जेणेकरुन संत्रा या नगदी पिकाला आधार मिळून त्याचा मोठ्या प्रमाणात विकास होऊ शकेल. " सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय या मताशी सहमत होतील. या प्रकल्पासाठी शंभर ते दीडशे एकर जमीन आहे. म्हणून या बाबतचा प्रस्ताव ताबडतोब केंद्राकडे पाठविणे आवश्यक आहे. हा प्रस्ताव किती दिवसात केंद्र शासनाच्या वन विभागाकडे पाठविला जाईल ? सभापती महोदय, हे काम करावयाचे असेल तर बजेटमध्ये यासाठी टोकन प्रोव्हीजन करणे आवश्यक आहे. माननीय सदस्य श्री. खतीब यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. त्यामुळे आता या प्रकल्पासाठी निधीची तरतूद केल्याशिवाय आपणाला हे काम करता येणे शक्य नाही. त्यासाठी आपण टोकन प्रोव्हीजन एक ते दोन महिन्यात करु शकतो. माझा या निमित्ताने असा प्रश्न आहे की, वन जमिनीचा प्रस्ताव आपण केंद्र शासनाच्या वन विभागाकडे पाठविला आहे काय ? अजून या बाबतचा प्रस्ताव पाठविला नसल्यास तो एक महिन्यात वन विभागाकडे पाठविण्यात येईल काय ? तसेच यासाठी लागणारी टोकन प्रोव्हीजन एक ते दोन महिन्यात केली जाईल काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, काही प्रकल्पाच्या बाबतीत वेगळेही टेंडर काढत असतो. त्याप्रमाणे टेंडर काढून आपण संबंधीत कंत्राटदाराला असे सांगतो की, या ठिकाणचा वन जमिनीचा प्रस्ताव त्यांनीच मार्गी लावावा. तशा प्रकारचे टेंडर या ठिकाणी काढण्यात येईल.

( यानंतर श्री. सरफरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 5591...

श्री. अजित पवार...

त्याशिवाय राज्य सरकार सुध्दा केंद्र सरकारच्या वन खात्याकडे यासबंधी पाठपुरावा करील. राज्य सरकारबरोबर संबंधित एजन्सी हे टेंडर घेईल त्यांनीही जर प्रयत्न केले तर हे काम लवकर मार्गी लागण्यास मदत होईल. ही बाब नागपूर विभागातील असली तरी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाच्या अखत्यारीत येत नाही. परंतु नागपूरच्या अधिवेशनामध्ये याकरिता टोकन प्रोव्हिजन करण्यासाठी प्रयत्न केले जातील. ही टोकन प्रोव्हिजन करण्यामध्ये जर अडचण आली तर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडून हे काम सुरु करण्यासाठी काही पैसे घेतले जातील. परंतु हे काम कोणत्याही परिस्थितीत थांबवू दिले जाणार नाही, ते सुरु करण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला आहे. महाराष्ट्राचा कॅलिफोर्निया संत्र्याच्या पिकामुळे विदर्भामध्ये निर्माण झ ाला आहे, परंतु परिस्थिती खूप वाईट आहे, पाण्याची पातळी बरीच खाली गेली आहे हे आपण मान्य केले आहे. आपण हेही मान्य केले आहे की, फॉरेस्ट क्लिअरन्सकरिता कन्सल्टंट किंवा कॉट्रॅक्टरकडून प्रयत्न करुन घेणार आहात. कारण दिल्लीची कामे ही सरकारच्या पाठपुराव्याशिवाय होत नाहीत. जोपर्यंत त्याठिकाणी कन्सल्टंट जात नाहीत आणि ते योग्यप्रकारची अर्थपूर्ण चर्चा करीत नाही तोपर्यंत त्याला यश येत नाही. अर्थपूर्ण म्हणजे महत्वाची चर्चा करीत नाहीत. माझी आपणाला एकच विनंती आहे की, हे काम करण्यासाठी तुम्हाला टेंडर काढण्यासाठी सर्व प्रकारची मान्यता मिळाली पाहिजे, प्रशासकीय मान्यता मिळाली पाहिजे, बजेट प्रोव्हिजन झाली पाहिजे. त्याशिवाय टेंडर काढू शकत नाही. ते टेंडर काढण्यापूर्वी ज्या ज्या प्रकारच्या मान्यता आवश्यक असतील त्या ताबडतोब दिल्या जातील आणि नागपूरच्या अधिवेशनाच्या आत हे टेंडर काढले जाईल असे आश्वासन आपण देणार काय?

श्री. अजित पवार : नागपूरचे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी टेंडर काढले जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पणन मंत्र्यांनी करावयाच्या निवेदनासंबंधी

**सभापती** : माननीय संसदीय कामकाज मंत्री व पणन मंत्र्यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, 12 जुलै रोजी या सभागृहामध्ये नियम 289 अन्वये प्रस्ताव देण्यात आला होता. व त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कापूस, आंबा वगैरे पिंकांच्या संदर्भात निवेदन करण्याची सातत्याने मागणी केली होती. परंतु 12 जुलै रोजी सदनाचे कामकाज लवकरच संपल्यामुळे आपणाकडून ते निवेदन करावयाचे राहून गेले. तेव्हा आजचे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी आपण त्यासंबंधीचे निवेदन करावे.

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन मंत्री) : सभापती महोदय, होय.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**महसूल राज्यमंत्र्यांनी दिलेल्या चुकीच्या उत्तरासंबंधी**

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, काल "संत बाप्टीस्ट चर्चच्या संदर्भात" ही जागा गार्डनसाठी रिझर्व्ह आहे काय? असा मी प्रश्न विचारला होता त्यावेळी माननीय महसूल राज्यमंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांनी "नाही" असे सांगितले. आता माझ्याकडे त्यासंबंधीचा पुरावा आहे. माझी विनंती आहे की, एवढया मोठया जागेचे रिझर्व्हेशन गार्डनसाठी असतांना मंत्रिमहोदयांनी "नाही" असे उत्तर दिले. ते उत्तर जर त्यांनी बरोबर दिले असते तर हा प्रश्न दुसरीकडे गेला असता. सभापती महोदय, हे पुरावे मी आपणाकडे पाठवितो. मी मंत्रिमहोदयांवर हेत्वारोप करीत नाही. परंतु या बाबतीत सभागृहाची दिशाभूल करणारी माहिती दिली गेल्यामुळे या प्रश्नाला अर्थ उरला नाही. सभागृहाची यामध्ये दिशाभूल झाली असल्यामुळे मंत्रिमहोदयांनी हे उत्तर दुरुस्त करुन ते पुन्हा सभागृहासमोर आणले पाहिजे. नाहीतर अशापध्दतीने यापुढे कुणी काहीही सांगेल आणि काहीही बोलेल?

**सभापती** : माननीय सदस्यांनी ती कागदपत्रे माझ्याकडे सुपूर्द करावीत, त्यासंबंधी जो काही निर्णय घ्यावयाचा आहे तो मी घेईन.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नाला मी "नाही" असे उत्तर दिले हे खरे आहे. त्यानंतर प्रतिप्रश्न विचारण्यात आल्यानंतर मी ही बाब तपासून घेईन, आणि त्या ठिकाणी अशाप्रकारचे आरक्षण असेल तर त्याची चौकशी केली जाईल असे मी सांगितले आहे.

श्री. नितीन गडकरी : तरमग मला जे उत्तर मिळाले आहे ते वेगळे मिळाले आहे. आज आपण सकाळ म्हणजे पहाट झाली म्हणायचे आणि अंधार झाला असेही म्हणायचे. यामधील नेमका अर्थ काय आहे?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती आली होती त्यानुसार मी उत्तर दिले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : माझा प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. मला जी माहिती मिळावयास पाहिजे होती ती मिळाली नाही. मला माननीय सभापतींकडून प्रश्न विचारण्यास अनुमती मिळाली त्यामुळे मी पहिला प्रश्न विचारला असता मंत्रिमहोदयांनी एक उत्तर दिले आणि दुसरा प्रश्न विचारल्यानंतर दुसरे उत्तर दिले. बेसिकली प्रश्नामध्ये बदल करण्याचा माझा अधिकार आहे...

**सभापती** : मी सभागृहाच्या कालच्या कामकाजाचे इतिवृत्त तपासून घेतो. आणि त्याच बरोबर जर गरज लागली तर माननीय सदस्यांना व मंत्रिमहोदयांना असे दोघांनाही दालनामध्ये बोलावून घेतो.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 14:05

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आपण कालची प्रश्नोत्तराची पुस्तिका वाचावे. त्या प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये देखील हेच दिलेले आहे आणि त्याच्या बाबतीत ऑब्जेक्शन निर्माण झालेले आहे.

**सभापती** : मी स्वत: या सर्व बाबी तपासून पाहतो आणि त्यामध्ये . . . .

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, या प्रश्नाच्या बाबतीत, त्यच प्रश्नपत्रिके मध्ये दुसरे उत्तर दिलेले आहे. ता.प्र.क्र.6791 "ठाणे येथील वर्तकनगर भागातील 10 एकर जमीन खिस्ती मिशनरी संस्थेने हडप केल्याबाबत" प्रश्न विचारलेला आहे.

**सभापती** : माझे म्हणणे असे आहे की, आपण याबाबतीतील कागदपत्रे माझ्याकडे द्यावी. त्यानुसार आवश्यकता वाटली तर मी तुम्हाला माझ्या दालनात बोलावून घेतो. सदनासमोर एखादी गोष्ट आणण्याची आवश्यकता असेल तर त्यादृष्टीने मी कारवाई करतो. सभापती या नात्याने एखादी गोष्ट सदनात चर्चा न होता जर तशीच रहात असेल तर ती येथे कोणत्या माध्यमातून आणावयाची ते मी पाहतो.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, एक महिन्यापूर्वी प्रश्न दिला जातो आणि त्याचे येथे अशा प्रकारे छापील उत्तर येते. याचा अर्थ याबाबतीत पुरेसा होमवर्क झालेला नाही. तेव्हा या प्रश्नाचे सुधारलेले जे उत्तर आहे, ते याठिकाणी यावयास हवे.

**सभापती** : सर्व कागदपत्रे पाहून मी याचा निर्णय देतो.

-----

. . . .एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रॉब्लेम आहे. आज विजेच्या लोड शेडींगसंदर्भात दोन्ही सभागृहामध्ये चर्चा ठेवण्यात आली आहे आणि या सभागृहामध्ये कोकणातील भारनियमनाच्या संदर्भात एक लक्षवेधी सूचना देखील ठेवण्यात आली आहे. याबाबतीत बहुतेक दोन्ही सभागृहामध्ये एकाच वेळी चर्चा सुरु होण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि ऊर्जा खात्याला राज्यमंत्री नसल्यामुळे दोन्ही सभागृहांमध्ये मलाच उत्तर द्यावे लागणार आहे. तेव्हा ऐनवेळी अडचण होण्याऐवजी माझी या सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी, शिवसेना पक्षाचे सर्व नेते, सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख आणि सत्ताधारी पक्षाच्या लोकांना आपल्या माध्यमातून विनंती आहे की, या सभागृहातील आज होणारी चर्चा वेगळया वेळेला किंवा जर उद्या ठेवली तर या प्रॉब्लेममधून मला बाहेर पडता येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मग आपल्या सभागृहाला काही महत्व रहात नाही. दोन्ही सभागृहे सारखी आहेत आणि हे उच्च सभागृह आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, I will leave this matter to the House.याबाबतीत सभागृहाने नोंद घ्यावी आणि हे सभागृह नेहमीच जेनरस राहीले आहे. या सभागृहाने मला नेहमीच ॲकोमोडेट केलेले आहे. अशा वेळी आज सुध्दा तुम्ही माझी निराशा करणार नाही याची मला खात्री आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण याबाबतीत निर्णय घेण्यापूर्वी मला आपणास विनंती करावयाची आहे. माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या समोर जो प्रश्न आहे, जी अडचण आहे , ती बरोबर आहे. कारण या विभागाला राज्यमंत्री नाही आणि दोन्ही याच विषयावर चर्चा असल्यामुळे, दोन्ही ठिकाणी एकाच वेळी त्यांना उत्तर देणे देखील अडचणीचे आहे. त्यांची जशी अडचण आहे, तसाच आमचा पॉईंट ऑफ प्रॉब्लेम असा आहे की, एखादा खालच्या सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर, त्यावर उत्तर दिल्यानंतर या सभागृहातील चर्चेला काही अर्थ उरत नाही. आम्ही यातून मार्ग काढू. शेवटी सामुहिक जबाबदारी आहे. पाहिजे तर आपण याठिकाणी लवकर चर्चा सुरु करु. त्यांना त्याठिकाणी . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, विधानसभेमध्ये लवकर चर्चा सुरु होईल अशी स्थिती आहे.



APR/MHM/SBT 14:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मग आम्ही रात्री उशीरापर्यंत थांबू. तुम्ही या सदनामध्ये नसलात तरी आम्ही ॲडजेस्ट करु. तुम्ही तुमच्या सहका-यांना मुद्दे लिहून घेण्यास सांगावे. पण या सभागृहामध्ये आजच चर्चा झाली पाहिजे.

**सभापती** : याठिकाणी माननीय ऊर्जामंत्र्यांनी पॉईंट ऑफ प्रॉब्लेम सांगितला आहे. त्यादृष्टीने असा एक मार्ग काढता येईल का ? ज्यामुळे माननीय मंत्री महोदयांना प्रॉब्लेम न येता, या सभागृहामध्ये चर्चा होईल. यादृष्टीने मार्ग काढण्याच्या बाबतीत दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची सहमती घेऊ.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मग विधानसभेतील चर्चा संपल्यानंतर मग या सभागृहामध्ये येण्याची मला अनुमती असावी. दरम्यान काळामध्ये सिनिअर मंत्री महोदय या चर्चेच्या संदर्भातील मुद्दे लिहून घेतील आणि त्यासंदर्भात उत्तर देता येईल. माझी दुसरी विनती आहे की, तिस-या क्रमांकावर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना ही कोकण किनारपट्टीत होत असलेल्या विजेच्या भारनियमनाच्या संदर्भातील आहे. तेव्हा तो विषय देखील या चर्चेमध्येच एकत्रित करण्यात आला तर ते सोयीचे होईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, नाही.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ठीक आहे.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : कोकणातील लक्षवेधी सूचना आहे. कोकणावर नेहमीच अन्याय होतो.

श्री.दिलीप वळसे-पाटील : खालच्या सभागृहात चर्चा सुरु होण्याच्या अवस्थेत येईल त्याचवेळेस येथे लक्षवेधी सूचना चर्चेस येणार आहे.

**सभापती** : आपल्याला अडचण येणार नाही. लक्षवेधी सूचना आणि अल्पकालीन चर्चा या दोन्हींवर चर्चा होईल यादृष्टीने काळजी घेतली जाईल .

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकडे ऊर्जा खाते, वैद्यकीय शिक्षण, तंत्र शिक्षण असे अनेक विभाग आहेत. त्यांना राज्यमंत्री कोणीही नाही. खरे म्हणजे अनेक राज्य मंत्री असे आहेत, की त्यांच्याकडे कामच नाही, ते चौपाटीवर फिरतांना दिसतात. त्यांच्यापैकी एका राज्यमंत्र्यांना नियुक्त करावे. त्यांना नियुक्त करायचे नसेल तर त्यांच्याच पक्षातील श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना बीन खात्याचे मंत्री म्हणून हे काम सोपवावे, ते त्यांना सहकार्य करतील. त्यांना लाल दिव्याची गाडी नको, बंगला नको ते त्यांना मदत करतील.

श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी सांगितले तसे करता येणार नाही. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी या संदर्भातील नोटस् घेऊन मंत्रीमहोदयांना त्या देऊ शकतील.

श्री.नितीन गडकरी : अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा आपला काही संबंध नाही. They are invisible. त्यांच्याशी आपले काही घेणे देणे नाही.

**सभापती** : सभागृहाच्या कामकाजाच्या संदर्भात सभापती ज्या पध्दतीने निर्णय देतील त्या पध्दतीने चालावे. मी या संदर्भाने अजून निर्णय दिलेला नाही.

श्री.नितीन गडकरी : कौन्सिल ऑफ मिनिस्टरचा संबंध आहे, त्यांच्यापैकी एक जण टाचण घेतील.

**The CHAIRMAN:** Any Hon. Minister can speak on behalf of the government.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्त्याच्या मुद्याबाबत.**

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय माझा औचित्त्याचा मुद्दा आहे. महाराष्ट्रातील नव्हे तर संपूर्ण देशातील बौध्द समाजातील लोकांचा संताप आणि उद्रेक होण्याची शक्यता आहे, अशी बाब मी औचित्त्याच्या मुद्याद्वारे निदर्शनास आणून देतो. अमेरिकेतील रिव्हर्साईड या शहरामध्ये महात्मा गांधीजींचा पूर्णकृती पुतळा बसविण्यात येणार आहे. या पुतळयाचे शिल्प नाशिक येथील श्री.मदन गर्गे यांनी तयार केलेले आहे. दोन दिवसापूर्वी दूरदर्शनवरील मराठी वाहिनीवरुन तयार केलेला पुतळा दाखविण्यात आलेला होता. सम्राट या वर्तमानपत्रामध्ये पुतळ्याचे छायाचित्र छापून आलेले आहे. पुतळा आक्षेपार्ह अशाप्रकारचा तयार केलेला आहे. गांधीजींच्या पायाच्या खाली भगवान बुध्दाचा पुतळा दाखविण्यात आलेला आहे. ही बाब अत्यंत विक्षिप्तपणाची आहे. ही बाब गांभीर्याने घेण्यासारखी आहे. अशाप्रकारची मूर्ती जर अमेरिकेच्या रिव्हर्साईड शहरामध्ये बसविली जात असेल तर महाराष्ट्रातील नव्हे, देशातीलच नव्हे तर जगातील बौध्द धर्मियांची भावना निश्चितपणे दुखावली जाईल. महापुरुषांची मूर्ती तयार करत असतांना कला संचालनालयाची परवानगी घ्यावी लागते, त्यांचे नो ऑब्जेक्शन सर्टिफिकेट घ्यावे लागते, तसे त्यांनी घेतलेले नाही. परंतु महात्मा गांधीजींचा पूर्णाकृती पूतळा नाशिक येथील श्री.मदन गर्गे या शिल्पकाराने बनविला. त्यामध्ये त्यांनी प्रमाद केलेला आहे, मोठी चूक केलेली आहे. बौध्द समाजातील लोकांच्या भावना पायदळी तुडविण्याचा त्यांनी प्रयत्न केलेला आहे, ही गंभीर अशाप्रकारची बाब आहे. यामुळे या राज्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. हा पुतळा अमेरिकेमध्ये पाठविण्यास कोणत्याही परिस्थितीत राज्य शासनाने परवानगी देऊ नये. नाशिकचे शिल्पकार श्री.मदन गर्गे यांनी बौध्द समाजाच्या भावना दुखविण्याचा प्रयत्न केलेला आहे, त्याबद्दल त्यांच्यावर कडक कारवाई करावी, अशी औचित्त्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

**सभापती** : मा.मंत्री श्री.अजित पवार साहेब आपण याची दखल घ्यावी. ही गंभीर बाब आहे. शासनाने याची संपूर्ण चौकशी करणे आवश्यक आहे. या संबधाने असा प्रकार झाला असेल तर ते प्रतिबंधित होणे गरजेचे आहे. यादृष्टीने शासनाने यामध्ये लक्ष घालावे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : कोणत्याही परिस्थितीत हा पुतळा अमेरिकेमध्ये जाता कामा नये. त्यामध्ये योग्य प्रकारे दुरुस्ती केली पाहिजे.

यानंतर कु.थोरात...

प्रा. जोगेंद्र कवाडे...

ज्यांनी कोणी अशा प्रकारच्या प्रतिकृतीला मंजुरी दिली असेल, भविष्यात कोणत्याही धर्माचा किंवा कोणत्याही महापुरुषाचा अवमान होणार नाही त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाणार नाहीत अशा प्रकारची सक्त ताकीद शासनाच्या वतीने देण्याची आवश्यकता आहे. तसेच अशा प्रकारचा महात्मा गांधींचा पुतळा अमेरिकेत जाता कामा नये.

श्री. रमेश निकोसे : ही अत्यंत गंभीर बाब आहे. महत्मा गांधीचा पुतळा बसविला गेला पाहिजे. ते रष्ट्रपिता आहेत. परंतु त्यांच्या पायाजवळ गौतम बुध्दांची प्रतिमा ठेवणे म्हणजे बौध धर्माच्या भावना चिरडल्यासारखे होऊन जाईल. दडपल्यासारखे होऊन जाईल. म्हणून कृपाकरुन गौतम बुध्दाची प्रतिमा बाजूला काढण्याची शासनाने कार्यवाही करावी, अशा प्रकारची विनंती आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जोगेंद्र कवाडे यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे त्यासंदर्भात शासन योग्य ती नोंद घेईल आणि संबंधितावर कारवाई करील.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. अजित पवार ( पाटबंधारे मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे सन 2003-2004 चे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** :महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे सन 2003-2004 चे लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**:अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

डॉ. अशोक मोडक (समिती प्रमुख ) महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करतो.

शुक्रवार दिनांक 15 जुलै, 2005 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणा-या अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 14 जुलै,2005 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांची दोन अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ आहेत त्यांना 10 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 140 मिनिटांचा वेळ खालीलप्रमाणे अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

1) श्री. संजय दत्त, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक -79 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

2) श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक- 61 45 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

3) श्री. जितेंद्र आव्हाड, वि.प.स., यांचा ठराव क्रमांक-23 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

**सभापती** :अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

डॉ. अशोक मोडक : महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे असा मी आपल्या अनुंमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : नियम 93 अन्वये सूचना.

**सभापती** : माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, विनोद तावडे, अनंत तरे व इतर वि.प.स. यांनी "दिनांक 12 जुलै, 2005 रोजी रत्नागिरी जिल्हयातील लोटे परशुराम येथील घरडा केमिकल्स कंपनीमध्ये रात्रीच्या सुमारास विषारी वायुगळतीमुळे दोन कामगारांचा झालेला मृत्यू." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**......

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे व इतर सन्माननीय सदस्य यांनी "ठाणे जिल्हयातील आदिवासी दलित व वंचित घटकांनी त्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत दिनांक 12.7.2005 रोजी काढलेला मोर्चा तसेच प्रलंबित प्रश्न न सुटल्यास आंदोलन करण्याचा दिलेला इशारा" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. शासनाने याबाबतीत गांभीर्याने लक्ष घालावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व इतर सन्माननीय सदस्य यांनी " जे.जे. रुग्णालय उड्डाणपुलावर काल सायंकाळी बस व ॲम्बेसिडर गाडीचा झालेला भीषण अपघात, मुंबईतील वाहतूक प्रश्नाबाबत मार्ग काढण्याची आवश्यकता" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. शासनाने याबाबतीत निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपिकिशन बजोरीया यांनी "अकोला जिल्हयातील मलकापूर येथील शासनाने भूसंपादित केलेल्या जमिनी परत करताना मूळ मालकांना डावलण्यात येणे, तसेच या जागेवर जुलै, 2005 मध्ये अतिक्रमण होण्याची शक्यता" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. याबाबत शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. मधु चव्हाण व इतर सन्माननीय सदस्य यांनी " मुंबईत गल्लीबोळात राजरोसपणे सुरु झालेल्या ऑन लॉटरी व्यवसायामुळे संपूर्ण तरुण पिढी तसेच कुटुंब उध्वस्त होण्याचा निर्माण झालेला धोका" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. याबाबत शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी व इतर सन्माननीय सदस्य यांनी "भारतीय अध्यापक महासंघाने तबलावादक शिक्षक आणि कलावंतांच्या वैयक्तिक प्रलंबित मागण्यासंदर्भात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**मा.सभापती** ....

दिनांक 14.7.2005 पासून ओरंगागाद येथे सुरु केलेले उपोषण" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. याबाबत शासनाने निवेदन करावे असे निदेश देऊन मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत व इतर सन्माननीय सदस्य यांनी " माहे जुलै, 2005 च्या दरम्यान रायगड जिल्हयातील महाड औद्योगिक कारखान्याचे रसायनमिश्रित सांडपाणी नदीच्या पात्रात सोडल्यामुळे नदीतील मासे मरण पावणे" याबाबत नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात लक्षवेधी सूचना द्यावी. मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

नियम 93 अन्वये देण्यात आलेल्या इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सलमान खान यांनी ऐश्वर्या राय यांना दाऊदच्या मुलीच्या लग्नाच्या पार्टीला ये नाही तर लक्षात ठेव अशी धमकी दिलेली आहे. याबाबत आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे.

**सभापती** : ती सूचना मी दालनात नाकारलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्याला सूचना नाकारण्याचा अधिकार असला तरी यामध्ये दाऊद आणि सगळया गोष्टी इन्व्हॉल्व आहेत....

**सभापती** : आपण दालनात यावे. आपण बोलू आणि मार्ग काढू.

-----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

**पृ. शी.** : स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित न होणे.

**मु. शी.** : स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित न होणे याबाबत श्री रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर व डॉ. अशोक मोडक, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे ( ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते, श्रीमती संजीवनी रायकर व डॉ. अशोक मोडक यांनी "स्थानिक स्वराज्य संस्थांमधील उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना सुधारित वेतनश्रेण्या लागू करण्याबाबतचा शासन निर्णय निर्गमित न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी शिक्षण क्षेत्रातील कर्मचाऱ्यांवर अन्याय करण्याचा आणि गेल्या पाच वर्षापासून ज्या प्रश्नासाठी संघर्ष चालू आहे त्याला परत एकदा पाने पुसण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये उच्च माध्यमिक शिक्षकांना रु. 6500 ऐवजी रु. 7225 ही सुधारित वेतनश्रेणी दिनांक 3 जून 2000 च्या शासन निर्णयाप्रमाणे लागू करण्यात आलेली आहे. परंतु ज्या जिल्हा परिषदेच्या उच्च माध्यमिक शाळा आहेत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उच्च माध्यमिक शाळा आहेत त्या ठिकाणी पूर्णवेळ काम करणाऱ्या शिक्षकांना ही वेतनश्रेणी लागू करण्यात आलेली नाही. यासंदर्भात अनेक वेळा चर्चा झाली. 20 जानेवारीला माननीय ग्रामविकास मंत्र्यांबरोबर चर्चा झालेली आहे. त्यांच्याबरोबर बैठक झालेली आहे. 15 दिवसांमध्ये याचा अंतिम निर्णय देतो असे ठरलेले असतानाही या ठिकाणी दिलेल्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "प्रयत्न चालू आहेत". याबाबत लवकरात लवकर म्हणजे हे अधिवेशन संपण्यापूर्वी आपण यासंदर्भातील निर्णय जाहीर करणार आहात काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आणि सन्माननीय मंत्रिमहोदय यांची बैठक झाल्यानंतर त्या बैठकीमध्ये याला मान्यता द्यावयाची असे ठरले होते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

पण जवळजवळ 1 कोटी 13 लाख इतका आर्थिक भार पडणार आहे. त्यामुळे हा प्रश्न वित्त विभागाकडे गेला होता. मा.वित्त मंत्र्यांनी तात्पुरती मान्यता दिलेली आहे. आम्ही लवकरात लवकर करु. ग्रामविकास विभागाने तत्वत: मान्य केलेले आहे. परंतु याला वित्त विभागाच्या मंजुरीची गरज आहे. यासंबंधी मा.वित्त मंत्र्यांबरोबर बोलणी चालू आहेत, त्यांनी तत्वत: मान्यता दिलेली आहे. आम्ही लवकरात लवकर करु.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, तत्वत: मान्यतेला काही अर्थ नाही. ही सभागृहाची दिशाभूल आहे. आम्ही हे देणार आहोत असे मंत्रिमहोदय याठिकाणी काही बोलत नाहीत. त्या खाजगी बैठकीतून 15 दिवसांचा वायदा करता आणि सभागृहातून पळ काढता ? हे बरोबर नाही. 15 दिवसात देऊ असे त्याठिकाणी मान्य केलेले आहे ना ? तेथे तत्वत: असे म्हटलेले नाही. 15 दिवसामध्ये निर्णय घेऊ असे म्हटले असताना आता तत्वत: असा नवीन शब्दप्रयोग समाविष्ट करावयाचा ही शुध्द फसवणूक नाही का ? हे बरोबर नाही. विधिमंडळाच्या बाहेरच्या समित्या होतात, त्यांना महत्व दिले जात आहे, तेथे एक आश्वासन द्यावयाचे आणि येथे मात्र दुसरे शब्द वापरावयाचे ? याठिकाणच्या उत्तराला महत्व आहे. आपण येथे आश्वासन दिले की, आपल्याला आश्वासन समिती विचारणार आहे याची आपल्याला पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे आता जाणीवपूर्वक तत्वत: असे म्हणत आहेत. आपण त्याठिकाणी जे उत्तर दिलेले आहे त्याप्रमाणे या लोकांना न्याय देणार आहात की नाही ? आम्हाला तत्वत: अशाप्रकारचे उत्तर नको तर व्यावहारिक उत्तर पाहिजे.

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, ही मागणी नैसर्गिक न्यायाला धरुन असल्यामुळे विभागासमोर हा प्रश्न असून त्याबाबत विभागाचा सकारात्मक दृष्टीकोन आहे. या विषयासंबंधी मा.वित्त मंत्र्यांबरोबर माझी चर्चा झालेली आहे, त्यांनी देण्याचे मान्य केलेले आहे, फक्त कालावधी आता सांगता येणार नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : ही मागणी तत्वत: मान्य असल्याचे मंत्रिमहोदयांनी आताच सांगितले आहे. खरे म्हणजे हा प्रश्न यापूर्वी 5-7 वेळा आलेला आहे. त्यावेळी एकदा एक महिन्यात, नंतर दोन महिन्यात आणि एकदा तर 15 दिवसात करतो असे सांगितलेले आहे. मा.श्री.आर.आर.पाटील

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ MHM/

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे....

हे ग्रामविकास मंत्री असताना वित्त विभागाचे सचिव, ग्रामविकास विभागाचे सचिव, शालेय शिक्षण विभागाचे सचिव आणि आमचे प्रतिनिधी यांच्याबरोबर चर्चा झाली त्यावेळी स्पष्टपणे सांगितले होते की, हा प्रश्न मंत्रिमंडळासमोरही नेण्याची आवश्यकता नाही. कारण शालेय शिक्षण विभागाकडील सर्व शिक्षकांना दिले आहे, नगरपालिकेच्या शिक्षकांना देण्यात आलेले आहे. फक्त 450 शिक्षकांचा हा प्रश्न आहे आणि तेही केवळ मराठवाडा आणि विदर्भातील हे शिक्षक आहेत. त्यांच्याबाबत हा भेदभाव केला जात आहे. तुम्ही 1.25 लाख शिक्षकांना दिले आहे, 450 शिक्षकांना देणे हा मोठा प्रश्न नाही. तुम्ही यापूर्वीही आश्वासन दिलेले आहे त्याचे पालन करावे. यासंबंधी एकदा एक महिन्यात, नंतर दोन महिन्यात आणि नंतर 15 दिवसात करु असे आश्वासन दिलेले आहे. सभागृहात दिलेली आश्वासने पाळावयाची नसतील तर ती देऊ तरी नका. हा सभागृहाचा अपमान आहे. यासंबंधी एक किंवा दोन महिन्यात पॉझिटिव्ह निर्णय घेतला जाईल काय ?

श्री.रणजित कांबळे : एका बाजुने हे सांगितले जाते की, कालावधी सांगा आणि दुस-या बाजुला सांगितले जाते की, दिशाभूल करु नका. सभापती महोदय, 20 जानेवारीला....

( विरोधी पक्षातील अनेक मा.सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : या प्रश्नावर सभागृहामध्ये यापूर्वी 3-4 वेळा आश्वासने दिलेली आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दिनांक 20 जानेवारी, 2005 रोजी मा.ग्रामविकास मंत्र्यांच्या कार्यालयामध्ये एक बैठक झाली त्या बैठकीला वित्त विभागाच्या उप सचिव श्रीमती शुभदा कारेकर हया देखील उपस्थित होत्या.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विनोद तावडे ...)

बैठकीचे मिनिटस् मी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "श्रीमती शुभदा कारेकर यांनी या प्रकरणी 15 दिवसात अंतिम निर्णय घेण्यात येईल असे सांगितले." मंत्र्यांच्या दालनात झालेल्या बैठकीला काही अर्थ नाही काय ?

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : या संदर्भात विभागाची भूमिका स्पष्ट आहे. हे दिले गेले पाहिजे आणि त्याबाबतीत दुमत असण्याचे कारण नाही. तांत्रिक गोष्टींची पूर्तता करण्यासाठी प्रकरण वित्त विभागाकडे पाठविलेले आहे. मा. अर्थमंत्र्यांशी मी बोललो असून त्यांनी देण्याचे मान्य केलेले आहे. ते बाहेरगावी गेलेले आहेत. ते आल्यानंतर याप्रकरणी आम्ही कार्यवाही करु.

श्री. पांडुरंग फुंडकर : याप्रकरणी वित्त विभागाने मान्यता दिलेली आहे. मा.सदस्यांनी मिनिटस् देखील याठिकाणी वाचून दाखविले आहेत. 15 दिवसात अंतिम निर्णय करण्यात येईल असे सांगितलेले असताना आता जुलै महिना सुरु आहे. यासाठी आणखी किती दिवस घेणार आहात ? मा मंत्री महोदय निश्चित कालावधी का सांगत नाहीत ?

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : टाईम बाऊण्ड आश्वासन देणे आवश्यक आहे.

श्री. रणजिंत कांबळे : तीन महिन्याच्या आत करुन देऊ...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : 3 जून 2000च्या जी.आर.प्रमाणे 3 महिन्यामध्ये अंमलबजावणी केली जाईल काय ?

**सभापती** : हा प्रश्न नैसर्गिक न्यायाला धरुन आहे हे मा.मंत्री महोदयांना मान्य आहे. राज्यामध्ये एका विभागातील शिक्षकांना वेतनश्रेणी लागू केलेली आहे आणि दुस-या विभागातील शिक्षकांना ती लागू केलेली नाही. यासंदर्भात मा. वित्त मंत्र्यांशी चर्चा झालेली असून त्यांनी अनुकूल मत दिलेले आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले. जानेवारी महिन्यामध्ये झालेल्या मिटींगमध्ये उप सचिव किंवा अन्य कोणी अधिका-याने एखादी गोष्ट सांगितली म्हणजे ती वित्त विभागाने सांगितली असे मानायला मी तयार नाही. काल मा. अर्थमंत्र्यांशी चर्चा झाली असे आता मा. मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे. तेव्हा माझे असे निदेश आहेत की, येत्या महिन्यामध्ये याप्रकरणी पॉझिटिव्ह निर्णय घ्यावा.

श्री. विजयसिंह मोहिते-पाटील : होय.

--

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : सी.ई.टी. परीक्षेस बसण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायन शास्त्र आणि गणित विषयात 50टक्के गुण मिळविण्याची अट रद्द करणे

**मु.शी** : सी.ई.टी.परीक्षेस बसण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायन शास्त्र आणि गणित या विषयात 50 टक्के गुण मिळविण्याची अट रद्द करणे याबाबत प्रा.शरद पाटील व श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुरेश शेट्टी ( उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, प्रा.शरद पाटीव व श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी " सी.ई.टी.परीक्षेस बसण्यासाठी भौतिकशास्त्र, रसायन शास्त्र व गणित विषयात 50 टक्के गुण मिळविण्याची अट रद्द करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शरद पाटील : राज्यातील विद्यार्थ्यांच्या अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशावर विपरित परिणाम होऊ नये म्हणून सी.ई.टी. परीक्षेमध्ये किमानप 50 टक्के गुण मिळाले पाहिजेत अशा प्रकारची अट शिथिल करण्यात आलेली आहे असे निवेदनामध्ये म्हटलेले आहे. परंतु 12वीच्या परीक्षेमध्ये शास्त्र आणि गणित या विषयामध्ये किमान 50 टक्के गुण मिळाल्या शिवाय सी.ई.टी. परीक्षेस बसता येणार नाही अशी अट असल्यामुळे 50 टक्क्या पेक्षा कमी गुण मिळणा-या विद्यार्थ्यांवर अन्याय होणार आहे. त्यांना सी.ई.टी.ला बसता येणार नाही. म्हणून 12वीच्या परीक्षेमध्ये किमान 50 टक्क् गुण मिळविण्यासंबंधी घातलेली अट रद्द करावी अशी आमची मागणी आहे. यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे ?

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी :सभापती महोदय, उत्तरामध्ये स्पष्ट नमूद करण्यात आलेले आहे की, या संदर्भात सुप्रीम कोर्टाने 14 फेब्रुवारी, 2004 रोजी आदेश दिलेले आहेत. दिनेश मेहता व्हर्सेस स्टेट ऑफ महाराष्ट्र अशी केस सुप्रीम कोर्टात होती. त्यावेळी सुप्रीम कोर्टाने असा आदेश दिला आहे की, फिजिक्स,केमिस्ट्री आणि गणित या विषयामध्ये ज्यांना 50 टक्के गुण आहेत त्या विद्यार्थ्यांनाच सी.ई.टी. परीक्षेस बसण्याची परवानगी द्यावी. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करुन आम्ही जी.आर.काढला आहे. आता जे विद्यार्थी बसतात आणि त्यांना पूर्वी जी 50 टक्क्याची अट होती ती काढून टाकलेली आहे. जे विद्यार्थी सी.ई.टी. परीक्षेस बसलेले व त्यात जे विद्यार्थी मेरीटमध्ये आलेले आहेत या सर्व विद्यार्थ्यांना महाराष्ट्रामध्ये इंजिनिअरींग कॉलेजमध्ये प्रवेश मिळणार आहे.

श्री. जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, या ठिकाणी मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. इयत्ता 12 मध्ये विद्यार्थ्यांसाठी पी.सी.एम.ची 50 टक्क्यांची अट घातलेली आहे त्यामुळे विद्यार्थ्यावर अन्याय झालेला आहे....

श्री. सुरेश शेट्टी : सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे आम्ही जी.आर.काढलेला आहे.

श्री.जी.एल.ऐनापुरे : या ठिकाणी सुप्रीम कोर्टाचा संदर्भ देण्यात येत आहे. सभापती महोदय, मी या सभागृहात सांगू इच्छितो की, कर्नाटक राज्यात आपल्याकडील पध्दतीपेक्षा उलट पध्दत आहे. कर्नाटक राज्यात 40 टक्के 45 टक्के गूण असणा-या विद्यार्थ्यांना सी.ई.टी.च्या परीक्षेला बसता येते. देशातील इतर काही राज्यांनी तर या सी.ई.टी.च्या परीक्षेस बसण्याची अटच ठेवलेली नाही. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, सी.ई.टी.कडे विद्यार्थ्यांनी लक्ष दिल्यामुळे राज्यातील ब-याच विद्यार्थ्यांनी 12 वी च्या परीक्षेकडे दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे सी.ई.टी. परीक्षेचे महत्व वाढले आहे. परंतु या ठिकाणी एकदम उलट निर्णय झाल्यामुळे अनेक पात्र विद्यार्थ्यांना सी.ई.टी.साठी बसता आलेले नाही. इयत्ता 12 वी मध्ये जास्त गुण मिळवून देखील काही विद्यार्थी सी.ई.टी.मध्ये नापास झालेले आहेत. सी.ई.टी. आणि 12 वी परीक्षा या संदर्भात सुप्रीम कोर्टाच्या आदेशामुळे गोंधळ चालला आहे. सुप्रीम कोर्टाचा आदेश काही राज्यानी नाकारला. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाच्या बाबतीत शासनास काही फेरविचार करता येईल काय ?

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री. सुरेश शेट्टी : सुप्रीम कोर्टाने फेब्रुवारी महिन्यात निर्णय दिलेला आहे. त्यानंतर लागलीच शासनाने यासंदर्भातील जी.आर.काढलेला आहे. सी.ई.टी. परीक्षेस बसण्यासाठी ----2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

पी.सी.एम.मध्ये 50 गुण आवश्यक आहेत अशा प्रकारची इयत्ता 12 वी मधील विद्यार्थ्यांना कल्पना होती.

श्री. जी.एल.अैनापुरे : याबाबतीत माझा मूळ प्रश्न असा होता की, यासंदर्भात सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. परंतु कर्नाटक राज्याने सी.ई.टी. परीक्षेस बसण्यासाठी खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी 45 टक्के गुण व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी 40 टक्के गुण असले पाहिजेत अशा प्रकारची अट ठेवलेली आहे. आपल्या येथील विद्यार्थ्यांना परीक्षा देण्यासाठी तिकडे जावे लागले आहे. माझ्याकडे यासंदर्भातील एक पत्र आहे ते माननीय मंत्र्यांना हवे असेल तर देण्यास तयार आहे. पत्राचा रेफरन्स या ठिकाणी वाचून दाखवू काय ?

श्री. सुरेश शेट्टी : कर्नाटक राज्यात प्रवेश देण्याची पध्दत कशी आहे, हे शिक्षण घेण्यासाठी त्या राज्याने काय निकष ठरविलेले आहेत याची मला माहिती नाही. परंतु  या संदर्भात सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे तो स्पेसिफीक निर्णय मी वाचून दाखविण्यास तयार आहे. "This is pertaining to Government of Maharashtra." या आदेशाची आम्हाला महाराष्ट्र राज्यामध्ये अंमलबजावणी करावी लागली. या अनुषंगाने आम्ही जी.आर.सुध्दा काढलेला आहे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय आल्यानंतर आम्हाला रिव्हाईज जी.आर.काढावा लागला आहे. आवश्यकता असेल तर सुप्रीम कोर्टाने नेमके काय म्हटले आहे तेवढा पोर्शन मी वाचून दाखवू शकतो.

**उपसभापती** :  निवेदन तिसरे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय..

**उपसभापती** : आपण निवेदनावर दोन तीन प्रश्न विचारण्याची संधी देतो. त्याप्रमाणे बरेच प्रश्न विचारण्यास संधी देण्यात आलेली आहे. आता तिसरे निवेदन चर्चेला घेण्यात येईल.

---------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : घाटघर येथे बोगद्यावर डोंगराचा भाग कोसळल्याने कामगार मृत्यूमुखी पडणे.

**मु. शी.** : घाटघर येथे बोगद्यावर डोंगराचा भाग कोसळल्याने कामगार मृत्यूमुखी पडणे याबाबत सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील,अनंत तरे वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.सुनील देशमुख ( जलसंपदा,लाभक्षेत्र राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील,अनंत तरे यांनी "घाटघर येथे बोगद्यावर डोंगराचा भाग कोसळल्याने कामगार मृत्युमुखी पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या ठिकाणी घाटघर धरणामध्ये जे काम चालले होते त्यावेळी सतत पाऊस पडत होता. त्या ठिकाणी पाऊस बंद होणार नाही अशी शक्यता निर्माण
झाली असतानाही तेथे उपस्थित असलेल्या अधिका-यांनी तेथील काम बंद का केले नाही ?

यानंतर श्री.कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 14:40

श्री. जयंत प्र.पाटील....

सभापती महोदय, हे काम आर.जे.शहा नावाच्या ठेकेदाराने केलेले आहे आणि या कामाचे चार तुकडे पाडण्यात आले ही गोष्ट खरी आहे काय ? 100 मीटरच्या कामाचे 4 तुकडे पाडण्यात आले आणि सुशिक्षित बेरोजगारांच्या नावाखाली हे काम त्याच ठेकेदाराला दिले गेले. या कामाबद्दल महालेखापालांनी आक्षेप घेतलेले आहेत आणि हे काम बरोबर झालेले नाही असे मत नोंदविले आहे. कामाचे तुकडे पाडलेले आहेत आणि काम योग्य प्रकारे टेंडर न काढता दिलेले आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, हे काम टेंडर काढूनच ठेकेदाराला देण्यात आले होते. टेंडरमधील सगळया बाबी तपासून घेऊन 9 टक्के बिलो दराने हे काम देण्यात आले होते आणि काम अत्यंत चांगले झालेले आहे. या कामाच्या सगळया चाचण्या घेण्यात आल्या आणि त्याचे रिझल्ट चांगले आलेले आहेत. हे काम बिना टेंडरने देण्यात आलेले नसून टेंडर काढूनच ठेकेदाराला काम देण्यात आले होते.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, महालेखापालांनी या कामाच्या टेंडर पध्दतीवर आक्षेप घेतलेले आहेत. हे काम बरोबर झालेले नाही. टेंडर चुकीच्या पध्दतीने काढले गेले आणि विशिष्ट ठेकेदाराला काम देण्यासाठी टेंडर काढण्यात आले होते. याबाबत महालेखापालांनी आक्षेप घेतले ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, ही घटना अतिशय दुर्दैवी घटना आहे. आपण देखील त्याठिकाणी भेट दिली होती. मा.सदस्य श्री. तावडे साहेबांनी भेट दिली. आम्ही सर्व जण या भागामध्ये गेलो होतो. ही घटना पाहिल्यानंतर कडयाच्या खालचा भाग जो ढासळला आहे तो ढासळण्याचे काही कारण नव्हते. कारण कडयाखाली गवत आणि झाडी आहे. परंतु ही सर्व घटना अचानक झालेली आहे. मा.सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी माहिती देताना सांगितले की, कामामध्ये काही त्रुटी राहिल्या आहेत. सभापती महोदय, जवळपास 1186 कोटी रुपयांचा हा प्रकल्प त्यावेळी मंत्रिमंडळाने जाणीवपूर्वक मंजूर केला. या प्रकल्पातून 250 मे.वॅ. वीज निर्माण होणार आहे. या बोगद्याचे काम आर.जे.शहा यांना देण्यात आले होते. या कंपनीने आतापर्यंत पेंच,भंडारदारा इ. ठिकाणी चांगल्या प्रकारचे आणि दर्जेदार काम केलेले आहे. याचे समर्थन

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ SBT/ MHM/ 14:40

श्री. अजित पवार....

करण्याचे काही कारण नाही परंतु वस्तुस्थिती मी सदनासमोर सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. विद्युतगृहाचे आणि छोटया-मोठया धरणाचे काम पटेल इंजि. कंपनीने केलेले आहे. या कंपन्या गुजरात,जम्मू-काश्मिर,हिमाचल प्रदेश आणि आंधप्रदेश याठिकाणी सुध्दा काम करीत आहेत. जवळपास 7.2 कि.मी.लांबीचे 22 बोगदे या कंपनीकडून करण्यात आलेले आहेत. ज्या दिवशी एवढी मोठी घटना घडली त्यानंतर 26000 क्यूबिक मीटर मलबा काढण्याचे काम चालू झालेले आहे. हे सगळे काम होत असताना मशिनरी त्याठिकाणी जात आहे. विभागाचे सचिव,मुख्य अभियंता यांनी भेट दिलेली आहे. स्थानिक आमदार श्री. महादू बरोरा या घटनास्थळी 12 दिवस बसून आहेत. काम करीत असताना स्थानिक प्रश्न निर्माण होऊ नयेत आणि कोणती अडचण निर्माण होऊ नये अशा पध्दतीने लक्ष देण्यात आले आहे. मलबा काढण्याचे काम चाललेले आहे. आतमध्ये गाडी जात आहे. हे सर्व पाहिल्यानंतर कोणत्याही परिस्थितीमध्ये हे काम खराब झालेले नाही. चांगल्या प्रकारची गुणवत्ता या कामाची आहे. या कामाचे कोणत्याही प्रकारचे तुकडे पाडण्यात आलेले नाहीत. घटना घडली त्यादिवशी बाहेर भरपूर पाऊस पडत होता. माझ्या माहितीप्रमाणे 20 इंच पाऊस पडला होता.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ..

या घाटघर प्रकल्पाच्या पलीकडे भंडारदरा धरण आहे.आणि जेथे ही घटना घडली तो परिसर अलीकडे आहे.या प्रकल्पाचे काम चालू असतांना काही भाग ढासळला आणि त्यामुळे बाहेर जाणारे पाणी अडले गेले. हे पाणी उलटया मार्गाने आत मध्ये शिरले. आतमध्ये मजूर काम करीत होते त्यातील काही मजूर इतर राज्यातील होते तर काही मजूर आपल्या राज्यातील ठाणे,शहापूर या परिसरातील होते . या मध्ये अडकलेल्या मजुरांना बाहेर काढण्याचा प्रयत्न ज्युनिअर इंजिनिअर्सनी आणि बाकीच्या लोकांनी केला होता. त्यांनी गाडी आतमध्ये नेली आणि काही मजुरांना बाहेर काढले त्यानंतर त्यांनी दुस-या वेळीसुध्दा हा प्रयत्न केला होता परंतु समोरुन पाणी आल्यामुळे त्यांचे धाडस झाले नाही. आतमध्ये मोठी झाडी गेली होती.अशा प्रकारची घटना राज्यामध्ये पुन्हा घडू नये यासाठी खबरदारी घेण्यात आली आहे.राज्य सरकारने 11 जुलै 2005 रोजी तज्ज्ञांची एक समिती नेमली होती. सॉईल आणि रॉक यासंबंधीची माहिती असलेले श्री.शिंपी, श्री.शेणोलीकर यांचा समावेश त्या समितीत करण्यात आला आहे.तसेच खडकवासला येथे केन्द्र सरकारची सी.डब्ल्यू.पी.आर.एस.नावाची संस्था आहे आणि या संस्थेमधील तज्ज्ञ व्यक्तीसुध्दा या समितीमध्ये आहेत.राज्यामध्ये प्रकल्पाचे काम करीत असतांना असा प्रकार पुन्हा घडू नये या दृष्टीने काळजी घेण्यात येत आहे. काही लोकांचे असे म्हणणे आहे की,इतक्या खोलवर टनेलचे काम करीत असतांना ब्लास्टींगचे काम करीत असतांना बाकीचा परिसर अस्थिर झाला असावा व त्यामुळे तो भाग पडला असावा.हा मुद्दा सुध्दा तपासून पाहण्यात आला होता.खरे म्हणजे 2 वर्षे झाली असून या प्रकल्पाचे 90 टक्के काम पूर्ण झालेले आहे. आता लास्ट स्टेजमधील काम चालू आहे.ज्याप्रमाणे धरामध्ये केरसुणीने साफ सफाई केली जाते तशा प्रकारे साफसफाई करण्याचे काम सुरु आहे.सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असा मुद्दा मांडला की त्या ठिकाणी एवढा पाऊस पडत असतांना आतमध्ये मजूर कसे काम करीत होते.? त्या भागात तीन चार महिने जास्त पाऊस पडत असतो. सभापती महोदय, आपण ठाणे जिल्हयातील आहात आणि आपल्याला त्याची माहिती आहे.तेव्हा अधिका-यांच्या दुर्लक्षामुळे किंवा दोन्ही कंपनीचे जे कोणी संबंधित असतील त्यांच्या चुकीमुळे ही घटना घडली असेल असे परिस्थिती पाहिल्यानंतर दिसून येत नाही. या ठिकाणी जी दुर्देवी घटना घडली आहे त्यामध्ये 14 मजुरांचा मृत्यू झाला आहे त्यात काही महिला आहेत आणि काही पुरुष आहेत. त्यांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई दिली पाहिजे. राज्याचे

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ....

उप मुख्यमंत्री त्या ठिकाणी गेल्यानंतर ही नुकसानभरपाई देण्यासंबंधी सूचना त्यांनी दिलेली आहे आणि संबंधित नातेवाईकांना पैसे दिले गेलेले आहेत. अजूनही 8 डेड बॉडीज मिळालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती खरी आहे. आतापर्यन्त 50 टक्के मलबा काढून झालेला आहे आणि राहिलेला मलबा 30 जुलै 2005 पर्यन्त काढला जाईल. त्याचबरोबर उरलेल्या मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना जी आर्थिक मदत देण्याची गरज आहे ती दिली जाईल.आर्थिक मदत दिल्यानंतर प्रश्न सुटतील असे मी म्हणणार नाही .. परंतु पुढच्या काळात राज्यामध्ये प्रकल्पाचे काम चालू असतांना असा प्रकार पुन्हा घडू नये याची खबरदारी घेतली जाईल . या संबंधी वेगवेगळया क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांकडून योग्य प्रकारचा सल्ला घेऊन जलसंपदा विभागाकडून आवश्यक ती खबरदारी घेतली जाईल असा मी या निमित्ताने खात्री देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी मूळ विषय सोडून बाकीचे उत्तर दिलेले आहे.सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी असा प्रश्न विचारला होता की, या प्रकल्पाच्या कामासंबंधी महालेखाकार यांनी ऑब्जेक्शन घेतले होते काय ? त्याचे क्रिटीकल रिमार्क्स काय होते ? सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र पाटील यांचा प्रश्न स्पेसिफिक होता व त्या प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर द्यावयास पाहिजे होते. परतु त्या प्रश्नाला त्यांनी उत्तर दिलेले नाही.ही दुर्घटना घडल्यानंतर माननीय उपमुख्यमंत्री त्या ठिकाणी गेले होते तसेच बाकीचे अन्य मंत्री सुध्दा त्या ठिकाणी गेले होते परंतु जलसंपदा मंत्री श्री.अजित पवार त्या ठिकाणी गेले होते किंवा नाही हे मला माहीत नाही. बाकीचे जे कोणी गेले ते वर गेले होते.प्रत्यक्षात 500 पाय-या उतरुन खालपर्यन्त किती जण गेले याबाबतीत वर्तमानपत्रात बातम्या आल्या होत्या. श्री.अजित दादा बोगद्यापर्यन्त गेले म्हणजे खालपर्यन्त गेले असतील असे मला वाटते परतु माननीय राज्यमंत्री तेथे गेले होते. या दुर्घटना घडल्यानंतर त्या बाबतीत दोन कामे करावयास पाहिजेत एक काम म्हणजे या दुर्घटनेची चौकशी करणे आणि दुसरे काम म्हणजे जे मृतदेह सापडले नाहीत त्यांचा शोध घेणे .तेव्हा ही दोन कामे करण्यात आली पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

KBS/MHM/SBT. श्री. गायकवाड नंतर ---- 14:50

श्री. तावडे .....

या संबंधात जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाने काही चेतावणी वगैरे दिली होती काय ? त्यांच्या पत्राची प्रत आपल्याकडे आहे काय ? नसल्यास, मी आपल्याला ती देऊ शकतो. 2) या धरणातील माती कंत्राटदाराने काढली ती आपल्या निविदेतील अटीप्रमाणे ठराविक अंतरावर नेऊन टाकावयास पाहिजे होती. पण त्याप्रमाणे ती टाकली गेलेली नव्हती आणि त्यामुळे तीच माती पाण्याच्या लोंढ्याने मागे आली, ही वस्तुस्थिती आहे काय ? या बाबतीत तेथील मजुरांच्या साक्षी घेतल्यास ते प्रत्यक्ष साक्ष देतील की तेथे किती माती पडलेली होती वगैरे. 3) आतमध्ये किती कोटीच्या मशिनरीचे नुकसान झालेले आहे ? 4) दोन वर्षापूर्वी येथे असाच मोठा पाऊस पडून बरीच वाहने आणि यंत्र सामग्री वाहून गेली होती ही वस्तुस्थिती आहे काय ? म्हणजे एवढा मोठा पाऊस तेथे पडतो हे समजू शकते. तसेच तेथे जी संरक्षक भिंत होती ती तुटल्यामुळे हे पाणी आत आले. तेव्हा ती संरक्षक भिंत कमकुवत होती म्हणून पडली वा तुटली आहे काय याची आपण माहिती घेतली आहे का ? 5) या बाबतीत जशी चौकशी केली पाहिजे तसेच मला माननीय मंत्री महोदयांना आग्रहाने सांगावयाचे आहे की, त्या ठिकाणी 8 मजुरांच्या डेड बॉडीज् अजून सापडलेल्या नाहीत. त्यांच्या घरामध्ये मी जाऊन आलो आहे. त्यांना शासनाने असे सांगितलेले आहे की, आम्ही अमुक इतकी इतकी वर्षे थांबू. तोपर्यंत ते लोक परत आले नाही तर मग त्यांना मृत घोषित करू आणि तुम्हाला त्याबद्दलची भरपाई देऊ. कारण सीआरपी कायदा तसे सांगतो. तेव्हा हे आठ लोक मृत नाहीत पण तेथे बोगद्यामध्ये अडकले आहेत, आपलेच अधिकारी आणि तेथील इतरही अनेक लोक तसे सांगत आहेत. त्या ठिकाणी किती डीपमध्ये काम चालले होते हे तेथे मी जाऊन आलो आहे, आपणही तेथे जाऊन आला आहात त्यामुळे आपल्यालाही माहीत आहे. तेव्हा तेथील ही सारी परिस्थिती लक्षात घेता तेथील मलबा काढण्याचे काम अजूनही पूर्ण झालेले नाही. ते होत नाही तोपर्यंत त्या बेपत्ता वा मृत मजुरांच्या डेड बॉडीज् मिळणार नाहीत. तेव्हा तोवर त्यांना मृत घोषित आपण करणार काय ? तसे घोषित आपण करू शकत नसाल तर किमान बेपत्ता घोषित करून त्यांच्या कुटुंबियांना मदत आपण देणार का ? तशी मदत त्यांच्या कुटुंबियांना दिली गेली पाहिजे अशी मागणी आहे. ते गरीब आदिवासी लोक आहेत. त्यामुळेच त्यांना केवळ मदत न देता त्यांच्या कुटुंबातील अन्य माणसांना देखील आपण नोकऱ्या दिल्या पाहिजेत अशी आग्रहाची मागणी तेथील सर्वच लोकांची आहे. तसे आपण करणार काय ?

..... डब्ल्यू 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आपण स्वत: देखील त्या ठिकाणी भेट दिलेली आहे आणि त्यामुळे आपणासही तेथील पूर्ण परिस्थितीची जाणीव आहे. जेथून पाणी जाते तेथे संरक्षक भिंत केलेली आहे. मुळात जे जे काही तेथे ढासळले आहे तोच त्या ठिकाणी ओढा होता त्याचा तुंब बसला. त्यामुळे एक दोन ठिकाणी हे झाले. एक वरच्या बाजूला आणि दुसरे खालच्या बाजूलाही झ ाले. त्या दोन्ही ठिकाणी मलबा एकत्र आल्यामुळे तेथे ती जी काही संरक्षक भिंत होती ती काही एवढ्या मोठ्या मलब्याला प्रतिकार करण्यासारखी होती असे अजिबात लक्षात येत नाही आणि त्यावर खूप काही खर्च करून तेथे मोठी संरक्षक भिंत घालण्याचेही लक्षात आले नाही. हे सारे निसर्गामुळेच घडलेले आहे. दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्यांनी म्हटले की, तेथून काढलेली माती वरच्या बाजूला टाकली होती आणि तीच तेथे वाहून आली वगैरे. पण तसे झालेले नाही. त्यांनी तेथील सगळी माती खालच्या बाजूला टाकलेली आहे. म्हणजे पावसामुळे ती माती पुन्हा खाली येऊन अडचण येणार नाही अशाच ठिकाणी ती माती त्यांनी टाकलेली आहे. तिसरे म्हणजे आता याला 8 महिने वगैरे होणार नाहीत. मी या सभागृहाला सांगतो की, विभागाचे सचिव, राज्यमंत्री, मुख्य अभियंता वगैरे आम्ही रोजच्या रोज तेथील मलबा काढण्याच्या वगैरे सर्व कामांचा आढावा घेत आहोत. त्या ठिकाणी साधारणत: तीन ठिकाणांहून मलबा काढण्याचे काम चालले आहे. त्यासाठी दोन दोन क्रेन्स लावलेल्या आहेत. एकाच क्रेनला पुढे दोन आणखी क्रेन लावून एकाने 7 टन मलबा काढल्यानंतर तेथे दुसऱ्या क्रेनने काम पुढे चालू ठेवले जाईल अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे आणि 30 जुलै पर्यंत हा सर्व मलबा बाहेर काढला जाईल. आतापर्यंत झालेल्या कामांचा एकंदरीत आढावा घेतल्यानंतर आजही सगळ्या अधिकाऱ्यांनी याबाबतीत खात्री दिलेली आहे की, तेथील 8 जण त्यामध्ये बेपत्ता झालेले आहेत आणि ते आतच आहेत. मी स्वत: कलेक्टरना या संदर्भात बोललो आहे. पाठीमागील काळामध्ये जेव्हा बॉम्ब स्फोटामध्ये काही व्यक्ती मृत झालेल्या होत्या .......

( यानंतर श्री. जागडे .... एक्स 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

त्यांच्या डेड बॉडीज बेपत्ता म्हणून घोषित करुन त्यांच्या नातेवाईकांना आपण नुकसान भरपाई दिली होती. त्या प्रमाणे या ठिकाणी कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. त्या दिवशी त्या ठिकाणी किती मजूर कामावर होते, या बाबतचे रेकॉर्ड पाहून कार्यवाही करावी लागेल. या बाबतचा नकाशा आणि वस्तुस्थिती पाहिली तर असे दिसून येते की, या ठिकाणी सात-आठ मजुरांना बाहेर येता आले नाही. बाकी सगळ्यांना बाहेर निघता आले. जवळपास त्या दिवशी त्या ठिकाणी एकूण 200 च्या वर माणसे काम करीत होती. आता सगळीच माणसे टनेलमध्ये काम करीत नव्हती. या ठिकाणी आपण जी मशिनरी घेतली आहे, ती जपान बॅंकेकडून 320 कोटी रुपयाचे कर्ज घेऊन घेतलली आहे. त्या मशिनरीमध्ये काही लोक काम करीत होते. त्यामुळे त्या ठिकाणच्या सर्व लोकांना व्यवस्थितपणे बाहेर काढण्याचा प्रयत्न झाला आहे. 200 पेक्षा जास्त माणसे काम करीत असताना फक्त 14 व्यक्ती मृत झालेल्या आहेत. यामध्ये स्त्रीया आणि पुरुष आहेत. तेथील स्थानिक माणसांनी लगेचच मदत केल्यामुळे यातील सहा डेड बॉडीज ताबडतोब सापडल्या आहेत. अजून 8 डेड बॉडीज आतमध्ये आहेत, त्यासुध्दा मिळतील. हे आठ लोक आतमध्ये काम करीत होते, असे आमच्या विभागाने जिल्हाधिका-यांना कळविले आहे. मुख्य अभियंत्यांचे म्हणणे ग्राह्य धरुन 8 आठ व्यक्ती आतमध्ये मयत झाल्या आहेत, असे जिल्हाधिका-यांनी मान्य करुन मयत कुटुंबियांच्या नातेवाईकांना जी काही नुकसान भरपाई द्यावयाची आहे, ती देण्याचे काम केले जाईल. तशा प्रकारची कार्यवाही त्या ठिकाणी सुरु झाली आहे. सभापती महोदय, त्या ठिकाणी काम करीत असलेल्या कंपनीविरुध्द कारवाई करण्याचे कारण नाही. कोयनेचे लेकटॅपचे काम या कंपनीने केले होते. त्याच कंपनीकडून या ठिकाणी लेकटॅपचे काम केले जात आहे. आर. जे. शाह नावाची ही कंपनी असून ही कंपनी दोन महिला चालवित आहेत. त्या दोन महिला सतत साईटवर असतात आणि अतिशय दर्जेदार असे काम या कंपनीकडून चालते. सभापती महोदय, या सगळ्या टेक्नीकल बाबी आहेत. त्या सर्वच बाबी मला समजतील असे नाही. माननीय सदस्य श्री. तावडे यांनी सांगितल्याप्रमाणे त्या ठिकाणी 550 पाय-या उतरुन आम्ही आतमध्ये जेथेपर्यन्त जाता येणे शक्य होते, तेथपर्यन्त जाण्याचा प्रयत्न केला होता. मी त्या बाबतची पाहणी केली आहे आणि सर्व शहानिशा केली आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत या कामाचे तुकडे पाडून टेंडर दिले आहे, अशातला भाग नाही. या टेंडरला कॅबिनेटची मान्यता घेऊनच पुढील कार्यवाही झाली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार.....

सभापती महोदय, या कामाच्या बाबतीत महालेखापरीक्षकांनी काही आक्षेप काढले होते. मला या बाबत सभागृहाला असे सांगावयाचे आहे की, अंडर ग्राऊंड कामाच्या बाबतीत काही परिमान वाढते. त्यामुळे त्याबद्दल तसा आक्षेप घेण्याचे कारण नाही. महालेखापालांनी जे आक्षेप काढले आहेत, त्या आक्षेपांना विभागामार्फत उत्तर देण्यात आले आहे. सभापती महोदय, या कामाचा ज्यांनी अभ्यास केला होता, त्यामध्ये स्पष्टपणे असे सांगितले आहे की, हा परिसर स्टेबल आहे. अशा प्रकारचा अभिप्राय तंज्ञांनी दिलेला आहे. त्यामुळे तशी काही अडचण नाही. टाटाचे भिराचे धरण हे ब्रिटीश काळातील अतिशय जुने असे धरण आहे. सह्याद्रीच्या कड्याच्या परिसरात मुंबई महानगरपालिकेने जी धरणे बांधली आहेत, तसेच त्या भागात जलविद्युत प्रकल्प आहेत, ते पाहता या ठिकाणी कमकुवत परिस्थिती आहे, याची कोणतीही शक्यता आलेली नव्हती. उलट हा परिसर स्टेबल आहे, अशा प्रकारचा अभिप्राय तंज्ञांकडून आलेला आहे.

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

आणि त्यामुळे त्सुनामीच्या लाटांसारखे अचानक हे संकट आले. तेथील परिसर अचानक खचला, वरच्या भागावरुन कडयाचा भाग पडल्यामुळे हा प्रकार झाला हे आपणही बघितले आहे. खालच्या भागामध्ये डोंगर मातीबरोबर 3 ते 4 मीटरचे डायमीटर असलेले झाडांचे ओंडके सुध्दा त्यामध्ये वाहून आले होते. त्यामुळे कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे, अधिकाऱ्यांच्या चुकीमुळे किंवा दुर्लक्ष झाल्यामुळे हा प्रकार घडला असे अजिबात म्हणता येणार नाही. परंतु या घडलेल्या घटनेचे समर्थन मी करीत नाही. राज्यामध्ये अन्यत्र अशाप्रकारचे काम सुरु असतांना अशाप्रकारची घटना पुन्हा घडू नये यासाठी जलसंपदा विभागाकडून निश्चितपणे खबरदारी घेतली जाईल. या घटनेमध्ये जे कर्मचारी मृत पावले आहेत. त्यांच्या घरामधील उत्पन्नाचे साधन गेल्यामुळे त्या दृष्टीकोनातून विचार करुन दोन्ही कंपन्यांमध्ये एकेक कां होईना प्रत्येक कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरीला लावण्याच्या संदर्भात सूचना देण्यात येतील.

श्री. अनंत तरे : ज्या कंत्राटदारास ठेका देण्यात आला होता तो ठेका विहित मुदतीत पूर्ण केला कां? तसेच, यामध्ये जे सहा कर्मचारी मृत पावले व 8 कर्मचारी बेपत्ता आहेत त्यांच्या नातेवाईकांना मदत करण्याबाबत माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सूचना दिल्या आहेत, ती मदत दिली काय? असल्यास कोणती मदत दिली? तसेच, त्या कर्मचाऱ्यांचा विमा उतरविला होता काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, त्या कर्मचाऱ्यांचा विमा उतरविला होता, त्यामुळे विमा कंपनीकडून त्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना पैसे मिळतील. त्याचबरोबर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी त्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना 1 लाख रुपयांची मदत घोषित केली आहे. त्यामध्ये 50 हजार रुपये रोखीने आणि 50 हजार रुपये चेकने देण्यात आले आहेत. त्यांचे वारसदार नातेवाईक आहेत, त्यांची माहिती आपल्या रेकॉर्डवर आहे. त्यांना आपण मदत दिलेली आहे. बाकीच्यांना प्रत्येकी 10 हजार रुपये मदत देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे विमा कंपनीकडून वेगवेगळया लोकांना वेगवेगळया प्रकारे मदत मिळणार आहे. त्यामध्ये कुणाला 2 लाख 60 हजार मिळणार आहे, कुणाला 3 लाख 60 हजार मिळणार आहे, कुणाला 3 लाख मिळणार आहे, कुणाला साडे तीन लाख मिळणार आहे अशाप्रकारची रक्कम मिळणार आहे. ज्या घरातील स्त्री किंवा पुरुष कर्ता माणूस गेल्यानंतर त्या कुटुंबांकडे उत्पन्नाचे साधन नाही त्यांना ते मिळाले पाहिजे. आणि म्हणून ही रक्कम फिक्स डिपॉझीटमध्ये टाकली तर त्या रकमेच्या मिळणाऱ्या व्याजातून त्यांना काही रक्कम मिळेल. आणि मघाशी सांगितल्याप्रमाणे मृत व्यक्तीच्या घरातील एका व्यक्तीला त्या कंपनीमध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

नोकरीला लावण्याचे काम केले जाईल. सभापती महोदय, त्या ठिकाणी कॉट्रॅक्टरकडून जे काम केले जात होते ते ठरलेल्या वेळेमध्ये चालले होते. जवळपास 1186 कोटींचा हा प्रकल्प आहे. त्यामध्ये पॉवर कॉर्पोरेशनचे 400 कोटी रुपये, जपान बँकेचे 320 कोटी रुपये, राज्य सरकारचे 500 कोटी रुपये अशाप्रकारे अर्थसहाय्य उभे केले आहे. त्यामुळे त्या कंपनीने जवळपास वेळेमध्ये हे काम पूर्ण केले होते. आणि खरे तर त्या ठिकाणी ट्रायल घेण्याचे काम चालू होते. तसेच, त्याठिकाणी जपानच्या कंपनीचे केबल व मशिनरी बसविण्याचे काम सुरु होते. त्या मशिनरीमध्ये पाणी जाऊन त्यांचे डायरेक्ट नुकसान काही झालेले नाही. त्या मशिनरीचे काम हे निशोकिवाई ही जपानची कंपनी करीत आहे. आणि केबलचे काम तोशिबा ही कंपनी करीत आहे. त्या मशिनरीचे काही नुकसान झाले आहे काय, याची शहानिशा त्या कंपनीची माणसे करीत आहेत. ती मशिनरी ओली झाली असेल तर ती ड्राय कशी करता येईल आणि ती मशिनरी पुन्हा कशी वापरता येईल या दृष्टीने आपण खबरदारी घेत आहोत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: नागपूर शहर व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात झालेली गॅस्ट्रोची लागण.

**मु.शी.**: नागपूर शहर व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात झालेली गॅस्ट्रोची लागण यासंबंधी श्री. संजय दत्त यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे. अशी विनंती करतो.

"दिनांक 18 जून 2005 रोजी वा त्या दरम्यान नागपूर शहर व ग्रामीण भागात मोठया प्रमाणात सुरु असलेली गॅस्ट्रोची लागण, सदरहू ठिकाणी महानगरपालिकेकडून पिण्याच्या पाण्याचा होत असलेला दूषित पाणी पुरवठा, यामुळे गॅस्ट्रोच्या साथीत होत असलेली वाढ, दिनांक 20 जून, 2005 रोजी वा त्या सुमारास जवळ जवळ दहा रुग्ण रुग्णालयात दाखल करण्यात येणे, यामुळे सदरहू भागातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सदर साथीस आळा घालण्यासाठी शासनाने सदर साथ रोखण्याबाबत करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर साथरोग नियंत्रणकक्षाची किती ठिकाणी स्थापना करण्यात आली आहे ? नागपूर जिल्हयातील ग्रामीण भागात गॅस्ट्रोमुळे दोन व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. तर त्यांच्या कुटुंबियांना शासन स्तरावर आर्थिक सहाय्य दिलेले आहे का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, दौलायमेटी या गावातील कु.निकिता भाऊदास लोखंडे, ही 9 वर्षाची मुलगी आणि 4 वर्षे 6 महिन्याचा मुलगा अशा दोन जणांचा मृत्यू झालेला आहे. त्यांनी खाजगी हॉस्पीटलमध्ये ट्रिटमेंट घेतली होती. त्यामुळे अशा स्थितीत कोणत्याही स्वरुपाची आर्थिक मदत दिली जात नाही. पहिल्या प्रश्नाच्या बाबतीत सांगावयाचे तर प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्र स्तरावर संपूर्णतः साथरोग नियंत्रण कक्षाची स्थापना केलेली आहे.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, गॅस्ट्रोची साथ फैलावू नये यासाठी काय-काय करावे हे माननीय मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये दिलेले आहे. पण नागपूर महानगरपालिकेच्या जलवाहिन्या ब-याच ठिकाणी फुटलेल्या होत्या. याबाबतीत लोकांनी तक्रारही केली होती. अशा वेळी या दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रोची साथ फैलावलेली आहे. याबाबतीत आपण महानगरपालिकेला सांगितले आहे की, ज्याठिकाणी जलवाहिनी फुटलेली आहे, त्याबाबतीत कोणती खबरदारी घ्यावी आणि काय उपाययोजना करावी ? ब-याच ठिकाणी जलवाहिन्या खूप जुन्या झालेल्या असल्यामुळे लोकांना दूषित पाणी मिळत आहे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, त्याठिकाणी जे वॉर्ड आहेत, तेथे जलवाहिन्या होत्या. तेथील वस्तीच्या बाजूला म्हणजे नंदनवन, नारा रोड, पिली नदी, नाग नदी याच्या बाजूला नाले आहेत, त्यातून गळती होत होती. त्याची दुरुस्तीही करण्यात आली आहे. आता सध्याच्या परिस्थितीत त्या भागामध्ये साथीचा रोग पूर्णपणे कंट्रोलमध्ये आलेला आहे.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, मी नागपूरमध्ये रहातो. याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी काही भागांचा उल्लेख केला. तसेच तेथे नारानारी, ठवरे कॉलनी, संयम नगर, शेंडे नगर इ.भाग आहेत आणि त्याच विभागात मी रहातो. त्यामुळे मला तेथील माहिती आहे. या विभागामध्ये ज्या जलवाहिन्या टाकण्यात आलेल्या आहेत, त्या जवळजवळ 70-80 वर्षापूर्वीच्या आहेत. तसेच नंदनवन या झोपडपट्टीचा विभाग असो किंवा इतर कोणताही विभाग असो, नागपूर

. . . .झेड-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहरातील ज्या जलवाहिन्या आहेत, त्या 70 ते 80 वर्षापूर्वीच्या आहेत. काही-काही ठिकाणी त्याच्या बाजूने गटाराची लाईन देखील टाकण्यात आलेली आहे. त्यामुळे गटाराची लाईन चोकअप झाल्यावर पिण्याच्या पाण्याच्या लाईनबरोबर ती कनेक्ट होऊन इंदोरा आणि बाकीच्या ठिकाणी गॅस्ट्रो, कॉलरा या रोगाची लागण होते ही निश्चित बाब आहे. याबाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, महानगरपालिकेने उन्हाळयाच्या काळामध्ये जाहीर केले. तसेच मी कमिशनर यांनाही विनंती केली होती की, तेथे ज्या विहिरी आहेत, त्या साफ करुन लोकांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करुन द्यावी. तसे करण्याचे कमिशनर यांनी कबूल केले. नालेसफाई करतो म्हणून असा प्रस्ताव मांडला. पण यासंबंधात कोणतीही कारवाई झाली नाही. दुसरा प्रश्न असा की, पिण्याच्या पाण्याची लाईन आणि गटाराची लाईन कुठेतरी कनेक्ट होते. अशा वेळी नवीन लाईन टाकण्यासाठी शासनाचे ध्येयधोरण काय आहे? याबाबतीत शासन काय करणार आहे ? याबाबतीत काय प्लॅन आहे ? ते सांगावे.

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, काही वस्त्यांमध्ये ज्या जुन्या पाईप लाईन आहेत आणि ते नागपूर भागातील असल्याने त्यांनी दिलेली माहिती ही निश्चितपणे खरीच असणार. अशा वेळी काही भागात पाईप गळती होते किंवा खाजगी विहिरींच्या बाबतीत सांगितले तर अशा विहिरी साफ करण्याच्या संदर्भात महानगरपालिकेला सूचना देण्यात येतील. तसेच ज्या जुन्या झालेल्या पाईप लाईन आहेत, त्या देखील पूर्णपणे दुरुस्त कराव्यात अशा प्रकारच्या सक्त सूचना महारनगरपालिकेला देण्यात येतील.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, आयसोलेशन दवाखान्यात तपासणी व औषधोपचाराकरता सरासरी पाच ते सात रुग्ण येत आहेत. हे पाच ते सात रुग्ण रोज येतात का ? याबाबतीत सद्यस्थिती काय आहे ? साथ आटोक्यात आली आहे का? रुग्णांचे सरासरी प्रमाण कमी झाले आहे की वाढले आहे ? तसेच निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "जिल्हा स्तरावर, तालुका स्तरावर तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर साथरोग नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात येऊन सदर कक्ष 24 तास कार्यरत आहे." याचा अर्थ साथ फार मोठया प्रमाणात आहे असा होतो का ? तसेच कक्ष 24 तास कार्यरत रहाण्याकरता पुरेसा सक्षम कर्मचारी वर्ग आहे का ?

. . . .झेड-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. पहिल्या प्रश्नाबाबत सांगावयाचे तर महानगरपालिकेच्या आयसोलेशन हॉस्पीटल मध्ये येणारे जे रुग्ण आहेत, आजच्या परिस्थितीत पाहिले तर 9 आयसोलेशन हॉस्पीटलमध्ये 7 रुग्णांना डिसचार्ज केले आहे. रुटीनमध्ये जरी आपण पाहिले तर एखाद-दुसरा तुरळक प्रमाणात सर्वसाधारणपणे पावसाळयात पाण्यामुळे उद्‌भवणारे रोग निर्माण होत असतात. त्यावेळी ती साथ नियंत्रणात आणणे महत्वाचे असते आणि त्यासाठी ख-या अर्थाने आरोग्य शिक्षणच महत्वाचे असते. म्हणून टी.व्ही.च्या माध्यमातून, भित्तीपत्रकाच्या माध्यमातून आरोग्य शिक्षणाची ॲक्टीव्हीटी घेत असतो. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर जे साथ नियंत्रण कक्ष स्थापन केलेले आहेत, त्याठिकाणी पुरेसा कर्मचारी वर्ग निश्चितपणे आहे. कारण आपल्याला साथ आटोक्यात आणावीच लागते. प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये जे कर्मचारी असतात, ते त्याच प्रिमायसेसमध्ये राहणारे कर्मचारी असतात.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफर हुसेन : नागपूर शहरामध्ये नागपूर महापालिका पाण्याचे वितरण करत असते. नागपूर शहरातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगरपरिषदा आणि जिल्हापरिषदा पाण्याचे सॅपल घेऊन, परिक्षण करत असतात. पाण्याच्या टाकीतील पाण्याचे सॅपल घेतले जाते परंतु पाण्याच्या टाकीपासून संपूर्ण शहराला पाईपलाईनमधून पाण्याचे वितरण होत असते त्या पाईप लाईन मधेच कोठेतरी फुटलेली असते. त्यामधून घाणपाणी जाते. म्हणून माझी सूचना आहे की, पाण्याचे सॅम्पल पाण्याच्या टाकीमधून घेण्यापेक्षा वितरण केलेल्या लाईनमधील एखाद्या नळातील पाण्याचे सॅपल घ्यावे आणि त्याचे टेस्टींग करावे. पाण्याच्या टेस्टींगची पध्दती बदलण्याची आवश्यकता आहे, त्यामध्ये सुधारणा होण्याची गरज आहे, अशी सूचना आहे. या सूचनेचा विचार केला जाईल काय ?

डॉ. विमल मुंदडा : सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली ती योग्यच आहे. परंतु रोज आपण पाण्याचे सहा सॅपल टेस्टींगकरिता घेत असतो. पाण्याच्या सोर्सपासून पेरीफेरीमध्ये असलेल्या पाण्याचे सॅम्पल आपण घेत असतो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

**पृ. शी**. : इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाला शासनाकडून मॅचिंग ग्रॅन्टचे वितरण न होणे.

**मु. शी** : इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाला शासनाकडून मॅचिंग ग्रॅन्टचे वितरण न होणे, यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मधुकर चव्हाण ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" म्हाडा कायद्यांतर्गत नियमानुसार इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळाला शासनाने मॅचिंग ग्रँट देणे, कायद्याने बंधनकारक अूनसुध्दा त्याचे वितरण न होणे, गेल्या पाच वर्षात शासनाने म्हाडाला 221.64 कोटी मॅचिंग ग्रॅन्ट देणे आवश्यक असूनसुध्दा त्यापैकी फक्त 186.13 कोटी मॅचिंग ग्रॅन्ट देणे, परिणामत: उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती निधी अभावी वेळेवर न होणे, त्यामुळे उपकरप्राप्त इमारती कोसळून, अपघात होऊन जीवित व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण होणे, नवीन इमारतींची पुनर्रचना निधी अभावी न होणे, परिणामत: संक्रमण शिबिरात भाडेकरू दीर्घकाळ खितपत पडणे, यामुळे भाडेकरुंच्या मनात असुरक्षिततेची, अविश्वासाची व संतापाची भावना निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री.दयानंद मस्के (गृहनिर्माण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांनी निवेदन सादर केलेले आहे, त्यामध्ये त्यांना बदल करावयाचा आहे काय ?

श्री.दयानंद मस्के : नाही.

श्री.मधुकर चव्हाण : मंत्री महोदय, आपले अधिकारी अतिशय दिशाभूल करीत आहेत. आपल्याला एक दिवस ते अडचणीमध्ये आणार आहेत. सभापती महोदय, या ठिकाणी जो तक्ता दिलेला आहे तो अतिशय दिशाभूल करणारा आहे, सभागृहाचा अपमान करणारा आहे. सरळ विचारलेले होते की, अंशदान किती देण्यात आले आणि किती देणे आवश्यक होते, किती द्यायचे शिल्लक आहे ? सन 1998-99 पासून 2004-2005 पर्यन्तची पान क्रमांक 2 मध्ये तक्त्यात माहिती दिलेली आहे. मनपाने वसूल केलेला उपकर 315.79 कोटी रुपये, शासनाचे वार्षिक अंशदान 315.79 कोटी रुपये दाखविलेले आहेत. या दोघांची बेरीज केली तर 631.58 कोटी रुपये होतात. असे असताना तक्त्यामध्ये म्हाडास वितरीत केलेली 243.13 कोटी रुपये अंशदान दिल्याचे सांगितलेले आहे. मनपाने वसूल केलेली उपकराची रक्कम आणि शासनाचे वार्षिक अंशदान असे मिळून 631.58 कोटी रुपये म्हाडाला द्यावयाचे असतांना म्हाडाला वितरित केलेली रक्कम 243.13 दाखविलेली आहे. ही कोणती रक्कम आहे, याचा बोध होत नाही. कायद्याप्रमाणे उपकराची आणि अंशदानाची रक्कम म्हाडाला देणे बंधनकारक आहे. आपण त्यातील एक नया पैसाही खर्च करु शकत नाही. कायद्यामध्ये "मे" आणि "शाल" शब्द आहे. पुढे म्हाडास देय असलेली अंशदानाची थकित रक्कम 72.66 कोटी रुपये म्हटलेले आहे. परंतु मनपाने वसूल केलेला उपकराची रक्कम आणि शासनाचे वार्षिक अंशदान असे मिळून 631 कोटी रुपये द्यायला पाहिजे. त्याऐवजी 243 कोटी रुपये म्हाडास वितरित केल्याचे दाखविलेले आहे. तरी देखील 187.65 कोटी रुपये शिल्लक रहातात. असे असतांना 72.66 कोटीच थकित रक्कम दाखविलेली आहे ती बरोबर नाही. पान क्रमांक 3 वर 2000-2001 ते 2004-2005 या पाच वर्षातील शासनाचे वार्षिक अंशदानाच्याबाबतचा तक्ता दिलेला आहे. त्यामध्ये मनपाने वसूल केलेला उपकर आणि शासनाने वार्षिक अंशदान असे दोन्ही मिळून 453 कोटी रुपये होतात.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदारे... 15:15
श्री. मधुकर चव्हाण...

226 कोटी रुपये उपकर व 226 कोटी रुपये अंशदन या दोघांची बेरीज होते, 426 कोटी 14 लाख रुपये आणि शासनाने 274 कोटी रुपयाची अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. शासनाने 474 कोटी रुपयांची तरतूद केली पाहिजे. जेवढे पैसे उपकराद्वारे वसूल झाले तेवढेच पैसे शासनाला द्यावे लागतात. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हा तक्ता बरोबर आहे काय? निवेदनाच्या शेवटच्या पानावर खालून दुस-या परिच्छेदात असे म्हटलेले आहे की, "सन 1999-2000 ते 2001 -2002 या कालावधीमध्ये शासनाच्या अंशदानापोटी द्यावयाची रक्कम शासनाच्या आर्थिक परिस्थितीमुळे काही अंशी कमी दिली असली तरी" सभापती महोदय, येथे शासनाच्या आर्थिक स्थितीचा काही संबंध येत नाही. लोकांचे पैसे असतात. ते पैसे महानगरपालिकेतर्फे शासनाच्या तिजोरीत जातात. ते सगळेच्या सगळे पैसे शासनाने परत द्यायचे असतात. येथे शासनाच्या आर्थिक स्थितीचा काही संबंध येत नाही. म्हणून माझा तिसरा प्रश्न असा आहे की, हा तक्ता बरोबर आहे काय? 62 लाख रुपये मुंबई महानगरपालिकेने उपकराचे वसूल केलेले आहेत ते अद्याप शासनाकडे भरलेले नाहीत हे खरे आहे काय?

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी ज्या काही सूचना या तक्त्याच्या संदर्भात केलेल्या आहेत त्या सर्व सूचना तपासून पाहण्यात येतील.

श्री. मधुकर चव्हाण :सभापती महोदय, तपासून काय पाहण्यात येईल? मी प्रश्न विचारलेला आहे. त्याचे मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री. दयानंद मस्के : आकडयांच्या बाबतीत जी तफावत दिसून येते ती तपासण्यात येईल.

श्री. विलास अवचट :सभापती महोदय, या लक्षवेधीच्या निवेदनामध्ये जे तक्ते दिलेले आहेत ते तपासून ज्या संबंधित अधिका-यांनी ते चुकीचे दिलेले आहेत त्यांच्यावर काही कारवाई करणार काय?

**उपसभापती** :माननीय मंत्रिमहोदयांना बोलू द्या.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, महानगरपालिकेने उपकर गोळा करुन वसूल केलेला उपकर पंधरा दिवसाच्या आत 5 टक्के परताव्याची रक्कम वगळता शासन तिजोरीत भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार पाच वर्षात 2001 ते 2005 या संपूर्ण कालवधीत .................

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के....

महानगरपालिकेकडून 226.57 कोटी रुपये रक्कम उपकरापोटी संकलीत केली. त्यापैकी पाच टक्के परतावा रक्कम 215.25 कोटी रुपये रक्कम शासनास जमा करणे अभिप्रेत आहे. यापैकी मानपाने शासनाच्या तिजोरीत.........

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मी पाच टक्क्याच्या बाबतीत विचारलेले नाही. शासनाने जे अंशदान देणे आवश्यक आहे, ते तुम्ही निवेदनामध्ये लिहिलेले आहे की, मनपाने वसूल केलेला उपकर 315 कोटी रुपये, असे दोघांचे मिळून 631 कोटी 58 लाख रुपये होतात त्यापैकी शासनाने फक्त 243 कोटी रुपये दिलेले आहेत. ते शासन ठेवू शकते काय? मग हे 72 कोटी रुपये कसे राहतात?

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी निवेदनामध्ये दिलेल्या दोन तक्त्यांच्या बाबतीत स्पष्टीकरण विचारलेले आहे. त्याला मा. मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे की, तपासून बघणे आवश्यक आहे. तेव्हा हे तपासून घेऊन प्रत्यक्ष कोणत्या आराखडयांमध्ये तफावत आहे, हे स्पष्ट होत नाही, तोपर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, जर आकडेवारीमध्ये कुठे घोटाळा असेल तर तो तपासून बघू असे म्हटले आहे.

श्री. विलास अवचट : मंत्रिमहोदय, तपासून बघणार कधी आणि आम्ही त्यावर प्रश्न विचारणार कधी?

( उत्तर आले नाही )

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, निवेदनामध्ये जो चार्ट दिलेला आहे त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, महानगरपालिकेने 1998-1999 ते 2000-2005 मध्ये 315.79 कोटी रुपये वसूल केले, हे बरोबर आहे काय?मग तेवढेच शासनाने पेसे दिले पाहिजेत. त्या दोघांची बेरीज केली तर अर्थसंकल्पीय तरतूद तेवढी असायला पाहिजे. पण शासनाने अर्थसंकल्पीय तरतूद सुध्दा 315 कोटी रुपये म्हणजे कमीच तरतूद केलेली आहे. आणि म्हाडाला त्याहून कमी रक्कम वितरीत

..3..



SMT/ MAP/ KGS/ प्रथम श्री. किल्लेदारे... 15:15

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते...

केलेली आहे. मुळात जे पैसे उपलब्ध व्हायला पाहिजे होते ते 400 कोटी रुपयांनी कमी आहेत. अशा प्रकारचा प्रश्न श्री. मधुकर चव्हाण यांनी मांडलेला आहे. तसेच त्याची जी मूळ लक्षवेधी सूचना आहे, त्यामध्ये सुध्दा त्यांनी असे म्हटलेले आहे की, "मॅचिंग ग्रँट न दिल्यामुळे उपकरप्राप्त इमारतींची दुरुस्ती निधीअभावी वेळेवर न होणे,. . . .. . . . . . . . . . . . . . . . . . .. . . .

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

त्यामुळे उपकरप्रापत इमारतीं कोळसून, अपघात होऊन जीवित व वित्त हानी होण्याची शक्य निर्माण होणे असा विषय यामध्ये दिलेला आहे. मुंबई शहरामध्ये ज्या जुन्या इमारती आहेत त्या ठिकाणी आपण निधी उपलब्ध करुन देत नाही हा महत्वाचा टप्पा आहे. तो आपण सभागृहापुढे आणलेला आहे. आपण पूर्ण रक्कम कशी उपलब्ध करुन देणार आहात ?

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याला जोडूनच माझा प्रश्न आहे. ज्या अधिकाऱ्यांनी असे उत्तर दिले असेल त्यांना घरी पाठवा. आपण दिलेल्या उत्तरामध्ये पहिल्या तक्त्यामध्ये असे म्हटले आहे की, 1998-99 मध्ये मनपाने वसूल केलेला उपकर 42 कोटी 80 लाख रुपये आहे. शासनाचे वार्षिक अंशदान 42 कोटी 80 लाख रुपये आहे. हे बरोबर आहे. पुढचा तक्ता फसवा आहे. म्हाडास वितरित केलेली रक्कम 38 कोटी रुपये दाखविलेले आहेत. ही रक्कम कोठली आहे ? हे 38 कोटी रुपये 42.80 कोटी रुपयांपैकी आहेत की अंशदानापैकी आहेत ? दोघांचे मिळून जे 85 कोटी 60 लाख रुपये होतात त्यापैकी हे 38 कोटी आहेत काय ? पुढचा तक्ता वेगळा आहे. मी पुन्हा आपल्याला सांगतो. म्हाडास वितरित केलेली रक्कम 38 कोटी रुपये आहे. मनपाने वसूल केलेला उपकर 42.80 कोटी रुपये आहे आणि शासनाचे वार्षिक अंशदान 42.80 कोटी रुपये आहे. मग आपण उपकराच्या 42.80 कोटी रकमेतून हे पैसे दिले काय ? अर्थसंकल्पीय तरतूद 38 कोटी दाखविली आहे ती कशातील आहे ? ही रक्कम अंशदानाची आहे की उपकराची आहे ? हे यामध्ये लिहिलेले नाही. दोघांची बेरीज झाली पाहिजे. ज्यांनी अशी माहिती दिली त्यांना घरी पाठवा.

श्री. दयानंद मस्के : हा तक्ता परत तपासून पाहण्यात येईल.

**उपसभापती** : मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, आपण याची पूर्ण माहिती घ्यावी. तोपर्यन्त ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना उद्या ठेवावी.

**उपसभापती** : : उद्याच नको. ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात येत आहे.

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**पृ. शी.** : राज्यात व विशेषत: कोकण किनारपट्टीत गेल्या चार महिन्यांपासून होत असलेले विजेचे भारनियमन.

**मु. शी.** : राज्यात व विशेषत: कोकण किनारपट्टीत गेल्या चार महिन्यांपासून होत असेलेले विजेचे भारनियम यासंबंधी सर्वश्री गुरुनाथ कुलकर्णी, विनायकराव मेटे, जितेंद्र आव्हाड, वसंतराव काळे, प्रा. फौजिया खान, श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री सदाशिवराव पोळ, विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, डॉ. अशोक मोडक, सर्वश्री शांताराम कळमरकर, सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, वसंतराव चवहाण, प्रा. जोगेंद्र कवाडे व श्री. जगन्नाथ शेवाळे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गुरुनाथ कुलकणी : सभापती महोदय, या ठिकाणी संबंधित खात्याचे मंत्रिमहोदय किंवा राज्यमंत्री कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे याबाबत कोणते माननीय मंत्रिमहोदय उत्तर देणार आहेत ?

श्री. विलास अवचट : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात कोणते मंत्रिमहोदय उत्तर देणार आहेत ?

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मघाशी माननीय ऊर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील असे म्हणाले की, मला खालच्या सभागृहात चर्चेला जावयाचे आहे. त्यांनी ती जबाबदारी माननीय मंत्रिमहोदय श्री. अजित पवार यांच्यावर सोपविली. त्याबाबत माननीय विरोधी पक्ष नेत्यांची मान्यता घेतली. माननीय विरोधी पक्ष नेत्यांची मान्यता घेतल्यानंतर माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांनी एवढी काळजी घ्यावयास पाहिजे होती. त्यांचा घाटधरचा विषय संपला. त्यांनी बिल्डरला वाचविले आणि ते सभागृहातून निघून गेले. माननीय मंत्रिमहोदय व्यस्त आहेत म्हणून त्यांनी मान्यता घेतली होती...

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, संबंधित माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नसतील तर ही लक्षवेधी सूचना उद्या घ्यावी. त्याला माझी हरकत नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

**उपसभापती** : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात उत्तर देण्यासाठी आता या सभागृहामध्ये संबंधित खात्याचे माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नाहीत. परंतु त्यांनी आधीच कारण सांगितले आहे की, खालच्या सभागृहामध्ये या विषयावर चर्चा आहे आणि त्यामुळे या ठिकाणी अनिवार्य उपस्थिती असलेले जे संबंधित मंत्रिमहोदय आहेत ते नोट्स घेतील असे त्यांनी म्हटले होते. सदरची लक्षवेधी क्लब करा असेही त्यांनी म्हटले होते. त्यावेळी सर्व सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, आम्ही याला कबूल नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ठीक आहे. संबंधित मंत्रिमहोदय आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. सन्माननीय सदस्यांनी सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. अजितदादा पवार यांच्याबाबतीत जे उद्गार काढलेले आहेत ते कामकाजातून काढून टाकण्यात येतील. ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल. यानंतर पुढची लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/ श्री.बरवडनंतर 15:25

**पृ.शी.** : राज्यातील शेतक-यांना अमेरिकन कंपनीच्या बी.टी.या कापूस बियाणाचा वापर करण्याचा देण्यात येत असलेला सल्ला.

**मु.शी.** : राज्यातील शेतक-यांना अमेरिकन कंपनीच्या बी.टी. या कापूस बियाणाचा वापर करण्याचा देण्यात येत असलेला सल्ला यासंबंधी श्री दिवाज्र रावते, डॉ. दिपज्ञ सावंत, सर्वश्री अ-ांत तरे, सुरेश जेथलिया, डॉ. -िलम जोऱ्हे, सर्वश्री रजजितसिंह मोहिते-पाटील, वि-ाायज्राव मेटे, जितेंद्र आव्हाड, सदाशिवराव पोळ, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा. फौजिया जा-ा, सर्वश्री संजय दत्त, सुधाज्र ज्जज्जे, -ातिज्ोद्दि-ा जतिब, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री व्ही. यु. डायज्व्हाजे, बी.टी.देशमुज, वसंतराव जोटरे, -ा-ाासाहेब बोरस्ते, जी.एल. अै-ाापुरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमेरिज-ा ज्ंप-ीचे बी.टी. या ज्ापूस बियाजाचे वापर ज्रज्याचा या राज्यातील शेतज्ऱ्यां-ाा देज्यात येत असलेला सल्ला, बी.टी.ज्ापूस बियाज्याचा वापर ज्रज्यासाठी शेतज्ऱ्यांची ज्रज्यात येत असलेली दिशाभूल, बी.टी,बियाजाचा वापर व पेरा 10 % पट्टी-ने वाढविज्याचा राज्य शास-ाा-ने ज्ेलेला -िर्धार, बी.टी.बियाज्याचा ज्या शेतज्ऱ्यां-ी पेरा ज्ेला अशा शेतज्ऱ्यांच्या शेतात एज्री 493 रुपये व साधे -ेहमीचे बियाजे पेरलेल्या शेतज्ऱ्यांच्या शेतात 663 रुपयांचे एज्री उत्पन आले, परदेशी बियाजे मोठया प्रमाजावर राज्यात येजे, ते जरेदी ज्रज्याची शेतज्ऱ्यांवर ज्रज्यात येत असलेली सक्ती, परिजामी येथील परंपराज्ञत बियाजे -ाष्ट होज्याच्या मार्ज्ञावर असजे, राज्यात परदेशी बियाजे ज्ंप-या आपले बियाजे चांज्ञले असल्याचा ज्रीत असलेल्या फसव्या जाहिराती, परिजामी प्रचलित बियाजे वापरजाऱ्या शेतज्ऱ्यांचे होजारे -ाुज्सा-ा, त्यामुळे राज्यातील शेतज्ऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लज्ञात घेता या प्रज्रजी शास-ाा-ने ज्ेलेली व ज्रावयाची ज्ारवाई व शास-ााची प्रतिज्रि या."

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ( कृषी मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, बी.टी.कॉटनचा सातत्याने प्रचार सुरु आहे. महाराष्ट्रामध्ये आता यापेक्षा वेगळे काही पेरावयाचे नाही असा मोठया प्रमाणावर प्रचार करण्यात आला आहे. ही जी मोनसॅन्टो कंपनी आहे तिने प्रचार करताना असे जाहीर केले की, जे शेतकरी बी.टी.कॉटनचा पेरा करणार नाहीत त्यांच्या हातामध्ये बेडया ठेकू. त्यामुळे आम्ही असे ताबडतोब सांगितले की, शेतक-यांबद्दल अशाप्रकारचे उद्‌गार काढले तर त्याचे गंभीर परिणाम होतील, यवतमाळच्या शेतक-यांनी त्याचा निषेध केला आहे. या कंपनीने हे बियाणे घेतले पाहिजे असे शेतक-यांवर बंधन घातले आहे. ही परदेशी कंपनी शेतक-यांचा अपमान करुन संपूर्ण मराठवाडयात व विदर्भामध्ये बी.टी.कॉटनची विक्री करीत असताना सांगत आहे. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, " 2002 ते 2005 पर्यंत घेतलेल्या प्रक्षेत्र पाहणीनुसार सन 2002-03 मध्ये 32.84 टक्के, 2003-04 मध्ये 26.11 टक्के व 2004-05 मध्ये 21.13 टक्के कापसाच्या उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून आलेले आहे." पुढे असेही म्हटले आहे की "2004-05 मध्ये 5.17 टक्के क्षेत्र बी.टी.युक्त कापसाखाली आलेले आहे आणि 2005-06 मध्ये सुमारे 17.24 टक्के क्षेत्र बी.टी.युक्त कापसाखाली येण्याची शक्यता आहे." असे म्हटले असले तरी बी.टी.कॉटनचा मोठया प्रमाणावर पेरा होईल अशातील भाग नाही. बी.टी.कॉटनच्या प्रचार आणि प्रसारामुळे त्याचप्रमाणे कंपनीने विशिष्ट प्रकारे जाहिरात केल्यामुळे राज्यामध्ये संपूर्ण हंगामामध्ये बोगस कोणते आणि खरे बी.टी.कॉटन कोणते हा संभ्रम निर्माण झाला आहे. शेतक-यांमध्ये अशाप्रकारे भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे. यासंबंधी नक्की काय झाले आहे ते शेतक-यांच्यादृष्टीने सांगणे आवश्यक आहे. शेतक-यांच्या हातामध्ये बेडया ठोकल्या जातील असा प्रचार ही कंपनी करीत असेल तर त्यासंबंधी शासन कोणती पावले उचलणार आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 1994 साली बी.टी.कॉटनचे जीन आले. एखादे नवीन जीन येते त्यावेळी जैविक तंत्रज्ञानाद्वारे संशोधन करुन त्याचा प्रसार करण्याचा आपला नियम आहे. एन्व्हायर्नमेंटल प्रोटेक्शन ॲक्ट अंतर्गत त्याच्यावर 1994-95 ते 2001-02 असे 7 वर्षे केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन खात्याने दिलेल्या सुचनानुसार संशोधन करण्यात आले. या जीनचा मनुष्यावर, वनस्पतीवर, प्राणी मात्रावर काय परिणाम होणार आहे याबाबत

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.बाळासाहेब थोरात.....

संशोधन केल्यानंतर त्याचा प्रसार करण्याचा निर्णय घेतला गेला. हा संपूर्ण विषय केंद्र शासनाच्या अखत्यारीत आहे. केंद्र शासनाने निर्णय घेतल्यानंतर 2002-03 पासून बी.टी.युक्त कापूस बियाणे स्वीकारले आहे. मोनसॅन्टो या कंपनीचे हे संशोधन आहे. तिने महिको, अंकूर, राशी या कंपन्यांना जीन दिले. यामध्ये रॉयल्टीचा विषय असतो. त्यामुळे या चार कंपन्यांना आपण मान्यता दिली. दिल्लीची कंपनी आहे तिला आपल्याकडून मान्यता दिली. जैविक तंत्रज्ञानाचा वापर केलेला असेल आणि ज्याला मान्यता दिलेली आहे त्याला आपण अधिकृत समजतो. शेतक-यांनी अधिकृत बियाणे घ्यावे, अनधिकृत बियाणे घेऊ नये असे मार्च महिन्यापासून निरनिराळया ठिकाणी सांगितले आहे. कृषी अधिकारी आणि वर्तमानपत्राद्वारे आपण मुद्दाम जाहिरात केली आहे. बी.टी.कॉटनचे बियाणे घेतल्यानंतर त्याची पावती मिळते आणि ते अधिकृत समजले जाते. 450 ग्रॅम इतक्या या बियाण्याची 1700 रुपये किंमत आहे. त्यामुळे लोक बी.टी.चे स्वस्त बियाणे घेऊ लागले जे अधिकृत नाही.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात....)

यासंदर्भातील जो ॲक्ट आहे त्याच्या माध्यमातून देखील अडचणी निमार्ण होत असतात.म्हणून प्रसार माध्यमाद्वारे, जाहिरातीद्वारे अनधिकृत बियाणे घेऊ नये असे सांगितलेले आहे. शेतक-यांनी कापसाचे कोणते बियाणे घ्यावे किंवा बी.टी.चेच बियाणे घ्यावे असा आग्रह शासनाने केलेला नाही. परंतु बी.टी.चे बियाणे घ्यावयाचे असेल तर ते अधिकृत बियाणेच घ्यावे असा कृषी विभागाचा आग्रह आहे. शेतक-यांनी अनधिकृत बियाणे घेऊ नये म्हणून काही ठिकाणी जप्त्या केलेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : बी.टी. बियाणाच्या संदर्भात विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतक-यांमध्ये फार मोठा संभ्रम निर्माण झालेला आहे. अधिकृत विक्रते आणि अनधिकृत विक्रेते हा विषय फार मोठा आहे. बुलढाणा जिल्ह्यामध्ये जवळ जवळ 70 लाख रु.चे बियाणे जप्त करण्यात आले हे खरे आहे काय ? बी.टी.चे बोगस बियाणे विकणारे रॅकेट असून 14 लोकांना अटकही केलेली आहे. खरे म्हणजे, याबाबतीत शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. शेतक-यांमध्ये ही चिंता आहे की, अनधिकृत बियाणाची उगवण बरोबर नाही आणि अधिकृत बियाणाची उगवण देखील बरोबर नाही. अधिकृत बियाणाची किंमत 1600 रु. आणि अनिधिकृत बियाणे 600 रुपयास मिळते. अनधिकृत बियाणे विकणा-यांवर शासनाने काय कारवाई केलेली आहे ? हे अधिकृत बियाणे जप्त केलेले आहे काय ? तसेच यापुढे अनधिकृत बियाणे विकले जाणार नाही यासाठी शासनाने काय खबरदारी घेतलेली आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : बी.टी.च्या 450 ग्रॅमची किंमत 1700 रु. आहे. हे बी.टी.बियाणे लावल्यास कापसावर बोंडअळी येत नाही आणि फवारणी करावी लागत नाही म्हणून शेतकरी हे बियाणे घेतात ही वस्तुस्थिती आहे. बोंडअळी आली नाही की, कापसाचे उत्पादन वाढते. अनधिकृत बियाणे निम्म्या किंमतीमध्ये म्हणजे 700 ते 800 रु. मिळते. ..

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : शेतक-याने अनधिकृत बियाणे घेण्यास परवानगी आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : अनधिकृत बियाणे घेऊ नये असे कृषी विभागाने सांगितलेले आहे. मार्च महिन्यामध्ये अशा प्रकारे अनधिकृत बियाणे येत असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यासंदर्भात प्रचार यंत्रणा राबविली. वृत्तपत्रे, मेळावे, खरिपाच्या मिटींग यामधून अनधिकृत बियाणे घेऊ नये असे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. बाळासाहेब थोरात....)

सांगितले. राज्यात येणारे अनधिकृत बियाणे कसे रोखता येईल यासाठी कृषी विभागाने पोलिसांचे सहकार्य घेतलेले आहे. 1 कोटी 84 लाखाचे बोगस बियाणे जप्त केलेले असून संबंधिताविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. अधिकृत बियाणे घेऊ नये असे वेगवेगळ्या प्रचार माध्यमाद्वारे शासनाने सांगितलेले आहे. मराठवाडा आणि विदर्भातील शेतक-यांची मागणी लक्षात घेता शेतक-यांना अधिकृत बियाणे पुरविण्यात येईल काय ? या बी.टी. बियाण्यामुळे कापसाचे तीन पट उत्पादन येते असा शेतक-यांचा समज आहे. आता ज्यांना लायसन्स दिलेली आहेत असे अधिकृत विक्रेते आणि अनधिकृत विक्रेते केवळ बी.टी.बियाणाचे लेबल लावून बोगस बियाणे विकायला लागले आहेत. आमच्या जिल्ह्यामध्ये 70 लाखाचे बोगस बियाणे पकडले. हे बोगस बियाणे गुजरात राज्यातून येते. पोलिसांनी गुजरात राज्यामध्ये जाऊन बोगस बियाणे पुरविणा-यांना पकडले. हे बियाणे कृषी केन्द्राच्या माध्यमातूनही विकले जाते. मला हे सांगावयाचे आहे की, याबाबतीत केवळ प्रचार करुन चालणार नाही तर अनधिकृत बियाणे विकणारे पकडले गेले पाहिजेत. तसेच दुस-या प्रांतातून येणारे बियाणे थांबविले पाहिजे. हा केन्द्र सरकारचा कायदा आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

केंद्र शासन त्यासाठी परवानगी देत असते. मागच्या अधिवेशनात आंध्र प्रदेशातील तिळाच्या बियाण्यांचा प्रश्न उपस्थित केला गेला होता. त्यावेळी शासनाकडून सांगितले गेले होते की, केंद्र शासन त्याबाबतीत कारवाई करु शकते, राज्य शासन कोणत्याही प्रकारची कारवाई करु शकत नाही. राज्यात मोठया प्रमाणात परदेशी बियाणे येत असल्यामुळे राज्यातील कापूस उत्पादक शेतकरी उध्वस्त होत चालला आहे. बी.टी.कॉटनच्या 750 ग्रॅम बियाण्याची किंमत 1700 रुपये एवढी आहे. एवढे महाग बियाणे घेऊन देखील शेतक-यांना अनेक अनधिकृत बियाणे कंपन्या फसवीत आहेत. एकीकडे पाऊस पडत नाही म्हणून शेतकरी हवालदील झालेला आहे. दुसरीकडे शेतक-याला उगवण क्षमता नसलेले बियाणे पेरल्यामुळे शेतकरी उध्वस्त होत चालला आहे. उगवण क्षमता कमी असलेले अनधिकृत बियाणे राज्यामध्ये येणार नाही यासंदर्भात शासन कोणत्या प्रकारची कठोर कार्यवाही करणार आहे?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मार्च महिन्यापासून यासंदर्भात आमच्या विभागाने खूप काळजी घेतलेली आहे. जवळपास राज्यात 2 कोटी रुपयांचे अशा प्रकारचे बियाणे जप्त केलेले आहे. सदर बियाणे अनधिकृतपणे राज्यात आणली जातात. त्या बियाण्यांच्या पिशव्यांवर कोणत्याही कंपनीचा शिक्का नसतो. काही ठिकाणी जीप घेऊन अशा प्रकारचे बियाणे विकले जात असते. या प्रकरणी जे कोणी सापडले त्यांचे विरुध्द अत्यंत कडक कारवाई करतो. अशा प्रकारे अनधिकृत बियाणे विकणा-यांवर कडक कारवाई करण्याच्या वेळी केद्राचा कायदा आहे असे सांगितले जात नाही. त्यांचेवर तात्काळ कडक ॲक्शन शासनाकडून घेतली जात आहे. यापुढे अशा प्रकारचे अनधिकृत बियाणे या राज्यात विकले जाणार नाही अशा प्रकारची काळजी घेण्यात येत आहे.

**उपसभापती** : मला माननीय मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की, या बियाण्याचे नाव "बी.टी." कसे काय ठेवले गेले. या सदनामध्ये उत्कृष्ट संसदपटू यांचे नाव देखील "बी.टी. देशमुख " आहेत. त्यांच्या अद्याक्षरावरुन हे नाव पडले आहे काय ? कारण सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांची तुलना कोणी करु शकत नाही.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, प्रा.बी.टी.देशमुख यांचे नाव विदर्भात अतिशय प्रसिध्द आहे. त्यामुळे कदाचित त्यांच्या नावाचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला गेला असावा.

**उपसभापती** : त्यांच्या नावाचा कोणी गैरफायदा घेऊ नये... 2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, एखादी कंपनी असा लोकप्रिय शब्द घेण्याचा प्रयत्न करीत असते. परंतु याच्यामध्ये बेसिलस थुरानागिनसस नावाचा बॅक्टेरिया आहे. त्या बॅक्टेरियामध्ये जिन्स वाहून नेण्याची क्षमता असते.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, अमेरिकेतील हे बियाणे उत्कृष्ट असले तरी त्या बियाण्याच्या भावावर कायद्याने काही नियंत्रण ठेवता आले पाहिजे. माझे एवढेच म्हणणे आहे की, सदर बियाण्याचे भाव कमी होण्याच्या दृष्टीने शासन काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : 750 ग्रॅम बियाण्याचा भाव 1700 रुपये आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. या बियाण्याचा भाव जास्त आहे हे मान्य आहे. बागायती शेती करणारा शेतकरी असेल तर त्यास ते बियाणे परवडते परंतु जिराईत शेती करणारा शेतकरी असेल तर त्यास ते बियाणे परवडत नाही. जिराईत शेतात या बियाण्याचे उत्पन्न कमी येते त्यामुळे त्या शेतक-यांना ते बियाणे परवडत नाही. यासंदर्भातील आढावा घेऊन केंद्र शासनास विनंती केलेली आहे. इशन्सीयल कमिटी ॲक्टच्या काही तरतुदीनुसार अशा प्रकारच्या बियाण्यांच्या किंमती कशा कमी करता येतील असा आमचा प्रयत्न आहे. यामध्ये 1250 रुपये रॉयल्टी जाते. म्हणून आम्ही यासंबंधी केंद्राकडे आग्रह धरलेला आहे. इशन्सीयल कमिटी ॲक्टमधील तरतुदीचा उपयोग करुन घेऊन सदर बियाण्याचे भाव कमी करता येत असेल तर ते करावेत अशी विनंती केंद्राला एका महिन्यापूर्वी करण्यात आलेली आहे.

श्री.विनायक मेटे : परदेशी कंपन्या बी.टी.कॉटन बियाण्याच्या नावाने शेतक-यांची मोठया प्रमाणात फसवणूक करीत आहेत ही गोष्ट सत्य आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, महाराष्ट्रात गोवर्धन सीड कंपनीने "वादळ","जनक","अश्वमेघ" आणि "भाग्य" असे चार कंपन्याच्या माध्यमातून बी.टी.कॉटनचे बियाणे बाजारात आणले होते. सदर कंपनीचे बियाणे शासनाने पकडले होते. या कंपन्यांकडून लाखो रुपयांचे बियाणे शासनाने जप्त केलेले आहे. म्हणून या कंपनीची परवानगी रद्द करण्यात येईल काय ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिलेली आहे त्यासंदर्भात लागलीच चौकशी करण्यात येईल व त्या अनुषंगाने कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 4 पुढे सुरु...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय,बोगस बियाण्यांमुळे शेतक-यांची फसवूणक होत आहे. आत्महत्या करण्याचे हे एक षडयंत्र आहे. माझा प्रश्न असा आहे की, शेतक-यांची फसवणूक करणारे जे दुकानदार आहेत त्यांच्यावर शासन काही कारवाई करणार आहे काय ? प्रचाराच्या माध्यमातून शेतक-यांना बोलावून घेऊन बियाणे घ्यायला लावले जाते आणि त्यातून शेतकरी उध्वस्त होत आहे. बी.टी. या अमेरिकन कंपनीला 1250 रु. रॉयल्टी द्यावी लागते. वेबसाईटमधून या कंपनीची जी माहिती आलेली आहे त्यानुसार अत्यंत घातक असे बियाणे आहे अशी नोंद आहे. मलेशियामध्ये सदर बियाणे बॅन केल्यानंतर या कंपनीने 200 कोटी रुपयांची लाच देऊ केली. आपल्याकडून 1250 रुपयांची रॉयल्टी घेतात आणि त्या माध्यमातून महाराष्ट्रातील आणि देशातील शेतक-यांची लूट होत आहे. सामान्यत: बियाणे 600-700 रुपयापर्यंत मिळते. परंतु याठिकाणी 1000 रु. आकारले जात आहेत हे बरोबर नाही. शासनाने मान्य केले आहे की, बोगस बियाणे पकडण्यात आले आहे. या बियाण्याचा वापर केल्यामुळे पेरा झाल्यानंतरसुध्दा उगवण झालेली नाही म्हणून केवळ शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यापुरता हा विषय मर्यादित नाही. यासंबंधात कोणती कारवाई शासन करणार आहे हा महत्वाचा विषय आहे. सध्या "बोलगार्ड" नावाचे बियाण्यासाठी अभिनेते श्री. नाना पाटेकर हे जाहिरात करीत आहेत. आपल्या वलयाचा वापर करुन ग्रामीण भागामध्ये शेतक-यांना बोलावून कृषी मेळावे घेत आहेत आणि बियाणे घेण्यासाठी उद्युक्त करीत आहेत. चाळीसगाव सारख्या भागामध्ये बोलगार्ड बियाणे वापरुन शेतकरी उध्वस्त झालेला आहे. अमेरिकन कंपनीच्या नादी न लागता बोलगार्ड बियाणे शेतकरी घेत आहे. आपल्या वलयाचा फायदा घेऊन शेतक-यांना फसविले जाते अशा कलाकारांवर शासन कारवाई करणार आहे काय ? कारण कृषी मेळावे घेऊन शेतक-यांना बियाणे घेण्यासाठी भुलविले जाते हे वाईट आहे. जाहिरात करण्यावर आमचा आक्षेप नाही. परंतु अशा जाहिरातींमधून शेतक-यांची फसवणूक होत आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, इतर देशात काय चालले आहे याची माझ्याकडे माहिती नाही. भारतामध्ये हे बियाणे वापरले जात आहे. इनव्हायरमेंट प्रोटेक्शन ॲक्टमध्ये 4

....2

लक्षवेधी सूचना क्र. 4 पुढे सुरु..

श्री. बाळासाहेब थोरात ....

कमिटया काम करीत आहेत. जेनेटिंग इंजिनिअरींग ॲप्रुव्हल समितीने त्याला मान्यता दिल्यानंतर ते अधिकृत बियाणे म्हणून आपण स्वीकारले. 2002 साली या बियाण्याला मान्यता दिलेली आहे. केंद्र सरकारच्या समितीने मान्यता दिलेली आहे. कृषी मंत्रालयाचा सुध्दा त्यामध्ये सहभाग आहे. त्यानंतर ते बियाणे अधिकृत झालेले आहे. अधिकृत बियाण्याची जाहिरात केलेली आहे त्याच्याकरिता आपल्याला अशी कारवाई करता येणार नाही.

------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी.**: सांगली शहरातील दूषित पाण्याचा प्रश्न.

**मु.शी.**: सांगली शहरातील दूषित पाण्याचा प्रश्न याबाबत श्री. कन्हैयालाल गिडवाणी ,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. कन्हैयालाला गिडवाणी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. कन्हैयालाल गिडवाणी (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

कृष्णा नदीच्या पात्रात मोठया प्रमाणात शहराचे सांडपाणी सोडले गेलयाने नुकतेच हजारो मासे मृत्यूमुखी पडून, नागरीकांचे आरोग्य धोक्यात आल्याने व बांधा-यापुढील हरीपूरपर्यंत कृष्णा नदीला गटार गंगेचे स्वरुप प्राप्त झाल्याने अखेर प्रदूषण नियंत्रण मंडळाने सांगली - मिरज - कुपवाड महापालिकेला "कठोर कारवाईची" कारणे दाखवा नोटीस बजावली.

सांगलीतील "ड्रेनेज सिस्टम" सदोष आहे. शहरातील बरेचसे सांडपाणी कृष्णा नदीत मिसळते. नदीचे हे पाणी बंधा-यात अडविले गेले असल्याने ते दूषित पाणी नदीच्या पात्रातील पाण्यात मिसळते. असे हे प्रदूषित पाणी महापालिका "शुध्द करुन" नागरिकांना पुरवते. मग, नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार नाही तर काय ? चिंताजनक बाब म्हणजे गेली कित्येक वर्षे हे असेच चालू आहे.

उन्हाळयात नेहमीच कृष्णा नदीचे पात्र कोरडे पडते. या वेळीही ते कोरडे पडले. त्यामुळे शहराला पाणी टंचाई जाणवली. डबक्यातून साठलेले शेवाळेयुक्त पाणी पिण्याची पाळी नागरीकांवर आली. काही वेळा यात साखर कारखान्यांचे मळी मिश्रित पाणीही मिसळले जाते. नदी कोरडी ठणठणीत पडली की कोयना धरणातून पाणी सोडले जाते, पण ते येईपर्यंत गटार गंगेचे पाणी नागरीकांना प्यावे लागते. तसे पाहता दूषित पाण्यामुळे कृष्णेचे येथील पात्र वारंवार दूषित होते, शिवाय उन्हाळयात हे पाणी सांगलीपरिसराला अपूरे पडते. म्हणूनच यावर कायमचा तोडगा काढण्यासाठी आता वारणा नदीचे पाणी उचलण्याची योजना पुढे आली आहे. सांगली - मिरज - कुपवाड महानगरपालिका सभेतही या योजनेच्या प्रस्तावाला नुकतीच मान्यता देण्यात आली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आता या योजनेचे काम केव्हा सुरु होणार ? त्यासाठी निधी कसा उपलब्ध होणार ? योजना प्रत्यक्षात केव्हा येणार ? हे प्रश्न आहेत. वारणेचे हे पाणी बारमाही वाहते. तसेच वारणा धरण प्रकल्पामुळे गरजेप्रमाणे पाणीही उपलब्ध होऊ शकते. ही योजना पूर्ण करण्याचे आता राज्य सरकारने ठरविले आहे. प्रश्न हाच आहे की, वारणेचे पात्रही काही प्रमाणात प्रदूषित होते, ते कसे रोखणार ? सांगलीला भेडसावणारी शेरीनाल्याची समस्याही अद्याप पूर्णपणे संपलेली नाही. गंगा नदीप्रमाणे कृष्णा नदी शुध्दीकरण योजनेबाबत मध्यंतरी बरीच चर्चा झाली. त्या अनुषंगाने पुढे कोणतीच कार्यवाही झाली नाही.

दूषित पाण्यामुळे सांगलीकरांना सतत गॅस्ट्रो, कॉलरा, विषमज्वर या साथींना तोंड द्यावे लागत आहे. आतापर्यंत त्यात अनेकांचे बळी गेले आहेत. नुकतीच गॅस्ट्रो-कॉल-याची मोठी साथ येऊन गेली. वारणा नदीतून पाणी पुरवठा करण्यासाठी सांगली करीता 38 कोटी 98 लाख रुपये, तर कुपवाड योजनेसाठी 37,27 कोटी रु. खर्चाच्या स्वतंत्र पाणीपुरवठा योजना राबविल्या जाणार आहेत. खरे म्हणजे, सांगली भागाला वारणा नदीचे पाणी पुरविण्याशिवाय आता गत्यंतरच नाही ; कारण, कृष्णेवरील ताकारी -म्हैसाळ जलसिंचन योजनांमुळे पाणी उपसा वाढणार असून कृष्णा नदी कोरडी ठणठणीत पडण्याची परिस्थिती आहे. गेल्याच वर्षी याचा अनुभव आला. या योजना अद्याप पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेल्या नाहीत. तशा त्या झाल्यावर सांगलीकरांना पिण्याचे पाणीच मिळणे कठीण होणार आहे. म्हणून वारणेतून पाणी उचलून पाणीपुरवठा योजना राबविल्याशिवाय दुसरा पर्यायच नाही. जलप्रदूषणाची समस्या वेगळीच आहे. ती सोडविण्यासाठीही युध्दपातळीवर प्रयत्न होणे गरजेचे आहे.

आणखी एक मुख्य समस्या म्हणजे सांगलीची ड्रेनेज व्यवस्थाच सदोष आहे. पाणीपुरवठा योजनेतील बहुतांशी पाईप्सही गंजून गेले आहेत. पाणी पुरवठा करणारे बरेच पाईप उघडया गटाराशेजारुन, किंवा काही ठिकाणी गटारातून गेल्या आहेत. त्यामुळे सतत नागरीकांचे आरोग्य बिघडत असते. याचा सखोल अभ्यास होऊन कायमची उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. केवळ मलमपट्टया करुन चालणार नाही. यासाठी लागणारा निधी महापालिकेकडे नाही. तेव्हा

....5



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आता राज्य सरकारनेच सांगलीकरांच्या या समस्येकडे लक्ष देणे अगत्याचे आहे. मानवी वस्तीपासून अखंडपणे वहात जाणारे मलमूत्रमिश्रीत सांडपाणी, विविध प्रकारच्या कारखान्यांतून बाहेर पडणारे सांडपाणी, पाटाच्या पाण्याने अव्याहतपणे जलसिंचन केल्यामुळे शेतजमिनीतून पाझरुन जाणारे पाणी ; जमिनीतील क्षार, रासायनिक खते, विषारी किटक व जंतूनाशके गोळा करीत पुनश्च नदीच्या जलस्त्रोतात येऊन मिसळते आणि तेच पाणी - जलशुध्दीकरणाची जुजबी प्रक्रिया करुन पिण्यासाठी वापरले जाते. रोगांचे वाटप केल्याचाच हा प्रकार नाही काय ? बिचारे नागरीक नाके मुरडत हे पाणी पितांना दिसतात. जो सांगलीचे पाणी पितो तो जगातील कुठलेही पाणी पचवू शकतो, अशी सहज प्रतिक्रिया नागरीकांच्या तोंडी दिसते. यावर शासनाने त्वरीत कारवाई करुन सांगलीतील नागरीकांना वरील प्रसंगातून मुक्त करावे. कृपया माझ्या विनंतीचा विचार व्हावा हि विनंती.

आपण विशेष उल्लेखाद्वारे सभागृहात हा विषय उपस्थित करण्यास अनुमती दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शहरातील दूषित पाण्याचा हा महत्वाचा प्रश्न आहे. मध्यंतरी ब-याच घडामोडी झाल्या आहेत. 4 महिने निघून गेले तरी शासनाने अजून निर्णय घेतलेला नाही. कामाची सुरुवात झालेली नाही. शासनाने याबाबतीत ताबडतोब निर्णय घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

---

....6



**पृ.शी.**: राज्यात होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या.

**मु.शी.**: राज्यात होत असलेल्या शेतक-यांच्या आत्महत्या याबाबत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा.सदस्य श्री. संजय दत्त यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"गेल्या काही वर्षामध्ये शेतक-यांनी सातत्याने केलेल्या आत्महत्या हा अत्यंत चिंतेचा आणि शासनाच्या चिंतनाचा विषय आहे. शासनाने केलेल्या उपाययोजना या अत्यंत तुटपुंज्या असल्यामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत. महाराष्ट्रातील सुमारे 36 लाख शेतकरी कुटूंब ही कर्जबाजारी आहेत. कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतक-यांनी आत्महत्या केल्याची राज्यशासनाने न्यायालयात कबूली दिल्याची बाब अत्यंत गंभीर आहे. 2001 ते 2004 दरम्यान महाराष्ट्रात 644 शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. खरे पाहता शेतक-याला वीज, पाणी, बियाणे, शेतीची अवजारे आणि कमी व्याजदाराने अर्थपुरवठा इत्यादि सुविधा तसेच, शेतमालाला विमा संरक्षण, योग्य बाजारभाव आणि बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यातच शेतक-यांचे खरे हित आहे. आजच्या घडीला या गोष्टी त्याला उपलब्ध होत आहेत काय याचा शोध घेऊन मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या आत्महत्यांना पायबंद बसू शकेल. हा विषय सार्वजनिक व जनहिताच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने विशेष उल्लेखाची सूचना दाखल करीत आहे.

-----

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी . : रत्नागिरी येथील नाटयगृहाला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव देणे

मु.शी : रत्नागिरी येथील नाटयगृहाला स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे नाव देण्याबाबत डॉ.नीलम गो-हे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्या डॉ.श्रीमती नीलम गो-हे यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ. नीलम गो-हे ( विधान सभेने निवडलेल्या ) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते :

रत्नागिरी ही स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जन्मभूमी आहे.महाराष्ट्रातच नव्हे तर भारत,फ्रान्स,युरोप या देशांच्या भौगोलिक मर्यादा तोडून स्वातंत्र्य वीर सावरकरांनी देशाच्या स्वातंत्र्य लढयाचे निशाण सर्वदूर पोहोचवले,धाडस व वीरश्री यांच्या आधारे त्यांच्या प्रयत्नांचा ठसा जगाच्या व हिंदुस्थानच्या इतिहासावर उमटला असे असूनही आपणच आपल्या तेजस्वी परंपराचा सन्मान करतांना ठामपणा व निर्धारात कमी पडतो की काय अशी शंका वाटते. खेदाची गोष्ट अशी आहे की, रत्नागिरी येथे नाटयगृह पूर्णपणे बांधलेले असूनही त्यास स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव देण्यास विलंब होत आहे 2005 या वर्षी रत्नागिरी येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रेरणेतून आरंभ झालेल्या पतित पावन मंदिराला 75 वर्षे पूर्ण होत आहे. भागोजीशेट कीर यांच्या औदर्यामुळे व स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रेरणेतून हे मंदिर तयार झाले होते. अशा वेळी त्यांच्या स्मृतीस वेळेवर आदरांजली मिळावी म्हणून रत्नागिरी नगरपालिकेने नाटयगृहास स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव द्यावे या दृष्टीने शासनाने योग्य ती पावले उचलावीत वेळ पडल्यास नगरपालिकेला विंनती करावी यासाठी विशेष उल्लेखाव्दारे लक्ष वेधत आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ए पृ.शी : नेट सेटच्या परीक्षेतून प्राध्यापकांना सूट देणे

मु.शी : नेट सेटच्या परीक्षेतून प्राध्यापकाना सूट देण्याबाबत श्री.जी.एल.अैनापुरे,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.जी.एल.अैनापुरे यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.जी.एल.अैनापुरे ( पुणे विभाग शिक्षक ) महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो. :

"महाविद्यालयीन प्राध्यापकांच्या पात्रतेसाठी नुकतीच सेट परीक्षा झाली. या परीक्षेमध्ये सहा हजाराचे वर प्राध्यापक विद्यार्थी बसले होते व त्यापैकी फक्त 136 सेट परीक्षा पास होऊ शकले या परीक्षेचा निकाल 1.5 ते 2 टक्क्याच्या वर कधी लागत नाही. याची कारणे कोणती याचा तपास शासनाने करावा.

पाचवा वेतन आयोग स्वीकारतांना सेट किवा नेट परीक्षा पास करण्याची व त्यानंतर पात्रताग्राहय धरण्याची अट घालण्यात आली. त्यावेळच्या संघटनेच्या पुढा-यांनी स्वत:ला ती अट लागू होणार नाही अशी दक्षता घेऊन मान्य केली व पुढच्या पिढीचे शिरकाण करुन टाकले

नेट सेट ही परीक्षा म्हणजे यु.जी.सी. मधील विकृत विव्दानांची किमया आहे. अत्यंत दुष्ट बुध्दीने पण पध्दतशीरपणे गुणवत्तेच्या गोंडस नावाखाली सर्वसामान्य उमेदवारांच्या प्रगतीचा मार्ग रोखण्याचा प्रयत्न आहे. पारंपारिक विद्यापीठातील एम.ए.च्या परीक्षेत ज्यांना बी + आहे,70 टक्के गुण प्राप्त आहेत ते उमेदवार सुध्दा पात्र होत नाहीत .सेट/नेट परीक्षेचा अभ्यासक्रम तसा अवघड नाही. परीक्षेचे स्वरुपही किचकट नाही. मग एवढी मुले नापास का होतात ? याचा सर्व्हे घेतला पाहिजे या परीक्षेचे स्वरुप पारदर्शी नाही. मी नापास का होतो ? कोठे कमी पडतो ?मला किती गुण मिळाले ? याचा काही उलगडा होत नाही. याचे स्पष्टीकरण मिळत नाही. त्यामुळे महाराष्ट्रात 11 हजाराच्या वर उमेदवार प्राध्यापकपदी कायम होऊ शकले नाहीत. ज्यांना एका परीक्षेत डिस्टीक्शन मिळाले आह. त्यांना 4-5 वेळा सेट/नेट परीक्षेला बसून सुध्दा पास होता येत नाही. पारंपारिक विद्यापीठाची डिग्री टाकाऊ व तकलादू समजावी काय ? विद्यापीठाची परीक्षा आणि सेट नेट परीक्षा यातील ही तफावत पाहिली की संशयाला जागा राहते. या संशयाचे निराकरण झाले पाहिजे. 3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.ऐनापुरे ......

सध्या या परीक्षा वर्षानुवर्षे एकाच विद्यापीठामार्फत घेतल्या जातात या परीक्षांव्दारे कोटयावधी रुपयांचे उत्पन्न फक्त एकाच विद्यापीठाला मिळत आले आहे. शिवाय वर्षानुवर्षे तीच माणसे व तेच विद्यापीठ यामुळे तेथे वेगळया प्रकारचे रॅकेट तयार झाले असणार व ते उघडकीस येईपर्यन्त हजारो विद्यार्थ्याचा बळी जाणार आहे आणि हे त्या विद्यार्थ्यावर अन्याय करणारे ठरेल."

हे सर्व लक्षात घेता या परीक्षेचे स्वरुप बदलण्यासाठी शासन पुढाकार घेणार आहे काय ? यापूर्वी शासनाने काही ठराविक सालापर्यन्तच्या नोकरीस लागलेल्या प्राध्यापकांना या परीक्षेतून सूट दिली आहे. तशीच सून सन 2004-2005 अखेर पर्यन्त नोकरीस लागणा-याना प्राध्यापकांचे बाबतीत शासनाने द्यावी किंवा परीक्षेचे स्वरुप पारदर्शी करुन घ्यावे. यासाठी यु.जी.सी. बरोबर चर्चा करुन या सेट/ नेट या भयानक परीक्षेतून सर्वाना मुक्त करावे. ही नकारात्मक व अशास्त्रीय परीक्षा आहे काही मूठभर अपात्र लोकांनी हजारो पात्र विद्यार्थ्याचा मार्ग रोखून धरला आहे.यातून शासनाने काही सकारात्मक मार्ग काढून दिलासा दिला पाहिजे म्हणून विशेष उल्लेखाव्दारे मी हा महत्वाचा विषय सभागृहाच्या नजरेस आणून देत आहे.

-----

नंतर श्री. सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : मुंबईच्या रस्त्यांवरील भोंदू वैद्यांचे तंबू टाकून सुरू असलेले दवाखाने बंद करणे.

**मु.शी.** : मुंबईच्या रस्त्यांवरील भोंदू वैद्यांचे तंबू टाकून सुरू असलेले दवाखाने बंद करणे याबाबत डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

----

**उपसभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी 'विशेष उल्लेखा'ची सूचना दिली आहे. त्यांनी ती थोडक्यात मांडावी.

डॉ. दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रमाणे विशेष उल्लेख करीत आहे ..

माहे जून 2005 मध्ये राज्य शासनाने मुंबईसह राज्यातील बोगस डॉक्टरांच्या व्यवसायावर टाच आणण्याचा निर्णय घेतला असून यापुढे असा व्यवसाय करणाऱ्या वैदूंनाही तुरूंगाची हवा खावी लागेल असा इशाराही माननीय मुख्यमंत्र्यांनी दिला. असे असताना मुंबई शहरात व उपनगरात तसेच द्रुतगती मार्गांवर बंजारा तत्सम जातीचे लोक "आयुर्वेदिक दवाखाना" मॅटेडोर गाडीतून किंवा रस्त्यावर तंबू बांधून आपले दवाखाने थाटतात. अशा दवाखान्यातून 'ताकद की गोली' मिळेल अशा प्रकारे जाहिरात करीत असतात. ..

**उपसभापती** : आपण कधी त्या गोळ्या घेऊन पाहिल्या आहेत का ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी त्या गोळ्यांचा अनुभव घेतलेला नाही. वाटल्यास, मी आपल्याला त्या गोळ्या त्यांचेकडून आणून देऊ शकेन. तर अशा मेटाडोर वा तंबूमधील या दवाखान्यांची दखल आजपर्यंत राज्य सरकारने वा पोलिसांनी घेतलेली नाही. शिवाय अशा या दवाखान्यांमुळे, ते रस्त्यांमध्येच असल्याने वाहतुकीलादेखील अडचण होते. एकीकडे शासनाने कठोर निर्णय घेऊन त्यांची ठोस अंमलबजावणी करण्याचे आदेश देऊनही अशा प्रकारचे दवाखाने राजरोसपणे चालू असतात. तेव्हा मुंबईतील पूर्व आणि पश्चिम द्रूतगती मार्गांवरील मेटाडोर व तंबू मधून चालणारे दवाखाने बंद करून जनतेच्या आरोग्याशी चालविलेला हा खेळ थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने कडक कारवाई करावी. या लोकांना राज्याबाहेर घालवून द्यावे. कारण ते महाराष्ट्रातील नसून बिहार, उत्तर प्रदेश राज्यांमधून आलेले भोंदू वैद्य आहेत. तरी याबाबत आपण कडक कारवाई करावी यासाठी मी हा 'विशेष उल्लेख' करीत आहे. याची शासनाने त्वरित दखल घ्यावी ही विनंती.

***

...... आयआय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : वैद्यक व्यवसायी (सुधारणा) विधेयक, 2005.

L.C.BILL NO. XVII OF 2005.

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MEDICAL PRACTITIONERS ACT, 1961)

श्री. सुरेश शेट्टी (आरोग्य राज्यमंत्री) : महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 17 - महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्या साठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्रमांक 17 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. अनिल देशमुख (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, आता यानंतर नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे. परंतु संबंधित विभागाचे मंत्री खालच्या सभागृहामध्ये त्यांच्या विभागासंबंधातील अडीच तासाची चर्चा असल्याने आपल्या येथे येऊ शकत नाहीत. तरी माझी आपणास विनंती आहे की, शक्य झाल्यास आजची नियम 260 अन्वयेची चर्चा आपण पुढे ढकलावी.

**उपसभापती** : आता 4.00 वाजता कामकाज सल्लागार समितीची बैठक आहे आणि आपल्याला देखील त्यामुळे चहापानाची सुटी घ्यावयाची आहे. तेव्हा आपण जी सूचना केली आहे त्या संदर्भात सर्व गटनेत्यांचे विचार घेऊन, सर्व संमतीने ठरवावे लागेल. ते आपण चहापानाच्या सुटीनंतर जेव्हा सभागृहाची बैठक पुन्हा भरेल तेव्हा ठरवू. तोवर मी सभागृहाची बैठक चहापानासाठी 4.30 पर्यंत स्थगित करतो.

सभागृहाची बैठक 4 वाजून 30 मिनिटांपर्यंत स्थगित झाली.

( 3.54 ते 4.30 मध्यंतर )

( यानंतर श्री.जागडे ...जेजे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरानंतर )

**सभापतीस्थानी : माननीय उपसभापती**

**संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान ( 2003-04 ) राज्यस्तरीय ( चौथ्या ) फेरीचा निकाल.**

श्री. अजित पवार ( पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ) : अध्यक्ष महोदय,.....

( प्रेस : कृपया खालील निवेदन छापावे. )

( यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दाभोळ विद्युत प्रकल्पाची पुनर्रचना करणे यासबंधी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी केलेल्या निवेदनाबाबत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, काल याठिकाणी वीज मंडळाच्या संबंधात माननीय ऊर्जा मंत्र्यांनी निवेदन केले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले होते की, या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना 15-20 मिनिटात वितरित केल्या जातील. पण अद्यापही ते निवेदन आम्हाला मिळालेले नाही. आज याठिकाणी विजेच्या भारनियमनाबाबत चर्चा होत आहे. पण अजून काल केलेल्या निवेदनाच्या प्रती आम्हाला मिळालेल्या नाहीत अशी परिस्थिती आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, काल माननीय ऊर्जा मंत्र्यांनी एक निवेदन केले आणि त्यावेळी असे सांगितले की, या निवेदनाच्या प्रती वितरीत करण्यास 15-20 मिनिटे लागतील. त्यासाठी त्यांनी आमची परवानगीही घेतली. पण अजूनपर्यंत ते निवेदन मिळालेले नाही.

-----

. . . .2 के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आता विजेच्या संदर्भात चर्चा होणार आहे. पण त्यासंबंधीच्या नोटस् कोण घेणार आहे ?

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, मी नोटस् घेणार आहे. परंतु याबाबतीत मी मघाशीच सांगितले होते की, विधानसभेमध्ये याच विषयाच्या संबंधात अडीच तासाची चर्चा सुरु आहे. त्यामुळे माननीय ऊर्जा मंत्री विधानसभेमध्ये आहेत. मी याठिकाणी होणा-या भाषणांच्या नोटस् घेऊ शकतो. परंतु या सभागृहामध्ये ही चर्चा सोमवारी किंवा मंगळवारी ठेवता आली तर बरे होईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, यासंबंधात सकाळी चर्चा झाली आहे आणि त्यावेळी सभागृहाने अशा प्रकारची अनुमती दिलेली आहे की, माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी विधानसभेमध्ये सुरु असलेल्या विजेच्या संबंधातील चर्चेला उत्तर द्यावयाचे. या सभागृहामध्ये ही चर्चा उद्या किंवा परवा घ्यावयाची नाही. कारण एकदा वर्तमानपत्रामध्ये बातमी आल्यानंतर मग येथे चर्चा करण्यात काही अर्थ रहात नाही. त्यामुळे आता माननीय मंत्री महोदय श्री.अनिल देशमुख या चर्चेच्या संबंधातील नोटस् घेतील आणि विधानसभेतील चर्चा संपल्यानंतर माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील येथे येतील आणि मग ऊर्जा मंत्री म्हणून उत्तर देतील असे ठरले होते.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : होय.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याठिकाणी आत माननीय विरोधी पक्षनेते विजेच्या संदर्भातील चर्चेला सुरुवात करीत आहेत. परंतु आज एक लक्षवेधी सूचना दिली होती आणि ती उद्या घेण्यात यावी अशी विनंती केली होती. तर तशी ती उद्या घेण्यात येणार आहे असे गृहीत धरुन आज याठिकाणी चर्चा होत आहे एवढेच मी आपल्याला सांगू इच्छितो.

**उप सभापती** : ठीक आहे.

-----

. . . .2 के-3





पृ.शी.: राज्यात मोठया प्रमाणात सुरु असलेले भारनियमन.

मु.शी.: राज्यात मोठया प्रमाणात सुरु असलेले भारनियमन
या विषयावर सर्वश्री.पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार,
नितीन गडकरी, दिवाकर रावते,मधुकर चव्हाण,विनोद
तावडे,दीपक सावंत,विलास अवचट,अरविंद सावंत,
अनंत तरे,डॉ.नीलम गो-हे,श्री.श्रीकांत जोशी,श्रीमती
कांता नलावडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव .

. श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :--

"राज्यातील सध्याची विजेची प्रचंड मागणी व विजेची उपलब्धता यात प्रचंड तफावत असणे, पावसाळा सुरु झाल्यानंतर देखील ग्रामीण भागात पहाटे 5 ते रात्री 11 या काळात 4-4 तासांचे तर तातडीच्या कारणासाठी एक-एक, दोन-दोन तासांचे भारनियमन करावे लागणे, शहरी भागात सकाळी 9 ते सायंकाळी 6 वाजेपर्यंत 3-3 तासांचे भारनियमन करावे लागणे, भार नियमना नंतर सुरु होणारा वीज पुरवठा नियमित स्वरुपात न राहता कृषी पंप चालू राहतील एवढीही क्षमता त्यात नसल्यामुळे कृषी पंप चालू होऊ न शकणे, विहिरीत पाणी असून देखील ते पिकाला देता न येणे. त्यामुळे काही जिल्हयातील शेतक-यांची उभी पिके पाण्याअभावी सुकून जाणे, पिण्याच्या पाण्याच्या ज्या योजनांमध्ये पाणी उपलब्ध आहे, त्याठिकाणी सुध्दा भारनियमनामुळे व पुरेसा विद्युत दाब नसल्यामुळे पाण्याच्या टाक्यांमध्ये पाणी सोडणे शक्य न होणे, त्यामुळे लोकांचे पिण्याच्या पाण्या अभावी होणारे प्रचंड हाल, ठिकठिकाणी विद्युत मंडळाच्या कार्यालयावर लोकांचे मोर्चे निघणे, राज्यातील आधीच कर्जबाजारी झालेला शेतकरी वीज टंचाईच्या संकटात सापडणे, दाभोळ वीज प्रकल्पातून वीज मिळण्यास होणारा प्रचंड विलंब, नवीन वीज निर्मिती प्रकल्प वा खाजगी वीज निर्मितीस प्रोत्साहन देण्यात दिसून येणारी उदासिनता त्यामुळे भविष्यात कोणतीही प्रभावी उपाय योजना करण्याची कोणतीही शक्यता न दिसणे, राज्यभरात साडेसहा लाख वीज जोडण्यांची प्रकरणे प्रलंबित असणे, सदोष ट्रान्सफॉर्मरमुळे पारेषणातील घट वाढणे, परिणामी भारनियमनात वाढ होणे, सततच्या वीज टंचाईमुळे हवालदिल झालेला शेतकरी वर्ग, ग्रामीण भागाप्रमाणेच नागरी भागातही भारनियमन करावे लागत असल्यामुळे शेतीप्रमाणे औद्योगिक क्षेत्रालाही याची झळ बसून

. . . .2 के-4



श्री.पांडुरंग फुंडकर . . . .

उद्योगधंदे बंद होण्याची व राज्याबाहेर जाण्याची निर्माण झालेली परिस्थिती. त्यामुळे राज्याच्या ग्रामीण भागाप्रमाणे शहरी भागातील जनतेतही निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत करावयाची उपाययोजना."

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू..

सभापती महोदय, हा जो प्रस्ताव या ठिकाणी विरोधी पक्षातर्फे आणलेला आहे तो प्रस्ताव पहिल्यांदाच आलेला आहे असे नाही तर गेल्या पाच साडेपाच वर्षमध्ये अनेकवेळा वीज मंडळाच्या कारभाराच्या संदर्भात या सभागृहात चर्चा झालेली आहे. मागच्या डिसेंबरच्या नागपूर अधिवेशनामध्ये या विषयाची चर्चा झालेली आहे, अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये विधानसभेमध्ये या विषयाची चर्चा झलेली आहे. आता आम्हाला दुर्दैवाने पावसाळी अधिवेशनामध्ये या विषयावर चर्चा उपस्थित करावी लागत आहे, असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. गेल्या पाच-सहा वर्षापासून या राज्यामध्ये विजेची मागणी सतत वाढत आहे, कृषि पंपांसाठी विजेची मागणी वाढत आहे, कारखान्यांसाठी विजेची मागणी वाढत आहे, वेगवेगळया उद्योगधंद्यांसाठी विजेची मागणी वाढत असतांना विजेचे उत्पादन मात्र सहा वर्षापासून आहे तेवढेच आहे. विजेच्या उत्पादनामध्ये वाढ झालेली नाही. माझ्याकडे या वर्षाचा महाराष्ट्राची आर्थिक पहाणी अहवाल आहे. या अहवालामध्ये 1966 पासून राज्यामध्ये विजेच्या निर्मितीमध्ये किती वाढ झाली, याची माहिती देण्यात आलेली आहे. 1960 ते 1971 या 10 वर्षामध्ये 10.06 टक्के विजेच्या उत्पादनामध्ये वाढ झाली, 1971 ते 1980 या कालखंडामध्ये 10.28 टक्के विजेच्या उत्पादनामध्ये वाढ झली. 1981 ते 1990 या कालखंडामध्ये 10.65 टक्के वाढ झालेली आहे, 1991 ते 2000 या कालावधीमध्ये 7.06 टक्के विजेच्या उत्पादनामध्ये वाढ झाली. 2001 ते 2004 या कालखंडामध्ये .0.11 एवढी विजेच्या उत्पादनामध्ये वाढ झालेली आहे. विजेची सतत मागणी वाढत असतांनासुध्दा गेल्या 4 वर्षात विजेच्या उत्पादनात .0.11 टक्केच वाढ झालेली आहे. म्हणजेच फार कमी विजेच्या उत्पादनात वाढ झालेली आहे. याचा परिणाम विजेची मागणी 14,450 मे.वॅ.ची असताना प्रत्यक्षात उपलब्ध वीज मात्र 11,800 मे.व. आहे. म्हणजे 350 मे.वॅ. विजेचा पुरवठा आज भासत आहे,. त्याची पुर्तता केली जात नाही. परिणामी 350 हजार मे.वॅ. विजेचे भरनियमन राज्यात करावे लागत आहे. हे भारनियमन ग्रामीण भगामध्ये सध्या सायंकाळी 5 ते रात्री 11 वाजेपर्यन्त म्हणजे चार तासाचे भारनियमन केले जाते आणि शहरी विभागामध्ये सायंकाळी 6 ते रात्रौ 9 वाजेपर्यन्त भारनियमन केले जाते. तीन-तीन तासाचे भारनियमन केले जाते. आता शहरी भागामध्ये दीड ते अडीच तासाचे भारनियमन केले जात आहे. गेल्या मार्चचे अधिवेशन संपले, त्याच्या दुसऱ्या दिवशीच वीज मंडळाने ग्रामीण भागात नऊ तासाचे भारनियमन जाहीर केले. अगोदर पाच तासाचे भारनियमन होते, अधिवेशन संपल्यामुळे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे चालू...

आता त्याबाबत कोणला उत्तर द्यावे लागणार नाही, म्हणून दुस-या दिवसापासून ग्रामीण भागात नऊ तासाचे लोड शेडींग सुरु केले. याचा परिणाम म्हणून ग्राहकांना फटका बसला, शेती पंपांना फटका बसला, कारखान्यांना फटका बसला.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

विद्यार्थ्यांचा परीक्षेचा काळ होता, त्यावेळी सरकारने जाहीर केले की, शहरी भगातील विद्यार्थ्यांसाठी लोडशेडींग केले जाणार नाही. त्याप्रमाणे शहरी भागात लोडशेडींग काही काळासाठी बंद केले. पण त्याचवेळी ग्रामीण भागात लोडशेडींग सुरु होते. लोडशेडींगच्या बाबतीत ग्रामीण आणि शहरी असा फरक करण्यात आला. शहरी भागात श्रीमंतांची मुले, चांगल्या शाळा कॉलेजमध्ये जात असतात,त्यामुळे शहरी भागातील विद्यार्थ्यांसाठी लोडशेडींग बंद केले आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी लोडशेडींग बंद करण्यात आलेले नाही. अशा प्रकारे लोडशेडींगचा फटका विद्यार्थ्यांना बसला. मार्च महिना गेल्या नंतर उन्हाळा सुरु झाला. या राज्यातील जवळपास दहा हजार गावे 50 पैशाच्या आत आणेवारी असलेली गावे आहेत. त्या गावात पाऊस पडला नाही., त्यामुळे तेथे पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली. त्याठिकाणी नळपाणी योजनेला भारनियमनाचा फटका बसल्यामुळे त्या नळ योजनेतून पाणी उपसले गेले नाही. परिणामतः पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांना या भारनियमनाचा फटका बसल्यामुळे त्या गावांना 5/5, 6/6 दिवस पिण्याचे पाणी मिळाले नाही. शहरी भागात पंधरा दिवस नळाला पाणी आले नाही, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली. मग ते अकोला असेल, खामगांव असेल, जळगाव असेल, खानदेश असेल अशा अनेक गावात पिण्याचे पाणी पंधरा-पंधरा दिवस भारनियमनामुळे मिळालेले नाही. त्यामुळे पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा सामना त्या भागातील जनतेला करावा लागला. शेतीपंपाला वीज मिळाली नाही. बजेट अधिवेशन आटोपल्यानंतर 9 तासांचे लोडशेडींग सुरु झाले. त्यावेळेला रब्बीचे पीक शेतक-यांनी लावले होते. त्या कालखंडात मी नाशिक जिल्हयाचा दौरा केला. नाशिक जिल्हा कांदा पिकविणारा जिल्हा आहे. त्या जिल्हयामध्ये कांद्याची लागवड करण्यात आली होती आणि कांद्याचे दोन महिन्याचे पीक शेतात वर आले होते. लोडशेडींगचा फटका या कांदा उत्पादक शेतक-यांना बसला. शेतक-यांनी विजेचा पंप सुरु केल्यानंतर पाच मिनिट पंप चालवला की, लगेच वीज जायची, ती पुन्हा तीन-चार तास यायची नाही. कधी वीज यायची तर कधी लगेच जायची. त्याचा परिणाम असा झाला की, नाशिक परिसरातील हजारो एकरातील शेतक-यांचा कांदा जळून गेला. त्यामुळे कांदा उत्पादक शेतक-यांचे लाखो रुपयाचे नुकसान झाले. सभापती महोदय, मी

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MHM/ SBT/ प्रथम श्री. किल्लेदारे... 16:45

श्री. पांडुरंग फुंडकर..

नाशिक जिल्हयातील अनेक तालुक्यात गेलो, अनेक शेतात गेलो, तेथील शेती बघितली. तेथील शेतक-यांना याबाबतीत विचारले असता त्या शेतक-यांनी असे सांगितले की, आमच्या शेतात विहिरीला भरपूर पाणी आहे, पण ते पाणी उपसण्याचे साधन नाही. आमच्या मोटारी जळतात. विजेची अनिश्चितता आहे. कधी अचानक वीज येते आणि ती अचानकपणे जाते, त्यामुळे आमच्या मोटारी जळतात. विजेची मोटार जळाल्यानंतर त्या लवकर दुरुस्त होऊ शकत नाहीत. त्यमुळे असम्ही कांद्याला पाणी देऊ शकलो नाही. विजेच्या भारनियमनामुळे नाशिक जिल्हयातील हजारो एकरातील कांदा जळला, आणि कांदा उत्पादक शेतकरी उध्वस्त झाला. रब्बीच्या हंगामात शेतक-यांनी शेतात गहू लावला, सूर्यफूल लावले, सोयाबीन लावले पण ते रब्बीचे पीक घेणा-या

शेतक-यांच्या विहिरींना पाणी असून सुध्दा ते पाणी भारनियमनामुळे देता आले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील रब्बीचे पीक घेणारा शेतकरी उध्वस्त झाला. शेतकक-यांच्या शेतात उभे असलेले पीक भारनियमनामुळे करपून गेले. तरी सुध्दा त्या पिकांना पाणी देण्यासाठी शासन त्या शेतक-यांच्या शेतीपंपांना वीज देऊ शकले नाही, अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली. या भारनियमनाचा फटका कांदा उत्पादक शेतक-यांना बसला. सरकारच्या वेगवेगळया योजना आहेत. मग ती जवाहर योजना असेल. आय.आर.डी.पी. योजना असेल या योजनांच्या माध्यमातून शासनाने त्या शेक-यांना शेतीपंप दिलेले असतील, विहीर खोदायला कर्ज दिले असेल, पण अशा शेतक-यांना भारनियमनामुळे वीज कनेक्शन मिळालेले नाही.

यानंतर श्री. बरवड...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

सभापती महोदय, गेल्या सहा वर्षात विजेच्या कनेक्शनची मागणी एवढी वाढली आहे की, आज महाराष्ट्रामध्ये जवळपास साडेपाच ते सहा लाख शेतकऱ्यांनी विजेचे कनेक्शन मिळावे म्हणून अर्ज केलेले आहेत. परंतु त्यांना कनेक्शन देण्यात आले नाही. त्यांच्या अर्जाचा अजूनही विचार होत नाही. या राज्यामध्ये ज्यावेळी युतीचे शासन आले त्यावेळी दीड लाख शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित होते. परंतु युतीचे शासन आल्यानंतर शासनाने निर्णय घेतला आणि कालबध्द कार्यक्रम आखून एक वर्षाच्या आत दीड लाख शेतकऱ्यांना त्यावेळी विजेचे कनेक्शन दिले गेले. परंतु गेल्या सहा वर्षामध्ये साडेसहा लाख शेतकऱ्यांनी विजेचे कनेक्शन मागितले पण त्यांना हे शासन कनेक्शन देऊ शकत नाही. शेतकरी वीज मागतात पण त्यांना वीज देऊ शकत नाही. विजेची बिले मात्र येत आहेत, अशी स्थिती झालेली आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. देशमुख साहेब, आपण निवडणुकीच्या काळामध्ये घोषणा केली. आपल्याला या राज्यातील शेतकऱ्यांची मते पाहिजे होती म्हणून आपण गोंडस घोषणा केली की, आमचे सरकार आले तर या राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देऊ. त्या घोषणेचे काय झाले ? आपण घोषण केली आणि शेतकऱ्यांची मते घेतली. आपण कापसाच्या बाबतीत घोषण केली, विजेच्या बाबतीत घोषणा केली. त्या दोन्ही घोषणा हवेत विरल्या. पहिले वर्ष निवडणुकीचे वर्ष होते त्यामुळे त्यावेळी विजेची बिले झिरोची आली. मतदानाच्या आधी झिरोची बिले दिली त्यामुळे या राज्यातील शेतकरी सुखावले. त्यांना असे वाटले की, हे मायबाप सरकार आपल्याला वीज बिलातून मुक्त करीत आहे. आपल्याला झिरोचे बिल येत आहे. त्यामुळे त्यांनी आपल्याला भरभरुन मते दिली. परंतु एक वर्ष संपत नाही तोच श्री. शरद पवार साहेबांनी दम दिला की, मोफत वीज देता येणार नाही, तुम्हाला हा निर्णय घेता येणार नाही, हा निर्णय तुम्ही परत घ्या. अशा पध्दतीने त्यांनी दम दिला आणि मग या सरकारने मोफत विजेचा निर्णय मागे घेतला. या राज्यातील शेतकरी भिकारी नाही. या राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देऊ नका. त्यांचे असे म्हणणे आहे की, जेवढी वीज मागितली तेवढी वीज आम्हाला द्यावी. विजेचे बिल घ्या परंतु शेतकऱ्यांना वीज द्या. त्यांना सन्मानाने जगू द्या. त्यांना आपण मोफत वीज देत नाही आणि पैसे भरुनही वीज देत नाही. एका एका खांबासाठी दहा दहा हजार रुपये भरण्यास शेतकरी तयार असताना त्यांना वीज देत नाही. त्यांना पुरेशी वीज देत नाही. त्यांना मोफतही वीज देत नाही. जी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

वीज देण्यात येते त्यामध्येही भारनियमन करण्यात येते. अशा पध्दतीने या राज्यातील शेतकरी कसा जगणार ? विजेच्या या भारनियमनामुळे या राज्यातील शेतकरी उध्वस्त झाला. एका बाजूला विजेचे कनेक्शन नाही आणि दुसऱ्या बाजूला नुसते भारनियमनच नाही तर ग्रामीण भागामध्ये अशी परिस्थिती आहे की, 25 कनेक्शन क्षमतेचा एखादा ट्रान्सफार्मर असेल तर त्यावर 50 कनेक्शनचा लोड येतो. त्यामुळे ट्रान्सफार्मर जळत आहेत. एकदा ट्रान्सफार्मर जळाला की, तेथील शेतकऱ्यांची काय परिस्थिती होते ? तेथील 25 कनेक्शन्स बंद होतात. शेतकऱ्यांनी अर्ज केला तरी वीज बोर्डाकडून त्यांना सांगण्यात येते की, तुमचे बिल भरा, त्याशिवाय तुम्हाला ट्रान्सफार्मर दिला जाणार नाही. विजेचे बिल भरल्यानंतर त्यांना इंजिनिअर सांगतो की, नगदी दहा हजार रुपये आणा. त्याशिवाय ट्रान्सफार्मर दिला जात नाही. शेतकरी वर्गणी गोळा करुन पैसे भरतात आणि ट्रान्सफार्मर घेऊन ते स्वत:च्या वाहनाने त्या स्थळावर नेतात. त्यानंतर वीज मंडळाचे कर्मचारी त्या ठिकाणी जातात आणि ते फक्त ट्रान्सफार्मर वर चढवितात. यामध्ये 15 ते 25 दिवसांचा कालखंड जातो. त्या 25 दिवसांमध्ये त्या शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांची काय अवस्था होत असेल ? माननीय मंत्रिमहोदय, आपण स्वत: शेतकरी आहात. आपण याबाबत विचार केला काय ? सभापती महोदय, ट्रान्सफार्मची कहाणी फार वेगळी आहे. मी आपल्याला एक उदाहरण देणार आहे. कोल्हापूर जिल्हयामध्ये वीज बोर्डाचे एक अभियंता आहेत. मागच्या जून महिन्यामध्ये कोल्हापूरच्या वीज मंडळाच्या चाचणी विभागातील ट्रान्सफार्मर खरेदीतील भ्रष्टाचाराचे एक प्रकरण बाहेर आले. त्याच विभागातील अभियंत्याने हे प्रकरण उघडकीस आणले. विद्युत अभियांत्रिकीमध्ये वीज निर्मिती केंद्रापासून ग्राहकांपर्यन्त वीज पोहोचविण्यामध्ये ट्रान्सफार्मर हा महत्वाचा घटक आहे. हे ट्रान्सफार्मर अधिकाधिक कार्यक्षमतेचे असले पाहिजेत, त्यांची कार्यक्षमता जास्त असली पाहिजे, त्यामध्ये गळतीचे प्रमाण अत्यल्प असले पाहिजे, या उपकरणाने दीर्घकाळ सेवा द्यावी यासाठी काही राष्ट्रीय दर्जाचे मापदंड ठरविण्यात आलेले आहेत. त्याच्या दर्जाची खात्री करुन घेण्यासाठी वीज मंडळामध्ये चाचणी विभागात तेथील यंत्रणा काम करीत आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/ श्री.बरवडनंतर 16:55

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)**

श्री.पांडुरंग फुंडकर....

या ट्रान्सफॉमरच्या चाचण्या घेतल्या जातात. त्यासाठी विद्युत विभागामध्ये स्वतंत्र विभाग आहे. शिवाय 5 वर्षासाठी भारत सरकारने 2500 हजार कोटीची खरेदी करताना केंद्रीय संशोधन संस्थेकडून या उपकरणाची व दर्जाची खात्री करुन घेण्याचे बंधन घातले गेले आहे ते पाळले जाते काय ? नवीन ट्रान्सफॉर्मर बसविल्यानंतर वीज गळतीचे प्रमाण कमी व्हावे असे अपेक्षित असते. परंतु हे ट्रान्सफॉर्मर बसविल्यामुळे वीज गळती कमी होण्याऐवजी दुप्पट वीज गळती झालेली आहे. 63 के.व्ही.चा ट्रान्सफॉमर 60 हजार रुपये आहे तर 630 के.व्ही.क्षमतेचा ट्रान्सफॉमर 3 लाख रुपयामध्ये खरेदी करण्यात आला आहे. हे जर लक्षात घेतले तर वीज मंडळाने आतापर्यंत खरेदी केलेल्या ट्रान्सफॉमर्रच्या भ्रष्टाचाराचा घोटाळा काही हजार कोटीमध्ये जातो. यासंबंधी ई-टीव्ही, दूरदर्शनने सूतोवाच केलेले आहे. मा.ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे-पाटील यांच्या निदर्शनास ही बाब आल्यानंतर त्यांनी सांगितले की, यासंबंधी चौकशी करु. हे कोल्हापूरच्या ट्रान्सफॉमर्सचे प्रकरण मोठे आहे, हे ट्रान्सफॉमर्स बोगस आहेत, ते कसे खरेदी केले, कोठून खरेदी केले, त्याच्या चाचण्या झाल्या होत्या काय ? शेतक-यांच्या माथी कसे मारले गेले, त्याच्यातून वीज गळती कशी झाली आणि वीज मंडळाचे नुकसान किती झाले, खरेदीमध्ये किती हजार कोटींचा भ्रष्टाचार झाला त्याची चौकशी करणार होते ती चौकशी पूर्ण झाली की नाही आणि दोषी अधिका-यांवर काय कारवाई केली त्याचेही उत्तर द्यावे लागेल. राज्यामध्ये दिवसेंदिवस वीज गळतीचे प्रमाण वाढत चालले आहे. वीज चोरीचेही प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सरकारकडून आम्हाला सांगितले जाते की, आम्ही वीज चोरी कमी करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सभापती महोदया, माझ्याजवळ वीज चोरीची आकडेवारी आहे. 1992 मध्ये 23 टक्के, 1993 ते 1998 21 टक्के, 99 मध्ये 20 टक्के, 99 अखेर 33 टक्के, 2000-01 तध्यक 31 टक्के आणि 2001-02 मध्ये 42 टक्क्यापर्यंत गेली आहे. शासनाने किमान वीज चोरी जरी थांबविली तरी या राज्यातील शेतक-यांना भारनियमनाला तोंड द्यावे लागणार नाही. तुम्ही ही वीज चोरी थांबविणार आहात काय ? वीज चोरीचे प्रमाण जास्त कोठे आहे यासंबंधीची मी एक बातमी वाचली आहे. बारामती भागामध्ये वीज चोरी अधिक होत आहे त्यानंतर दुसरा क्रमांक लातूरचा आहे. एखाद्या शेतक-याने आकडा टाकला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

तर त्याच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये वीज चोर म्हणून गुन्हा नोंदविला जातो. परंतु आताच सांगितल्याप्रमाणे ज्या भागामध्ये प्रचंड वीज चोरी होत आहे त्या विभागातील वीज चोरीबाबत काय कारवाई केली जात आहे तेही सांगितले पाहिजे. एका बाजुला वीज चोरीचे प्रमाण या राज्यामध्ये वाढत आहे आणि जे या राज्यात राज्यकारभार करतात त्यांच्या भागात वीज चोरीचे प्रमाण वाढले आहे हे राज्यकर्त्यांना भूषणावह नाही. दुस-या बाजुला भारनियमनाची परिस्थिती निर्माण केली जात आहे. 5 एकरवाल्या शेतक-याने विजेचे बिल भरले नाही तर तुमचे अधिकारी जाऊन त्याचे कनेक्शन तोडतात. आज विजेचे बिल कोणत्या भागाचे बाकी आहे ते सांगितले तर आश्चर्य वाटावयास नको. भिवंडीची 700 कोटीची वीज बिले थकित आहेत. एका गावामध्ये 700 कोटीचे बिल बाकी आहे. हे बिल वसूल करण्याची तुमची हिंमत आहे काय ? थातूरमातूर वीज बिल वसूल करण्याचे तुम्ही नाटक करता. अधिकारी तेथे जातात आणि सांगतात की, आम्हाला धमक्या दिल्या जातात. कोणाच्या तरी धमक्यांना घाबरुन 700 कोटीची वीज बिले वसूल करु शकत नाही. ग्रामीण भागातील 50 रुपये, 200 रुपयाचे बिल भरले नाही तर तुम्ही वीज कनेक्शन तोडून त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करता. परंतु 700 कोटी रुपये वसूल का करीत नाही ? त्याठिकाणी तुमचे हितसंबंध गुंतले आहेत, एका विशिष्ट समाजाचे तेथे यंत्रमाग, हातमाग आहेत, एक विशिष्ट समाज तेथे धंदा करतो, त्यांची वीज बिले सक्तीने वसूल केली तर तुम्हाला मते मिळणार नाहीत म्हणून त्यांना वरदान दिले जाते,....

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 17:00

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

त्यांच्या वीज बिलाची वसुली केली जात नाही. मोठमोठ्या उद्योजकांच्या वीज बिलाची वसुली केली जात नाही. मात्र ग्रामीण भागातील शेतक-याच्या वीज बिलाची वसुली हे सरकार करीत आहे. अशा प्रकारे महाराष्ट्रात विजेचा कारभार सुरु आहे. मला यासंदर्भात अनेक उदाहरणे देता येतील. या विषयावर माझे अनेक सहकारी बोलणार आहेत. मागणी इतका विजेचा पुरवठा करता येत नाही म्हणून हा विजेचा प्रश्न राज्यात निर्माण झालेला आहे. आज राज्यात 3500 मे.वॅ. विजेचा तुटवडा आहे. राज्यात विजेची निर्मिती केली नाही तर ही तूट सारखी वाढतच जाणार आहे. शेतीसाठी, उद्योगधंद्यासाठी वीज मिळणार नाही. परवा मी अकोला एमआयडीसीमध्ये गेलो होतो. तेथील उद्योजकांनी मला सांगितले की, वीज मिळाली नाही तर आम्ही कारखाने चालवू शकणार नाही. काही कारखाने बंद पडून कामगार बेकार होत आहेत. राज्यातील ठिकठिकाणचे उद्योग दुस-या राज्यात जात आहेत. आपल्या राज्यात वीज मिळत नाही म्हणून उद्योजक हिमाचल प्रदेश पर्यन्त जात आहेत. आपल्या राज्यात विजेअभावी ते उद्योग चालवू शकत नाहीत.

सभापती महोदय, आपल्या राज्याचे मा. मुख्यमंत्री हे अमेरिकेच्या दौ-यावर गेले आणि तेथून त्यांनी स्टेटमेंट केले. एखादा मुख्यमंत्री परदेशी जातांना किंवा परदेशातून आल्यानंतर स्टेटमेंट करतो. परंतु मुख्यमंत्री परदेशात गेल्यानंतर तेथूनच स्टेटमेंट केल्याचे आजपर्यन्त तरी मी पाहिलेले नाही. आपल्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी अमेरिकेत गेल्यानंतर, 10 हजार कोटीचे उद्योग महाराष्ट्रात येणार आहेत, अशा प्रकारचे स्टेटमेंट केले. परंतु याठिकाणी उद्योग आल्यानंतर त्या उद्योगांना वीज कोठून देणार हे मात्र त्यांनी सांगितले नाही. वीज नसल्यामुळे राज्यात येणारे उद्योग हे डिझेल, पेट्रोल की रॉकेलवर चालवणार हे देखील त्यांनी सांगितले नाही. मात्र 10 हजार कोटीचे उद्योग महाराष्ट्रात येणार असे स्टेटमेंट करुन महाराष्ट्रातील जनतेला त्यांनी फसविले आहे. राज्यातील विजेच्या प्रश्नाच्या संदर्भात विविध पक्षांनी मग भारतीय जनता पक्ष असेल किंवा शिवसेना असेल, ठिकठिकाणी आंदोलने केली, रास्तारोको केले, वीज मंडळाच्या अधिका-यांना घेराव घातले. राज्यामध्ये विजेच्या संदर्भात विरोधी पक्षातर्फे आंदोलन सुरु असताना अचानक राज्यातील जनतेचे लक्ष दुसरीकडे वळविण्यात आले. वृत्तपत्रातून श्री. माधव गोडबोले आणि मा.केन्द्रीय मंत्री श्री. शरद पवार यांची जुगलबंदी सुरु झाली. या जुगलबंदीच्या एक नव्हे तर

...2..

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...

चार-पाच फे-या झाल्या. गोडबोले समितीचा अहवाल चुकीचा होता असे श्री. पवारसाहेबांनी सांगितले. हा गोडबोले समितीचा अहवाल चुकीचा होता तर मग तुमच्या सरकारने तो अहवाल स्वीकारलेला आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यानी गोडबोले समितीचा अहवाल बरोबर आहे असे सांगितले. मग प्रश्न असा निर्माण होतो की, श्री.पवारसाहेब बरोबर आहेत, श्री. माधव गोडबोले बरोबर आहेत की राज्याचे मुख्यमंत्री बरोबर आहेत ? कोण खरे आहे यासंदर्भात गावागावातून चविष्ट अशी चर्चा सुरु होती. या जुगलबंदीमध्ये एक महिना गेला. श्री. गोडबोले खरे की, श्री.पवारसाहेब खरे असे चित्र तयार करुन राज्यातील जनतेची दिशाभूल करण्यात आली. आता पुढच्या एक-दोन वर्षात प्लॅनिंग करुन भारनियमन कसे कमी करणार, हे भारनियमन शून्यावर कसे आणणार याचा महाराष्ट्रातील जनतेला जोपर्यन्त नीट संदेश जात नाही तोपर्यन्त महाराष्ट्रातील जनता तुम्हाला माफ करणार नाही असा इशारा देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

---

...नंतर श्री. खंदारे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित ) : सभापती महोदया, महाराष्ट्रातील घराघरात विजेचा प्रश्न निर्माण करणा-या सरकारच्या कुटील नितीच्या राजकारणाला सदिच्छा द्याव्यात की प्रतारणा करावी अशा प्रकारचे वातावरण या महाराष्ट्रात निर्माण करण्यात झालेले आहे. महाराष्ट्रात वीज पुरेशी असावयास पाहिजे परंतु आज मोठया प्रमाणात विजेचा तुटवडा आहे. या सदनात गेल्या अधिवेशनामध्ये राज्यात विजेचा किती तुटवडा आहे, विजेची तूट कशी कशी वाढत चालली आहे याबाबतची माहिती दिली. परंतु राज्यासाठी आवश्यक असणारी वीज का निर्माण केली नाही अशी माहिती विचारली असता ते माहिती देऊ शकले नाहीत. या राज्यामध्ये राज्यकर्त्यांनी भविष्यामध्ये "वीज निर्मिती हे प्रथम धोरण ठेवावे" असे होमी भाभा यांनी 50 वर्षापूर्वी सांगितले होते. कुठल्याही महाग वीजे पेक्षा वीज नसणे हे महाग आहे, त्याच प्रमाणे उपलब्ध असलेल्या विजेपेक्षा नसलेली वीज किती महाग पडते यासंबंधी त्यांनी आपल्या भाषणात चांगल्या प्रकारे विवेचन केलेले आहे. वीज उपलब्ध नसल्यामुळे राज्यातील शेतक-यांचे जीवन उध्वस्त झालेले आहे. राज्यात बेरोजगारी वाढली आहे. वीज टंचाईमुळे राज्यात नवीन कारखाने येत नाहीत अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. शाळा, महाविद्यालयापासून ते ग्रामीण भागापर्यन्त वीज नसल्यामुळे कशा प्रकारचे नुकसान होते याचा देखील त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केलेला आहे. सभापती महोदया, जेवढी वीज उपलब्ध आहे तेवढी वीज काळजीपूर्वक कशी वापरली जावी याला जास्त महत्व आहे. मला आठवते की, श्री. प्रकाश जावडेकर हे या सभागृहाचे सदस्य होते. ते सदस्य असताना या सभागृहात दाभोळ प्रकल्पाच्या बाबतीत चर्चा सुरु होती. त्या चर्चेच्या वेळी एक यूनिट वीज वाचविणे म्हणजे एक युनिट विजेची निर्मिती करणे असे वाक्य त्यांनी वापरले आहे. विजेच्या संदर्भात जनतेपर्यन्त चांगला संदेश द्यावा म्हणून त्यांनी ते वाक्य त्या चर्चेच्या वेळी वापरलेले आहे. या सरकारने जनतेपर्यन्त कोणता संदेश दिलेला आहे याबाबतीत मी नंतर बोलणार आहे.मी सुरुवातीला म्हणालो या सरकारच्या कुटील राजनितीला काय म्हणावयाचे ? महाराष्ट्रात पाण्याचा भीषण प्रश्न निर्माण झालेला होता. दुष्काळी परिस्थितीमुळे शेतक-यांचे जीवन उध्वस्त होत असल्याने शेतकरी आत्महत्त्या करण्यास प्रवृत्त होत आहेत हा एक ज्वलंत प्रश्न राज्यात निर्माण झालेला आहे, राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असताना राज्यातील जनतेला रोजगार हमी योजनेची कामे उपलब्ध करुन दिली गेली नाहीत हाही महत्वाचा प्रश्न





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

निर्माण झाला होता, जनावरांना लागणा-या चा-याचा प्रश्न निर्माण झाला होता. राज्यातील प्रत्येक विभागात जलसाठे किती टक्के शिल्लक आहेत हाही एक मोठा प्रश्न निर्माण झालेला होता. त्याच बरोबर या महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रापासून ते कुपोषणा पर्यन्तचे गंभीर प्रश्न होते. या सर्व प्रश्नांच्या बाबतीत शासनाने कोणत्याही प्रकारची गंभीर चर्चा केलेली नाही. फक्त विजेच्या प्रश्नावरच चर्चा केली गेली..

यानंतर श्री. कानडे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ 17:10

श्री. दिवाकर रावते ....

विजेचा प्रश्न सुरु ठेवल्यानंतर इतर सर्व प्रश्नांकडे दुर्लक्ष करता येते हे गणित या शासनाला जमल्यामुळे ही शिस्तबध्दता निर्माण करण्यात आली. मार्च महिन्यापासून टी.व्ही.,वृत्तपत्र यामध्ये भारनियमन हा एकच विषय. त्यातून होणारी आंदोलने आणि तोडफोड,जाळपोळ याबद्दलची माहिती येते. अशी माहिती आल्यानंतर ऊर्जामंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी मुलाखत देताना सांगितले की, राज्यामध्ये विजेची मागणी वाढत आहे,3300 मे.वॅ.विजेचा तुटवडा आहे तसेच वीज चोरी वाढलेली असल्यामुळे आणि विजेचा तुटवडा असल्यामुळे भारनियमन करणे गरजेचे आहे. त्यानंतर अर्थमंत्री श्री. जयंत पाटील येतात,त्यानंतर उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील येतात आणि त्यानंतर मा.मुख्यमंत्री आणि शेवटी केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार टी.व्ही.आणि वर्तमानपत्रातून मुलाखत देतात अशी सायकल पूर्ण झाली की पुन्हा तेच होते. वीज निर्मितीच्या बाबतीत आणि भारनियमन कसे वाढविणार हे सांगतात. 4 तासांचे भारनियमन 6 तासांवर जाणार. शहरी आणि ग्रामीण भागामध्ये एकच चर्चा सुरु असते ती म्हणजे भारनियमन. शिस्तबध्द पध्दतीने तीन महिने घराघरामध्ये तीच चर्चा आहे. उत्तर एकच आहे तुटवडयामुळे भारनियमन करावे लागत आहे. यासंदर्भात मोठया प्रमाणावर आंदोलने झालेली आहेत. जे राजकीय पक्ष कधी मैदानात उतरत नव्हते तेही यानिमित्ताने आंदोलन करायला लागले. तोंडाला काळे फासणे,कार्यालयाची मोडतोड करणे,रास्ता रोको अशा आंदोलनांना सुरुवात झाली. किरकोळ आंदोलने पाहून राजकीय पक्षांना वाटले की जनता खवळली आहे आपणही आंदोलन केले पाहिजे. गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांचे स्टेटमेंट आहे की जनतेचा संताप आहे समजून घ्या. कायदा आणि सुव्यवस्था मोठया प्रमाणात बिघडली आहे जनतेचा संताप आणि उद्रेकाकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे. सभापती महोदया, वीज मंडळाचे अध्यक्ष श्री. जयंत कावळे यांची एक मुलाखत प्रसिध्द झाली आहे. त्यातील काही भाग मी मुद्दाम याठिकाणी वाचून दाखवितो. निर्लज्जपणा हा शब्द देखील कमी पडावा असा या वीज मंडळाच्या कारभाराचा नमुना आहे. हा शब्द मी वाईट हेतूने वापरला आहे. हा शब्द असंसदीय नाही. या शासनाने सगळया सीमा पार करण्याची पाळी आणलेली आहे. श्री. जयंत कावळे यांना प्रश्न विचारला की खात्रीशीर वीज पुरवठयासाठी काय प्रयत्न सुरु आहेत ? त्यांनी सांगितले की, सध्या खात्रीशीर वीज पुरवठा चालू आहे. भारनियमनाच्या वेळा वगळता खात्रीशीर वीज मिळते. सभापती महोदया,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

SSK/ KGS/ MAP/ 17:10

श्री. दिवाकर रावते ...

अशा पध्दतीने मुलाखत देणे ही अतिशय गंभीर बाब आहे. सरकारचे हे धोरण आहे. त्यांना प्रश्न विचारला होता की, किती दिवसात वीजेचे कनेक्शन मिळेल ? त्यांनी सांगितले एक महिन्याच्या आत मिळेल. 17.4.05 च्या अंकामध्ये ही मुलाखत आहे. किती कनेक्शन पेंडींग आहेत याचा आकडा आताच विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी सांगितला आहे. सभापती महोदया, शासनाची ही सगळी बनवाबनवी आहे आणि ढोंगीपणा आहे. मराठीत म्हण आहे की, "यथा राजा,तथा प्रजा". आजची परिस्थिती तशीच आहे. अधिका-यांची अगतिकता निर्माण झालेली आहे. माझ्याकडे यासंदर्भात तक्ता आहे.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रावते ...

सभापती महोदया, विद्युत मंडळाचे एकूण ग्राहक 1 कोटी 33 लाख असून त्यापैकी 23 लाख शेतीचे ग्राहक आहेत. शेतकरी आकडे टाकून वीज चोरतात अशी सतत ओरड केली जाते.आकडा टाकणा-या शेतक-यांच्याविरुध्द कारवाई केली जाते असे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर सांगत असतात.चोरी करणे हे योग्य आहे की अयोग्य आहे याबाबतीत मी काही बोलणार नाही. त्याच्या मेरिटमध्ये मी जाणार नाही. परंतु मोठया चोराला सोडून सरकार मात्र भुरटया चो-या करणा-यांच्या मागे लागते. शेतकरी वर्षानुवर्षे आकडे टाकून विजेची चोरी करतात असे सांगितले जाते. जळगाव शहरात अनेक विजेची कनेक्शन्स एका दिवसात कापण्यात आली असल्याचे इ टी.व्ही. वर काही दिवसापूर्वी दाखविण्यात आले होते.श्री.सुरेश दादा जैन यांच्या जळगाव शहरातील ही परिस्थिती होती. तेव्हा ही विजेची चोरी कोणाच्या संमतीने चालली होती ? या वीज चोरीच्या मागे कोण होते ? त्या वीज चोरीला कोण संरक्षण देत होते ? मी मघाशी हे सांगितले होते की, वीज मंडळाचे एकूण वीज ग्राहक 1 कोटी 33 लाख असून त्यापैकी 23 लाख ग्राहक हे शेतीचे आहेत. 10 हजार मेगॅवॅटस बीजे पैकी 3 हजार मेगॅवॅटस वीज शेतीसाठी वापरली जाते. एकूण 12 हजार कोटी रुपयाचा वीज मंडळाचा महसूल असून शेती पंपाचा अपेक्षित महसूल 1 हजार 500 कोटी रुपये असतांनासुध्दा शेतक-यांच्या बाबतीत असंबध्द प्रचार केला जातो.हे दाखवून देण्याकरता मी ही सगळी आकडेवारी या ठिकाणी मुद्दाम सांगत आहे.शेतीची एकूण थकबाकी 3 हजार 800 कोटी रुपये एवढी आहे.कृषी संजीवनी योजनेव्दारे 632 कोटी रुपये वसूल करण्यात आले असून वीज मंडळाने पेललेला वाटा हा 500 कोटी रुपयांचा आहे. हे अत्यंत योग्य आहे,बेकायदेशीर आहे असे मला सांगावयाचे आहे. एक महिन्यात वीज कनेक्शन देण्यात येईल असे सांगण्यात येते परंतु 4 लाख कृषी पंपाना वीज देण्याचे अजून शिल्लक आहे. एप्रिल महिन्या अखेरचा हा आकडा आहे. महाराष्ट्रातील विजेची मागणी आणि वीज निर्मिती यामध्ये तफावत आहे.अमरावती येथे अपारंपारिक वीज निर्मितीच्या कार्यक्रमासाठी उर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील आले होते. केन्द्रीय उर्जा मंत्री श्री.अनंत गिते, राज्याचे उर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील आणि मी असे तिघेजण एका व्यासपीठावर होतो त्यावेळी केन्द्रीय उर्जा मंत्र्यांनी असे सागितले होते की,700 मेगॅवॅटस वीज केन्द्र सरकार आपल्याला देऊ इच्छिते. तसे त्यांनी कळविले होतेक. परंतु राज्य सरकारने असे सागितले की, आमच्याकडे वीज मुबलक आहे त्यामुळे आम्हाला

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रावते ...

ही वीज नको.केन्द्र सरकार 700 मेगॅवॅटस वीज देत असतांना आपण ही वीज नाकारली आहे.एनरॉनच्या संदर्भात कोर्टात ॲफिडेव्हीट करीत असतांना असे सांगितले जाते की आमच्याकडे वीज मुबलक आहे. मला या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांना असे विचारावयाचे आहे की जर आपल्याकडे वीज मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे तर मग भारनियमन कशासाठी केले जात आहे ? माननीय मंत्रिमहोदयांनी जनतेसमोर येऊन वारंवार जे सागत आहे ते फार गंभीर आहे, ते असे सांगत आहेत की,येणा-या चार वर्षात भार नियमन करावेच लागणार अराहे.चार वर्षे भार नियमन चालू राहणार आहे. लोकांनी आता अंधाराची सवय करुन घ्यावी. आम्ही वीज निर्मिती करु शकणार नाही.याबाबतीत तुम्ही किती नाटके केली होती याचे माननीय मंत्रिमहोदयांनी आज उत्तर दिले पाहिजे. भारनियमनाच्या बाबतीत मे महिन्यात जनतेमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला होता. तेव्हा केन्द्राकडून वीज आणतो असे सांगण्यात आले होते. राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि कॉंग्रेस यांचे भांडण जनतेच्या मुळावर का आल ? हे आम्हाला कळत नाही..काल एनरॉनच्या संदर्भात माननीय उर्जामंत्र्यांनी एक निवेदन केले होते. ते निवेदन मला मिळालेले नाही . एनरॉन कंपनीला आणणार आहे असे श्री.शरद पवार यांनी म्हटल्यानंतर आपले काय होणार आहे असा विचार करुन या बाबतीत माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की मी माननीय पंतप्रधांनाना भेटतो व त्यांना विनंती करतो. त्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री दिल्लीत गेले होते. वर्तमानपत्रात त्यांचे फोटो छापून आले .त्यांनी खरोखर चर्चा कली की चर्चेचे नाटक केले हे त्यांनाच माहीत आहे. त्यांनी असे सांगितले की, 1200 मेगॅवॅटस वीज केन्द सरकार देणार आहे. भारनियमन एक तासानी कमी करण्यात येणार असल्याचे देखील जाहीर करण्यात आले होते .वीज देतो असे जर केन्द्र सरकारने सांगितले असेल तर मग ही वीज कोठे आहे ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/KGS/MAP. श्री.गायकवाड नंतर --- 17:20

श्री. रावते .....

ती वीज का आली नाही ? आपण ती वीज का घेतली नाही ? सभापती महोदया, मग महिनाभरामध्ये भ्रमाचा भोपळा फुटला. वर्तमानपत्रातूनच बातमी आली की, केंद्र सरकारने कबूल केले होते त्याप्रमाणे वीज दिली गेली नाही. मग यामध्ये असत्य कोण बोलले ? केंद्राने वीज दिली असेल तर ती का घेतली गेली नाही ? का ती केंद्राने ती वीज आपल्याला दिलीच नाही याचा खुलासा या ठिकाणी होणे आवश्यक आहे. जनतेला महिनाभर अगदी ऊर्जा मंत्र्यांपासून तो केंद्रीय कृषी मंत्री असलेल्या माननीय श्री. शरद पवार आणि अगदी माननीय पंतप्रधानांच्या नावाने सांगितले गेले की, आम्हाला विजेचा भार कमी करण्यासाठी केंद्र सरकार वीज उपलब्ध करून देणार आहे, केंद्र सरकार महाराष्ट्राच्या मदतीला धावून आले आहे, वगैरे वगैरे. एवढे सारे म्हटले गेल्यानंतर ती वीज का आली नाही याचा खुलासा मंत्री महोदयांनी, शासनाने येथे करावा एवढीच आमची विनंती आहे. मोफत वीज देण्याचेही तुम्ही बंद केले. पुन्हा मी तो शब्द वापरत नाही. पण जनतेशी सरकारने असत्य बोलण्याला देखील काही मर्यादा असाव्यात. तुम्ही कसले राज्यकर्ते आहात ? आम्ही आमच्या जाहीरनाम्यामध्ये तुम्हाला मोफत वीज देण्याचा शब्द दिला होता पण पाच वर्षासाठी म्हणून आम्ही ती मोफत दिलेली नव्हती असे मोफत वीज देण्याचे बंद केल्यावर सरकार कडून सांगण्यात आले. व्वा, काय शब्द फिरविले आहेत ? जनतेनेही तुम्हाला एक महिन्यासाठी, सहा महिन्यांसाठी किंवा नऊ महिन्यांसाठी निवडून दिले होते का ? जनतेही तुम्हाला तुम्ही मोफत वीज देणार म्हणूनच तुम्हाला पाच वर्षासाठी निवडून दिले होते ना ? परंतु या मोफत विजेच्या प्रश्नावर माननीय मुख्यमंत्र्यांनी जनतेला स्पष्टपणे सांगितले की, आम्ही तुम्हाला पाच वर्षासाठी वीज मोफत दिली आहे वा देऊ असे म्हटलेले नाही. आम्ही तुम्हाला शक्य तितका काळ वीज मोफत दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष, श्री. अरूण गुजराथी या बाबतीत असे म्हणाले की, आपण जाहीर केलेली गोष्ट देत येत नसेल तर जनतेला आपण तसे स्पष्टपणे सांगितले पाहिजे की, आम्हाला ही ही गोष्ट कबूल केल्याप्रमाणे देता येत नाही. मग अशी नाटके कशासाठी चालविली ? अशीही बनवा बनवी नावाचे जसे नाटक होते तसेच या सरकारचा हा सारा खेळ झाला. सभापती महोदया, आंध्र प्रदेश सरकारने देखील आपल्या जनतेला जाहीर केले होते की, आमचे सरकार सत्तेवर आले तर आम्ही मोफत वीज देऊ म्हणून. कारण त्या राज्यात शेतकऱ्यांच्या सर्वात जास्त आत्महत्या झाल्या होत्या. म्हणूनच तेथे मोफत वीजेच्या घोषणेवर सरकार सत्तेवर आले आणि आजही आंध्र प्रदेश

...... टीटी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

सरकारने तेथील जनतेला मोफत वीज दिलेली आहे, त्यांनी ती देण्याचे बंद केलेले नाही. इतके असूनही आंध्र प्रदेशने महाराष्ट्र राज्याला त्यांच्याकडील सरप्लस वीज देऊ केली. मग आंध्र प्रदेश सरकारला जे जमते आहे ते आम्हाला का जमू शकले नाही असा महत्त्वाचा प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित करीत आहे. त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिले तर उत्तमच. सभापती महोदया, घरगुती वापरासाठी 44.2 इतकी वीज आहे आणि सिंचन, शासकीय कार्यालये वगैरेंसाठी 17.60 एवढी वीज आहे आणि औद्योगिक वापरासाठी सर्वात जास्त वीज आपल्या राज्यामध्ये दिली जाते. मग ज्या उद्योग धंद्यांमध्ये वीज वापरली जाते आहे ते उद्योधंदे आपल्या या लोड शेडींगमुळे बंद पडू लागले आहेत आणि त्यामुळे अनेक जण बेकार होऊ लागले आहेत त्याची जबाबदारी कोणावर आहे ? या सर्वाचा परिणाम म्हणून महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न घटत चालले आहे ही अत्यंत गंभीर अशी बाब आहे असे मला येथे नमूद करावेसे वाटते. महाराष्ट्र हे आघाडीवर असलेले राज्य आज पिछाडीवर कसे जात आहे हे यातून आपल्याला समजते आहे आणि हे सर्व कशामुळे झाले ? सभापती महोदया, निवडणुकीपूर्वी महाराष्ट्रात एवढीच वीज होती. परंतु गेल्या 10 वर्षामध्ये आम्ही एकही युनिट वीज निर्माण करू शकलो नाही असे सारखे सांगितले जात आहे. तर मग निवडणूक होण्यापूर्वी वीजेचे भारनियमन नव्हते. असे कां ? युती सरकारच्या काळामध्ये वीजेचे भार नियमन नव्हते. आज 60 टक्के कारखाने वीजेच्या भार नियमनामुळे बंद पडलेले आहेत. आता एकाएकी इतके वीजेचे भारनियमन का आले ? सभापती महोदया, मी हे आरोप करीत आहे. खरे तर सन्माननीय श्री.शरद पवार यांना एन्रॉन या महाराष्ट्रात पुन्हा सुरू करावयाचे होते आणि आहे. त्यासाठी एक मानसिकता निर्माण व्हायला पाहिजे म्हणून हा सारा खटाटोप करण्यात आला. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांनी मांडला तोच विषय आहे. ....

( यानंतर श्री.जागडे .... यूयू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

या महाराष्ट्रातील सर्व लोकांमध्ये एक सायकॉलॉजी निर्माण करण्यात आली. दोन तास वीज नाही, चार तास वीज नाही, नऊ - नऊ तास वीज नाही. यामुळे लोक कंटाळले. लोक म्हणायला लागले की, काहीही करा, पण वीज आणा. हे शब्द जेव्हा लोकांकडून यावयाला लागले. लोकांचा संतापाचा उद्रेक झाल्यानंतर माननीय शरद पवार साहेबांनी मे महिन्यात एक स्टेटमेंट केले. केंद्र सरकार एन्रॉन आणणार आणि 2 रुपये 30 पैसे या दराने वीज देणार. आता त्यांनी जे स्टेटमेंट केले होते, ते आता माझ्याजवळ नाही. या बाबतचा प्रश्न असा होता की, विजेबाबत आता केंद्र सरकार काय करणार आहे ? त्यावेळी मा. शरद पवार यांनी असे उत्तर दिले की, एन्रॉन प्रकल्प आता केंद्र सरकार ताब्यात घेणार आहे. सध्या महाराष्ट्र सरकार इतर राज्याकडून 3 रुपये 30 पैसे प्रति युनिट या दराने वीज खरेदी करीत आहे. आता एन्रॉन ताब्यात घेतल्यानंतर केंद्र सरकार 2 रुपये 30 पैसे या दराने वीज देणार आहे. त्याप्रमाणे एन्रॉन जी वीज निर्माण करणार आहे, त्यातील वीज इतर राज्यानाही दिली जाईल. आता यामध्ये एन्रॉन किती वीज निर्माण करणार आहे हे मला कळत नाही. महाराष्ट्राला जवळ जवळ 3 ते 4 हजार मे. वॅ. विजेची आवश्यकता असताना 1200 मे. वॅ. वीज निर्मिती एन्रॉन करणार आहे. मा. शरद पवार यांनी आपल्या मुलाखतीत असे सांगितले आहे की, एन्रॉन प्रकल्प केंद्र शासनाच्या मालकीचा करुन महाराष्ट्र राज्याचा विजेचा प्रश्न आम्ही सोडविणार आहोत. हे करण्यासाठी माननीय पंतप्रधान श्री.मनमोहन सिंग यांनी जी पाच लोकांची एक समिती नेमली आहे, त्या समितीवर मी स्वत: आहे. अशा प्रकारची घोषणा ज्यावेळी लोक कंटाळले, जेरीला आले, त्यावेळी श्री. शरद पवार यांनी केली आहे. आता एन्रॉन वीज कोणी बंद केली ? काँग्रेसच्या याच आघाडी सरकारने एन्रॉनची वीज बंद केली. एन्रॉनमध्ये असा करार होता की, संपूर्ण वीज सरकारने घेतली पाहिजे. संपूर्ण वीज सरकारला घेता येत नसेल तर 90 टक्के विजेचे पैसे सरकारने दिले पाहिजे. ते पैसे देता येत नव्हते, म्हणून आपण एन्रॉनची वीज बंद केली. तसेच महाराष्ट्रातील इतर प्रकल्प बंद पडतील म्हणून एन्रॉनची वीज वापरण्यात आली नाही.

श्री. गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय.....

श्री. दिवाकर रावते : मी माननीय सदस्य श्री. कुळकर्णी यांना सांगू इच्छितो की, आता आळंदीची यात्रा सुरु आहे. परंतु काही वाटा या चोराच्या आळंदीला जात असतात. त्यामुळे त्यामध्ये माननीय सदस्य कशाला सामील होत आहेत ? तो विषय आपण सोडून देऊ.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, आमचा खाजगी गुंतवणुकीला विरोध नव्हता, तर त्यामध्ये जी कलमे होती, त्या कलमांना विरोध होता. एन्‌रॉनचा करार ज्या छुप्या पध्दतीने झाला होता, त्याला आमचा विरोध होता.

श्री. गुरुनाथ कुळकर्णी : माननीय सदस्यांनी हे सोडून द्यावे. ते सगळे गंगेला मिळाले ना ?

श्री. दिवाकर रावते : काल माननीय मंत्रिमहोदयांनी या बाबत स्टेटमेंट केले आहे ना ? सभापती महोदय, चार ते पाच कंपन्यांबरोबर करार करण्यात आला आहे. आता या कंपन्यांबरोबर करार करीत असताना 50 टक्के आम्ही वीज घेऊ आणि 50 टक्के वीज विकण्यासाठी परवानगी देऊ. आता ही परवानगी देत असताना या कंपन्यांना ज्या सवलती दिलेल्या आहेत, त्या सदनाला माहिती नाहीत. सभापती महोदय, मला बोलावयाचे भरपूर आहे. परंतु वेळ कमी असल्यामुळे मला सर्वच विषयावर बोलता येत नाही. अपारंपारीक विजेच्या नावाने या ठिकाणी जे मंत्री आहेत, त्यांच्या घरातील पंखे फिरत आहेत. वीज निर्मिती न होता या कंपन्यांना फुकटचे पैसे दिले जात आहेत. बजाज कंपनीला आपण 700 कोटी रुपये दिले आहेत. ही रक्कम सबसिडीच्या माध्यमातून दिलेली आहे. किती कोटी रुपयांची सबसिडी आपण या कंपन्यांना दिली आहे. त्या संदर्भातील खुलासा माननीय मंत्रिमहोदय करणार आहेत की नाही ? आपण या सर्वांची नांवे आपण आम्हाला या ठिकाणी द्या. आमच्यातील कोण लोक असतील तर त्यांचीही नांवे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावीत. कोट्यावधी रुपयाची सबसिडी दिली असतानाही एक युनिट सुध्दा वीज आम्हाला मिळत नाही.

( यानंतर श्रीमती रणदिवे..

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

आणि या महाराष्ट्रातील जनतेला भारनियमनाला तोंड द्यावे लागत आहे. आज शेतकरी उध्वस्त होत आहे, कारखाने उध्वस्त होत आहेत. ग्रामीण भागामध्ये घरात घासलेटचा दिवा लावावा असे म्हटले तर ते देखील मिळत नाही. त्यामध्ये देखील तुम्ही काळाबाजार करीत आहात. अशा प्रकारे ग्रामीण भाग अंधारात बुडालेला आहे. वेळेअभावी मी अधिक बोलू शकत नाही. पण ही माया कुठेतरी जमा होत आहे आणि कोणाच्या तरी स्वार्थासाठी का होईना, उद्या याठिकाणी अत्यंत महागडी वीज आल्यानंतर लूट कोणाची आणि सजा कोणाला अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. महाराष्ट्रात गेल्या चार वर्षात कोणतीही वीज निर्माण करणार नाही असे सांगून हे शासन मोकळे झालेले आहे. याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट लक्षात घ्यावी की, अजून 14 सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे आहे आणि त्यानंतर माननीय मंत्री महोदयांना उत्तर द्यावयाचे आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांना दहा मिनिटांचा देखील वेळ मिळत नाही. तरी देखील सन्माननीय सदस्यांनी दहा मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेऊ नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, . . . .

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी 23 मिनिटे भाषण केले आहे. तेव्हा कृपा करुन आता बोलू नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वीज मंडळाने जी "अक्षय प्रकाश" योजना जाहीर केली आहे, त्यासंदर्भात मला बोलावयाचे होते. पण वेळेअभावी बोलता येत नाही. मी एवढेच सांगू इच्छितो की, "अक्षय प्रकाश" योजनेच्या बाबतीत जी जाहीरात करण्यात आली आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "सायंकाळी 5.00 ते रात्री 10.00 या वेळामध्ये जनतेने वीज चोरी करु नये." मग इतर वेळी वीज चोरी करावी का ? असे एका जागरुक नागरिकाने आपल्याला लिहीलेल्या पत्रामध्ये विचारले आहे.

-----

. . . .2 व्ही-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, विजेच्या प्रश्नावर चर्चा सुरु असताना मला सांगावयाचे आहे की, याबाबतीत आज महाराष्ट्र अतिशय संकटग्रस्त परिस्थितीत आहे. महाराष्ट्रात लोड शेडींग आहे. अनेक कारखानदार महाराष्ट्र राज्याच्या बाहेर आपले कारखाने नेत आहेत. त्यामुळे कारखान्याच्या माध्यमातून या राज्यातील तरुण मुलांना जी रोजगाराची संधी मिळणार होती, ती संधी त्यांना मिळणार नाही. जसे बाहेर लोड शेडींग आहे, तसे ते सभागृहात देखील आहे. बिचारे ऊर्जा मंत्री, त्यांनी परवानगी मागितली की, मला विधानसभेमध्ये याच विषयावर उत्तर द्यावयाचे आहे. अशा वेळी आमचे भाषण ऐकण्यासाठी ऊर्जा राज्यमंत्री देखील नाही. खरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णीसारखे उत्साही नेते ऊर्जेच्या क्षेत्रात . . . .

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : ते राज्यमंत्री म्हणून येण्यास तयार नाहीत.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, ते वाट पहात आहेत की, आम्हाला काम करण्याची संधी मिळावी. पण त्यांच्यासारख्या तरुण, उत्साही नेत्यांना तशी संधी मिळत नाही आणि याठिकाणी उत्तर देण्यासाठी मंत्री नाहीत. मी सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांना तरुण म्हटल्याबद्दल त्यांचा आक्षेप असेल तर त्यांनी तसे सांगावे. मी माझे शब्द मागे घेतो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, कालच शिवसेना प्रमुखांनी एक वक्तव्य केले आहे की, त्यांचे वय 80वर्षाचे झालेले असले तरी त्यांचे मन तरुण आहे. त्यांनी शिवसैनिकांना सांगितले की, माझे मन तरुण असल्यामुळे आजही शिवसेनेवर माझा पूर्णपणे कंट्रोल आहे. त्या कॉन्टेस्टमध्ये आपण मला विचारणार असाल तर, होय, माझे मन देखील तरुण आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, पान पिकलेले आहे, पण देठ हिरवा आहे. मी चांगल्या अर्थाने बोललो, आपणही चांगल्या अर्थाने घ्यावे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना सांगावयाचे आहे की, त्यांचा वेळ कमी होत आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, आज महाराष्ट्रात जी परिस्थिती आहे, ती कोणी निर्माण केली ? गेल्या सहा वर्षापासून आपण वीज निर्मितीसाठी कोणते प्रयत्न केले ? मी याचे पुरावे देतो. सहा वर्षात या शासनाने काय करावे ? तर मुंबई हाय कोर्टात खोटे ॲफीडेव्हीट केले की, महाराष्ट्रात सरप्लस वीज आहे. पण गेल्या सहा वर्षात वीज निर्मितीचे किती करार केले?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू...

किती पावर परचेस ॲग्रीमेंट केले, किती प्रोजेक्ट फायनान्शीयल क्लोझरपर्यन्त पोहोचले, हे पाहिले तर एकही प्रोजेक्ट पोहोचला नाही, असे दिसून येईल. आज देखील महाराष्ट्रामध्ये 450 मे.वॅ. विजेची टंचाई आहे, परंतु आज देखील महाराष्ट्रत वीज निर्मितीकरिता कोणत्याही प्रकारचे गंभीर प्रयत्न सरकारने केलेले नाहीत. वीज, पाणी रस्ते आणि दळणवळणाची साधने या चार गोष्टी असल्याशिवाय उद्योगधंदे येत नाहीत. मुख्यमंत्री उद्योगांनी गुंतवणूक करण्यासाठी अमेरिकेला गेले होते. यापूर्वी सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम हे उद्योग मंत्री असतांना ते अमेरिकेला जाऊन आले. त्यांनी अमेरिकेमधून काय आणले ? 950 कोटी रुपयाची गुतवणूक करण्याच्यादृष्टीने घोषणा केल्या गेल्या परंतु फुटक्या कवडीचीही गुंतवणूक येथे कोणी केली नाही. आता पुन्हा राणा भिमदेवी थाटात येऊन सांगितले गेले की, आम्ही पुन्हा गुंतवणूक करण्याच्यादृष्टीने इरादा पत्र केले. या इरादा पत्राला कोण विचारते ? लोक विसरुन जातात. बोलाचा भात आणि बोलाची कढी असा प्रकार आहे. अमेरिकेच्या एका कार्यक्रमामध्ये मा.मुख्यमंत्र्यांना एकाने विचारले की, मुख्यमंत्रीजी आपल्या राज्यात किती वेळ वीज आहे ? त्यावर त्यांनी तसे काही आमच्याकडे वीज पूर्णवेळ असल्याचे सांगितले. त्यानंतर एकाने सांगितले की, आम्ही ऐकले आहे की, राज्यात 12 तास वीज आहे आणि 12 तास लोड शेडींग आहे. मग आम्ही कशी इन्व्हेस्टमेंट करायची,असा प्रश्न केला. खरे म्हणजे मी मुख्यमंत्र्यांना सल्ला दिलेला होता. त्यांनी अमेरिकेत जाऊन तीन क्षेत्रात लक्ष घातले तर जास्त गुंतवणूक आली असती. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेब सगळयाच गोष्टींवर टीका करणे चांगले नाही. या महाराष्ट्रात सरकारने काही चांगले काम केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना मी विनंती करेन की, जे चांगले काम झालेले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे. त्याबाबत अभिनंदन केले पाहिजे. कॉंग्रेस-राष्ट्रवादीच्या सरकारने सहा वर्षामध्ये तीन क्षेत्रामध्ये चांगले काम केलेले आहे. त्याबाबतीत सरकार अभिनंदनास पात्र आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथजी आपण अभिनंदनास पात्र आहात. या राज्यात आपण कोणाला प्रोत्साहन दिले हे पाहिले तर असे दिसून येईल की, जनरेटर, इन्व्हर्टर आणि हेल्मेट या तीन क्षेत्रामध्ये इतके उत्तम काम केलेले आहे की, त्याची तोड कशालाच येणार नाही. ऐतिहासिक, क्रांतीकारी, मानाचा मुजरा असे जनतेकडून प्रमाणपत्र घ्या. याचे कौतुक आहे की, इन्व्हर्टरच्या एजन्सी जिल्ह्याजिल्ह्यात आहेत त्या यांच्याच मुलांकडे आहेत. म्हणजे इकडे लोडशेडींग करणारे हेच, इन्व्हर्टर विकणारे हेच, जनरेटर विकणारे हेच आणि हेल्मेटच्या एजन्सीकरिता लाईनमध्ये उभे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.नितीन गडकरी (पुढे चालू...

रहाणारे हेच. पुन्हा आमच्याकडे येऊन समृध्द आणि संपन्न महाराष्ट्र आहे म्हणून धब्बा मारुन भाषण करणारे हेच. हे महाराष्ट्रामध्ये काय सुरु आहे, मला कळत नाही. सभापती महोदया, महाराष्ट्राची वाट लागलेली आहे. अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत. त्यांची पाण्याअभावी,विजेअभावी पिके वाळली, उद्योग बंद पडत चाललेले आहेत, अजूनपर्यन्त महाराष्ट्राने वीज निर्मितीच्या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची प्रगती केली नाही. सह्याद्रीवर थूक पॉलीसचा एक कार्यक्रम झाला. 12 हजार कोटीचे इरादा पत्र देण्यात आल्याचे सांगण्यात आले. सन्माननीय श्री.जयंत पाटील साहेब मला शब्द वापरता येत नाही. इरादा पत्राचा कागद काहीही पुसण्याच्या लायकीचा नाही. याला काही अर्थ नाही. जागेचा पत्ता नाही, फायनान्शीयल क्लोझर नाही. पावर परचेस ॲग्रीमेंट नाही, कोणती फ्युएल आहे, याची काही माहिती नाही. पर्यावरणाचे फॉरेस्ट लायसन नाही, असे इरादा पत्र आहे. सन्मानीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकणी सांगतील की, माझा ऐश्वर्या रायशी लग्न करण्याचा इरादा आहे. त्यांचा इरादा असून काय उपयोग ? .ते असे म्हणत नाहीत, अशी त्यांची इच्छाही नाही. माझे ते चांगले मित्र आहेत. परंतु यांच्या इराद्याला काय अर्थ आहे ? ऐश्वर्या राय सलमान खान बरोबर जाईल नाही तर आणखी कोणाबरोबर तरी जाईल. आपल्या इराद्याला काय अर्थ आहे ? कोणीही इरादा पत्र देते. देशाचा प्रधानमंत्री होण्याचा माझा इरादा आहे असे कोणी पत्र देईल. परंतु त्याला कोण विचारते ? 12 हजार कोटीचे इरादा पत्र केले् म्हणून लगेच पेढे वाटले गेले, फोटो काढले, वर्तमानपत्राच्या फ्रंट पेजवर बातमी छापून आली. माझे असे म्हणणे आहे की, या इराद्या पत्रांपैकी एकाचा तरी दिवा लागलेला आहे काय ? तसे असेल तर मी हात जोडून सभागृहाची माफी मागतो. हे इरादा पत्र म्हणजे टरक्यामायसिनची कॅप्सुल आहे. जबरदस्तीने कागद लिहून घेतले. देणे-घेणे काही नाही. त्यांनी टाय घातले त्याबरोबर यांनीही सुटबूट घातले आणि हाय हाय करुन इरादा पत्र केले. अशाने काही होणार आहे काय ? हे जनतेच्या डोळ्यात धूळ फेकण्याचे लक्षण आहे. सरकार गंभीर नाही. एक हसतमुख होते, ते दिवसभर हसतच होते...साहेब आपल्याला एवढे मिळाले असे कार्यकर्त्यांनी सांगितले तरी त्यावर ते हसतच होते. त्यांची व्यक्तीमत्व हसतमुख होते, त्यांनतर देशमुख आले. या दोघांनीही महाराष्ट्राची वाट लावली. सभापती महोदया, सहा वर्षात वीज निर्मितीचे नवीन प्रकल्प केले नाहीत, मग महाराष्ट्र पुढे कसा जाणार ?

यानंतर कु.थोरात...

अप्रकाशित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी......

उद्योगधंदे कसे चालणार आहेत? ऊर्जा मंत्र्यांची ताकद आहे काय? त्यांनी या सभागृहात आज सांगावे. काल मंत्रिमहोदयांनी एन्रॉन बद्दल सांगितले. मी म्हटले कसेही असो, महाराष्ट्रात एन्रॉन च्या कॉन्ट्राव्हर्सीपेक्षाही महाराष्ट्रात वीज येते, हे महत्वाचे आहे. मी या मताचा नाही की, केवळ टीकेसाठी टीका केली पाहिजे. तुम्ही एन्रॉन प्रकल्प सुरु करुन 2500 मेगॅवॅट वीज दीड दोन वर्षात येणार असेल तर ती वीज पाहिजे आहे. श्री. दिवाकर रावतेसाहेबांनी मघाशी मा. श्री.भाभांचे वाक्य सांगितले, ते महत्वाचे आहे. विजेची किंमत किती आहे? आज वीज राहणार नसेल तर. शेतकरी असेल, उद्योगपती असेल, कामगार असेल, तरुण युवक असेल, आमच्या सगळयांच्या जीवनात अंधार झाल्या शिवाय राहाणार नाही.माणसाला जगण्याकरिता ऑक्सीजनची आवश्यकता आहे,तशी विकासाकरिता वीज पाहिजे. म्हणून विजेच्या बाबतीत वॉर फुटिंगवर प्रयत्न केले पाहिजेत. एम.एस.ई.बी.मध्ये एक नवीन मंत्री होते. त्यांनी मोअर जनरेशन, मोअर लॉसेस असे म्हटले. त्यावर कॉन्ग्रेसच्या सरकारने आता नवीन फॉर्म्युला काढला आहे. "नो जनरेशन नो लॉसेस."आणि हे खरे आहे.मराठवाडात लातूरमध्ये सगळयात जास्त वीज चोरी आहे. पुणे जिल्हयात बारामतीत वीज चोरी आहे. मला कळत नाही, जेथून राज्याचे प्रमुख येतात, तेथे वीज चोरी कां? अलिबागची वीज चोरी कां वाढत नाही? या प्रश्नाचे उत्तर कोणी देईल काय? मराठवाडयात 54 टक्के, 58 टक्के, 59 टक्के वीज चोरी आहे. मध्यंतरी सहयाद्रीवर प्रेझेंन्टेशन

झाले. मी थक्क झालो. वीज चोरी कां होते? मी असे म्हणत नाही की, विदर्भात वीज चोरी नाही. विदर्भातही वीज चोरी आहे. सगळया ठिकाणची वीज चोरी बंद झाली पाहिजे. 39 टक्के विजेचे नुकसान आहे. 13 टक्के ट्रान्समिशन-डिस्ट्रिब्युशन लॉस आहे. एक टक्का म्हणजे 160 कोटी रुपये होतात. म्हणजे ही जवळपास 2200 कोटी रुपयाची वीज झाली. 10 टक्के वीज शेतक-यांना दिली जाते. म्हणजे 1600 कोटी रुपयाची वीज आहे. 16 टक्के विजेची चोरी आहे. म्हणजे या राज्यात दर वर्षी 2500 कोटी रुपयाची वीज चोरीला जाते. या सरकारने प्रामाणिकपणे विजेचे बिल भरणा-यावर 25 पैसे विजेच्या चोरीचा टॅक्स लावला. ते बिल या सभागृहात पास झाले. मला सांगताना लाज वाटते की, शासन विजेच्या चो-या पकडू शकत नाही म्हणून जे इमानदारीने विजेचे बिल ---



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

भरतात त्यांच्याकडून पर युनिट 25 पैसे घेऊन चोरीचा पैसा वसूल करतो, ही या राज्यामध्ये स्थिती आहे. ही स्थिती चांगली नाही. शासन अजूनही गंभीर नाही. मी या राज्यात मागणी केली की, कोजनरेशनमध्ये 1800 मेगॅवॅटचे विजेचे प्रकल्प येऊ शकतात. कोजनरेशनचे सगळे करार, कराराप्रमाणे झालेले आहेत असे आता सांगितले. वीज निर्मितीमध्ये सगळयांना बोलावले पाहिजे. शेतक-यांमुळे वीज वाढली, तर शेतक-यांना रोजगार मिळणार आहे. कर्नाटकमध्ये एक प्रकल्प आला. बायोटेक्नॉलॉजीने एक झाड तयार होते. म्हणून रोज लोक लाकडे कापतात, त्याच्यातून वीज तयार होते. आज आपल्याजवळ कोळसा नाही.कोळशाची कमी आहे. केवळ आहे त्या पॉवर प्लॅनमधून महाराष्ट्रामध्ये कोल वॉशरीज सुरु केल्या तर 5 लाख युवकांना ताबडतोब रोजगार मिळेल आणि 600 मेगावॅट विजेचे उत्पादन वाढेल. पण हे कोणी करीत नाही. 6/6 महिने कोलवॉशरीजचे टेंडर पडलेले आहेत. ते फायनल होत नाहीत.मी यासंदर्भात सहयाद्रीवर बोललो होतो की, न्यूक्लीअर पॉवरचे प्रायव्हेटायझेशन करा. श्री. मनमोहन सिंग मुंबईत आले तेव्हा त्यांनी सांगितले की, न्यूक्लीअर पॉवर शिवाय पर्याय नाही. अमेरिकेतील 75 टक्के वीज न्यूक्लीअर पॉवर आहे.फान्सची 80 टक्के वीज ही न्यूक्लीअर पॉवर आहे. सातारा, कोल्हापूर, सांगली, पुणे या मधल्या पाच जिल्हयाच्या बेल्टमध्ये विजेचे शॉर्टेज आहे. चंद्रपूरची वीज तेथे नेण्यामध्ये शासनाचा दर वर्षी 500 ते 600 कोटी रुपयाचा ट्रान्समिशन, डिस्ट्रिब्युशन लॉस आहे.येथे महाराष्ट्र वीज मंडळ अणूशक्ती आयोगाच्या सहकार्याने,न्यूक्लीअर पॉवरचा प्रॉजेक्ट कां घेतला जात नाही? याबाबतचा कुणी विचारच करीत नाही. इथेनॉलचे प्रकल्प आम्ही सुरु केले. मी यासंदर्भात अनेकवेळा मागणी केली की, इथेनॉलच्या आधारावरचे जनरेटर सेट असतील त्यांना सगळे टॅक्स माफ करा. इथेनॉल द्या. शेतक-यांना तरी दोन पैसे मिळतील. पण डिझेलमध्ये रॉकेल मिसळून आज ते डिझेल वापरले जाते. शेतक-याच्या इथेनॉलला प्रोत्साहन देण्यास शासन तयार नाही. मी श्री. अतुल किर्लोस्करांना भेटलो. तो जनरेटर सेट तयार झाला. मी म्हटले तो श्री. शरद पवार साहेबांना दाखवा. महाराष्ट्रात तो आला पाहिजे. आपल्या घराघरामध्ये जनरेटरवर कमीत कमी इथेनॉलवर वीज तयार होईल. विंड पॉवर, हायड्रो प्रॉजेक्टच्याबाबतीत हीच स्थिती आहे. आज महाराष्ट्रातील 4500 जे 5000 मेगॅवॅट विजेचे प्रकल्प झुडपी जंगल आणि वन जमिनीमुळे अडकून पडलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

याबाबतीत क्रायसीस आहे. या सभागृहात आम्ही मागणी करतो की, या निमित्ताने आपण माननीय पंतप्रधानांकडे जावे आणि साडेचार ते पाच हजार मेगावॅट विजेच्या प्रकल्पाच्या बाबतीत फॉरेस्ट आणि एन्व्हायर्नमेंटचा क्लिअरंस घ्या. महाराष्ट्रामध्ये हायड्रो इलेक्ट्रीक प्रोजेक्ट सुरु करा. हिमाचल प्रदेशमध्ये साडेआठ हजार मेगावॅट वीज हायड्रो इलेक्ट्रीक प्रोजेक्ट पासून तयार होत आहे. मग महाराष्ट्रामध्ये आपण हायड्रो इलेक्ट्रीक करिता काय प्रयत्न करीत आहात ? आपण काही करीत नाही. लंडनमधील फिशरमन प्रभू जे श्री. शशी प्रभू यांचे मोठे भाऊ आहेत त्यांनी गुजरात सरकारला समुद्राच्या लाटेपासून वीज निर्मिती करण्याचा एक प्रोजेक्ट दिला. त्या ठिकाणी समुद्राच्या लाटेवर 4 हजार मेगावॅट वीज तयार होते. बाकीची राज्ये कोठे चाललेली आहेत ? गुजरात राज्याला आणि श्री. नरेंद्र मोदीला आपण जातीयवादी, सांप्रदायिक म्हणता. त्यांनी कोटयवधी रुपयांचा गॅस आज मिळविला आहे. गुजरातमध्ये लोडशेडींग नाही. आमच्या राज्यात वीज आहे, तुम्ही आमच्या राज्यात या असे ते आवाहन करतात. पहिल्या क्रमांकावर असलेल्या आपल्या राज्यातील उद्योगपती गुजरातकडे चालले आहेत. त्यांनी आपला गॅस तयार केला. त्यांची वीज सरप्लस आहे. ज्यांची तुम्ही सांप्रदायिक, जातीयवादी म्हणून हेटाळणी करता त्या श्री. नरेंद्र मोदी आणि गुजरात राज्याला राजीव गांधी फाऊंडेशनने विकासाच्या बाबतीतमध्ये पहिला क्रमांक दिलेला आहे. तुम्ही डोळे उघडे करण्यास तयार नाही. तुम्ही समजून घेण्यास तयार नाही. या सरकारला काही म्हणावयाचे असेल तर हे सरकार खुशालचेंडू सरकार आहे असे म्हणावे लागेल. हे सरकार कोणत्याही गोष्टीचा पाठपुरावा करीत नाही. कोणी चांगले सांगितले तर त्याचा विचार करीत नाहीत. मला माहीत आहे की, तुमच्याकडे अनेक सुसंस्कृत सन्माननीय सदस्य बसलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार आहेत, सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आहेत. त्यांचेही दु:ख आहे. सहन होत नाही आणि सांगताही येत नाही अशी त्यांची अवस्था आहे. ते बिचारे काय करतील ? ते बोलले तर हे ऐकत नाहीत. सगळे जण हसतात. त्यामुळे ते बिचारे बोलतही नाहीत. सांगून उपयोग नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांचे बरे आहे. ते ना इकडचे आहेत ना तिकडचे आहेत. इकडे गेले तर इकडे टाळया आणि तिकडे गेले तर तिकडे टाळया अशी त्यांची परिस्थिती आहे. जे झाले ते जाऊ द्या. काळ निघून जात आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. नितीन गडकरी ....

पाच वर्षे गेली. कोठे भानगडीत पडता ? इकडे दादा आहेत तर तिकडे विलासराव आहेत. त्यांच्याकडे पाहून हसले तर हे नाराज आणि यांच्याकडे पाहून हसले तर ते नाराज. त्यामुळे दोघांकडेही बघून हसा अशी परिस्थिती आहे. काही सन्माननीय सदस्य माझ्याकडे पाहून हसा असे म्हणत आहेत. आपले प्रेम जमत नाही. आधीच तिकडे बुकींग झाले आहे. सभापती महोदया, सरकार याबाबतीत गंभीर नाही. त्यामुळे हा प्रश्न कसा सुटणार ? विंड पॉवरच्या बाबतीत सर्व थांबलेले आहे. को-जनरेशनमधील प्रोजेक्ट पूर्ण होत नाहीत. हायड्रो प्रोजेक्ट्सची सुध्दा तीच स्थिती आहे. न्युक्लिअर पॉवरच्या बाबतीत निर्णय होत नाही. आज तारापूरचा युरेनियमवरचा 250 मेगावॅटचा प्रोजेक्ट पुनर्वसनामध्ये अडकला आहे. आपल्याकडे युरेनियम आहे, थेरीयम आहे, हेवी वॉटर आहे. या सभागृहामध्ये याबाबत किती वेळा बोलावयाचे ? तेच ते बोलून मला कंटाळा आला आहे. मी विरोधी पक्ष नेता असताना एक दिवस सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते असे म्हणाले की, तुम्ही विरोधी पक्ष नेते आहात, तुम्ही उगीच कशाला सल्ला देता ? मी त्यांना म्हणालो की, शेवटी हे आपले राज्य आहे. जरी विरोधी पक्षामध्ये असलो तरी राज्याचा विकास झाला पाहिजे. जनतेला न्याय मिळाला पाहिजे. तरुण माणसाला रोजगार मिळाला पाहिजे. शेतकऱ्यांना 24 तास वीज मिळाली पाहिजे. आपले राज्य पहिल्या नंबरवर नेले पाहिले. ते कोण नेतो हा प्रश्न नाही. या राज्याचा विकास झाला पाहिजे. ही तळमळ आपल्याजवळ असली पाहिजे. परंतु आमची तळमळ ऐकण्यास कोणी तयार आहे काय ? आम्ही या सभागृहामध्ये एवढया गंभीरपणे चर्चा करीत असतो. आम्ही माननीय मंत्रिमहोदयांना परवानगी दिली होती त्यामुळे त्यांच्यावर आक्षेप घेणे बरोबर नाही परंतु यासारख्या महत्वाच्या विषयावर आम्ही जे पोटतिडिकीने बोलतो त्यांची कोणी दखल घेतो काय ? मी गेली चार वर्षे बोलून बोलून थकलो. आधी विरोधी पक्ष नेत्याच्या पदावरुन बोलत होतो आणि आता या ठिकाणाहून बोलत आहे. काही सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, थकल्यासारखे वाटत नाही. त्यादृष्टीने पाहिले तर मी थकणार नाही. आम्ही जनतेच्या न्यायालयात जाऊन हे सांगू. परंतु माझे असे म्हणणे आहे की, या सभागृहाची एक सँटीटी आहे. या सभागृहाने आपले एक वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. या सभागृहामध्ये व्यक्त केलेले विचार अनेक लोक नंतर ऐकून घेतात, लिहून घेतात. माझी एवढीच विनंती आहे की, ऊर्जेची ही स्थिती दूर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. नितीन गडकरी ....

करण्याकरिता या चर्चेच्या निमित्ताने युध्दा पातळीवर काही तरी ॲक्शन प्लॅन या सभागृहामध्ये सांगावा. आम्ही हे करीत आहोत, या या तारखेला एवढी वीज मिळेल असे सांगावे. राज्यात साडेसहा लाख वीज पंपांना कनेक्शन नाही. 40 लाख एकर जमीन पाण्याखाली येऊ शकते. शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन विहीर बांधली, कर्ज घेऊन पंप घेतले. त्यांचा व्याजाचा मीटर सुरु आहे परंतु त्यांना कनेक्शन मिळत नाही. ते शेतकरी काय करतील ? त्यांचा आवाज पोहोचत नाही. हा किती महत्वाचा प्रश्न आहे ? माझी माननीय ऊर्जा मंत्र्यांना विनंती आहे की, आता आपण भाषण देऊ नका. प्रत्यक्ष कृतीचा आराखडा आणि युध्द पातळीवर आपण काय करणार आहात याचा दाखला या निमित्ताने द्यावा.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

महाराष्ट्राचे काही तरी समाधान करावे, राज्याला दिशा द्यावी, नाही तर आले आणि गेले अशी स्थिती होईल. कमीत कमी त्यांनी एवढा प्रयत्न करावा एवढी विनंती करतो आणि माझे बोलणे संपवितो.

-------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

**पृ.शी./मु.शी.**: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री.हर्षवर्धन पाटील ( संसदीय कार्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

"कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, दिनांक 14 जुलै, 2005 रोजी दुपारी 4.00 वाजता विधान भवन, मुंबई येथे झाली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन सोमवार, दिनांक 18 जुलै, 2005 ते शनिवार, दिनांक 23 जुलै, 2005 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला :-

| | |
|---|---|
| सोमवार, दिनांक 18 जुलै, 2005 | बैठक होणार नाही. |
| मंगळवार, दिनांक 19 जुलै, 2005 | 1) सन 2005-06 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा ( पहिला दिवस ).<br>2) शासकीय विधेयके. |
| बुधवार, दिनांक 20 जुलै, 2005 | 1) सन 2005-06 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा ( दुसरा व शेवटचा दिवस). |
| गुरुवार, दिनांक 21 जुलै, 2005 | 1) पुरवणी विनियोजन विधेयक.<br>2) अल्पकालीन चर्चा - नियम 97 अन्वये. |
| शुक्रवार, दिनांक 22 जुलै, 2005 | अशासकीय कामकाज ( विधेयके )<br>(गत सत्रातील प्रलंबित) |
| शनिवार, दिनांक 23 जुलै, 2005 | शासकीय विधेयके. |

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, माझा पॉईन्ट ऑफ प्रोसिजर आहे. दिनांक 19 जुलै रोजी शासकीय विधेयके आहेत. मधल्या कामकाजामध्ये इतर कामकाजानंतर दिनांक 23 रोजी फक्त शासकीय विधेयके आहेत. गेल्या वेळेचा अनुभव लक्षात घेऊन एकाच दिवशी 5 ते 7 शासकीय विधेयके आणावयाची आणि सभापतींनी आपल्या अधिकारामध्ये त्याला मान्यता देऊन चर्चेविना ती मंजूर करावयाची असे या सदनामध्ये होत आहे. शासकीय विधेयकाना कामकाज सल्लागार समितीने मान्यता दिलेली आहे. विधेयकावरील चर्चा एवढया तासामध्ये संपवावी, एवढया वेळेमध्ये संपवावी याला कामकाज सल्लागार समितीची मान्यता असेल असे मी मानत नाही.

**तालिका सभापती** : तसे मुळीच होत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, गेल्या वेळेला असे सांगितले की, कामकाज सल्लागार समितीमध्ये निर्णय झालेला आहे. आम्ही स्पष्ट शब्दामध्ये सांगतो की, जी विधेयके चर्चेला असतील त्या चर्चेसाठी वेळ मिळावा आणि जी विधेयके राहतील ती नाही झाली तरी हरकत नाही ती विधेयके पुढील अधिवेशनामध्ये घेण्यात यावीत.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, कामकाज सल्लागार समितीमध्ये आज जे ठरले त्यामध्ये असेच ठरले की, दिनांक 23 जुलै रोजी शासकीय विधेयके घेण्यात यावीत. त्याप्रमाणे आपण सर्वजण चर्चा करुन ठरवू त्याप्रमाणे ती होतील.

**तालिका सभापती** : जेवढा वेळ चर्चा व्हावयास पाहिजे तेवढा वेळ चर्चा होणार आहे. मा.सदस्यांनी काळजी करण्याचे कारण नाही.

श्री.दिवाकर रावते : ज्या विधेयकावर आम्हाला जेवढा वेळ बोलावयाचे आहे तेवढा वेळ आम्ही बोलूच.

**तालिका सभापती** : आपण त्या त्या बिलांवर बोलू शकता.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदया, कामकाज सल्लागार समितीमध्ये जे ठरले आहे त्याप्रमाणे शनिवारी इतर काही कामकाज होणार नाही, त्यादिवशी फक्त शासकीय विधेयके होणार आहेत असा त्याचा अर्थ आहे. याचा अर्थ जेवढी विधेयके आणतील तेवढी शासकीय विधेयके पूर्ण करणार असा त्यातून अर्थ निघत नाही. जे काही विधेयक येईल त्याच्यावर आपण चर्चा करु. आता नाही तरी आपण निर्णय घेतला आहे की, सदनाचे कामकाज सहा तास चालवावयाचे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-----

4....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

<u>**मा.पणन मंत्र्यांच्या निवेदनाबाबत**</u>

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी एक प्रश्न उपस्थित केला होता.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कापसाच्या प्रश्नासंबंधी, कोकणातील रत्नागिरीच्या हापूस आंब्याच्या संदर्भात, त्याच बरोबर धानाबद्दलचा तो प्रश्न आहे. त्यामुळे या सभागृहामध्ये तिन्ही खात्याचे मंत्री उपस्थित पाहिजेत. मंत्रिमहोदय जे निवेदन करु इच्छित आहेत ते त्यांनी उद्या करावे, कारण आम्हाला त्याच्यावर चर्चा करावयाची आहे. हा महत्वाचा विषय असल्यामुळे अशाप्रकारे हा विषय होऊ शकत नाही.

श्री.हर्षवर्धन पाटील : कापसाच्या पैशाचा विषय महत्वाचा नसेल तर मी खाली बसतो.

**तालिका सभापती** : मंत्रिमहोदय कोणत्या विषयावर निवेदन करीत आहेत ते तरी समजू द्यावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सन्माननीय सदस्य श्री.गडकरीसाहेब म्हणाले की, कापसाच्या पैशाचा विषय महत्वाचा नाही. त्यामुळे मी खाली बसतो.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदया, मी तसे म्हटलेले नाही. हा विषय महत्वाचा असल्यामुळे आम्हाला त्याच्यावर चर्चा करावयाची आहे असे मी म्हटले आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ MAP/ SBT/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 17:55

श्री. हर्षवर्धन पाटील : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मा. विरोधी पक्ष नेत्यांनी, कापसाच्या पेमेंटबाबत सरकारने निवेदन करावे अशा आशयाचे पत्र मा.सभापतींना दिले होते. त्यानुसार मा.सभापतींनी हे निवेदन करावे असे आदेश दिले. मा. सभापतींनी दिलेल्या आदेशानुसार माझे निवेदन तयार आहे. हे निवेदन उद्या करावे, असे मा.सदस्य सांगत असतील तर त्याबाबतीत माझी काही अडचण नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन चर्चा करण्यासंबंधी आम्ही नियम 289अन्वये प्रस्ताव आणला होता. त्या दिवशी सभागृह चालले नाही. 12 तारखेला मा.सभापतींनी, प्रश्नोत्तराच्या तासानंतर निवेदन करण्यास सांगतो, असे सांगितले. नियम 289चा प्रस्ताव हा कापसाचे पैसे, आंब्याला दिली जाणारी सबसिडी, आंबा पिकाचे, धानाचे जे नुकसान झाले त्याबाबतीत द्यावयाची नुकसान भरपाई, यासंबंधीचा होता. चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, कोकण या भागातील धान पिकविणा-या शेतक-यांना मा. मुख्यमंत्र्यांनी जे 20 कोटीचे अनुदान जाहीर केले होते त्याचेही पैसे द्यायचे राहिलेले आहेत, असे विषय त्या प्रस्तावामध्ये अंतर्भूत होते. आता केवळ मा.पणनमंत्री कापसाच्या संदर्भात निवेदन करीत आहेत. धान, आंबा आणि कापूस या तिन्ही विषयाच्या संदर्भात एकत्रित असे निवेदन झाले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : हा फार महत्वाचा विषय आहे. पहिल्या दिवशी मा.सभापतींनी सांगितले की, प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन अल्पकालीन चर्चा करु. परंतु त्या दिवशी चर्चा झाली नाही. दुस-या दिवशी मा. विरोधी पक्ष नेत्यांनी धान, कापूस आणि आंबा या तिन्ही विषयाच्या संदर्भात संयुक्त निवेदन करावे अशी विनंती केली. त्यामुळे या तीन विषयापैकी केवळ एकाच विषयावर निवेदन होणार असेल तर ते योग्य होणार नाही. तिन्ही विषय वेगवेगळे होतील. मा.सभापतींनी तिन्ही विषयासंबंधी तिन्ही विभागाच्या मंत्र्यांनी निवेदन करावे असे सांगितले.

**तालिका सभापती** : माझ्या माहिती प्रमाणे मा.सभापतींनी कापसाचे पैसे देण्याच्या संदर्भात निवेदन करावे असे आदेश दिले होते..

श्री. नितीन गडकरी : प्रस्तावामध्ये तीन विषय अंतर्भूत होते. त्यामुळे तिन्ही विषयासंबंधी एकत्रितपणे निवेदन होण्याची गरज आहे.... आमची मागणी मुळातच धान, कापूस आणि आंबा या तीन विषयाच्या संदर्भात निवेदन करावे अशी आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : माननीय सभापतींनी कापूस, धान आणि आंबा या तिन्ही विषयावर निवेदन करावे असे आदेश दिले...

श्री. नितीन गडकरी : केवळ कापसासंबंधी निवेदन करावे अशी आमची मागणी नाही...

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर माननीय सभापतींनी कापसाच्या संदर्भातील निवेदन करण्याचे निदेश दिले होते. त्यावेळी माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माननीय सभापतींना चिठ्ठी पाठविली होती..

**तालिका सभापती** : माननीय सभापती महोदयांनी निदेश दिल्याप्रमाणे पणन मंत्री निवेदन करण्यासाठी उभे आहेत. पणन मंत्र्यांना जे काही निवेदन करावयाचे आहे ते करु द्यावे. जर ते निवेदन आपल्याला परिपूर्ण वाटले नाही तर आपण ते निवेदन थांबवू आणि त्यांना एकत्रित असे परिपूर्ण निवेदन उद्या करण्यास सांगू.

श्री. हर्षवर्धन पाटील : माननीय सभापतींच्या आदेशाचे पालन होत नाही असा अनेक वेळा सभागृहात सदस्यांकडून उल्लेख केला जातो, त्यावर चर्चा केली जाते. माननीय सभापतींनी मला निवेदन करण्याचे आदेश दिले होते आणि मी आपल्या जागेवर उभा राहिलो आणि होय असे उत्तर मी या सभागृहात दिलेले आहे. माझी एवढीच विनंती आहे की, कापूस एकाधिकार खरेदी योजने अंतर्गत अग्रीम-1 च्या बाबतीत या सभागृहात चर्चा झाली होती. विदर्भातील, खानदेशातील तसेच उर्वरित महाराष्ट्रातील शेतक-यांचे त्यांच्या कापसाचे पेमेंट कधी मिळेल याकडे लक्ष लागलेले आहे. माझ्याकडे यासंदर्भात निवेदन तयार आहे. राज्यातील कापूस उत्पादक शेतक-यांचे कापसाचे पमेंट करण्यासंबंधीचे मला निवेदन करावयाचे आहे....

**तालिका सभापती** : आपण सभापतींचे आदेश पाळलेले आहेत. परंतु तुमच्याकडील निवेदन हे परिपूर्ण आहे काय ?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदया, दिनांक 11जुलै 05 रोजी सभागृहाचे कामकाज सुरु झाले त्या दिवशी आम्ही नियम 289 अन्वये प्रस्ताव सभागृहात आणला होता. परंतु त्या दिवशी सभागृहाचे कामकाज झाले नाही. दिवसभरासाठी सभागृहाची बैठक तहकूब झाली. दिनांक 12 जुलै 2005 रोजी तोच प्रस्ताव सभागृहामध्ये पुन्हा आणला. हा प्रस्ताव सभागृहात आणल्यानंतर माननीय सभापतींनी आम्हाला सांगितले की, प्रथम प्रश्नोत्तराचा तास होऊ द्या. प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर या प्रस्तावाचे काय करावयाचे ते नंतर सांगतो. प्रश्नोत्तराचा तास झाला त्यावेळी माननीय पणन मंत्री या सभागृहात उपस्थित नव्हते. त्या दिवशी या सभागृहात माननीय जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार उपस्थित होते. माननीय श्री.अजित पवार यांना माननीय सभापतींनी सांगितले की, नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावासंबंधी संबंधित मंत्र्यांना ताबडतोबीने निवेदन

2...

श्री.पांडुरंग फुंडकर...

करावयास सांगा. दिनांक 12 जुलै,05 रोजी सायंकाळपर्यन्त या प्रस्तावासंबंधी सभागृहात निवेदन होईल. परंतु ते निवेदन त्या दिवशी झाले नाही. 13 तारखेस देखील या प्रस्तावाबाबतचे निवेदन सभागृहात झाले नाही. नियम 289 अन्वये आम्ही जो प्रस्ताव दिलेला आहे त्यासंबंधी अजून पर्यन्त संबंधित मंत्र्यांनी निवेदन सभागृहात केलेले नाही. म्हणून यासंदर्भात मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यास संधी द्यावी अन्यथा आपण पुन्हा मंत्र्यांना निवेदन करण्याबाबतचे निदेश द्यावेत अशा प्रकारचे पत्र मी माननीय सभापतींना लिहीले. याचा सरळ अर्थ असा आहे की, आम्ही नियम 289 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्यासंबंधीचे निवेदन आम्हाला हवे आहे. कापसापूरते निवेदन आम्हाला नको आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदया, विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव सभागृहात आणला होता. त्या विषयावर त्यांना चर्चा उपस्थित करावयाची होती. या अनुषंगाने चर्चा सुरु असताना पणन मंत्र्यांना निवेदन करण्याचे निर्देश देण्यात आले. या ठिकाणी जो प्रस्ताव देण्यात आला होता व त्या अनुषंगाने चर्चा झाली. कापसाच्या संदर्भातील जी देणी आहेत त्या संदर्भात व नागपूरच्या अधिवेशनात सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, विदर्भ, कोकण आणि अन्य धान पिकविणारे विभाग आहेत. त्यांना 20 कोटी रुपये देण्याचा निर्णय झाला. त्यापैकी काही पैसे शासनाकडून दिले गेले आहेत, काही पैसे अजून द्यावयाचे आहेत. त्याबाबचा एक मुद्दा आहे. तिसरा मुद्दा कोकणात आंबा पिकाच्या बाबतीत दर हेक्टरी 10 हजार रुपये देण्याचा निर्णय झाला. परंतु अद्यापपर्यन्त त्या अनुदानाचे वाटप झालेले नाही. या तिन्ही महत्वाच्या बाबींच्या संदर्भात शासनाची भूमिका काय आहे याबाबतची माहिती सभागृहात निवेदनाव्दारे दिली गेली पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, आंबा, कापूस आणि धान या तिन्ही विषयाबाबतचा एकत्रित प्रस्ताव दिलेला होता व त्यावर तिन्ही मंत्र्यांनी निवेदन करावे अशी माननीय विरोधी पक्ष नेते यांनी मागणी केलेली आहे. तिन्ही विषयाच्या मंत्र्यांनी एकत्रित रित्या सभागृहात निवेदन करावे अशी आमची मागणी आहे. या ठिकाणी फक्त कापसाचे निवेदन करुन चालणार नाही. आंबा, धान या संदर्भात देखील निवेदन सभागृहात झाले पाहिजे. पणन मंत्री हे कापसाचे निवेदन करुन निघून जातील. उर्वरित दोन विषयांच्या बाबतीत निवेदन कोण करणार ? आम्ही दिलेल्या प्रस्तावाचे तुम्ही बायफरकेशन कसे काय करता आहात ?

3...



ABG/ MAP/ SBT/ KGS/ प्रथम श्री.शिगम 18:00

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदया, आम्ही बायफरकेशन केलेले नाही. मला माननीय सभापतींनी पणनच्या संदर्भात निवेदन करण्याचे निदेश दिले होते त्या प्रमाणे मी निवेदन करण्यासाठी उभा राहिलेलो आहे...

यानंतर श्री. कानडे..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ 18:05

**तालिका सभापती (**श्रीमती सुधा जोशी) : मंत्रीमहोदयांनी कापसाच्या संदर्भातील निवेदन याठिकाणी केले आहे. सभापतींच्या निदेशानुसार त्यांनी हे निवेदन केले. परंतु समजुतीच्या घोटाळयामुळे केवळ एका विषयावर निवेदन केले. मा.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तीनही विषयावर निवेदन होणे आवश्यक असल्यामुळे उद्या शासनातर्फे हे निवेदन करण्यात येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, 11 जुलै रोजी सभागृह तहकूब झाले त्यावेळी 12 जुलै रोजी निवेदन करण्यास सांगितले होते. उद्या या आठवडयातील शेवटचा दिवस आहे. अजूनही शासनाकडून परिपूर्ण निवेदन झालेले नाही. आम्ही बोलतो त्याचे तीन-तीन ठिकाणी रेकॉर्डींग होते. सभागृहात लिहिले जाते,टेपरेकॉर्डींग होते आणि अधिकारी वर्ग लिहून घेत असतो. याची दखल शासन घेते किंवा नाही ? आज सकाळी विरोधी पक्षनेत्यांनी निवेदन करण्याबाबत आठवण सुध्दा करुन दिली होती. तरीसुध्दा निवेदन झालेले नाही हे बरोबर नाही.

**तालिका सभापती** : एकाच विषयावर निवेदन असल्यामुळे हे निवेदन होणार नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, कोकण आणि विदर्भासाठी 20 कोटी रुपये धानाची नुकसान भरपाई म्हणून देण्याचे शासनाने मान्य केले होते. अजून एक रुपयासुध्दा दिलेला नाही. आंब्याची नुकसान भरपाई दिलेली नाही. निवेदन अपुरे येण्याची शक्यता आहे. उद्या होणारे निवेदन परिपूर्ण असले पाहिजे.

**तालिका सभापती** : तिनही विषयाबाबतचे परिपूर्ण निवेदन व्हावे ही सभागृहाची अपेक्षा शासनाने पूर्ण करावी.

श्री. हर्षवर्धन पाटील(पणनमंत्री) : सभापती महोदया, यासंदर्भात उद्या निवेदन केले जाईल.

**तालिका सभापती** : आता 6 वाजून 7 मिनिटे झालेली आहेत. रोज 6 तास काम करण्याचा नियम केलेला आहे त्यानुसार 7.00 वा. सभागृहाचे कामकाज संपवावे लागणार आहे. अजून 12 मा.सदस्य बोलणार आहेत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदया, आतापर्यंत ऊर्जामंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याऐवजी बांधकाम मंत्री श्री. अनिल देशमुख हे आमच्या भाषणातील मुद्दे लिहून घेत होते. आता श्री. अनिल देशमुख सुध्दा निघून गेले आहेत. आता ही जबाबदारी डॉ. विजयकुमार गावीत यांच्यावर टाकलेली आहे. म्हणजे फोकस नाही,कंदील नाही आणि चिमणी सुध्दा नाही मग कशावर चर्चा करावयाची ?

**तालिका सभापती** : आता मा.सदस्य श्री. विलास अवचट यांनी प्रस्तावावरील भाषण सुरु करावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात मोठया प्रमाणात होत असलेले वीजेचे भारनियमन.

**मु.शी.**: राज्यात मोठया प्रमाणात होत असलेले वीजेचे भारनियमन यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार,नितीन गडकरी,दिवाकर रावते,मधुकर चव्हाण,विनोद तावडे,दिपक सावंत,विलास अवचट,अरविंद सावंत,अनंत तरे,डॉ.निलम गो-हे श्री.श्रीकांत जोशी,श्रीमती कांता नलावडे,वि.प.स.यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे सुरु...)

श्री. विलास अवचट ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, या अडीच तासाच्या चर्चेमध्ये मी माझे मनोगत व्यक्त करीत आहे. राज्यामध्ये वीजेची टंचाई आणि भारनियमन हा विषय समोर असताना मला नाटककार कै. वसंत कानेटकर यांच्या "वीज म्हणाली धरतीला" या नाटकाची आठवण येते. या नाटकात झाशीच्या राणीच्या शौर्याची कथा आहे. झाशीच्या राणीमध्ये विद्युल्लता,चपळाई कशी होती हे या नाटकात दाखविण्यात आले होते.

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.कानडे 18.10

श्री.विलास अवचट ...

**(सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

आता माझ्यासमोर असा प्रश्न निर्माण झाला आहे की, या विजेमध्ये विद्युलता आहे काय ? विजेमध्ये चपळता आहे काय ? श्री.वसंत कानिटकर यांनी " वीज म्हणाली धरतीला " या नाटकात जे सांगितले होते त्याबाबत आत्मचिंतन करण्याचा प्रश्न आता निर्माण झाला आहे. वीज चोरीला आळा कसा घालावा यासाठी आपण दूरचित्रवाणीवर वारंवार जाहिराती बधत असतो.नाटककार श्री.अरुण नलावडे तसेच अखिल भारतीय नाटय परिषदेचे अध्यक्ष श्री.मोहन जोशी यांच्यासारखे दिग्गज कलाकारांना वीज मंडळाने पणाला लावले आहे. अशा प्रकारच्या जाहिराती दिल्या नंतर .दोन महिन्याच्या कालावधीत त्याचा किती परिणाम झाला याबाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगणे आवश्यक आहे.आज सकाळी एक लक्षवेधी सूचना मांडण्यात आली होती .सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी कोकणाची अशी व्यथा मांडली होती की गेल्या चार महिने कोकणात 10 ते 12 तास भारनियमन होत आहे परंतु ते भारनियमन का केले जात आहे हे सांगण्या ऐवजी पुढच्या पाच सात वर्षात वीज मंडळाचे धोरण काय आहे हे सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. या निवेदनात असे सांगण्यात आले की," राज्यात निर्मिती क्षमता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. अनुषंगाने खाजगी गुंतवणुकीव्दारे निर्मिती प्रकल्प अस्थापित करण्यासाठी धोरण निर्गमित करण्यात आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य पॉवर जनरेशन कंपनीच्या प्रस्तावित उरण,तळेगाव व खापरखेडा प्रकल्पांना शासनाने मान्यता दिली आहे.दाभोळ प्रकल्प पुन्हा सुरु करणे दृष्टीक्षेपात असून जुलै 2006 ते डिसेंबर 2006 या कालावधीत हा प्रकल्प टप्याटप्याने सुरु होईल.तसेच पारस आणि परळी प्रकल्प 2006-23007 मध्ये कार्यान्वित होतील. त्यामुळे पुढील वर्षापासून मोठया प्रमाणावर भारनियमन कमी होऊन येत्या पाच वर्षात भारनियमन शुन्यावर आणण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे." लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने माननीय मंत्रिमहोदयांनी पुढील पाच वर्षाचे धोरण सांगितले होते.वीज निर्मिती, विजेची चोरी आणि थकबाकीची वसुली असा त्री सूत्री कार्यक्रम जर शासनाने नीट राबविला असता तर आज हा प्रश्न उपस्थित करण्याची वेळ आली नसती.केन्द्रीय उर्जा खात्याने गुणांकन अहवाल प्रसिध्द केला असून देशातील 29 वीज निर्मिती करणा-या राज्यासबंधी हा गुणांकन अहवाल होता. गुणांकन करीत असतांना त्यांनी काही निकष लावले होते. नवीन वीज

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अवचट.....

कायद्याची अंमलबजावणी,ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमाची अंमलबजावणी,वीज निर्मिती केन्द्राची क्षमता, वीज गळतीचे प्रमाण, महसुल वसुली इत्यादी निकषावर गुणांकन देण्यात आले होते.मार्च 2005 मध्ये जो अहवाल प्रसिध्द केला होता. त्यामध्ये आंध्र प्रदेश राज्याला 56.75 टक्के गुण मिळाले असून त्यांना .प्रथम क्रमांक मिळाला .आपल्या राज्याला 37.25 टक्के मार्क्स मिळाले आणि आपण 12 व्या क्रमांकावर आहोत. आपण काठावर पास झालो आहोत..हे गुण पाहिल्यानंतर शासन याबाबतीत काही विचारविनिमय करणार आहे किंवा नाही ? असे मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावेसे वाटते. काही वर्षा पूर्वी आपण स्वत: वीज निर्मिती करुन इतर राज्यांना वीज पुरवत होते. परंतु गेल्या चार पाच वर्षात 9 -10 तास विजेची वाट पाहणा-या लोकांवर असे म्हणण्याची पाळी आली आहे की, " फिटे अंधाराचे जाळे, झाली जनता हताश, गावा गावातून न वाहे प्रकाश प्रकाश " गेल्या पाच वर्षाचा आढावा द्यावयाचा तर 14 हजार 331 मेगॅवॅटस वीज निर्मितीची क्षमता आपण निर्माण केली आहे.

नतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MHM/SBT. श्री. गायकवाड नंतर --- 18:15

श्री. अवचट ....

त्यापैकी 9811 महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाची, 2349 केंद्र सरकारची, 1771 टाटा कंपनीची आणि 500 बीएसइएसची अशी एकूण 14341 मे.वॅ. एवढी वीज असताना गेल्या पाच वर्षातील अहवालाचा तक्ता पाहिला तर त्यामध्ये प्रत्यक्ष वीजेची मागणी, पुरवठा आणि तूट या बाबतची परिस्थिती काय होती हे मी आपल्याला सांगू इच्छितो. 2000-01 मध्ये वीजेची मागणी 10473 मे.वॅ.ची होती आणि त्यावेळी 8651 मे.वॅ. इतका वीजपुरवठा करण्यात आला होता. 2001-02 मध्ये वीजेची मागणी 10119 होती आणि पुरवठा 9113 इतका करण्यात आला होता. 2002-03 मध्ये 11425 ची मागणी असताना 9004 इतका वीजपुरवठा करण्यात आला होता. तर 2003-04 मध्ये 11357 ची मागणी असताना 9315 इतका वीजपुरवठा करण्यात आला होता आणि 2004-05 मध्ये राज्य वीज मंडळाच्या इतिहासामध्ये कधी नव्हती एवढी म्हणजे 12204 मे.वॅ.वीजेची मागणी असताना केवळ 2483 मे.वॅ. वीजेचा पुरवठा वीज मंडळ करू शकले आहे. म्हणजेच जवळ जवळ 2721 मे.वॅ. वीजेची तूट होती आणि त्यामुळेच न भूतो, न भविष्यती, आपण जवळ जवळ 9-9, 10-10 तास वीजेचे भारनियमन केले. हे करीत असताना औद्योगिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्रामध्ये, व्यापारी क्षेत्रामध्ये त्याचा परिणाम झ ाालाच पण आरोग्य-वैद्यकीय क्षेत्रामध्ये देखील त्याचा मोठा परिणाम झाला आहे, जो आपल्या अजूनपर्यंत निदर्शनास आला नाही वा आणला गेला नाही. म्हणजे आरोग्याच्या दृष्टीने जी औषध निर्मती केली जाते त्यांचेवर तर या भारनियमनाचा परिणाम झालाच पण औषधांची दुकाने आहेत की ज्या ठिकाणी औषधे ठेवण्यासाठी म्हणून आपण रेफ्रिजरेटर्स ठेवणे सक्तीचे केलेले आहे, जेणे करून ती औषधे खराब होऊ नयेत. त्यावर देखील या भार नियमनामुळे परिणाम झाला आहे. औषधांच्या दुकानांतील रेफ्रिजरेटर्स वीजेच्या भार नियमनामुळे बंद झाली आणि त्यामुळे ॲम्पिसिलीन, रेटिनॉल, पेनिसिलिन वगैरे सारख्या आन्टीबायोटिक्स औषधांवर विपरित परिणाम झालेला आहे. याची जबाबदारी या खात्याने घेतली आहे की नाही याची मला माहिती नाही. आपल्याकडे हॉस्पिटल्सकडून, ग्राहकांकडून याबाबत तक्रारी आलेल्या आहेत पण लक्षात कोण घेतो ? हा सगळ्यात महत्त्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, हे सर्व सांगत असतानाच शिवसेने तर्फे ठाणे,नाशिक,नंदूरबार, अमरावती या चार जिल्ह्यांमध्ये 9 हजार एनआयसीयू म्हणजे नवजात अर्भक दक्षता युनिट उघडण्यात आली आणि त्याचे उद्‌घाटन उद्धव साहेबांच्या अध्यक्षतेखाली आणि डॉ.दीपक सावंत यांच्या उपस्थितीमध्ये झाले होते. मे महिन्यामध्ये

..... इइइ 2 ..

अमरावतीमध्ये या युनिटस्ना मी भेट दिली होती. त्यावेळी भारनियमनामुळे ही एनआयसीयू बंद झालेली होती असे मला दिसून आले आणि जिल्हा परिषदेच्या ताब्यात असलेल्या एका युनिटमध्ये असलेल्या 4-6 दिवसांच्या चार अर्भकांचा वीज नसल्यामुळे मृत्यू झालेला आहे असे मला एका नर्स कडून समजले. तेव्हा याला जबाबदार कोण आहे याचा येथे खुलासा होणे गरजेचे आहे. सभापती महोदय, वीज टंचाईवर मात करण्यासाठी अनेक राज्यांतून वीज घेतली गेली. तेव्हा या संदर्भात आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून माहिती पाहिजे की, अन्य राज्यांतून आपल्या राज्याने किती मे.वॅ.वीज घेतली आणि त्यासाठी किती किंमत आपल्याला मोजावी लागली ? एका प्रतिकूल परिस्थितीमधून जात असताना 1800 कोटी रुपयांची थकबाकी होती परंतु ही थकबाकी कमी करण्याच्या दृष्टीने एक कलमी कार्यक्रम घेतला असल्यामुळे आज ही थकबाकी 1800 वरून 1100 कोटीवर आली आहे. त्याबद्दल मी खात्यातील अधिकाऱ्यांचे जरूर अभिनंदन करेन. पण ही एवढी थकबाकी अगोदर इतक्या मोठ्या प्रमाणात वाढली गेली त्याबद्दल आपण किती अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली आहे याचीही माहिती सभागृहासमोर आली पाहिजे. सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आकडे टाकून होणाऱ्या वीज चोरीबद्दलचा प्रश्न उपस्थित केला. परंतु जे साखर कारखाने आहेत, मोठमोठे उद्योगधंदे आहेत त्यांचेकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे, ती किती आहे आणि त्याबद्दल संबंधित किती कर्मचारी-अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे हे येथे सांगितले पाहिजे. सभापती महोदय, राज्य विद्युत मंडळाचा अहवाल आपण आम्हाला दिलेला आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, राज्य विद्युत मंडळाने 31.3.2000 पर्यंत 870 ग्राहकांनी वीज चोरीबद्दल 95 कोटी 71 लाखाची पुरवणी बिले दिली, ती लेखांकन केलेली नाहीत आणि वरील सर्व प्रकरणामध्ये ग्राहकांनी वीज निरीक्षकांकडे विवाद उपस्थित केलेले आहेत. ....

( यानंतर श्री.जागडे .... 3एफ 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विलास अवचट..

वरील अधिका-यांकडून आजतागायत कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. सभापती महोदय, ज्यावेळी अशा प्रकारच्या तक्रारी येत असतात, तेव्हा आपण केसेस दाखल करीत असतो. परंतु या केसेसचा निर्णय एकेक वर्ष लागत नाही. आता हे अधिकारी अकार्यक्षम आहेत काय ? यामध्ये विलंब का होत आहे ? याची या निमित्ताने नोंद घेण्याची आवश्यकता आहे. एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदय, सभागृहात विजेच्या प्रस्तावावर जी चर्चा सुरु आहे, त्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे. विजेचे भार नियमन किंवा लोड शेडींग हा शब्द 15-20 वर्षापूर्वी कोणाला विचारला असता तर त्यावेळी या शब्दाचा अर्थबोध झाला नसता. आज आपण ग्रामीण भागात गेलो असता संध्याकाळी ज्यावेळी सहा नंतर विजेची अपेक्षा करीत असतो, त्याचवेळी वीज जाते. आपण गावात गेल्यानंतर पाच वर्षाच्या लहान मुलाला विचारले तर ते असे सांगते की, लोडशेडींग असल्यामुळे वीज गेली आहे. आज राज्यातील ग्रामीण भागात सहा ते सात तास विजेचा पत्ता नसतो. ज्यावेळी रात्री विजेची आवश्यकता असते, त्याचवेळी वीज नसते. संध्याकाळी जी वीज जाते, ती रात्री बारा वाजेपर्यन्त येते, कधी पहाटे वीज येते. काही काही गावात तीन-तीन दिवस विजेचा पत्ता नसतो. खरे म्हणजे भार नियमनामुळे वीज पुरतही नाही आणि उरतही नाही. प्रत्येक जिल्ह्यात भार नियमन मोठ्या प्रमाणात केले जाते. सभापती महोदय, बांगला देशाचे युध्द जेव्हा सुरु होते, तेव्हा आपल्या देशात रात्रौ सर्वत्र ब्लॅक आऊट होत होते. आजची परिस्थिती पाहिल्यानंतर राज्यात युध्दजन्य परिस्थिती तर निर्माण झ ाली नाही ना ? असे वाटते. सभापती महोदय, या वर्षीचा उन्हाळा हा भार नियमनामध्ये गेला आहे. सभापती महोदय, भार नियमन केल्यानंतर, विजेचा तुटवडा सुरु झाल्यानंतर अनेक कारणे समोर येत असतात. यंत्रणेत बिघाड झाल्याच्या सबबी सांगून वेळ मारुन नेली जाते. त्यानंतर राज्य सरकार जाहीर करते की, शहरी भागात तीन दिवस आणि ग्रामीण भागात सहा ते नऊ तास लोड शेडींग केले जाते. यामुळे शहरात आणि गावागावात आज मोठ्या प्रमाणे इनव्हर्टची मागणी होत आहे. मी रायगड जिल्ह्यातील एका कार्यकर्त्याच्या घरी गेले होते. त्यावेळी त्या गावात लाईट नव्हता. परंतु त्या कार्यकर्त्याच्या घरी लाईट होता आणि त्या घरातील पंखे चालले होते. त्यावेळी मी त्यांना विचारले की, तुमच्या घरात लाईट कशी आहे ? तेव्हा त्यांनी मला सांगितले की, आम्ही इनव्हर्टर लावला आहे. सभापती महोदय, आज सर्वत्र इनव्हर्टर आणि जनरेटरची मागणी मोठ्या प्रमाणात होत आहे. तेव्हा याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, लोड शेडींगचा प्रश्न निर्माण झाला होता, त्यावेळी ग्रामीण भागातील रस्त्यावरील दिवे रात्री बंद करावेत, असा एक विचित्र निर्णय करण्यात आला होता. ग्रामीण भागात रात्रीच्या वेळी दिवे नसतील तर त्या ठिकाणी कायदा आणि सूव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. आता हा विचार कोणाच्या डोक्यातून आला आहे, हें आम्हाला समजून येत नाही.

( यानंतर श्रीमती रणदिवे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे . . . .

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये वीज साठविण्याची कुठेही यंत्रणा नाही. पाणी उपसण्यासाठी विजेचा वापर केला जात असल्यामुळे विजेचा तुटवडा निर्माण होत आहे असे भासवले जाते. पवनचक्कीच्या बाबतीत संपूर्ण महाराष्ट्रात पाहिले तर सातारा येथील पवनचक्क्या सुरु आहेत. पण तेथेच जोरात वारा वाहतो का ? बाकीच्या ठिकाणी असलेल्या पवनचक्क्या बंद आहेत याची कारणे काय आहेत ? वीज किती वेळ जाते हे महत्वाचे नाही तर वीज किती वेळ रहाते हे जनतेच्या दृष्टीने महत्वाचे आहे. संपूर्ण उन्हाळा भारनियमनात गेला. सर्व व्यवहार हे पूर्णपणे विजेवर अवलंबून असतात. त्यामुळे जनतेचे कमालीचे हाल होतात. याचा उद्योग, व्यवसाय करणा-यांवर देखील प्रतिकूल परिणाम झालेला आहे म्हणजे उत्पादनात वाढ होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट यांनी औषधे कशा प्रकारे खराब होतात याबाबतीत सांगितले. फ्रीज किंवा कुलींगची व्यवस्था बंद असल्यामुळे औषधे खराब होतात. आज राज्यातील उद्योगधंदे बंद होत आहेत, त्यामुळे लोकांना रोजगाराला मुकावे लागत आहे. एका बाजूला वीज निर्मितीचे आणि वीज चोरीचे प्रमाण वाढत आहे आणि शासनाने ही बाब अत्यंत गांभीर्याने घेतली पाहिजे. या प्रकारांना आळा घालण्यासाठी कसून प्रयत्न केले पाहिजेत. खरे म्हणजे त्या-त्या भागातील वीज गळतीच्या टक्केवारीवर तेथील भारनियमनाचे संपूर्ण गणित अवलंबून आहे असे मला वाटते. वीज गळती जास्त असेल तर त्याठिकाणी भार नियमन जास्त असते. महाराष्ट्रात 17 लाख शेती पंप मीटर शिवाय आहेत. त्यामुळे शेती पंपासाठी किती वीज लागते हे ठरविणे कठीण आहे आणि याचाच दुरुपयोग केला जातो. विजेची चोरी लपविण्यासाठी शेती पंपाला वीज दिली असे सांगितले जाते. बिचारा शेतकरी मात्र मीटर लावत नाही, कारण बिल वाढेल. त्यामुळे यावर उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. आपण सौरऊर्जेचा वापरही चांगल्या प्रकारे करु शकतो. ग्रामीण भागात रस्त्यांवरील दिव्यांसाठी सौरऊर्जेचा वापर करु शकतो. आपल्याला सोलर कुकरचा वापर करता येऊ शकतो. शासनामार्फत "शेतकरी" नावाचा अंक निघतो. त्यामध्ये शेतीमित्र श्री.चंद्रकांत पाठक यांनी "वीज निर्मिती, जलसिंचन आणि स्वयंरोजगारासाठी, बैलशक्तीसाठी आधुनिक ऊर्जा तंत्र" या शीर्षकाखाली एक लेख लिहीला आहे. आज शेती सुध्दा आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे केली जाते. त्यामुळे बैलांना काम नसते. श्री.पाठक यांनी चांगला लेख लिहीला आहे. महाराष्ट्रात साधारणपणे 80 लाख बैलऊर्जेपासून अंदाजे 3 हजार मे.व्हॅ.एवढी ऊर्जा मिळू शकते. याचा विचार केला तर

. . . .3 जी-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे . . . .

आपल्याला अंधाराच्या दारी उजेड निर्माण करण्याचा प्रयत्न करता येईल. खरे म्हणजे सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणात चार ओळी सांगितल्या, पण मी असे म्हणेन की,

घट्ट अंधाराचे जाळे, झाली जनता निराश,
घराघरातून दाटे काळोखाचा फास फास.

आज ग्रामीण भाग असो किंवा छोटी-छोटी शहरे असोत, पुणे शहर असो किंवा चिंचवड असो, सगळी कडे 8-8, 9-9 तास वीज गायब होत असते. अशा वेळी मुलांनी अभ्यास कसा करावयाचा? घरामध्ये महिलांनी स्वयंपाक कसा करावयाचा ? वीज गायब झाल्यामुळे अनेक कामे खोळंबतात आणि विकासालाही खीळ बसते याचाही शासनाने गांभीर्याने विचार करावा. यापूर्वी सन्माननीय सदस्यांनी केलेल्या भाषणामध्ये अनेक मुद्दे येऊन गेलेले आहेत, त्यामुळे मी त्याची दुरुक्ती करीत नाही. धन्यवाद.

-----

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, एका अत्यंत महत्वाच्या विषयावर सभागृहात विरोधी पक्ष नेत्यांनी चर्चा घडवून आणलेली आहे. सुदैवाने मी सार्वजनिक उपक्रम समितीचा सदस्य असल्यामुळे मधल्या काळात मला समितीसमवेत चंद्रपूर येथील महा औष्णिक केंद्राला भेट देण्याचा योग आला. बऱ्याचशा सन्माननीय सदस्यांनी सातत्याने भारनियमामुळे काय काय झाले, याबाबत सांगितले, त्याची द्विरुक्ती न करता मला सांगावयाचे आहे की, याचा परिणाम रोजगारावर, विद्यार्थ्यांवर, शेतकऱ्यांवर, उद्योगावर झालेला आहे, ग्रामीण भागामध्ये 8-8 तास भारनियमन झाल्यामुळे जिल्ह्यातील रुग्णालयामध्ये क्षणाक्षणाला वीजपुरवठा बंद झाल्यामुळे रुग्णांच्या महत्वाच्या शस्त्रक्रिया करण्यामध्ये अडचणी निर्माण झाल्या. मा.आदिवासी विकास राज्यमंत्री, आरोग्य राज्यमंत्री महोदयांनी ग्रामीण भागात आरोग्य केंद्रे आहेत त्या ठिकाणी वीजपुरवठा करण्यासाठी वेगळी कोणती तरतूद केलेली आहे ते सांगावे. एखादा रुग्ण अतिशय तातडीची मदत मागण्यासाठी आरोग्य केंद्रामध्ये आल्यानंतर त्याला मदत करता येणार नाही अशी अवस्था आहे. आश्चर्य वाटेल की, कोकणामध्ये उद्योग फार कमी आहेत. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये काही उद्योग आहेत. सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये उद्योग कमी आहेत, त्या ठिकाणी बागायती शेती नाही. अशावेळेला आठ तासाचे भारनियमन केलेले आहे. खरे तर त्या ठिकाणी विजेचे भारनियमन करण्याची आवश्यकता नाही परंतु सुप्रिम कोर्टाने आदेश दिल्यामुळे सगळीकडे समान न्याय या तत्वावर कोकणामध्येही भारनियमन केलेले आहे. मला खेदाने साांगावेसे वाटते की, आम्ही चंद्रपूर येथील महा औष्णिक केंद्राला भेट दिली असता असे आढळून आले की, त्या ठिकाणची वीज निर्मिती क्षमता 2340 मे.वॅ. आहे. एकूण सात युनिट आहेत. त्यापैकी 210 मे.वॅ.चे चार युनिट आणि 500 मे.वॅ.चे तीन युनिट आहेत. त्या ठिकाणची स्वच्छता चांगली होती, त्या केंद्राला आय.एस.ओ. देखील मिळालेले आहे. मी सहज तेथील संगणाकावरुन पाहिले असता असे दिसून आले की, अधिकाऱ्यांनी जी माहिती दिली ती दिशाभूल करणारी होती, धक्कादायक होती. त्या ठिकाणी 210 मे.वॅ.चे 4 युनिट आहेत. त्यापैकी एक युनिट पूर्ण क्षमतेने म्हणजे 210 मे.वॅ. विद्युत निर्मिती केली होती, दुसऱ्या युनिटमधून 183 मे.वॅ, तिसऱ्या युनिटमध्ये 173 मे.वॅ, आणि चौथ्या युनिटमधून 160 मे.वॅ.विद्युत निर्मिती केली जात होती. त्या ठिकाणी 2340 मॅ.वॅ. विद्युत निर्मिती क्षमता असताना त्यापेक्षा कमी विद्युत निर्मिती होत होती. एका बाजूला भारनियमन चालू आहे, शेतकरी हवालदिल झालेला आहे, विद्यार्थी हवालदिल झालेले आहेत, उद्योजक हवालदिल झालेले



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत (पुढे चालू....

आहेत, असे असतांना आपण विद्युत निर्मिती का थांबविता ? त्यावर असे सांगण्यात आले की, काहीवेळा विद्युत निर्मिती दुरुस्तीच्या कामासाठी बंद करावी लागते. परंतु पावसाळ्यामध्ये हा विद्युत पुरवठा थांविण्याचे कारण काय आहे, असे विचारले असता, त्यांनी नंतर सांगितले की, गंगापूर येथील दोन टॉवर पडल्यामुळे तेथपर्यन्त जाणारा विद्युतपुरवठा थांबविलेला आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती नीलम गोऱ्हे बसण्यासाठी येतात.)

सभापती महोदया आपण प्रथमच सभापतीस्थानी बसत आहात त्याबद्दल आपले स्वागत करतो.

**उपसभापती** (सभापती आसनाशेजारी उभे राहून) : मला निरोप देता की काय ?

श्री.अरविंद सावंत : आपले निरोपाचे भाषण नंतर करु.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती नीलम गोऱ्हे)

सभापती महोदया, गंगाखेड येथील दोन टॉवर पडले, म्हणून आम्ही वीज निर्मिती कमी केली असे चौकशी करता सांगण्यात आले. टॉवर पडले म्हणून वीज निर्मितीच कमी केली.....

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदारे... 18:35
श्री. अरविंद सावंत...

मी पुढे आणखी विचारले की, तुम्ही हे पडघ्याला कां नाही नेत? परळी-लोणी-क-हाड, चंद्रपूर-पडघा, आणि चंद्रपूर-परळी असे तीन मेजर ट्रान्समिशन्स आहेत. गंगाखेडला दोन टॉवर पडले. ते टॉवर दुरुस्त करण्यासाठी अनेक महिने लागले. मी म्हटले, ठीक आहे. या परिस्थतीत तुम्ही विदर्भातील वीज पुरवा. तुमच्याकडे तसे नेटवर्क नाही काय? तसे तुमच्याकडे जाळे नाही का? तुम्ही हे केंद्र पडघ्याला कां देत नाही? पडघ्यावरुन आणखी कुठे नेटवर्क फिरवता येत नाही काय?पडघ्यावरुन नाशिकला हे केंद्र कां देता येत नाही. भुसावळला कां देत नाही?एकलहरे नाशिक येथे केंद्र आहे. भुसावळलासुध्दा वर्किंग वीज केंद्र आहे. अध्यक्ष महोदया, तसे त्यांच्याकडे नेटवर्कच नाही. असा विचार सुध्दा दुर्दैवाने विद्युत महामंडळाने कधी केला नाही, हे खेदाने सांगावे लागते. जनतेला सुध्दा माहीत नाही. आम्ही सांगतो वीज नाही, वीज नाही. आणखी वीज हवी. पण जी वीज आहे, तीचा सुध्दा आपण पूर्ण क्षमतेने वापर करीत नाही. अशा वेळी शासन त्यांच्यावर काय कारवाई करणार? असा माझा प्रश्न आहे. याठिकाणी अतिशय अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरले जाते. कोळसा आणला जातो, तो वॉशिंग केला जाते. वॉशिंग करतांना अतिशय ॲटोमिक मशीन वापरली जाते. एन्टायर वॅगन लिफट् करुन वरुन कोळसा ओतला जातो. मी त्यांना विचारले की, रेल्वे तुम्हाला दंड कां आकारते? कोळसा वॅगनमध्ये अधीक भरला आहे, म्हणून रेल्वे दंड आकारते असे त्यांनी सांगितले. मी त्यांना म्हटले आपल्याकडे वे-ब्रिज असतात तेव्हा सर्वसाधारणपणे ट्रकचे वजन किती आहे, आणि त्या ट्रकमध्ये भरलेला माल किती आहे, याचे वजन काढता येते. तसे तुम्ही याबाबतीत कां करीत नाही? तेव्हा त्यांनी सांगितले की, रेल्वे ऐकत नाही. यामुळे महामंडळाचे नुकसान होते, शासनाचे नुकसान होते याबाबतीत मंत्रिमहोदयांच्या पातळीवर किंवा शासनाच्या पातळीवर हा विषय आणलेला नाही. त्यामुळे वजन अमुक इतके झाले की, फाईन लावा असे रेल्वे ठरवून टाकते.वजन करण्याची जी सिस्टिम औष्णिक वीज केंद्राज आहे, ती सिस्टिम रेल्वेत नाही. रेल्वे खाते ठरवून टाकते. म्हणे आमच्या वॅगनचे वजन करावयाचे नाही, म्हणून तेथे सुध्दा आम्हाला दंड लागतो. प्रदूषण महामंडळसुध्दा विद्युत महामंडळाला दंड लावते. दु:ख या गोष्टीचे आहे की, यासंदर्भात पूर्णपणे विचार केला गेला नाही. मी निव्वळ चंद्रपूरचे सांगत आहे. हीच गोष्ट भुसावळला सापडेल किंवा अन्य विद्युत केंद्रावर सापडेल, जल विद्युत केंद्राच्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

बाबतीत सुध्दा हीच गोष्ट आहे. शासन विद्युत केंद्र कां बंद करते? असलेल्या विद्युत केंद्रांची संबंध वर्षातील स्थापीत क्षमता किती आणि प्रत्यक्षात निर्मिती किती केली, आणि वापरात किती आणली याचा तक्ता मंत्रिमहोदयांनी द्यावा. पारेशन-लॉसेस ही आणखी पुढची गोष्ट आहे. मुळामध्ये सगळी जनता अंधारात लोटली तरी सुध्दा आपण मात्र विजेची निर्मिती करीत नाही. वीज चोरीच्या बाबतीत सांगितल्यानंतर सभापती महोदया आपल्याला आश्चर्य वाटेल. वाईट याचे वाटते की, सार्वजनिक उपक्रम समितीसमोर जेव्हा अधिका-यांना साक्षीला बोलावतो तेव्हा सगळेजण शेतक-यांवर बोलतात. सभापती महोदय, आजच विद्युत मंडळाचा अहवाल सभागृहाला सादर झालेला आहे. त्या अहवालामध्ये प्रत्यक्षात सिंचन, कृषि, कमी दाब, उच्च दाब यामध्ये 10.75 टक्के वीज वापरली जाते. औद्योगि उच्च दाब 39.19 आणि औक्षेगिक कमी दाब यामध्ये 8.81टक्के वीज वापरली जाते. ही दोन्ही एकत्रित केली तर साधारणपणे 50 टक्के वीज उद्योंगासाठी वापरली जाते. आणि त्यांच्याचकडे पैशांची बाकी राहते. त्यांच्यावर शासन कारवाई करीत नाही. या महामंडळाचे अहवाल सभागृहाला सादर करण्यात येतात. सगळया महामंडळाच्या लॉसेसचा एकदा विचार करावा लागेल असे मला वाटते. या विषयावर आम्ही मध्यंतरी माननीय सभापतींना भेटण्याचे ठरविले होते. ज्या अनेक महामंडळाचे अहवाल सभागृहाला सादर होतात, त्या अहवालाच्या बाबतीत अनेक समित्या वेगवेगळया शिफारशी करतात. त्या ज्या काही शिफारशी केल्या जातात त्या शिफारशींचे पुढे काय होते? आय.ए.एस. अधिका-यांच्या संदर्भातील कारवाईच्या शिफारशी त्या अहवालांमध्ये केलेल्या आहेत. पुढे त्या शिफारशींचे काय झाले? 1990,1991,1992,1993 चे अहवाल पाहा, माझ्याकडे ते अहवाल आजही आहेत. त्या विषयावर वेगळी चर्चा करण्याची गरज आहे. दुर्दैवाने आमचे सगळे सीनियर्स एवढा वेळ घेतात की, आम्हाला बोलण्यासाठी अधिक वेळ मिळत नाही. सांगली जिल्हयातील माण तालुक्यातील धामणी म्हणून गाव आहे. सार्वजनिक उपक्रम समितीवर माझ्या सोबत सन्माननीय सदस्य श्री. सदाशिवराव पोळ हे होते. त्यांनी महामंडळाच्या अधिका-यांना विचारले की, माण तालुक्यात धामनी नावाचे गाव आहे. त्या गावामध्ये शंभर टक्के वीज वापरली जाते. अधिकृत एक किंवा दोन ग्राहक असतील. पण प्रत्येक घरात वीज आहे.

यानंतर श्री. बरवड...

अशुध्दीत प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

कोण चोऱ्या करतात ? जे चोरी करतात त्यांना सहकार्य करणारे आहेत. आम्ही अधिकाऱ्यांना पुन्हा साक्षीसाठी बोलवून पुन्हा विचारुन पहा असे सांगितले. आम्ही विचारले पण अजून त्याचे उत्तर आले नाही. सांगली जिल्हयातील माण तालुक्यातील धामणी गाव आहे. त्या गावात एवढे धाडस आहे. 100 टक्के वीज आम्ही वापरु, तुम्ही काय करणार ? एवढे धाडस त्यांच्याकडे आहे. अनेक गावे आणि अनेक उद्योजक यांनी प्रचंड बिले थकविलेली आहेत. नाशिक जिल्हयातील कांद्याचे पिक गेले. जळगावची काय परिस्थिती आहे ? मी दोन वेळा जळगावला जाऊन आलो. तेथील केळीच्या बागा सुकलेल्या आहेत. केळीचे सुकले बाग असुनिया पाणी अशी परिस्थिती आहे. त्या ठिकाणी पाणी आहे पण पंप चालत नाही. लोडशेडींग असल्यामुळे पंप चालत नाही. या सभागृहातील नंदूरबारचे सन्माननीय सदस्य श्री. रघुवंशी थोडया वेळापूर्वी माझ्याशी बोलत होते. ते म्हणाले की, माझ्याकडे पाणी आहे पण वीज नाही. पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी असलेली टाकी भरण्यासाठी दहा तास लागतात. टाकी भरण्यासाठी दहा तास लागतात पण वीज येत नाही. ती टाकी कशी भरणार ? रात्री दीड वाजता पिण्याचे पाणी सोडतात. त्या ठिकाणी सुध्दा शेतकऱ्यांचे खूप हाल झाले. त्यांचे जे नुकसान झाले त्याला जबाबदार कोण आहे ? निव्वळ कापूस उत्पादक, त्यांचे चुकारे, त्यांचे व्याज, त्यांचा बोनस एवढयापुरतेच मर्यादित नाही तर सर्व शेतकरी होरपळून गेलेले आहेत. आपण इतके निर्ढावलेलो आहोत की, आपण काही करीत नाही. आपल्याकडे निवडणुका होतात त्यावेळी जाहीरनामा प्रसिध्द करतो. मध्यंतरी एका विषयावर माननीय मुख्यमंत्री असे म्हणाले की, जो जाहीरनामा आला त्यामध्ये प्रिन्टींग मिस्टेक आहे. लोकांनी सुध्दा व्होटींग मिस्टेक केली. दुर्दैवाने हे सगळे घडत असताना आजही यासंदर्भात कारवाई होत नाही. सभापती महोदया, जाता जाता एवढेच सांगेन की, अनेक कारखाने बंद पडले. माननीय मुख्यमंत्र्यांनी इरादापत्रांबाबत सांगितले परंतु त्या इरादापत्रांच्या बाबतीत पुढे काहीही होणार नाही अशी परिस्थिती आहे. आम्ही अनेकदा हे अनुभवले आहे. आज खाजगीकरण आले आहे. आपल्याला जो कोळसा पाहिजे तो आपण वेस्टर्न कोलफिल्ड कडून घेतो. त्या कंपनीचा निव्वळ नफा 900 कोटी रुपये आहे. त्यांचे ग्राहक महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आहे. आमचे वीज मंडळ सांगते की, आम्हाला चांगल्या प्रतीचा कोळसा मिळत नाही. आपल्याला 6 लाख मेट्रीक टन कोळसा

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

श्री. अरविंद सावंत .....

लागतो. ते आपल्याला 3 लाख मेट्रीक टन कोळसा देतात. आपल्या वीज मंडळाचे स्वत:चे खणन क्षेत्र असले पाहिजे. खणन क्षेत्राच्या बाबतीत जाहिराती येतात की, या या ठिकाणी कोळसा उपलब्ध होऊ शकतो. आपण आपली स्वत:ची कोळशाची खाण का तयार करीत नाही ? आपण त्यांच्याकडूनच कोळसा का घेता ? आपल्यावर ते बंधनकारक आहे काय ? ते म्हणतात की, आमचा केंद्र सरकारचा उपक्रम आहे. त्या ठिकाणी मी एका एका अधिकाऱ्यांच्या नावाची पाटी वाचली. त्या ठिकाणी एकही मराठी अधिकारी नव्हता. एक सबॉर्डीनेट अधिकारी मराठी होता. वेस्टर्न कोलफिल्डमध्ये एकही मराठी अधिकारी नव्हता. आमचा कोळसा घ्या असे ते म्हणतात आणि ते आपल्याला नडतात. चंद्रपूर औष्णिक केंद्राच्या बाजूला पदमापूर गाव आहे. खणन क्षेत्राच्या बाबतीत आपण लक्ष दिले पाहिजे. आपण स्वत:चे खणनक्षेत्र निर्माण केले पाहिजे. जाता जाता अपारंपारिक ऊर्जेबद्दल बोलतो. मी 1996 साली सभागृहात आल्यापासून सातत्याने याबाबत बोलत आहे. ज्या ज्या वेळी यासंदर्भात चर्चा झाली त्या त्या वेळी मी हे सातत्याने सांगितले आहे. आपण प्रोसिडींग काढून बघावे. मध्यंतरी वर्तमानपत्रात आले होते की, मंत्रिमंडळ असा विचार करीत आहे. ते मँडेटरी केले पाहिजे. सौर ऊर्जेचा वापर शहरांमध्ये केला पाहिजे. विजेची बचत म्हणजेच विजेची निर्मिती आहे असे आपण नेहमी म्हणतो. मी मुद्दाम हिशेब केला. या सभागृहामध्ये किती दिवे जळत आहेत ? या सभागृहामध्ये 360 दिवे जळत आहेत. या ठिकाणी ए.सी.आहे. ए.सी.साठी वीज पाहिजे परंतु हे दिवे सौर ऊर्जेवर चालू शकतात. तसा विचार आपण का करीत नाही ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

मग तशाच गोष्टी सर्व हॉस्पिटलमध्ये, हॉटेल्समध्ये चालू आहेत. पंचतारांकित हॉटेलमध्ये 24 तास वीज चालू असते. आता घाटघरच्या प्रकरणामुळे तुम्ही अडकले आहात असे माझे सहकारी श्री.विनोद तावडे यांनी म्हटले आहे. 4 वर्षे या प्रकरणामुळे तुम्ही लटकणार आहात ही सत्य परिस्थिती आहे. पाऊस पडला नाही आणि तुमचे तलाव तुडूंब भरुन दुथडी भरुन वाहू लागले नाही तर जल विद्युत केंद्रातून वीज निर्मिती कराल असे वाटत नाही. मी मागे एकदा तत्कालीन केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री.सुरेश प्रभू यांना एक प्रश्न विचारला होता. मी त्यांना विचारले की, जर दुष्काळ असेल, पाऊस आला नाही तर तुम्ही विजनिर्मीती कशी करणार, तुमच्याकडे खात्रीलायक काय आहे ? मी त्यांना सांगितले की, खात्रीलायक सूर्यप्रकाश आहे त्याचा तुम्ही उपयोग करणार की नाही ? या सूर्यप्रकाशाच्या मुद्यावर शासनाने गंभीरपणे विचार करुन त्याचा वापर करणे आवश्यक आहे. काल सभागृहात दाभोळ वीज कंपनीबाबत निवेदन करण्यात आले आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. परंतु आपल्याकडे वीज नाही ही महाराष्ट्राला भूषणावह गोष्ट नाही. शेजारील मध्य प्रदेश राज्यात फार प्रगती झाली आहे असे नाही. परंतु तेथे आपल्यासारखे भारनियमन नाही. आपल्याकडे लोड आहे आणि शेडिंग असे दोन्हीही आहे ते बंद करावे आणि जनतेला दिलासा द्यावा असे बोलून मी माझे भाषण संपवितो.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

श्री.प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, महाराष्ट्रातील एका अतिशय महत्वपूर्ण ज्याचा आपण आजकाल पोलिटिकल कमोडिटी असा उल्लेख केला तर वावगे होणार नाही अशा राजकीय मालाबद्दल चर्चा करीत आहोत आणि त्यासंबंधी बोलण्याची संधी मला मिळाली आहे. वास्तविक पाहता लोडशेडिंगबाबत जेथे कनेक्शन आहे तेथे काही तास वीज पुरवठा करावयाचा आणि काही तास वीज पुरवठा करावयाचा नाही असे म्हणू शकतो. पण आपल्याकडे ज्याला देण्यासाठी वीज नाही. परंतु मी यानिमित्ताने एक गंभीर विषयाकडे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो. ज्या घरामध्ये विजेचे कनेक्शनच दिले नाही त्यांना या लोडशेडिंगच्या गप्पा ऐकविल्या तर कसे होईल ? गावी एक म्हण आहे. एकदा खीर केलेली असते तेव्हा संपूर्ण गाव त्या खिरीचा स्वाद घेत असते. परंतु भटक्या जातीच्या घराला, वाडया वस्त्यांना त्याचे आवातनं नसते. त्यामुळे त्या खिरीविषयी तो बाप त्या मुलाला म्हणतो की, ती नासकी खीर आहे. थोडे दिवस काम केले तर तुला गोड खीर खावयास मिळेल. असा प्रकार ग्रामीण भागामध्ये सुरु आहे. माझी सरकारला विनंती आहे की, महाराष्ट्रामध्ये किती वाडया वस्त्यांवर आजही अंधार आहे याबाबत एकदा श्वेतपत्रिका काढावी. एकदा कोकणातील धनगर, वाडया वस्त्यांवर जाण्याचा प्रसंग आला होता. त्या वाडया व वस्त्या गावाबाहेर असतात. काही गावगुंडांनी वाडयांवर घाण केल्यामुळे त्या लोकांनी पोलीस स्टेशनमध्ये तक्रार केली होती. त्यामुळे त्या गावगुंडांनी मोहल्ल्यात जाऊन त्यांची घरे उद्ध्वस्त केली. रत्नागिरीमध्ये हा प्रकार झाला आहे. ही बातमी वर्तमानपत्रातून आपण वाचली असेल. त्यानंतर इतर वस्त्यांवर गेल्यावर तेथे वीज नाही, पाणी नाही, रस्ता नाही असे दिसून आले. झ-याच्या पाण्यावर इतर लोक हक्क सांगत आहेत. अशी भयानक परिस्थिती आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये आहे. किती लोकांना वीज दिली नाही, किती वाडया वस्त्यांवर वीज द्यावयाची आहे ही परिस्थिती सरकारने श्वेतपत्रिकेद्वारे जनतेसमोर आणावी. मी मुद्दाम एक उदाहरण सांगेन. एक मुलगा एस.एस.सी.नापास झाला होता.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. खंदारे 18:50

(श्री. प्रकाश शेंडगे....)

किती विषयामध्ये तू नापास झालास असे त्या विद्यार्थ्यास विचारले असता त्याने 6 विषयात नापास झालो असे सांगितले. कशामुळे नापास झालास, असा मी पुनश्च प्रश्न केला. त्याने सांगितले की, ज्या दिव्याखाली मी अभ्यास करीत होतो तो दिवा गेले तीन महिने बंद आहे. तो दिवा पेटलाच नाही. रात्री कधी तरी बारा-एक वाजण्याच्या सुमारास पेटायचा. मी रात्री बारा वाजता उठून अभ्यास करावयास गेलो की अर्ध्या-पाऊण तासात तो पुन्हा विझायचा. त्यामुळे मला अभ्यास करता आला नाही आणि परिणामी मी नापास झालो. सभापती महोदय, यावर्षी एस.एस.सी. बोर्डाचा निकाल 4 टक्के कमी लागलेला आहे. लाखो विद्यार्थी नापास झालेले आहेत. नापास झालेल्यांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची संख्या प्रचंड मोठी आहे. आपण या नापास झालेल्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या तर, त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यामध्ये महाराष्ट्र शासनाचा किती मोठा वाटा आहे हे आपणास समजेल. या परिस्थितीतून हे शासन कधी मार्ग काढणार आहे याची मला कल्पना नाही. राजकारणासाठी राजकारण करावे. परंतु एखाद्याचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यासाठी विजेचा वापर करुन राजकारण करु नये अशी माझी शासनाला नम्र विनंती आहे. वीज निर्मितीसाठी कोळसा हे महत्वाचे खनिज आहे. मा.सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी कोळशासंबंधी याठिकाणी भाष्य केले. मागील अधिवेशनामध्ये मा.सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी देखील कोळशाचा विषय सदनामध्ये उपस्थित केलेला होता. त्यावेळी महाराष्ट्रातील कोळशाची वाहतूक गुजरात राज्यातील बंदरातून का होते अशा प्रकारचा प्रश्न शासनाला विचारण्यात आलेला होता आणि त्या प्रश्नाचे उत्तर शासन देऊ शकले नाही. या महाराष्ट्रामध्ये कोळसा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. केन्द्राकडे त्याची मक्तेदारी आहे. असे असले तरी महाराष्ट्र शासनाने अर्ज करण्यामध्ये विलंब लावला आणि त्यामुळे राज्यावर झ ारखंड, बिहार, ओरिसा या प्रांतातून कोळसा आणण्याची पाळी आली. यामध्ये काय गौडबंगाल आहे हे आपण सांगितले तर हा विलंब जाणूनबुजून केल्याचे निदर्शनास येईल. कोळशाची दुप्पट दराने अन्य प्रांतातून वाहतूक करुन त्याद्वारे अनेक लोकांचे अर्थपूर्ण व्यवहार करण्याचा, विजेचे दर वाढून महाराष्ट्रातील जनतेकडून वीज बिलाची सक्तीने वसुली करण्याचा चंग बांधलेला आहे. हे कोठे तरी थांबले पाहिजे. आपण महाराष्ट्रातील जनतेचे देणे लागत आहात. कोळशाची संपूर्ण वाहतूक ही महाराष्ट्रातील बंदरातूनच करावी. तसेच महाराष्ट्रातील खाणीमधूनच

..2..

(श्री. प्रकाश शेंडगे पुढे सुरु...

कोळसा घेणे बंधनकारक करावे. वेस्टर्न कोल फिल्डची मक्तेदारी मोडीत काढावी. हा महाराष्ट्र आमचा, जमीन आमची असताना खनिजावर मात्र वेस्टर्न कोल फिल्डचा अधिकार असून तेच करोडा रुपयांचा फायदा कमवित आहेत आणि आमचा ग्रामीण भागातील विद्यार्थी वीजेअभावी अभ्यास करता येत नाही म्हणून मॅट्रीकच्या परीक्षेला चार-पाच वेळा बसतोय. महाराष्ट्रातील जनतेची इतिहासामध्ये कधी नव्हती इतकी दयनीय अशी स्थिती या सरकारने केलेली आहे. मला महाराष्ट्र सरकारला एक जाब विचारावयाचा आहे की, जेव्हा मोफत विजेची घोषणा केली त्यावेळी विजेची राज्यात काय परिस्थिती आहे हे आपणास माहीत नव्हते काय? विकत देखील वीज हे शासन देऊ शकत नव्हते तर मग या शासनाने मोफत वीज देण्याची घोषण का केली ? महाराष्ट्रातील जनतेला फसविण्यासाठीच ही घोषणा केली ना ? मला वाटते या केलेल्या फसवणुकीबद्दल या शासनाने महाराष्ट्रातील जनतेची माफी मागितली पाहिजे. माफी मागितली तर कदाचित जनता तुम्हाला माफ करील. घोषणा करताना कधी प्रिंटींग मिस्टेक सांगितली जाते तर कधी मोठ्या नेत्याची परवानगी नव्हती असे सांगितले जाते. सभापती महोदय, वीज चोरीच्या बाबतीत एक गोष्ट मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश शेंडगे..

आपण अनेक वेळा चर्चा करतो भिवंडी शहरात वीज चोरी मोठया प्रमाणात होते. ग्रामीण भागात शेतकरी विजेची चोरी करतात असे या ठिकाणी सांगितले जाते. परंतु माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, मुंबई शहरातील वाळकेश्वर भागात धनदांडगे लोक राहतात. या वाळकेश्वर भागात मोठया प्रमाणात वीज चोरी होत आहे. या ठिकाणी जी वीज चोरीचा प्रकार सुरु आहे त्याबाबतीत शासनाने माहिती घ्यावी व ती सभागृहासमोर ठेवावी.धनदांडग्या लोकांच्या वसाहतीमध्ये किती प्रमाणात वीज चोरी होत आहे या बाबतची वस्तुस्थिती राज्यातील जनतेला कळू द्यावी. धनदांडगे वीज चोरतात तर ग्रामीण भागातील एखाद्या शेतक-याने वीज चोरी केली तर त्यात वावगे काय आहे. धनदांडग्यांनी चोरी केली तर त्यांना प्रमाणपत्र दिले जाते. परंतु राज्यातील गरीब शेतक-याने वीज चोरी केली तर त्याच्या हातात मात्र हातकडी घातली जाते. धनदाडगे लोक वीज चोरी करतात त्यांचे विरुध्द कठोर कारवाई केली गेली पाहिजे. विजेच्या प्रश्नाच्या बाबतीत अनेक सन्माननीय महत्वाचे मुद्दे या सभागृहात उपस्थित केलेले आहेत. विजेच्या बाबतीत शासनाने गांभीर्याने दखल घेणे गरजेचे आहे. सभापती महोदया, मी मरीन ड्रायूव्ह येथून रात्री गाडीतून जात होतो. त्यावेळी मला अगदी दिवसा प्रकाश पडतो एवढा प्रकाश त्या ठिकाणी दिसला. मी तेथे थांबलो आणि एका व्यक्तीस विचारले की, एवढा विजेचा प्रकाश कशासाठी आहे तर मला सांगण्यात आले की, त्या स्टेडीयममध्ये क्रिकेटचा खेळ सुरु आहे. दिवस असताना क्रिकेटचा खेळ का खेळला जात नाही असा प्रश्न विचारला असता मला सांगितले गेले की, डे-ॲन्ड नॉईट क्रिकेट खेळण्याची आता फॅशन सुरु झालेली आहे. रात्री क्रिकेट खेळले जात होते, तो खेळ पाहण्यासाठी प्रेक्षक सुध्दा उपस्थित नव्हते. दिवसा जेवढा प्रकाश पडतो तेवढा प्रकाश डे ॲन्ड नाईटच्या क्रिकेट खेळासाठी विजेचा वापर करतो तो आपल्याला परवडणारा नाही. हा प्रकार कुठे तरी थांबविला पाहिजे. मुंबई शहरात रात्रीचा विजेचा झगमगाट शासनाने बंद केला पाहिजे, त्यावर कुठे तरी आवर घातला पाहिजे. एन्रॉन प्रकल्प व इतर विद्युत प्रकल्प पूर्णपणे सुरु होत नाहीत तो पर्यन्त ही सगळी चैन, हा सगळा देखावा, बंद केला पाहिजे. प्रत्येक गरीब कुटुंबाना विजेचा पुरवठा केला गेला पाहिजे अशी मी शासनाला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.धन्यवाद.

---------------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी विजेच्या बाबतीत मुद्दे उपस्थित केले. परंतु जे मुद्दे या सभागृहात उपस्थित केले गेले नाहीत तेवढेच मुद्दे मी मांडणार आहे. एम.एस.ई.बी.च्या चार कंपन्या शासनाने निर्माण केल्या. त्या कंपन्यांची निर्मिती होऊन चाळीस दिवसांचा कालावधी होऊन गेलेला आहे. एम.एस.ई.बी.होल्डींग कंपनी लिमिटेड, एम.एस.ई.बी.पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड, एम.एस.ई.बी.ट्रान्समिशन कंपनी लिमिटेड आणि एम.एस.ई.बी. पॉवर ॲन्ड डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेड अशा चार वेगळया कंपन्या निर्माण केल्या गेल्या आहेत. याच चार कंपन्यांची निर्मिती करुन चाळीस दिवस झाले आहेत, परंतु अजून पर्यन्त एम.एस.ई.बी.चे अकाऊन्ट बंद झालेले नाही. या नवीन चार कंपन्यांचे अकाऊंट अद्याप सुरु झालेले नाही. ग्राहकांना विजेची देयके आलेली आहेत त्यात असे म्हटले आहे की, आपल्या येथे जी डिस्ट्रीब्यूशन कंपनी आहे तिच्या नावाने देयकाचे चेक काढावेत. काही बॅंका ग्राहकांच्या विजेच्या देयकांचे चेक घेत आहेत, काही बॅंका चेक घेत नाहीत. मग प्रत्यक्ष नवीन कंपनी अस्तित्वात आहे की एम.एस.ई.बी.च अस्तित्वात आहे हे चाळीस दिवस होऊन सुध्दा अजून एम.एस.ई.बी.चे अधिकारी आणि वीज ग्राहक हे संभ्रमात आहेत याचे क्लेरिफिकेशन ऊर्जा मंत्र्यांनी या सभागृहात करणे गरजेचे आहे. सभापती महोदया, राजकीय हस्तक्षेप संपला पाहिजे म्हणून आपण डिसेंट्रलायझेशन करतो. पण या सगळया कंपन्यांचे पदसिध्द अध्यक्ष ऊर्जा मंत्री आहेत आणि उपाध्यक्ष ऊर्जा राज्यमंत्री आहेत. सध्या आपल्याकडे ऊर्जा राज्यमंत्री नाहीत. ते पद अजून रिक्त आहे. हे सर्व कशासाठी केले आहे ? एम.एस.ई.बी. 80 हजार कोटी रुपयांची रियल मालमत्ता आहे. तिची व्यावसायीक पध्दतीने विक्री करावयाची आहे. त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप ठेवता यावा म्हणून पदसिध्द अध्यक्ष म्हणून ऊर्जा मंत्री आहेत अशी चर्चा सर्वत्र होत आहेत. गुजरात राज्य, तसेच इतर राज्ये सगळया पध्दतीच्या जाहिरातीमधून विजेच्या संदर्भात वेगवेगळया प्रकारची माहिती देत असतात. ही पध्दत आपल्याकडे का सुरु करण्यात आलेली नाही.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ 19.00

श्री. विनोद तावडे ....

किंवा कर्मचा-यांच्या बरोबर जे ॲग्रीमेंट व्हावयाला पाहिजे त्या ॲग्रीमेंट विषयी कंपनी निर्माण करुन 4 महिने झाले तरी कोणी कुठे काम करावयाचे याविषयी जे पत्रक निघाले आहे त्यामध्ये " as is,where is " या बेसीसवर निघाले आहे. जिवंत माणूस काम करुन घाम गाळून इतके दिवस त्या कंपनीमध्ये काम करतो त्याला ज्याप्रमाणे भंगार विकले जाते त्याप्रमाणे वागणूक मिळत आहे. त्याची सेवाज्येष्ठता राहिलेली नाही. बाकी सगळया राज्यामध्ये त्याची सेवाज्येष्ठता तशीच ठेवलेली आहे. असे असताना शासनाला या 4 वेगळया कंपन्या करण्याची एवढी घाई कोणती होती आणि कशासाठी होती ? याच्या उत्तराची आम्हांला मंत्रीमहोदयांकडून अपेक्षा आहे आणि ते नक्कीच उत्तर देतील असे वाटते. आज ॲग्रीकल्चर कनेक्शनसाठी 5000 रुपये शेतक-यांकडून घेतो आणि 45 हजार रुपयांचे कर्ज घेतो. आज 2 लाख शेतक-यांचे अर्ज पडून आहेत. या चार कंपन्या त्याच पध्दतीने काम करणार आहेत किंवा शेतक-याला 50 हजार रुपये भरावे लागणार आहेत याचेही उत्तर मंत्रीमहोदयांनी दिले पाहिजे. या चार कंपन्या झाल्यानंतर स्वाभाविकपणाने महाराष्ट्रातील जनता या विषयाच्या स्पष्टीकरणाची अपेक्षा धरीत आहे. राज्य वीज मंडळाच्या मोक्याच्या ठिकाणी असणा-या जागा असतील,कर्मचा-यांच्या सेवाशर्ती असतील,वीजेची कनेक्शन असतील किंवा मी मघाशी उल्लेख केलेला विषय असेल याचा खुलासा होणे आवश्यक आहे. माहितीच्या अधिकाराचा वापर करुन मी जी माहिती प्राप्त केली त्याच्यामध्ये निकृष्ट दर्जाच्या कोळशामुळे झालेले वीज निर्मितीचे नुकसान याविषयाची माहिती पाहिली तर 2004-05 या वर्षामध्ये 2173 दशलक्ष युनिट वीजेचे नुकसान झालेले आहे. खात्याने अधिकृत माहिती याठिकाणी दिलेली आहे. नव्याने 8 कंपन्या निर्माण केल्या. ज्यामध्ये स्पेक्ट्रम,रिलायन्स,जिंदाल,टाटा यांचा समावेश आहे. या कंपन्यांना महाराष्ट्रात वीज निर्मिती करण्यासाठी रस्ते,पाणी आदी सुविधा शासन उपलब्ध करुन देणार आहे. या प्रकल्पातून निर्माण होणा-या वीजेपैकी 50 टक्के वीज शासन विकत घेणार आहे. तसेच या प्रकल्पांसाठी मुद्रांक शुल्कामध्ये 100 टक्के आणि ऑक्ट्रॉयमध्ये 100 टक्के सूट देणार आहे. राज्याबाहेर वीज गेली तर कोणताही कर लावला जाणार नाही. म्हणजे सर्व सुविधा शासन उपलब्ध करुन देणार आहे. मा.सदस्य श्री. गडकरी म्हणाले ते सत्य आहे की कुठल्याही कंपनीबरोबर जे अंडरस्टॅन्डींग झालेले आहे त्याबाबत सरकार सिरीयस नाही. सरकारने एमओयू

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ...

च्या अंमलबजावणीस अजून सुरुवात केलेली नाही. एमएसइबीने पॉवर फायनल केलेली नाही. वीज देण्याच्या संदर्भात कारवाई केलेली नाही. भूसंपादन केलेले नाही. अशा अनेक गोष्टी आहेत ज्या या 6-7 कंपन्या लोकांसमोर सांगत आहेत. त्यामुळे वर्षभराच्या आत हे सगळे सुरु झाले तर फायदे लागू होतील. 4-5 महिने झालेले आहेत अजून सुरुवात झालेली नाही. त्यामुळे कंपन्यांना फायदे मिळणार नाहीत तर आम्ही वीज उत्पादन सुरुच करणार नाही असे क्लीअरकट या कंपन्या सांगत आहेत.

( **सभापतीस्थानी मा. उपसभापती** )

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MAP/ प्रथम श्री.कानडे 19:05

श्री.विनोद तावडे ..

मघाशी सन्माननीय सदस्य श्री.अवचट यांनी सांगितले की,विजेच्या बाबतीत जे मानांकन झाले होते त्यामध्ये आपला क्रमांक 13 वर आला आहे. दिल्ली, आंध्र प्रदेश, उत्तर प्रदेश इत्यादी राज्ये आपल्या वर आहेत आणि आपण मात्र 13व्या क्रमांकावर गेलो आहोत .सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी आज एक लक्षवेधी सूचना मांडली होती त्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने त्यांनी कोकणाचा विषय मांडला होता. 2 गॅस सिलेन्डर्स असणा-यांना रॉकेल मिळत नाही .रात्रीच्या वेळी लोड शेडीग असते आणि गॅसवर दिवा, बत्ती चालू करता येत नाही. त्याकरता रॉकेल हवे असते. तेव्हा माननीय उर्जा मंत्री माननीय पुरवठा मंत्र्यांना असे सांगणार आहेत काय ? की ज्या भागात लोड शेडीग आहे त्या भागात पणती ,बत्ती, दिवा चालू करण्यासाठी रॉकेल उपलब्ध करुन दिले जावे. लाईट नसल्यामुळे तांदूळ निवडण्याचे काम महिलांना रात्री करता येत नाही. त्यामुळे ही कामे त्या महिलांना सकाळी करावी लागतात आणि त्यानंतर शेतावर वा इतर ठिकाणी त्यांना कामासाठी जावे लागते.तेव्हा शेतक-यांच्या मतावर निवडून आलेले आणि आम्हीच शेतक-याचे हितचिंतक आहोत असे म्हणणारे सरकार या गोष्टीचा विचार करणार आहे काय ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. चार कंपन्या केल्य नंतर सुध्दा अधिकारी एम.एस.ई.बी.चा शिक्का वापरतात व सही करतात .कंपनी ॲक्टप्रमाणे हे बेकायदेशीर आहे. हे कृत करण्यास आपण त्यांना भाग पाडत आहोत. तेव्हा याचे स्पष्टीकरण मंत्रिमहोदयांनी द्यावे तसेच 40 दिवस होऊन सुध्दा चेक्स कोठे भरावयाचे हे लोकांना व बॅन्क अधिका-यांना माहीत नाही.तेव्हा त्याबाबतीतसुध्दा स्पष्टीकरण करावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

--------

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे (विधान सभेने निवडलेल्या ) :सभापती महोदया, वीज मंडळाच्या संदर्भात या ठिकाणी जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे. त्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदया, विजेच्या बाबतीत महाराष्ट्रात अभूतपूर्व अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. पावसाचे अकाली येणे, कधी अतिवृष्टी होणे आणि अनावृष्टी होणे यासारख्या अस्मानी संकटा प्रमाणेच विजेच्या बाबतीत सुलतानी संकट निर्माण झालेले आहे. या चर्चेच्या निमित्ताने इतर सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत त्याबाबतीत न बोलता मी बाकीचे मुद्दे मांडणार आहे. मला माननीय मंत्रिमहोदयांना असे सांगावयाचे आहे की,शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या वचन नाम्यामध्ये शेतक-यांना मोफत वीज देण्याचे आश्वासन दिले होते. माननीय शिवसेना प्रमुखांनीसुध्दा शेतक-यांचे प्रश्न डोळयासमोर ठेवून धोरण आखले जईल असे आश्वासन दिले होते.निवडणुकीच्या काळात कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेसनेही तसेच सांगितले.त्यानंतर कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस सरकार सत्तेवर आले आणि त्यांनी अगोदर दिलेला शब्द बदलला.त्याचा परिणाम काय झाला हे आपण पाहिले आहे.. त्यामुळे ठीक ठिकाणी आंदोलने सुरु झाली आहेत. माननीय उर्जा मंत्री ज्या जिल्हयाचे आहेत त्या पुणे शहरामध्ये शिवसेनेच्या माध्यमातून 2 मे 2005 रोजी वीज मंडळाच्या कार्यालयावर मोर्चा नेला होता व त्याला हिंसक स्वरुप प्राप्त झाले होते.आपण विधिमंडळात चर्चा करीत असतो व जनतेचे लक्ष त्याकडे लागलेले असते. लोकांच्या काही अपेक्षा असतात . त्या पूर्ण व्हावयास पाहिजे. परंतु त्या पूर्ण होत नाहीत.त्यामुळे त्यांना आंदोलन करावे लागते. दिनांक 2 मे 2005 ला जे आंदोलन झाले होते त्याला हिंसक स्वरुप प्राप्त झाले होते . त्यावेळी जे छायाचित्रकार आणि पत्रकार तेथे उपस्थित होते त्यातील 10 जणांना मारहाण करण्यात केवळ पोलीसच होते असे नाही तर वीज मंडळाचे कर्मचारी सुध्दा होते व या कर्मचा-यांनी त्यांना मारहाण केल्याची व्हीडिओ कॅसेट आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.सुंबरे

डॉ. गोऱ्हे ....

पुणे शहर पत्रकार संघ आणि पिंपरी-चिंचवड पत्रकार संघ यांनी समर्थ पोलीस ठाणेमध्ये एसीपी श्री.जाधव यांचेकडे स्वत: याबाबत तक्रार नोंदविलेली आहे की, वीज मंडळाच्या कर्मचारी-अधिकाऱ्यांनी आम्हाला मारहाण केली आहे. तेव्हा एका बाजूला आपण म्हणतो आहोत की, आम्ही कंपनीकरण करतो आहोत, जनतेपर्यंत वीज पोहोचविण्याचा प्रयत्न करीत आहोत. पण त्यात काही प्रशासनिक अडचणी आहेत. पण हे म्हणत असताना किमान माणुसकीचे वर्तन जेवढे ठेवता येईल तेवढे ठेवण्याचा प्रयत्न करणे आणि पुढे जाऊन मी असे म्हणेन की, असे जेव्हा हाताबाहेर जाण्याचे प्रकार घडतात तेव्हा पत्रकार आणि छायाचित्रकार यांना स्वत: वीज मंडळाचे कर्मचारी जर मारहाण करीत असतील तर अशा मुद्यांवर देखील स्वत:ला सुसंस्कृत म्हणविणाऱ्या आमच्या ऊर्जा मंत्र्यांनी संबंधित कर्मचाऱ्यांवर काय कारवाई केली आहे हे समजून घेणे जनतेच्यादृष्टीने अतिशय आवश्यक आहे असे मला वाटते. अकोला, नागपूर मध्ये देखील अशाच प्रकारची आंदोलने उभी राहिली. भर उन्हामध्ये आंदोलन करण्याची कोणाही आंदोलकांना हौस नव्हती. परंतु भार नियमनाबरोबरच अनेक ठिकाणी रॉकेल टंचाई देखील भीषण असल्यामुळे, मी जवळपास 10 जिल्ह्यांमध्ये दौरा केला तेव्हा अनेक लोकांनी आम्हाला सांगितले की, त्यांच्या मागणी पेक्षा 50 ते 60 टक्केच रॉकेल उपलब्ध होते आहे आणि त्यामुळे विशेषत: रात्रीच्या वेळेस जेव्हा भार नियमन असते त्यावेळेस कंदील देखील लावण्यास रॉकेल नसते. या लोकक्षोभाचा बळी कोण जाणार आहे हा प्रश्न निर्माण झाला आहे. त्याबद्दल सन्माननीय श्री.गडकरी तसेच सन्माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी उल्लेख केलेला आहे. परंतु आमच्या सारखे राजकारणाचे आणि समाजकारणाचे अभ्यासक जे आहेत ते देखील चकित झाले की, गोडबोले समितीच्या अहवालाबद्दल श्री.गोडबोले यांना जबाबदार धरण्यात आले की, तुमच्या अहवालामुळे आम्ही हा निर्णय घेतला असा वाद निर्माण झाला होता आणि जवळपास 8-10 दिवस वर्तमानपत्रातून हा वाद चालला होता. स्वत:च नेमलेल्या अशा समित्यांचे जे अहवाल असतात, त्या समित्यांमध्ये काम करीत असताना, जो जनतेचा राग या संबंध निर्णयासंबंधात होता तो वळविण्यासाठी देखील हा वाद झाला नसेल असे आपण क्षणभर जरी गृहीत धरले तरीसुद्धा या संबंधातील सर्व वस्तुस्थिती आमच्या समोर आली पाहिजे. त्याच वेळी आमच्या समोर एन्‍रॉन संबंधीचे निवेदन आलेले आहे. खरा प्रश्न यामध्ये असा आहे की, कोणत्या भावामध्ये लोकांना ही वीज मिळणार आहे. सभापती महोदय, आणि हे होत असताना याचा सर्वात

...... 3पी 2 ...

डॉ. गोऱ्हे ....

मोठा फटका हा लघुउद्योगांना बसलेला आहे. वीज गळती संबंधात आज जो आपण अहवाल सादर केलेला आहे त्या अहवालामध्ये अनेक कोट्यवधी वीज चोऱ्यांची प्रकरणे आहेत आणि त्याबाबतचे खटले 3-3, 5-5 वर्षे कोर्टात पडलेले असूनही नंतर जेव्हा त्याबाबत कोर्टाकडून निर्णय मिळतो तेव्हा ज्यांनी ही वीज चोरी केलेली असते त्यांच्या मालमत्तेवर टाच आणण्याचा जेव्हा प्रयत्न होतो तेव्हा असे दिसून येते की, संबंधिताने जवळ जवळ ती सारी मालमत्ता विकून टाकलेली आहे आणि म्हणून आम्ही त्यांच्याकडून कोठल्याही प्रकारची वसुली करू शकत नाही अशा प्रकारची उदाहरणे आजच्या या अहवालामध्ये दिलेली आहेत. दुसरीकडे मात्र जे छोटे ग्राहक आहेत, जे प्रामाणिकपणे पैसे भरतात त्यांना मात्र वेगवेगळ्या प्रकारे अडचणी येतात त्यातील एक उदाहरण मी आपल्यापुढे मांडणार आहे. माझ्या माहितीप्रमाणे एक हजार पेक्षा कमीचे बिल असेल तर त्याचा चेक घेतला जात नाही असे ग्राहक पंचायतच्या लोकांचे म्हणणे आहे. तर या संदर्भात आपण लक्ष दिले तर बरे होईल असे मला वाटते. एखादे वेळेस कंपनीकरणाच्या पार्श्वभूमीवर या संदर्भात अजून काही सुधारणा होऊ शकतात किंवा काय हे पहावयास पाहिजे. दुसरा प्रश्न असा आहे की, वीज बिले अदा करण्यासाठी 3 ते 4 तासच कार्यालये उघडी असतात, ती अधिक काळ उघडी ठेवली गेली पाहिजेत असेही ग्राहक पंचायतचे म्हणणे आहे त्याही बाबतीत आपण विचार करावा अशी माझी सूचना आहे. तेव्हा जे छोटे ग्राहक आहेत त्यांच्या सुखसोयी बरोबरच खाजगीकरणातून आपल्याला सर्वच बाबतीत उत्तरे मिळतील किंवा नाही हा प्रश्न आहे. यामध्ये प्रशासनातील जुनीच वाळवी सारखी कीड तेथे पोहोचली असेल तर त्याबाबतीतही कशा प्रकारे धोरणात्मक निर्णय घेतले जाणार आहेत हा प्रश्न आहे. जे खाजगीकरण होत असताना पूर्वीच्या वीज मंडळावर ज्या जबाबदाऱ्या होत्या, उदा. काही ठिकाणी प्रकल्प उभे रहात असताना तेथील प्रकल्पग्रस्तांना शासनाने जो शब्द दिला होता, कायदेशीर भरपाईचे त्यांचे प्रश्न असतील, वा नोकऱ्यांची आश्वासने त्यांना दिली गेली असतील .. उदा. चंद्रपूर जिल्ह्यातील 514 प्रकल्पग्रस्तांचे प्रकरण आहे, ते अजूनही नोकरीसाठी वाट पहात आहेत तसेच या संबंधातील जबाबदाऱ्या कोणावर आहेत याचाही खुलासा व्हायला पाहिजे. सन्माननीय ऊर्जा मंत्र्यांचे उत्तर नेहमीच अभ्यासपूर्ण असते पण या अभ्यासपूर्ण उत्तराचा जेव्हा आम्ही अभ्यास करतो त्यावेळेस भार नियमनाच्या वेळापत्रकाचा जेव्हा आमचा अभ्यास झाला तो चांगला असला तरी जनतेला मात्र त्या अभ्यासातून शून्यच हातामध्ये मिळते असे मला वाटते एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपविते. जय हिंद, जय महाराष्ट्र. (यानंतर श्री.जागडे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ( उर्जा मंत्री ) : सभापती महोदय, आज सभागृहात वीज, विजेची टंचाई, त्यामुळे निर्माण होणा-या समस्या, त्यामुळे कृषी आणि औद्योगिक क्षेत्रावर होणारे परिणाम, राज्यातील नागरिकांना सोसाव्या लागणा-या हाल-अपेष्टा तसेच या बाबत सरकारची निश्चित भूमिका आणि सरकारची भविष्यकालीन धोरण काय आहे ? या बाबत चर्चा सुरु आहे. या चर्चेमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, श्री. नितीन गडकरी, श्री. दिवाकर रावते, श्री.विलास अवचट, श्रीमती कांता नलावडे, श्री. अरविंद सावंत, श्री. प्रकाश शेंडगे, श्री. विनोद तावडे आणि डॉ. नीलम गो-हे यांनी भाग घेतला आहे. इतरही अनेक माननीय सदस्यांना या चर्चेमध्ये भाग घ्यावयाचा होता. परंतु वेळ अपुरा असल्यामुळे त्यांना या चर्चेत भाग घेता आला नाही. त्याबद्दल मी सर्व माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानीत आहे.

**( सभापतीस्थानी : मा. उपसभापती )**

सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. डिमांड आणि सप्लायमध्ये गॅप निर्माण झाल्यामुळे या राज्याला भार नियमनाला सामोरे जावे लागत आहे. गेल्या दहा वर्षात वीज निर्मितीला ज्या मर्यादा आल्या, त्याचा परिणाम म्हणून राज्याला जवळपास साडेतीन हजार मे.वॅ. पेक्षा जास्त भार नियमन करावे लागले. आता या भार नियमनामुळे त्रास झालेल्या जनतेकडून प्रतिक्रया उमटणे स्वाभाविक आहे. काही प्रतिक्रिया सहजपणाने उमटल्या, तर काही प्रतिक्रिया नियोजनबध्द उमटल्या. आता याबद्दल मला कोणालाही दोष द्यावयाचा नाही. शेवटी राजकारणाच्या पलिकडे जाऊन या गोष्टीचा विचार आपणाला करावा लागणार आहे. मी या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे राजकारण आणू इच्छित नाही.

सभापती महोदय, गेल्या दहा वर्षात वीज निर्मितीमध्ये भर घालण्याच्या बाबतीत आपण कमी पडलो आहोत. दाभोळ वीज प्रकल्प आणि इतरही काही योजना असतील, त्या योजनांच्या माध्यमातून आपण वीज निर्मिती करु शकलो नाही. साधारणत: एकपट प्रगतीचा वेग असताना दीड पट विजेची मागणी वाढत असते. त्यामुळे तीन हजार मे.वॅ. विजेची टंचाई निर्माण झाली आहे. 2010 सालापर्यन्त 10 हजार मे. वॅ. ची वीजनिर्मिती आपणाला करावयाला पाहिजे. साधारणत: आपण लॉंग टर्म योजना आखत असतो, तेव्हा आपण जनतेला ताबडतोब रिलीफ देऊ शकत नाही. परंतु जनतेला ताबडतोब रिलीफ मिळावा, अशी अपेक्षा असते. चार वर्षाने आपणाला यामध्ये रिलीफ

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील.....

मिळेल असे मी ज्यावेळी जनतेला सांगतो, तेव्हा जनता मला विचारते की, आपण चार वर्षानंतरचे सांगू नका. या उन्हाळ्यात आणि या पावसाळ्यात काय परिस्थिती असेल ते सांगा. सभापती महोदय, एखादा वीजप्रकल्प सुरु करावयाचा असेल तर त्यासाठी निधीची आवश्यकता असते. निधी उपलब्ध झाल्यानंतरही तो वीजप्रकल्प पूर्ण होण्यासाठी तीन ते चार वर्षाचा कालावधी लागतो. सभापती महोदय, आर्थिक मर्यादेबाबत मी या सभागृहात यापूर्वीही सांगितले आहे. म्हणून या बाबत निरनिराळ्या योजना तयार करुन या राज्यातील लोकांना अडचणीतून दूर करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. त्या कामाला आपण लागलो आहे. त्यासाठी आपण पीएलएफ वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत. एखादी मशिनरी जर फुल कॅपॅसिटीने चालविली तर त्या मशिनरीचे आयुष्य कमी होत असते. तरीदेखील आपण आपला पीएलएफ 75 पर्यन्त वाढविला आहे.

( यानंतर श्री. सरफरे...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये वीज निर्मिती केंद्रे जवळपास 30 वर्षापेक्षा जास्त जुनी आहेत. तरीसुध्दा 75च्या पीएलएफने ती चालविली जातात. त्यामध्ये आधुनिकीकरण, सुधारणा करण्याचा निश्चितपणे प्रयत्न सुरु आहे. सभागृहाला सांगू इच्छितो की, उन्हाळयामध्ये भार नियमन जास्त असले आणि आज वीजेची मागणी कमी असली तरी या कालावधीमध्ये ओव्हरऑल मोठया प्रमाणात संच काढले असल्यामुळे आज 2000 मेगावॅटच्या आसपास लोडशेडींगचे प्रमाण आहे. आपण शेजारच्या राज्याकडून, केंद्र सरकारकडून वीज खरेदी करण्याचा प्रयत्न केला. अक्षय प्रकाश योजनेसारखी योजना राबविण्याचा प्रयत्न केला, परंतु ती यशस्वी होऊ शकली नाही. याचे कारण असे की, नियोजित वेळेत तुम्ही भार नियमनातून आम्हाला वगळणार असाल तर आम्ही सक्तीने आमच्या स्वत:वर आम्ही भार नियमन लादून घेतो अशाप्रकारची ही योजना होती. परंतु स्थिती इतकी हाताबाहेर गेली की, अचानक होणारे लोड शेडींगमुळे गावा-गावामध्ये अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले. त्यामुळे या योजनेला निश्चितच सेटबॅक बसलेला आहे. दुसरी एक योजना मी या सभागृहामध्ये मांडली होती. भार नियमन आपण इच्छेने, आनंदाने लादत नाही. वीज नसल्यामुळे भार नियमन करण्याशिवाय आपल्याला पर्याय नाही. किमान अशावेळी घरामध्ये विद्यार्थ्यांना परीक्षेचा अभ्यास करण्यासाठी तरी वीज असावी, गृहिणींना संध्याकाळी स्वयंपाकाच्या वेळी तरी वीज घरामध्ये असावी अशाप्रकारच्या चर्चा ज्यावेळी झाल्या त्यावेळी सिंगल फेजिंगशिवाय दुसरा कोणताही पर्याय आपल्यासमोर नव्हता. त्यासाठी मी मंत्रिमंडळापुढे हा पर्याय घेऊन गेलो. मंत्रिमंडळाने वीज मंडळाला 500 कोटी रुपयांचे कर्ज काढायला संमती दिली. त्या कर्जाच्या माध्यमातून वीज मंडळाने सिंगल फेजिंगचे ट्रान्सफॉर्मर बसवायचे,काही ठिकाणी हॉस्पिटल्स असतील, पाणी पुरवठा योजना असतील त्यासाठी स्पेस फिडर किवा स्वतंत्र फिडर त्या गावासाठी तयार करावयाचे. जेणेकरुन इतर वेळी आपल्याला भार नियमन करावे लागेल. कारण ही परिस्थिती कायमस्वरुपी राहील असे मी म्हणणार नाही. तुम्ही आज जे नियोजन केले आहे त्या प्रमाणे उद्या या राज्यासाठी जी वीज लागणार आहे ती निर्माण करण्याचे आपण नियोजन केले आहे. दरम्यानच्या काळामध्ये आपल्याला काही तरी मार्गाने लोकांना रिलिफ देण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. तो रिलिफ देण्यासाठी हा सिंगल फेजिंगचा कार्यक्रम आपण हाती घेतला आहे. हा कार्यक्रम वर्षभरात पूर्ण करावयाचा आहे. याच्या अंमलबजावणीला आम्ही सुरुवात केली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

आहे.पुढील उन्हाळयात ज्यावेळी भार नियमनाची परिस्थिती येईल त्यावेळी या क्षेत्रामधून सिंगल फेजिंगच्या माध्यमातून काही तरी रिलिफ गावांना देता येईल. त्रिफेज कनेक्शन जरी बंद राहिले तरी सिंगल फेज कनेक्शन चालू राहिल्यामुळे घरामध्ये व गावामध्ये वीज चालू राहील. मधल्या काळामध्ये ऊर्जा संवर्धनासाठी आपण एक प्रयत्न केला. मला एक गोष्ट सभागृहाला सांगितली पाहिजे की, ज्यावेळी सगळया अडचणी निर्माण झाल्या, आणि हातामध्ये कोणतीही व्यवस्था नव्हती त्यावेळी आम्ही एम.ए.आर.सी.कडे गेलो आणि एम.ए.आर.सी. ला अशी विनंती केली की, सरकारने किंवा अन्य कुणीही वीजेची थोडीशी बचत करण्याच्या संदर्भात नागरिकांना आवाहन करण्याचा प्रश्न होता. त्यावेळी एम.ए.आर.सी. ने असा निर्णय दिला की, ज्या ग्राहकांनी गेल्या वर्षी या महिन्यात जेवढी वीज वापरली असेल त्यापेक्षा 20 टक्के कमी वीज ते ग्राहक वापरतील त्यांना बिलामध्ये कांही इन्सेंटीव्ह दिले जाईल. आणि ज्या ग्राहकांनी या काळात गेल्या वर्षी जेवढी वीज वापरली असेल, त्यापेक्षा जास्त वीज वापरतील त्यांना पेनल्टी लावली जाईल अशाप्रकारची भूमिका त्यांनी ठरविली. या उपाय योजनेमधून राज्याला 200 कोटींचे उत्पन्न मिळाले आहे. यामध्ये उत्पन्न मिळविणे महत्वाचे नसून यामध्ये 20 टक्के वीजेची कपात करुन वीजेची बचत करणे, सिस्टीम सेव्ह करणे ही भूमिका त्या पाठीमागे होती. हे 200 कोटी रुपये खर्च करुन मेढाच्या माध्यमातून, अपारंपारिक ऊर्जा विभागाच्या माध्यमातून ऊर्जा संवर्धन आणि या क्षेत्रातील सुरक्षितता या संदर्भात लोकजागृती करणे, आणि काही ठिकाणी फॉरेस्ट एरियामध्ये वाडया वस्त्यामध्ये वीजेच्या तारा नेता येत नसल्यामुळे त्या ठिकाणी वीज नेता येत नाही. अशा ठिकाणी अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताच्या माध्यमातून त्या वाडया वस्त्यांचे विद्युतीकरण करता आले तर तो प्रयत्न करावयाचा होता. त्या पाठीमागची ती भावना होती. मुंबईमध्ये रहाणाऱ्या माणसाच्या घरामध्ये चार एअर कंडिशन मशिन्स असतील तर त्यापैकी त्याने जर दोन एअर कंडिशन चालविले व त्याव्दारे वीजेची बचत केली तर त्यामध्ये थोडाफार फायदा होईल. त्याचप्रमाणे पंखे चालविले पाहिजेत, व घरातील वीज वापरण्याच्या संदर्भात मर्यादा घातल्या पाहिजेत त्यादृष्टीने आपण प्रयत्न केले आहेत. सभापती महोदय, ज्या प्रमाणे आपण शॉर्ट टर्म प्रयत्न केले आहेत त्याप्रमाणे लॉग टर्म प्रयत्न करण्याच्या दृष्टीकोनातून नेहमीच या राज्यासमोर हा प्रश्न उभा राहिला आहे. तुम्ही हा प्रश्न कसा सोडविणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

आहात? यामधून मार्ग कोणता काढणार आहात? एखाद्या बिलाचा, ट्रान्सफॉर्मरचा प्रश्न असे छोटे छोटे प्रश्न असतील, एखादा अधिकारी चांगला वागला नाही वगैरे मॅन अँड मॅनेजमेंटचे प्रश्न असतील, हे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातून सातत्याने प्रयत्न करीत रहाणे, व लोकांची मानसिकता बदलणे या दृष्टीकोनातून आपण एका बाजूला निर्मिती क्षेत्रामध्ये सुध्दा भर घालण्याचा प्रयत्न केला. आणि दुसऱ्या बाजूला सिस्टीम सुध्दा दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

सिस्टीम दुरुस्तीमध्ये आपण वीज मंडळाची पुनर्रचना केली, त्याचे कॉर्पोरेटेशन केले आणि व्यापारी पध्दतीने या कंपन्या चालल्या पाहिजेत ही भूमिका आपण या पाठीमागे स्विकारली. हे करताना एकाचे चार तुकडे केल्यामुळे लगेच दुस-या दिवशी सकाळी त्याचे रिझल्ट मिळतील असे नाही. देशामध्ये 2003 मध्ये जो कायदा केलेला आहे आणि आपलेच सरकार दिल्लीमध्ये असताना त्यांनी तो कायदा आणला. लोकसभेमध्ये एकमताने हा कायदा मंजूर झाला. या वीज मंडळाची पुनर्रचना करण्याची तरतूद या कायद्यामध्ये आहे. त्याची अंमलबजावणी करण्याचे आपण काम केले आहे. कायद्यातील तरतूद जरी अशी भूमिका असली तरी लोकांना चांगली सर्व्हीस कशी देता येईल, यामध्ये जास्त अकाऊंटेबिलीटी कशी आणता येईल, यात जास्त पारदर्शकता कशी आणता येईल हा प्रयत्न या सगळयामागचा आहे. म्हणून या एका वीज मंडळाचे आपण चार भाग केले. त्यानुसार 1) निर्मिती कंपनी 2) वितरण कंपनी 3) ट्रान्समिशन कंपनी आणि 4) होल्डींग कंपनी, अशा चार कंपन्या करण्याचे आपण ठरविलेले आहे. ब-याच वेळेला अशी तक्रार येते की, आम्हाला ऑईल मिळाले नाही, आम्हाला ट्रान्सफॉर्मर मिळाला नाही, त्यासाठी पैसे मागितले. दोन महिने ट्रॉन्सफॉर्मर मिळाला नाही. शेवटी या कन्झ्युमर्स् सर्व्हीसेसच्या गोष्टी आहेत. हे जर आपल्याला करावयाचे असेल आणि आजची महाराष्ट्राची जी एकच वितरण कंपनी आहे, चंद्रपूरचा असिस्टंट इंजिनिअर आणि ज्युनिअर इंजिनिअर काय करतो हे याठिकाणी वीज मंडळामध्ये बसलेल्या चेअरमननां किंवा तेथील टेक्नीकल मेंबरनां कळण्यामध्ये ज्या अडचणी आणि मर्यादा असावयाच्या. मग मधला चीफ इंजिनिअर, सुप्रीटेंडींग इंजिनिअर, एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर, असिस्टंट इंजिनिअर या सगळयातून येथे यावयाचे, त्याऐवजी जसे आपण महसूली नियंत्रणासाठी झोनल केलेले आहेत म्हणजे विदर्भ, मराठवाडा वगैरे, तसे वितरण कंपनीच्या सुध्दा अधिक कंपन्या करुन त्या माध्यमातून त्या भागात अधिक चांगल्या प्रकारे मॅनेजमेंट आणण्याच्या दृष्टीकोनातून काय करता येईल यासाठी सुध्दा आपण भविष्य काळामध्ये प्रयत्न करणार आहोत. यासंदर्भात आज निर्णय झालेला नाही. त्याच्या निर्णयासाठी मंत्रीमंडळासमोर जावे लागेल. तसेच त्याबाबतीत विधानसभेसमोर जाऊन, आपल्या सर्वांना अवगत करुन पारदर्शकपणे निर्णय घेतला जाईल. मी एक गोष्ट पुन्हा-पुन्हा सांगू इच्छितो की, हे विभाजन करीत असताना कुठल्याही परिस्थितीत याचे खाजगीकरण करावयाचे ही भूमिका आमच्या मनामध्ये नाही. या विषयासंबंधात बोलताना "खाजगीकरण,खाजगीकरण"असा जो उल्लेख

. . . .3 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

केला जातो, तर यामध्ये खाजगीकरण हा विषय नाही. आता खाजगी क्षेत्रातील लोकांना वीज वितरणाच्या क्षेत्रामध्ये केंद्र शासनाने मुभा दिली आहे. त्यात टाटा सारखी कंपनी, रिलायन्ससारखी कंपनी, जिंदाल किंवा इस्पात यांच्या सारख्या कंपन्या असतील, त्या या क्षेत्रात कार्यक्षम पध्दतीने काम करतील आणि आम्ही आमच्या सरकारी पध्दतीनेच तेथे काम करीत राहीलो तर एक दिवस असे होईल, आज जशी एस.टी.महामंडळाची अवस्था झालेली आहे की, पंक्च्युअल सर्व्हीस देणारे लोक पुढे जाऊ लागले आहेत आणि एस.टी.मात्र बंद पडण्याच्या मार्गावर किंवा उत्पन्न घटण्याच्या मार्गावर जाऊ लागली आहे. अशा वेळेला स्पर्धेमध्ये उभे राहण्याच्या दृष्टीकोनातून, तेथे टिकण्याच्या दृष्टीकोनातून जे जे करणे गरजेचे होते, ते ते करण्याच्या संदर्भात आम्ही भूमिका घेतली. 50 युनियन, त्यांचे कर्मचारी या सगळयांबरोबर चर्चा केली. अनेकांच्या मनात अनेक शंका आहेत की, ओरिसामध्ये काय झाले ? दिल्लीला काय झाले ? इकडे काय झाले ? तिकडे काय झाले ? तर त्यांचे-त्यांचे मॉडेल वेगळे आहेत. आपले महाराष्ट्राचे मॉडेल वेगळे आहे. आपण आपल्या पध्दतीने त्याचा विचार केलेला आहे. त्यांना आलेले यश, आलेले अपयश या सगळया गोष्टींचा आपण विचार केलेला आहे. तो सगळा विचार केल्यानंतर, जरी आपण शेवटी राहीलो असलो तरी याबाबतीत निर्णय केलेला आहे. मी जेव्हा सभागृहामध्ये आलो, तेव्हा वीज मंडळाचा क्रमांक आता 12 वर गेलेला आहे असे सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडेसाहेब सांगत होते. ज्यांनी हे रेटींग केलेले आहे, त्याचे जर पुस्तक वाचले तर त्यात त्यांनी जे मार्क्स दिले आहेत, त्यामध्ये एम.ए.आर.सी.ई.ची स्थापना केली की नाही ? त्याला मार्क दिलेले आहेत. वीज मंडळाचे विभाजन केले की नाही ? त्याला मार्क दिलेले आहेत. स्पेशल कोर्ट निर्माण केली की नाहीत ? त्याला मार्क दिलेले आहेत. म्हणजे वीज क्षेत्रातील सरकारचा परफॉर्मस् आणि वीज क्षेत्रातील वीज मंडळाचा परफॉर्मस् याला एकत्रित करुन मार्क दिलेले आहेत. मग त्यातून जर एखादा निर्णय सरकार म्हणून आम्ही मंत्रीमंडळामध्ये केला नाही आणि त्यामुळे त्यांचे रेटींग खाली जाणार असेल तर, त्यात त्यांच्या परफॉर्मन्स्ला दुरुस्त करावयास वाव नाही असे मी म्हणत नाही. तेथे सुध्दा दुरुस्त करावयास वाव आहे. परंतु सरकारच्या अनेक गोष्टींच्या कमतरतेमुळे आज मोफत विजेचा जो निर्णय आहे, तो सुध्दा रेटींग खाली जाण्यामध्ये, तुम्ही सबसिडी किती देता ? याबाबतीत सुध्दा जरुर काही विचार झालेला आहे. आपण काय करणार आहोत ? तर आता वीज मोजून देणार

. . . .3 एस-3



APR/KGS/MAP 19:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील . . . .

आहोत म्हणजे आमची निर्मिती कंपनी, वितरण कंपनीला मोजून वीज देईल आणि एकदा मोजून वीज दिली की तेवढे पैसे त्यांनी दिलेच पाहिजेत, बाकीचे आम्हाला दुसरे काही माहिती नाही. तुम्ही तेवढे वसूल करा किंवा करु नका. पण सरकारच्याच एकाच इमारतीत असलेल्या दोन कंपन्या जेव्हा मोजून पैसे घेतील आणि मोजून वीज देतील, त्यावेळी वितरण कंपनीचा मुंबईमध्ये बसणारा अधिकारी सुध्दा जिल्हयाचा ताब्यात मोजून वीज देईल, तालुक्याच्या ताब्यात मोजून वीज देईल आणि त्यातून पैसे वसूल करील. आज जे वीज मंडळाचे उत्पन्न बुडत आहे ते यातून दुरुस्त करता येईल. आपण आज जरी फक्त निर्मितीच्या संदर्भात बोलत असलो तरी या राज्यातील खरा प्रॉब्लेम हा वितरणाच्या संदर्भातील आहे आणि माझ्या मताशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरीसाहेब सहमत होतील.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे -पाटील (पुढे चालू....

गेल्या अनेक वर्षामध्ये या क्षेत्रामध्ये आपण गुंतवणूकच केलेली नाही. आज असा प्रश्न आहे की, हिमाचल प्रदेशमधून आपल्याला वीज मिळाली, पश्चिम बंगालमधून वीज मिळाली तरी तेथून वीज आणायची म्हटली तरी नागपूरच्या पुढे वीज आणता येत नाही. कारण मधे काही परिसराला अंधारामध्ये रहावे लागले, आपल्या ट्रान्मीशन लाईन आहेत, तेथील काही मनोरे पडले. वीज उपलब्ध असतांनासुध्दा आपल्याला वितरण करता आले नाही. म्हणून एच.ओ.डी.सी. आणि ज्या ट्रान्मीशन लाईन आहेत त्यामध्ये दुरुस्ती करण्याच्या संदर्भामध्ये, गुंतवणूक करण्याच्या संबंधामध्ये मोठी गरज आहे. एक हजार, दोन हजार कोटी रुपयाची गुंतवणूक या क्षेत्रात करणे गरजेचे आहे. बऱ्याचवेळा टी ॲन्ड डी लॉसेस कमी करा असेही आपण सांगतो आणि दुसऱ्या बाजूला मीटर बसवू नका, मोफत वीज द्या असेही सांगतो. मीटर बसविले नाही तर एनर्जी अकौंटिंग होणार नाही, एनर्जी अकौंटिंग झाली नाही तर टी ॲन्ड डी लॉसेस कमी करता येणार नाही. म्हणजे दोन्ही बाजूनेही बोलायचे, नक्की कोणत्या दिशेने जायचे असा प्रश्न ज्यावेळेला निर्माण होतो, त्यावेळेला या क्षेत्रामध्ये 2 हजार कोटी रुपयाची ज्यावेळेला गुंतवणूक करायची आहे, तेव्हा सरकार ही गुंतवणूक उपलब्ध करुन देणार आहे काय ? वीज मंडळ स्वत:च्या क्षमतेवर गुंतवणूक करणार आहे काय ? एवढ्या वर्षामध्ये पी.जी.एस.सी.आय.एस.चे महाराष्ट्रात एकसुध्दा सेंटर नाही. आज पी.जी.एस.सी.आय.एस. काय करणार आहे ? ट्रान्मीशन लाईनमध्ये काही गुंतवणूक ते करणार आहेत काय, याबाबत जरुर त्यांच्याकडे यासंबंधाने पाठपुरावा करण्याचे काम सुरु आहे. हा एक प्रयत्न आपण केलेला आहे. आपण काही स्वत:चे प्रोजेक्ट सुरु केलेले आहेत. मागे मी सांगितले होते की, परळी आणि पारस येथे दोन प्रोजेक्ट सुरु केलेले आहेत.

श्री.नितीन गडकरी(बसून): आपल्या कारकिर्दीतील ते नाहीत.

श्री.दिलीप वळसे-पाटील : मी मंत्रिमंडळाने केव्हा मंजुरी दिली त्याची तारीख सांगायला तयार आहे. पैसे केव्हा उपलब्ध करुन दिलेले आहेत तेही सांगायला तयार आहे. आपण आपले सरकार असतांना त्याबाबतचे प्लॅनिंग केले असेल, पण त्या संबंधात मंत्रिमंडळामध्ये मंजुरी मिळविणे, त्यासाठी पैसे उपलब्ध करणे, त्याची अंमलबजावणी सुरु करणे हे काम सुरु झाले. ते काम कोणाच्या काळामध्ये झाले या वादामध्ये मला जायचे नाही. उद्या महाराष्ट्राच्या विद्युत निर्मितीमध्ये वाढ होणार आहे की नाही, हा प्रश्न आहे. म्हणून आपण 500 मे.वॅ.विद्युत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे चालू...

निर्मितीमध्ये वाढ करण्याचा निर्णय आपण केला. मला सभागृहाला सांगायला आनंद होतो. परळीचा प्रोजेक्ट आपल्याला मार्च 2006 मध्ये कार्यान्वित करता येईल या स्टेजमध्ये आहे. पारसचा प्रोजेक्ट ऑगस्ट 2006 मध्ये कार्यान्वित करता येऊ शकेल अशी परिस्थित्ी आहे. म्हणजे 500 मे.वॅ. विद्युत निर्मिती ही गेल्या वर्ष-दोन वर्षाच्या कालावधीत या राज्याच्या स्थापीत क्षमतेमध्ये भर घालतो आहोत. याच्या बरोबर घाटघरचा 250 मे.वॅ. प्रकल्प आहे. दुर्दैवाने त्या ठिकाणी काही अपघात झाला. तेथून 250 मे.वॅ. वीज मिळणार आहे. याचा अर्थ बाकीच्या कोणावरही अवलंबून न रहाता 839 मे.वॅ.वीज जवळपास आपल्याला उद्याच्या वर्ष-सहा महिन्या कालावधीमध्ये या राज्यामध्ये अतिरिक्त वीज मिळणार आहे. आपण काही देशामध्ये लॉंग टर्म पावर परचेसचे ॲग्रीमेंट केले. देशामध्ये 2 हजार मे.वे.पेक्षा जास्त मे.वॅ. वीज उत्पादनाच्या संबंधात ॲग्रीमेंट केलेले आहेत. मध्यंतरी आपण एक धोरण स्वीकारले की, या राज्यामध्ये वीज निर्मितीच्या क्षेत्रामध्ये खाजगी क्षेत्रातील लोकांनी गुंतवणूक करण्यासाठी आले पाहिजे. हे धोरण स्वीकारल्यानंतर काही खाजगी कंपन्या पुढे आल्या आणि सरकारच्याबरोबर सामजस्याचे करार केले. 12000 मे.वॅ.चे सामंजस्याचे करार झाले. यामध्ये लोकांना विश्वसनीयता वाटेरनाशी झाली. निश्चितपणे हे एन.आर.पी. नाहीत. कारण आपला पातळगंगेचा अनुभव आहे, विदर्भाती भद्रावती प्रोजेक्टचा अनुभव आहे. हे सगळे अनुभव आपल्या पदरी होते, त्यामुळे आपल्याला त्यामध्ये विश्वास वाटत नव्हता. परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, आज आपण 2003 च्या कायद्याचा अभ्यास केला तर वीज निर्मितीच्या प्रकल्पासाठी केंद्र सरकार, राज्य सरकारच्या मान्यतेची गरज नाही. आपण या संबंधाने पॉलिसी अशासाठी केली की, या राज्यात या क्षेत्रात गुंतवणूक यावी म्हणून त्यांना सवलती द्यायला निघालो. आमच्या सवलतींचा लाभ घ्यायचा असेल, तर आपण या सवलतींचा लाभ घ्या, अंतर्गत प्रकल्प टाका. किमान 500 मे.वॅ.चा प्रकल्प असला पाहिजे, हे सांगितले. 1250 हजार मे.वे.चे सामंजस्य करार झाले हेही मी सांगितले, आजही पुन्हा सांगतो हे 1250 हजार मे.वॅ.चे प्रकल्प येतील असा मी दावा करत नाही. यातील निम्मे जरी प्रकल्प आले तरी चालतील. त्यांना आपण दोन अटी घातलेल्या आहेत. ज्या दिवशी सामजस्य करार केला त्या दिवसापासून सहा महिन्याच्या आतमध्ये त्यांनी डिटेल्स प्रोजेक्ट रिपोर्ट सरकारला सादर केला पाहिजे. ज्या दिवशी डिटेल रिपोर्ट सादर केला जाईल त्यापासून सहा महिन्याच्या आतमध्ये त्या कंपनीने फायन्शीयल क्लोजर केले पाहिजे, मशिनरीची ऑर्डर दिली पाहिजे, फायनान्शीयल टायअप झाले पाहिजे. याचा अर्थ ज्या दिवशी



SKK/ KGS/ MAP/

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील (पुढे चालू...

सामंजस्य करार केला तेथपासून एक वर्षाच्या कालावधीमध्ये हे लोक सिरियस प्लेअर आहेत की नॉन सिरियस प्लेअर आहेत, हे यामध्ये आपल्या कळणार आहे. या लोकांना हे प्रकल्प उभे करता यावेत, हे पाहिजे जावे असे सांगण्यात आले. यावेळेस टाटासारखी कंपनी, रिलायन्ससारखी कंपनी, इस्पात, जिदाल कंपनी आहे या सगळया कंपन्या पावर सेक्टरमध्ये आहेत. त्या नव्याने प्रोजेक्ट करायला निघालेले नाहीत. मुंबईसारख्या शहरात टाटा कंपनी वीज सप्लाय करते, उपनगरामध्ये रिलायन्स कंपनी वीज सप्लाय करते, बाकीच्या कंपन्या इतर राज्यामध्ये वीज सप्लाय करतात. हे सगळे करत असतांना आपण ३ हजार मे.वॅ. पावर परचेस करण्याच्या संदर्भात त्यांना आश्वासित केलेले आहे. त्याचा उपयोग त्यांना त्यांचे फायनान्शीयल टायअप करण्याच्यादृष्टीने निश्चितप्रकारे होईल.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MAP/ 19:35

श्री. दिलीप वळसे-पाटील....

हे जरी खरे असले तरी सुध्दा यासंदर्भामध्ये राज्य सरकार स्वस्थ बसलेले नाही. यासंदर्भात राज्य सरकारने आपल्या पध्दतीने 3000 मेगॅवॅटचे पॉवर प्रॉजेक्ट या राज्यात सुरु करण्याचे ठरविलेले आहे. उरणला 1040 मेगावॅटचा प्रकल्प, तळेगावला 1400 मेगावॅटचा प्रकल्प आणि खापरखेडयाला 500 मेगॅवॅटचा प्रकल्प उभारण्यासंबंधीचा राज्याच्या मंत्रिमंडळाने निर्णय केलेला आहे.खापरखेडयाचा कोलबेस प्रकल्प आहे, आणि उर्वरित दोन प्रकल्प गॅसबेस प्रकल्प आहेत. उरणलाच गॅस नाही, तर याला कुठून गॅस येणार? असा सहज प्रश्न विचारला जातो. केंद्र सरकारने भेलच्या माध्यमातून गुजरामधून गॅसची पाईपलाईन टाकण्याच्या संदर्भात कारवाई सुरु केलेली आहे. पेट्रोलियम मंत्र्यांनी जगामध्ये सगळीकडे फिरुन अतिरिक्त गॅस मिळविण्यासाठी करार करण्यास सरुवात केलेली आहे. वीज मंडळाने सुध्दा स्वतंत्रणाने ओपन मार्केटमध्ये उतरुन आपल्यालासुध्दा इंटरनॅशनल मार्केटमधून गॅस मिळतो काय? मग तो गॅस गुजरातमध्ये आणून किंवा जेव्हा दाभोळ प्रकल्प सुरु होणार आहे, त्या दाभोळ प्रकल्पाच्या जेट्टीवर आणून, त्याठिकाणी गॅस आणता आला तर माझी खात्री आहे की, हे 3000 मेगॅवॅटचे प्रकल्प होतील. या राज्याच्या मंत्रीमंडळाने दर वर्षी 500 कोटी रुपये या प्रकल्पाच्या उभारणीसाठी देण्याच्या संदर्भात कॉन्क्रीट निर्णय घेतलेला आहे, ती भूमिका शासनाने ठरविलेली आहे. एक आपली नियोजनात चूक काय

झाली? मोफत विजेचा मुद्दा मांडणे बरोबर आहे. पण मोफत विजेच्या माध्यमातून किंवा सवलतीच्या विजेच्या माध्यमातून राज्य सरकारच्या तिजोरीमधून वीज मंडळाला गेल्या 5 ते 6 वर्षात 6 ते 7 हजार कोटी रुपये ज्यावेळेला दिले, त्यावेळी हे 7 हजार कोटी रुपये इक्विटी म्हणून आपण वीज मंडळाला दिले असते, आणि 20 टक्के ही रक्कम धरुन 80 टक्के रक्कम बाजारामधून मिळाली असती तर 25000 कोटी रुपयांचे प्रकल्प महाराष्ट्रात उभे राहू शकले असते. राज्य सरकारने 3000 मेगॅवॅटचे 12000 कोटी रुपयाचे प्रकल्प उभे करण्याचे ठरविलेले आहे. त्यामध्ये ही 20 कोटी रुपयाची इक्विटी म्हणून हे 2400 कोटी रुपये 2500 कोटी रुपये दर वर्षी 500 कोटी रुपये याप्रमाणे पाच वर्षात देण्यात येतील. कारण हे पैसे एका दिवशी लागणार नाहीत. या प्रकल्पाचे काम उद्या सुरु झाले तरी हे प्रकल्प तीन टप्प्यामध्ये सुरु होणार आहेत. त्यामुळे दर वर्षी त्यातील काही पैसे मिळाले तरी त्यामधून काम निश्चितप्रकारे भागणार आहे. सभापती महोदय, हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील....

सगळे होत असतांना एक चांगली घटना काल घडलेली आहे. दाभोळच्या संदर्भात जी एक टांगती तलवार आपल्या राज्यावर, देशावर होती. आजपर्यंत या सभागृहात दाभोळचा विषय निघाल्यानंतर सभागृहात, सभागृहाच्याबाहेर, टी.व्ही.चॅलेनवर मी कधीही या विषयाच्या संदर्भात बोललो नाही. त्याचे कारणच हे होते की, या राज्याचा ऊर्जामंत्री म्हणून मी एखादे केलेले स्टेटमेंट, आर्बिट्रेशनमध्ये तिकडे कोणी तरी जाऊन वापरेल आणि त्याचा वापर आपल्या देशाच्या विरुध्द किंवा राज्याच्या विरुध्द करेल. म्हणून या विषयाच्या संदर्भात मी सभागृहात किंवा सभागृहाच्या बाहेर बोलण्याचे टाळत होतो. केंद्र सरकारने यामध्ये पुढाकार घेतला. मंत्र्यांची समिती नेमली. श्री. प्रणव मुखर्जींच्या अध्यक्षतेखाली मंत्र्यांचा कार्यगट नेमला. श्री. शरद पवार साहेब त्या गटामध्ये होते. कॅबिनेट सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक वेगळया अधिका-यांची समिती नेमली. केंद्रीय ऊर्जा सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक आढावा समिती नेमली. या राज्यामध्ये सुध्दा माझ्या अध्यक्षेतेखाली चार मंत्र्यांचा एक कार्यगट झाला. चार सचिवांचा कार्यगट झाला आणि गेले चार महिने याबाबतीत बसून मग "जीआी बेक्टेल" कंपनी असेल, फॉरेन लेंन्डर्स असतील इंडियन लेंन्डर्स असतील, आयसीआयसी बँक असेल किंवा देशातील सगळया वित्तीय संस्था असतील, त्यामध्ये केंद्र सरकारने पुढकार घेतला. पंतप्रधानांनी पुढाकार घेतला. केंद्रीय ऊर्जा सचिव शाही यांनी पुढाकार घेतला. कॅबिनेट सचिवांनी पुढाकार घेतला. आणि कालच्या तारखेला हा दाभोळचा प्रकल्प पुन्हा सुरु होण्याच्या दृष्टीकोनातून सगळे करार-मदार झालेले आहेत. एकमेकांच्या विरुध्द ज्या काही तक्रारी होत्या, ज्या कोर्ट केसेस होत्या, त्या सगळया कोर्ट केसेस मागे घेण्याचे ठरलेले आहे. याचाच दुसरा अर्थ असा की, याच्यासाठी त्यांनी काम केलेले आहे. दोन स्वतंत्र कंपन्या केलेल्या आहेत. एक कंपनी स्पेशल परपज व्हेईकल ही कंपनी या प्रकल्पासाठी फक्त निधी उभा करण्यासाठी निर्माण केली आहे.निधी उभा करुन सगळयांची देणी देऊन झाल्या नंतर प्रॉजेक्ट सुरु करणे, कॉन्ट्रॅक्टरची देणी देणे हे सगळे काम त्या कपंनीने करावयाचे आहे. जेव्हा हा प्रकल्प सुरु होईल तेव्हा हा प्रकल्प केंद्र सरकारच्याच एन.टी.पी.सी.च्या माध्यमातून निर्माण केलेल्या कंपनीच्या माध्यमातून चालविला जाणार आहे. ज्यावेळेला हा प्रकल्प सुरु होणार, अशी चर्चा सुरु झाली, त्यावेळी त्यांनी राज्य सरकारला विचारले की, तुम्ही यातील वीज घेणार काय? त्यावेळी राज्य

..3..



SMT/ KGS/ MAP/ 19:35

श्री. दिलीप वळसे-पाटील....

सरकारने सांगितले की, ठीक आहे. आम्ही 80 टक्के पी.एल.एफ.ने 2 रुपये 30 पैशाने वीज घेण्यास तयार आहोत. मग त्यांनी गॅस कुठून आणावा, त्यांनी नाफ्ता कुठून आणवा किंवा त्यांनी या बाबतीत काय करावे यासंदर्भात जो पॉवर पर्चेस ॲग्रीमेंट होईल तो नंतर होणार आहे. पण एक प्रन्सिपल अंडरस्टॅण्डिग म्हणून प्रिन्सिपल ॲक्सेप्टन्स म्हणून दोन रुपये 30 पैशाची किंमत लावली आहे. मग त्यामध्ये फिक्स चार्ज किती असेल आणि बदलता चार्ज किती असेल याच्या संदर्भातसुध्दा

आपण त्यांच्यावर बंधन घालून दिलेले आहे. अगदीच इन्टरनॅशनल मार्केटमध्ये जशी पेट्रोलची किंमत वाढते किंवा बाकीच्या फ्यूएलच्या किंमती वाढतात, तसा दर वाढला तरच या दरामध्ये काही बदल होऊ शकेल, अन्यथा ठराविक कालावधीसाठी हा दर आपण त्यांच्याकडून ठरवून घेतलेला आहे. त्यांनी आपल्याला कमिटमेंट अशी दिलेली आहे की, हा करार झाल्यापासून एक सहा महिन्यापर्यंत म्हणजे साधारणतः पुढच्या जून,2006 पर्यंत सहा महिन्याच्या कालावधीमध्ये हा प्रकल्प सुरु करण्याच्या संदर्भात आणि त्याच्या नंतरच्या सहा महिन्यामध्ये त्याचा पुढचा टप्पा असे हे दोन्ही टप्पे सुरु करण्याच्या संदर्भामध्ये चर्चा झालेली आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

हा प्रकल्प सुरु होऊ शकला तर ताबडतोब वर्षभराच्या कालावधीमध्ये या राज्यामध्ये 2 हजार मेगावॅट अतिरिक्त वीज येईल. आज जो दोन ते अडीच हजार मेगावॅट विजेचा तुटवडा जाणवतो त्यामध्ये 2 हजार मेगावॅट विजेचा तुटवडा भरुन निघेल आणि लोडशेडींगचा जो प्रश्न आहे तो बऱ्याचअंशी कमी होऊ शकेल. या ठिकाणी मला हेही सांगितले पाहिजे की, पूर्वीची जी दाभोळ कंपनी होती त्यांची आपल्याकडे 495 कोटी रुपयांची थकबाकी होती. ही 495 कोटी रुपयांची थकबाकी आपण त्यांना दिली. 495 कोटी रुपयांची थकबाकी दिल्यानंतर नवीन स्थापन होणाऱ्या ज्या कंपन्या आहेत मग त्यामध्ये होल्डींग कंपनीला किंवा राज्य सरकार ठरवील त्या कंपनीला 15 टक्केची इक्विटी देण्याचे त्यांनी ठरविलेले आहे. भविष्य काळामध्ये विजेचे जे उत्पन्न मिळेल ते उत्पन्न राज्याचा उत्पन्नाचा भाग राहील. गॅसच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय कंपन्यांबरोबर करार झालेले आहेत. त्यातून जे काही उत्पन्न मिळेल ते उत्पन्न सुध्दा राज्याच्या उत्पन्नाचा भाग राहील. बेक्टेलला सुध्दा जे पैसे द्यावयाचे होते ते पैसे आपण दिले नाहीत. ते पैसे इंडियन फॉरेन इन्स्टीटयूटने दिले. त्याच्यासाठी जे कर्ज काढले गेले ते पैसे त्यांनी फेडावयाचे आहेत. त्यांनी जर ते पैसे फेडले नाहीत तर त्याची जबाबदारी केंद्र सरकारने घेतलेली आहे. यामध्ये आपण फारसे आर्थिक बर्डन न घेता हा प्रकल्प आर्बीट्रेशनमधून बाहेर काढला. राज्यावर जी टांगती तलवार आहे त्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न झाला. राज्यामध्ये वीज मिळाली तर उद्योग क्षेत्रामध्ये सुधारणेचे वातावरण निश्चितपणे निर्माण होऊ शकेल हे मला या ठिकाणी सभागृहाला सांगितले पाहिजे. या सगळया कंपन्या स्थापन केल्यानंतर आपण राज्यामध्ये काही मेजर रिफॉर्म्स करण्याचे ठरविले आहे. त्या रिफॉर्म्समध्ये वीज मंडळाचे रिस्ट्रक्चरींग करण्याच्या संदर्भात मी सभागृहामध्ये बोललो होतो. आता मी या राज्यामध्ये एनर्जी अकाऊंटींगचा कार्यक्रम हातामध्ये घेत आहे. जवळपास 41 हजार डी.टी.सी. आणि त्यामध्ये एनर्जी मिटरायझेशन करुन त्यामधून इव्हॅल्यूशन करणे हे काम सुरु झालेले आहे. हे सगळे यासाठी करावयाचे आहे की, आज त्यांची अकाऊंटीबिलिटी कोणावरही नाही. आम्ही याबाबतीत टारगेट ठरविलेले आहे. 2001 मध्ये आपल्या टी.अँड डी. लॉसेसचे प्रमाण 39.49 टक्क्यापर्यन्त होते. ते प्रमाण आता 2004-05 मध्ये 35.28 टक्केपर्यन्त खाली आणण्यामध्ये यशस्वी झालेलो आहोत. यामध्ये पुढच्या चार वर्षाच्या कालावधीमध्ये दरवर्षी टी.अँड डी. चे प्रमाण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

3 टक्के कमी करण्याचा माझा प्रयत्न आहे. मोठया प्रमाणावर आपण टी. अँड डी. लॉसेस कमी करु शकलो तर निश्चितपणे या वीज मंडळाच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल आणि त्याचा फायदा आपल्या राज्याला होईल. वीज चोरीच्या संदर्भात आपण काही निर्णय केले. मी एक बिल या सभागृहामध्ये मांडले होते आणि आपण सगळयांनी ते बिल एकमताने मंजूर केले. त्या बिलाची अंमलबजावणी करण्याच्या आधी केंद्र शासनाचा कायदा आला. तो कायदा आल्यानंतर आपल्या कायद्याची अंमलबजावणी तशीच राहिली. राष्ट्रीय पातळीवरचा नवीन कायदा आल्यामुळे त्याची अंमलबजावणी सुरु झाली. त्यामध्ये काही त्रुटी होत्या. त्या त्रुटींचा फायदा घेऊन काही लोक नागपूरच्या उच्च न्यायालयात गेले. पोलिसांना या प्रकारच्या केसेस हाताळता येणार नाहीत अशा प्रकारचे जज्जमेंट त्यांनी दिले. त्याचा फायदा घेऊन आपण काल या सभागृहामध्ये यासंदर्भात दुरुस्ती करण्यासाठी जे बिल मांडले त्याला आपण सर्वांनी दिलदारपणे मान्यता दिली त्याबद्दल मी सर्वांचे आभार मानले. आज पुन्हा आभार मानतो. पोलिसांना हे काम करावयाचे आहे आणि ज्यावेळी हे काम करावयाचे आहे त्यावेळी रुटीन कोर्समध्ये पोलीस स्टेशनकडे गेलो तर त्या पोलिसांवर बंदोबस्त आणि बाकीच्या सगळया गोष्टी असतात. त्यामुळे या राज्यामध्ये 6 स्वतंत्र डेडीकेटेड पोलीस स्टेशन्स निर्माण करण्याचा निर्णय घेतलेला आहे. सध्या आपण सहा असेसमेंट केलेले आहेत. यामध्ये काही कमी जास्त लागले तर त्यादृष्टीकोनातून आपण जाणार आहोत. यामध्ये कल्याण ला एक पोलीस स्टेशन त्याचप्रमाणे पुणे, नाशिक, जालना, नागपूर आणि लातूर या ठिकाणी एक एक असे सहा पोलीस स्टेशन्स आपण निर्माण करणार आहोत आणि तीन स्वतंत्र न्यायालये तयार करीत आहोत. त्यामध्ये सगळया वीज चोरीच्या केसेसचा मग त्या कर्मचाऱ्यांविरुध्द असतील किंवा ग्राहकांविरुध्द असतील त्या केसेसचा लवकर निर्णय झाला पाहिजे. त्याची वसुली झाली पाहिजे आणि संबंधितांना शिक्षा झाली पाहिजे यासाठी ही पावले टाकलेली आहेत. यामध्ये आपण निश्चितपणे हा प्रयत्न केलेला आहे. कॉल सेंटर्स चालू करणे, इन्फॉर्मेशन सेंटर चालू करणे या नियमित कार्यक्रमातील गोष्टी आहेत. या गोष्टी करण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. मला सभागृहाच्या आणि विशेषत: सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे की, आज आपण थर्मल पॉवर

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

स्टेशनच्या माध्यमातून जेवढी वीज निर्मिती करतो ती सगळी केंद्रे विदर्भामध्ये आहेत आणि त्या ठिकाणी 6 हजार मेगावॅट वीज तयार होते. विदर्भामध्ये त्यातील 3 हजार मेगावॅट वीज वापरली जाते आणि 3 हजार मेगावॅट वीज पश्चिम महाराष्ट्रात वाहून आणली जाते. त्यामध्ये खूप लॉसेस होतात आणि खूप आर्थिक नुकसान होते. मग आपल्याला काय प्लानिंग करावयास पाहिजे ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/ श्री.बरवडनंतर 19:45

श्री.दिलीप वळसे-पाटील.....

जर नवी मुंबई, ठाणे, बेलापूर, कोकणातील रायगड, पुणे या सगळया भागाला ॲश्युअर्ड पॉवर सप्लाय द्यावयाचा असेल तर याच परिसरामध्ये आता विजनिर्मिती केली पाहिजे. म्हणून टाटाला आणि रिलायन्सला आम्ही सांगितले आहे की, तुमच्या शक्यतो समुद्र किनारी इम्पोर्टेड कोलवर आधारित पॉवर प्रोजेक्ट काढले तर आणि आपल्या उरणचा पॉवर प्रोजेक्ट किंवा तळेगावचा 1400 मे.वॅ.चा पॉवर प्रोजेक्ट हे सुध्दा पॉवर प्रोजेक्ट या पट्टयामध्ये झाले आणि विदर्भातील वीज सरप्लस झाली तर आज ज्या दराने वीज वापरतो त्यापेक्षा स्वस्त दराने तयाठिकाणी वीज देता येईल. आपली स्पर्धा मध्य प्रदेशच्या स्टील उद्योगाच्या बाबतीत आहे. आज मध्य प्रदेश आणि बाकीच्या राज्यांनी सर्व उद्योग क्षेत्रामध्ये आपल्याला जर स्वस्त दरामध्ये वीज द्यावयाची ठरविली तरी आपण घेत नाही. कारण आपल्या आर्थिक गणितामध्ये ते बसत नाही. ही वीज सरप्लस जर झाली तर विदर्भामध्ये सुध्दा उद्योग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून निश्चित प्रयत्न करता येईल हा एक भाग आहे. आणखी एक महत्वाचा मुद्दा आहे. आपण बाकीच्या मोठमोठया गोष्टींचा विचार करतो. पण वाडया, वस्त्यांच्या विद्युतीकरणाबाबत, कृषी पंपाचा विचारही केला पाहिजे. एक कृषी पंप द्यावयाचा झाला तर त्यावर 50-55 हजार रुपये खर्च करावा लागतो. कृषी पंपाचे लक्ष्य वाढवून द्यावे आणि मंत्र्यांनी जाहीर करावे याला काही लागत नाही. परंतु 1 लाखाचे लक्ष्य ठरविले तर ते लक्ष्य पार करण्यासाठी तेवढी उपकेंद्रे, तेवढे ट्रान्सफॉमर्स उपलब्ध करुन दिली नाही तर मग आहेत त्या ट्रान्सफॉर्मरवर लोड येतो, ते जळतात आणि जळालेले ट्रान्सफॉमर्स दुरुस्त कसे करावयाचे आणि त्याच्यातून सगळया कहाण्या सुरु होतात. या कहाण्या त्याच्यामध्ये होऊ नयेत म्हणून आपल्याला तो कार्यक्रम प्राधान्याने हातामध्ये घ्यावयाचा आहे. मी माझ्या वीज मंडळाच्या अधिका-यांना सुध्दा विचारले आहे की, आम्ही सगळे आमदार डीपीडीसीमध्ये या विद्युतीकरणाच्या कार्यक्रमासाठी पैसा उपलब्ध करुन देतो पण तो पैसा वीज मंडळाकडे गेल्यानंतर त्याच्यातून किती वाडया, वस्त्यांचे विद्युतीकरण झाले ? दुर्गम भागातील वाडयांचे काय झाले याचा हिशेब करण्याची पध्दत नसल्यामुळे आता यापुढील काळामध्ये प्रत्येक जिल्हयाच्या अधिक्षक अभियंत्यांना त्या त्या जिल्हयामध्ये असलेल्या एकूण वाडया, वस्त्या आणि त्यांचे विद्युतीकरण हे वेळेमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून कार्यक्रम पूर्ण करावा लागेल. तो मंजूर करुन घ्यावा लागेल. दरवर्षी त्याची

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अंमलबजावणी करावी लागेल. या कामासाठी देशाचे सन्माननीय पंतप्रधान यांनी स्व.राजीव गांधी यांच्या नावाने एक योजना जाहीर केलेली आहे. त्याच्यामध्ये महाराष्ट्रातील जास्तीत जास्त वाडया, वस्त्या कशा आणता येतील आणि केंद्राकडून या योजनेंतर्गत जास्तीत जास्त पैसे कसे मिळविता येतील यादृष्टीकोनातून प्रयत्न राहिले आहेत. ट्रान्सफॉमर्सबाबत खूप तक्रारी आहेत. तसे म्हटले तर हा मोठा विषय आहे, म्हटले तर हा विषय लहानही आहे. परंतु यासंबंधी तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. ट्रान्सफॉमर्स टेस्टिंग करीत असताना काही अधिकारी चुकीचे वागले आहेत. कोल्हापूरच्या बाजुला ही घटना उघडकीस आली असली तरी तो संपूर्ण ट्रान्सफॉमर्सचा लॉट खरेदी झाला त्यामध्ये आणखी बाकीच्या ठिकाणी अशा गोष्टी घडल्या आहेत काय हे तपासण्याच्या संदर्भात आपण वीज मंडळाला किंवा नवीन कंपनीला सूचना दिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये जे जे कोणी दोषी आढळतील त्यांची कोणाचीही गय केली जाणार नाही, कोणालाही पाठिशी घालण्याचा प्रयत्न केला जाणार नाही. आज जनतेच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे त्यावेळी अशाप्रकारे एखादा अधिकारी किंवा कोणी असेल त्याला पाठिशी घालण्याची भूमिका आम्ही घेणार नाही. आपण नवीन पोलीस स्टेशन्स, कोर्ट निर्माण करीत आहोत, कायदा निर्माण करीत आहोत, तरतुदी करीत आहोत. दरवेळेला माझ्याकडे तक्रारी करण्यात येतात की, तुम्ही ग्राहकांवर कारवाई करता. परंतु जे कर्मचारी चुकीचे वागले त्यांच्यावर तुम्ही कारवाई करीत नाही. यासंबंधी वीज मंडळाच्या अधिका-यांना सूचना दिल्या आहेत, जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी, परंतु सगळेच चुकीचे वागत असतील, सगळेच चोर असतात असे नाही. प्रत्येक समाजामध्ये मग राजकारण असू दे, शिक्षण संस्था असू दे, कर्मचारी असू दे, 10-5 लोक चुकीचे वागत असतात पण त्यामुळे संपूर्ण यंत्रणा बदनाम होत असते आणि म्हणून चुकीचे वागणारे लोक मंडळामध्ये असतील त्या लोकांना सुध्दा शिक्षा करुन त्यांच्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहोत. मध्यंतरी वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली होती. त्यामुळे महाराष्ट्रातील कोळसा खाणींच्या संदर्भात खासदार श्री.अहिर यांनी माझ्याकडे चौकशीची मागणी केलेली आहे. मी सांगू इच्छितो की, आज आपण कितीही तात्पुरत्या स्वरुपामध्ये बोलत असलो तरी कोळशाचे साठे कमी होत चालले आहेत. आजपासून 20-30 वर्षानंतर महाराष्ट्रामध्ये विजनिर्मितीसाठी कोळसा उपलब्ध होईल की नाही

3...





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील...

याचा विचार आता करण्याची वेळ आलेली आहे. यासंदर्भामध्ये केंद्र सरकारकडे आग्रह धरण्यासंबंधी राज्यसरकारच्या माध्यमातून, मा.मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून पत्र लिहिले आहे. मी स्वत: केंद्रीय कोळसा मंत्र्यांबरोबर चर्चा केली आहे. जेव्हा जेव्हा मागणी होते तेव्हा तेव्हा चर्चा केली आहे. तरी सुध्दा त्याच्यामध्ये काही शक्ती पॉवरफूल ठरल्या आणि काही खाजगी क्षेत्रातील लोकांनी त्या खाणी मिळविण्याचा प्रयत्न केला असला तरी मी सभागृहाला एवढेच सांगू इच्छितो की, या राज्यातील सत्ताधारी आणि विरोधी पक्षाचे असे सगळेच्या सगळे खासदार घेऊन या प्रश्नासंबंधी केंद्र सरकार बरोबर संघर्ष करण्याची आमची तयारी आहे. त्याच्यामध्ये राज्याचा दबाव गट निर्माण करुन त्या खाणी राज्याला कशा मिळतील, बाजुला कशा जाणार नाहीत यासंबंधी भूमिका घेऊ.

नंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. खंदारे 19:50

(श्री. दिलीप वळसे-पाटील पुढे सुरु...)

मधल्या काळात जेव्हा ही बाब निदर्शनास आली त्यावेळी मी स्वत:, मा. मुख्यमंत्री आणि केन्द्रीय कृषीमंत्री मा.श्री.शरद पवारसाहेब आम्ही माननीय पंतप्रधाना भेटलो आणि त्यांच्या ही बाब लक्षात आणून दिली. महाराष्ट्राच्या आजुबाजूला असलेल्या खाणी ह्या अन्यत्र जावू देणार नाही.

श्री. प्रकाश शेंडगे : महाराष्ट्राने खाण मिळण्यासाठी अर्ज केला नाही त्यामुळे आपल्याला मिळणारा कोळसा हा अन्य राज्यांनी घेतला. अर्ज न करण्याच्या संदर्भात जे कोणी अधिकारी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी असा मुद्दा मी उपसिथत केला होता.

श्री. दिलीप वळसे-पाटील : कोळशाच्या खाणी ह्या पॉवर सेक्टरला, इंडस्ट्रीज सेक्टरला किंवा अन्य सेक्टरला किती द्यावयाच्या हे केन्द्र सरकारमध्ये ठरत असते. त्याठिकाणी वरचे लोक असतात. खाण मिळण्याच्या संदर्भात आपले पत्र गेले नाही असे म्हणणे बरोबर होणार नाही. सगळ्याच खाणी आम्हाला द्याव्यात अशी मागणीही आपल्याला करता येणार नाही. यासंदर्भात लिंकिंग प्रोजेक्ट असतात. प्रोजेक्ट बरोबर इंडस्ट्री लिंक असते. वृत्तपत्रातून प्रसिध्द झालेले वृत्त आणि खासदारसाहेबांनी दिलेली माहिती याबाबतीत वीज मंडळाच्या अधिका-यांना चौकशी करण्यास सांगितले आहे. हा माईनचा विषय असल्यामुळे ऊर्जा विभागाला विश्वासात घेतले जात नाही. केवळ माईन विभागालाच विश्वासात घेतले जाते. याबाबतीत आमची जबाबदारी नाही असे मी म्हणत नाही. आमचे पत्र गेलेले आहे. देशाच्या माननीय पंतप्रधानांपर्यन्त आम्ही गेलो आहोत.

श्री. नितीन गडकरी : एमएसईबी बाहेरच्या राज्यातून कोळसा आणते. आपण बाहेरच्या राज्यातून कोळसा घेणे बंद करणार काय ? माझी मा. मंत्री महोदयांना विनंती आहे की, त्यांनी 20-25 ब्लॉक्ससाठी निगोशिएशन करावे. इतर राज्यांनी जसे जॉइण्ट व्हेन्चर करुन नवीन ब्लॉक्स घेतलेले आहेत तसे नवीन ब्लॉक्स घ्यावेत. शासनाने लॉजिकल भूमिका घ्यावी.

श्री. अरविंद सावंत : अधिकची माहिती म्हणून मी सांगू इच्छितो की, खणन क्षेत्राच्या संदर्भात आपण विचार केला तर विद्युत मंडळाचे विभाजन केल्यामुळे कोळशाच्या खणन क्षेत्रासाठी कोण अर्ज करणार हा प्रश्न आहे. त्यामुळे अशा प्रकारची मागणी जात नाही...





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : तशी काही परिस्थिती नाही. अगोदर काळात जनरेशनचे काम करणारे जे लोक होते त्यांनी हे काम करायला पाहिजे होते. परंतु जनरेशनचे काम करणा-यांनी किंवा अन्य कोणी हा अर्ज करावयास पाहिजे असा प्रश्न नाही. मा.सदस्य श्री. गडकरी यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, खाण ही एका राज्याची प्रॉपर्टी असू शकत नाही. ती राष्ट्रीय प्रापर्टी असते. तरी सुध्दा आपल्याला ब्लॉक मिळणार नाही असे म्हणता येणार नाही. पुढील 20-25 वर्षाची गरज लक्षात घेऊन जवळच्या खाणी कशा मिळतील यादृष्टीने केन्द्र सरकारकडे जे जे काही प्रयत्न करायला पाहिजे ते सर्व प्रयत्न केले जातील एवढेच मी या ठिकाणी सांगतो. या प्रस्तावावर बोलताना अन्य काही प्रश्न मा.सदस्यांनी या ठिकाणी उपस्थित केले. शेतीच्या नुकसानीचा प्रश्न उपस्थित केला. विजेमुळे शेतीचे नुकसान झाले हे मला मान्य आहे. त्याबाबतीत मार्ग काढण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. वीज माफीचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला होता. परंतु वीज माफी जाहीर करुन वीज नाही अशी परिस्थिती असल्यामुळे मागणी देखील थोडीशी वाढली आणि त्यामुळे अनेक कटकटी निर्माण झाल्या. जे ट्रान्सफॉर्मर जळतात तेवढेच ते बदलले जातात. ॲडिशनल ट्रान्सफॉर्मर न दिल्यामुळे ट्रान्सफॉर्मर जळण्याचे प्रमाण वाढलेले आहे. यासंदर्भातील देखील काम हाती घेण्याचे आदेश अधिका-यांना दिलेले आहेत. वीज चोरीबाबत बारामती आणि लातूरचा उल्लेख याठिकाणी करण्यात आला. मला वाटते कोणाचे तरी नाव दृष्टीसमोर ठेवून या दोन भागांचा उल्लेख केला गेला असावा. आजुबाजूच्या डिव्हिजनच्या तुलनेत बारामती डिव्हिजनमध्ये चोरीचे प्रमाण थोडे कमी दिसते.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ MHM/ प्रथम श्री. शिगम 19:55

श्री. दिलीप वळसे-पाटील...

परंतु ही जी सगळी माहिती आहे.मी सांगू इच्छितो की, जुन्नरमध्ये तशी परिस्थिती नाही. मी त्या भागातील आहे म्हणून चर्चा करण्याचे काहीही कारण नाही. आपण ज्यावेळेस वीज माफीचा निर्णय घेतला. त्यावेळी ते एकच डिव्हीजन असे होते की, तेथे आपल्याला क्रेडीट बॅलन्स द्यावा लागला. कारण तिकडचे सगळे लोक नियमित पैसे भरणारे आहेत. या भागाची सन्माननीय सदस्या श्रीमती निलमताई गोऱ्हे यांना चांगली माहिती आहे. त्या विभागात त्यांनी अतिशय चांगले काम केलेले आहे. जुन्नर, आंबेगाव, खेड येथील लोक कसे वीज देयके भरण्यास सक्षम आहेत याची त्यांना चांगली कल्पना आहे. त्यांनी मला निवडणूकीत चांगल्या प्रकारे मदत केलेली आहे...

श्री. विलास अवचट : त्यांचा सी.आर.कशाला खराब करीत आहात ?

श्री.दिलीप वळसे पाटील : माझ्याशी मैत्री केल्यामुळे कोणाचाही सी.आर.खराब होणार नाही याची मी ग्वाही देतो. या ठिकाणी भिवंडी शहरातील वीज चोरीचा प्रश्न वारंवार निर्माण होतो. त्या परिसरात वसुलीच्या संदर्भात काही मर्यादा आहेत म्हणून वीज मंडळाने एक वेगळा प्रयोग करण्याचे ठरविले आहे. त्या ठिकाणी कामे आऊट सोर्सींगच्या माध्यमातून करण्याचे ठरविले आहे. आज जे उत्पन्न मिळत आहे त्यात आऊट सोर्सींगमुळे किती उत्पन्नाची भर पडते हे पाहण्याचे आम्ही ठरविले आहे व हा प्रश्न देखील मार्गी लावण्याचा प्रयत्न करीत आहोत.

श्री. नितीन गडकरी : विजेच्या चोरीच्या संदर्भात नवीन मुंबईचा एक नंबर लागतो परंतु तुम्ही त्यास काही दुजोराच देत नाही.

श्री.दिलीप वळसे पाटील : मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, कोणत्या डिव्हीजनची विजेच्या देयकाची एकूण रक्कम किती आहे, वीज देयकाची किती रक्कम वसूल झाली आहे व किती रक्कमेची थकबाकी आहे तसेच टी.एन.टी. लॉसेस किती आहेत याचे लेटेस्ट स्टेटमेंट मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. यासंदर्भातील सगळी माहिती राज्य विद्युत मंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे. यासंदर्भातील प्रेझेंटेशन दाखविण्यास मी तयार आहे याची मी आपल्याला कल्पना आधी दिलेली आहे. या विषयाच्या अनुषंगाने अनेक सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत त्या सूचनांचा जरुर विचार करण्यात येईल. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले की, तुम्ही जनरेटरला मदत करता. याला मदत करता, त्याला मदत करता. मी या संदर्भात सांगू इच्छितो की, ही तात्पुरती उपाययोजना करण्यात आलेली आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे पाटील...

वीज निर्मिती ही एका व्यक्तीने केलेली नाही. मी असे म्हणणार नाही की, वीज ही श्री.दिलीप वळसे-पाटील यांनी निर्माण केली आहे, सन्माननीय सदस्य श्री. गोपीनाथ मुंडे यांनी वीज निर्माण केली आहे. गेल्या काही वर्षापासून हे मानवनिर्मित संकट आपल्या सर्वांच्या समोर उभे राहिले आहे. म्हणून त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने करण्यात येत आहे. यात काही त्रुटी राहिल्या आहेत, त्या त्रुटी सुध्दा दूर करण्याचा प्रयत्न कसोशीने करण्यात येत आहे. हॅड्रो प्रकल्पाच्या माध्यमातून विद्युत निर्मिती होत नाही असाही उल्लेख या ठिकाणी केला गेला. हॅड्रो प्रकल्पाच्या 300 मे.वॅ.क्षमतेच्या साईडस् महाराष्ट्रात उपलब्ध आहेत. परंतु हॅड्रोचे प्रोजेक्ट पाटबंधारे विभागाकडे असल्यामुळे पाटबंधारे विभागाने यासंदर्भात नवीन धोरण तयार केलेले आहे.हेड्रो प्रकल्पातून बी.ओ.टी. तत्वावर ऊर्जा् निर्माण करण्याचा निर्णय पाटबंधारे विभागाने घेतलेला आहे. सभापती महोदय,रुग्णालयांमध्ये भार नियमन केले जाते यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला गेला. याबाबतीत सांगू इच्छितो की, स्पीडर सेप्रेशनचा जो मुद्दयाचा मी मघाशी उल्लेख केला. त्यातून या सगळया अडचणी दूर करता येऊ शकतील. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी वाडया-वस्त्यांवर वीज नाही याचा उल्लेख केला. वाडया-वस्त्यांवर वीज पुरवठा करण्याच्या बाबतीत सांगू इच्छितो की, मर. पंतप्रधानानी राजीव गांधी योजना जाहीर केलेली आहे, त्या योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्रातील जास्तीत जास्त वाडया आणि वस्त्यांना वीज पुरवठा करण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल. सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यानी काही महत्वाचे मुद्दे या ठिकाणी मांडलेले आहेत. सगळया सभासदांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा मला वेळे अभावी आढावा घेता येणार नाही.

श्री. अरविंद सावंत : स्थापित क्षमतेपेक्षा वीज निर्मिती कमी होत आहे याचा खुलासा केला तर बरे होईल.

श्री. दिलीप वळसे-पाटील : स्थापित क्षमतेचा 75 टक्के पी.एल.एफ.आहे. यासंदर्भातील अडचण मी आपल्याला सांगतो की, आज विजेची मागणी जरी कमी झालेली असली तरी लोड-शेडींग 2000 च्या आसपास आहे. वीज निर्मिती कमी का दिसते आहे त्याचे कारण सांगतो की, आता आपण 1400 मे.वॅ.क्षमतेपेक्षा जास्त मे.वॅ.क्षमतेचे संच ओव्हरॉयलींगसाठी काढलेले आहेत. उन्हाळयात विजेचा त्रास होऊ नये म्हणून हे संच मुद्दाम पावसाळयात ओव्हरायलिंगसाठी काढलेले







श्री. दिलीप वळसे पाटील..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत. जर उन्हाळयात हे संच ओव्हरायलिंगसाठी काढले तर त्यातून अनेक अडचणी निर्माण होऊ शकतील. यावेळी जास्तीचे संच ओव्हरायलिंग करण्याचे धाडस आम्ही केलेले आहे. त्यामुळे कदाचित रेकॉर्डवर असे दिसत असेल की, स्थापित क्षमता एवढी आहे आणि स्थापित क्षमते एवढी वीज निर्माण होत आहे अशी परिस्थिती नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून स्थापित क्षमतेचा पूर्णपणे वापर होत नाही अशी आपली भावना झाली असेल तर त्यात काही अनुचित आहे असे मी म्हणणार नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती निलमताई गो-हे यांनी काही प्रश्न उपस्थित केलेले आहेत. गोडबोलेचा वाद महाराष्ट्रात उभा राहिला. ब-याच वेळेला महाराष्ट्रामध्ये यशाचे श्रेय धेण्यासाठी अनेक लोक पुढे येतात, परंतु अपयशाचे धनी होण्यासाठी कोणी पुढे येत नाही. आपल्याकडे जी आकडेवारी उपलब्ध आहे. त्यात केंद्र सरकारने केलेले मुल्यांकन आहे. श्री. गोडबोले यांनी केलेले मुल्यांकन आहे. वीज मंडळाने यासंदर्भात मुल्यांकन केलेले आहे. ही सगळी आकडेवारी पाहिल्या नंतर या राज्यासाठी जी विजेची वाढणारी गरज आहे ती ठरविताना निश्चितपणे काही ना काही तरी गफलत झालेली आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ 20:00

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

व्यक्ती म्हणून मी सभागृहामध्ये कोणाला दोष देणार नाही. गोडबोले साहेबांचे यासंदर्भातील अंदाज फसलेले आहेत. वीज खात्याचा मंत्री म्हणून मी विभागाच्या चर्चेवर बोलतो ते रेकॉर्डवर येण्यासाठी बोलतो आणि माहितीच्या आधारे बोलतो. त्यामुळे यामध्ये वाद असण्याचे कारण नाही. शेवटी महाराष्ट्राला वीजेची गरज आहे किंवा नाही,नियोजन आहे किंवा नाही आणि त्यादृष्टीने गांभीर्याने पावले टाकली किंवा नाहीत हे प्रश्न आहेत. पूर्वीप्रमाणे परिस्थिती निर्माण होणार नाही,लोकांना रस्त्यावर यावे लागणार नाही,आंदोलन करावे लागणार नाही ही काळजी शासन घेईल. पत्रकारांना सुध्दा सांभाळून घेण्याचा प्रयत्न आहे. दोन वेळा चर्चा झाली आहे. प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीत सुध्दा पूर्वी जी कमिटमेंट होती तीच कमिटमेंट या कंपन्यांची राहणार आहे. यानंतर सुध्दा काही प्रश्न शिल्लक राहिले असतील तर सभागृहामध्ये जी चर्चा झालेली आहे ते पूर्ण व्हरबॅटम मी मागवून घेईन आणि त्यात उपस्थित केलेल्या प्रश्नांच्या संदर्भात लेखी स्वरुपात उत्तर पाठविण्याची व्यवस्था करीन एवढेच मी यानिमित्ताने सांगू इच्छितो. मा.सदस्यांचे आभार मानून मला दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद देतो.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मा.सदस्य श्री. नितीन गडकरी गेली चार वर्षे शासनाला याबाबतीत काही विधायक सूचना करीत आहेत. त्या सूचनांचा अभ्यास करण्यासाठी मंत्रीमहोदयांनी विभागाला सूचना द्याव्यात.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, सभागृहामध्ये झालेल्या चर्चेचे संपूर्ण इतिवृत्त मी मागवून घेतो आणि मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचे लेखी उत्तर पाठवितो.

**उपसभापती** : सभागृहापुढील कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढवितो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आता जे उत्तर दिले त्यामध्ये आम्ही उपस्थित केलेले बरेच प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. मा.सदस्य श्री. गडकरी यांनी काही विधायक सूचना केलेल्या आहेत. त्याबाबतचा उल्लेख मंत्रीमहोदयांनी केला असता तर बरे झाले असते. 2/3 सूचनांचा खुलासा याठिकाणी होणे आवश्यक आहे. सदोष ट्रान्सफॉर्मर संबंधी कोल्हापूर येथील इंजिनिअरने भ्रष्टाचार झाल्यासंबंधीची बाब निदर्शनास आणल्यानंतर त्यासंबंधी केलेल्या कारवाईबाबत उत्तर येणे अपेक्षित होते. त्याचप्रमाणे थकित वीज किती कंपन्यांची बाकी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MHM/ SBT/ KGS/ MAP/ 20:00

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आहे आणि ती वसूल करण्याबाबत कोणती कारवाई केली जाणार आहे यासंबंधी उत्तर अपेक्षित आहे. तसेच शेतक--यांना चुकीची बिले येत आहेत. 100-200 ऐवजी 1000 रुपयांची बिले येत आहेत. ही बिले दुरुस्त न करता आधी बिल भरा आणि नंतर चुकीच्या बिलासंबंधी चौकशी करा असे सांगितले जाते. शेतक-यांना जाणीवपूर्वक बिले पाठविली जात आहेत. बिल भरल्यानंतर ती दुरुस्त केली जातात आणि मग 6-6 महिन्यांनी पैसे परत करण्यासंबंधी कारवाई केली जाते. माझी अशी विनंती आहे की, प्रथम वीज बिल दुरुस्त करुन द्यावे त्यानंतरच शेतक-यांकडून पैसे भरुन घेतले पाहिजेत. ट्रान्सफॉर्मर जळाले की वीज मंडळाचे अधिकारी 10000 रुपयांची मागणी करतात. यासंबंधी चौकशी करुन जे पैसे कुठे जमा केले जातात आणि कशासाठी शेतक-याला हे पैसे भरावे लागतात यासंबंधी खुलासा झाला पाहिजे. भविष्यात जर ट्रान्सफॉर्मर जळाला तर शेतक-याला 10000 रु. भरायला लागू नयेत यासंबंधी स्पष्ट आदेश वीज मंडळाला शासन देणार आहे काय ?

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, भारनियमन असताना सुध्दा शेतक-याला वीजेची बिले येत आहेत. माझी अशी विनंती आहे की, ॲव्हरेज बिल पाहून वीज बिलाची आकारणी करण्यात यावी.

यानंतर श्री. गायकवाड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील :सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी कोल्हापूरच्या ट्रान्सफॉर्मर्स खरेदीमध्ये जो भ्रष्टाचार झाला, अनियमितता झाली त्यासंबंधीचा प्रश्न मांडला होता त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, केवळ कोल्हापूरच नव्हे तर गेल्या वर्षात जेवढे ट्रान्सफॉर्मर्स खरेदी केले होते त्यामध्ये अशा घटना घडल्या आहेत काय ते तपासून संबंधिताविरुध्द कारवाई करण्याचे आदेश वितरण कंपनीला दिलेले आहेत.वितरण कंपनी यासबंधीचे सर्व व्यवहार वरिष्ठ पातळीवर तपासून संबंधिताविरुध्द कारवाई करील.त्यामध्ये कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही.थकीत वीज बिलाच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, आपण इन्डस्ट्रीजच्या थकीत वीज बिलासबंधी नेहमी बोलत असतो परंतु वीज मंडळाची जी थकबाकी आहे त्यामध्ये कृषी पंपाची थकबाकी मोठया प्रमाणावर राहते. काही लोकांची वर्षभर राहते..

श्री.पांडुरंग फुंडकर : आपण त्याचा ब्रेकअप द्यावा.

श्री.दिलीप वळसे - पाटील : सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, मी आपल्याला ब्रेक अप देतो.माझे वाक्य पूर्ण होण्याच्या अगोदर त्यावर आपण प्रतिक्रिया व्यक्त करीत आहात.हे बरोबर नाही. माझे म्हणणे पूर्ण होऊ द्यावे व त्यानतर आपण बोलावे. नगरपालिका, महानगरपालिका यांच्याकडे सुध्दा दोन तीन वर्षापासून विजेची थकबाकी राहते. उदाहरण द्यावयाचे झाले तर मी आपल्याला औरंगाबाद महानगरपालिकेचे देतो. त्यांच्याकडे 150 कोटी रुपयांची थकबाकी आहे.अहमदनगर महानगरपालिकेकडे 150 कोटी रुपयांची थकबाकी आहे आणि दोन तीन वर्षे ही थकबाकी त्यांच्याकडे राहिलेली आहे.कृषी पंपाचीसुध्दा काही ठिकाणी अशी थकबाकी राहिलेली आहे. इन्डस्ट्रीजमध्ये सुध्दा असे लोक असतील तर त्यांच्याकडून ही रक्कम वसूल करण्याचा आपला प्रयत्न असतो.इन्डस्ट्रीजमध्ये 40-45 दिवसांपेक्षा जास्त दिवस थकबाकी राहत नाही.इन्डस्ट्रीजमध्ये थकबाकी असलेले जे हायस्ट 100 मोठे लोक आहेत त्यांची यादी मी या सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. त्यांच्याकडील थकबाकी वसूल करण्यासाठी वीजमंडळ काय प्रयत्न करीत आहे हे सुध्दा सांगण्यास मी तयार आहे.वीज बिलातील दुरुस्तीच्या बाबतीत आपण मुद्दा मांडला आहे. त्या ठिकाणीसुध्दा चोरी होत असते म्हणून आता आम्ही नवीन निर्णय घेतला आहे. जेथे मीटर्स नाहीत त्या सर्व ठिकाणी मीटर्स लावण्यात येणार आहेत.आज पर्यन्त

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील ....

मीटर रिडर्सचा पुरेसा स्टाफ नसल्यामुळे दोन महिन्या नंतर किंवा सहा महिन्या नतर विजेची बिले पाठविण्यात येत होती. त्या संदर्भात आता नवीन निर्णय घेण्यात आला आहे. या राज्यातील आय.टी.आय.मध्ये एक लाख विद्यार्थी आहेत. ते खाते सुध्दा माझ्याकडे असून परवाच मी त्यासंदर्भात राज्यातील सर्व आय.टी.आय.चे प्राचार्य आणि वीज मंडळाचे एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर्स यांची बैठक घेतली होती.वीज मंडळाचे कर्मचारी एक महिन्याचे मिटर रिडीग घेतील आणि दुस-या महिन्याचे मिटर रिडींग आय.टी.आय.चे विद्यार्थी घेतील तसेच त्यासाठी त्यांना पैसे दिले जातील एकमेकावर चेक आणि बॅलन्स ठेवण्यासाठी ही व्यवस्था केलेली आहे. वीज चोरी मोठया प्रमाणावर थांबविण्यासाठी त्यामुळे आपल्याला यश मिळू शकेल.तसेच चुकीची बिले देण्याचे प्रमाण निश्चितपणे कमी होईल.ट्रान्सफॉर्मर जळाल्या नंतर पैसे का द्यावे लागतात ? सिस्टीम ओव्हरलोड झाल्या नंतर ट्रान्सफॉर्मर जळणारच. जरी तो वॉरन्टी पिरिअडमधील असला तरी रिपेअर सेन्टरमध्ये नेऊन त्याची दुरुस्ती करावी लागते. त्या ठिकाणी नंबर असतात. लवकर ट्रान्सफॉर्मर बसवावा यासाठी लोकांची घाई असते .ज्याला घाई असते तो काहीही करण्यास तयार असतो व याचा फायदा सिस्टीम मधील लोक घेत असतात. मी मघाशी माझ्या भाषणात हे सांगितलेले की, फक्त जळालेले ट्रान्सफॉर्मर्स बदलणे हा महत्वाचा भाग नाही तर कॅपॅसिटी एक्सपान्शनच्या कार्यक्रमामध्ये वीज मंडळाने नवीन वितरण कंपनीला सूचना दिल्या आहेत. त्यासाठी लॉग टर्म कार्यक्रम आपण हातामध्ये घेत आहोत.

**उपसभापती** : वीज मंडळावर अत्यंत चांगली चर्चा झालेली आहे. या चर्चेला माननीय उर्जा मंत्र्यांनी देखील अत्यंत चांगले उत्तर दिलेले आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

-----

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>अर्धा तास चर्चे संबंधी</u>** ......

**उपसभापती** : आता अर्धा तास चर्चा आहे, त्या घ्यावयाच्या काय ?

काही सन्माननीय सदस्य : या चर्चा उद्या घ्याव्यात किंवा ...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माझ्या खात्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांची अर्धा तास चर्चा आहे. ही अर्धा तास चर्चा यापूर्वी या सभागृहामध्ये सहा वेळा येऊन पुढे ढकलली गेली आहे. तेव्हा आता जर आपल्याला यावर चर्चा करावयाची नसेल तर आपण ती चर्चाच रद्द करावी ....

श्री. दिलीप वळसे-पाटील : माननीय उपसभापती महोदय, हा विषय एकदा तपासून घेण्याची वेळ आलेली आहे. एखाद्या विषयावर तारांकित प्रश्न लागतो. त्याच विषयावर लक्षवेधी सुचना लागते, नियम 93 ची सूचना देखील असते. डिसेंबर आणि मार्च च्या अधिवेशनामध्ये असे झालेले आहे. हे काय चालले आहे हेच मला कळत नाही. एखाद्या विषयावर प्रश्न, लक्षवेधी सूचना वा नियम 93 किंवा अन्य कोणत्याही मार्गाने चर्चा झाल्यानंतर पुन्हा पुन्हा तोच विषय त्या एकाच अधिवेशनामध्ये सभागृहात येतो आहे. एखाद्या लहान विषयासाठी देखील तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना वा नियम 93 खाली देखील चर्चा होते. हे कसे काय होते ते समजत नाही. केवळ याच सभागृहात असे होते आहे असेही नाही तर दोन्ही सभागृहामध्ये असे होत आहे ...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, ही अर्धा तास चर्चा आज, आज नाही तर उद्या अशा प्रकारे सतत होत असेल तर मला जखडून टाकण्यासारखे आहे. वाटल्यास ही चर्चा पुढील अधिवेशनामध्ये होणार असेल तरी त्याला माझी हरकत नाही. पण हीच नाही तर कोणतीही अर्धा तास चर्चा घ्यावयाची असेल तर त्यासाठी आपण फिक्स वेळ द्यावी. किमान आजची ही अर्धा तास चर्चा तरी आपण आजच चर्चेला घ्यावी.

**उपसभापती** : मला वाटते आता आज ही आणि अन्य तीन अर्धा तास चर्चा घेतली जाऊ शकत नाही. तसा वेळही खूप झालेला आहे, सदस्यांचीही विनंती आहे. तेव्हा आपण ...

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आपण मला एक निश्चित वेळ द्यावी जेणे करून पुन्हा पुन्हा यासाठी मला येथे जखडून रहावे लागणार नाही.

**उपसभापती** : होय. मला वाटते पुढील आठवड्यामध्ये पहिल्या दिवशी सभागृह दुपारी 2.00 वाजता असते. तेव्हा त्यापूर्वी अर्धा पाऊण तास आपण आजच्या या चार अर्धा तास चर्चा घेऊ शकतो. सदस्यांची आणि मंत्री महोदयांची यासाठी तयारी आहे काय ? ..... 4बी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गणेश नाईक : माझी हरकत नाही, पण एकदा चर्चा घेण्याचे ठरविल्यानंतर ती पुढे ढकलण्यात येऊ नये इतकीच माझी आपणास विनंती आहे.

श्री. विनोद तावडे : माझीही हरकत नाही.

**उपसभापती** : ठीक आहे. आता या ठिकाणी आपण म्हणजे माननीय मंत्री श्री.वळसे-पाटील आणि श्री.गणेश नाईक यांनी जो मुद्दा उपस्थित केला, एखाद्या विषयावर सभागृहामध्ये किती मार्गाने किती वेळा चर्चा उपस्थित करावयाची, तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, नियम 93, अर्धा तास चर्चा अशा वेगवेगळ्या मार्गांनी एकाच अधिवेशनामध्ये एकच विषय पुन्हा पुन्हा सभागृहात येऊ लागला तर ते रिपिटेशन होते. आपणाला मी सांगू इच्छितो की, हा विषय मी स्वत: कामकाज सल्लागार समितीमध्ये मांडीन. बरं, हा प्रकार याच सभागृहात होतो असे नाही तर विधान सभेमध्ये देखील होतो. कमीत कमी यामध्ये सुसंगती यावयाची असेल तर याबाबत कामकाज सल्लागार समितीमध्ये मी आपले मनोगत मांडतो आणि तेथेच यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न आपण करू.

तर आता या अर्धा तास चर्चा आज न घेता, सोमवारी सभागृहाला सुटी आहे. म्हणून मंगळवार, दिनांक 19 जुलै 2005 रोजी दुपारी 12.00 वाजता घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक होईल.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन, शुक्रवार, दिनांक 15 जुलै 2005 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 8 वाजून 14 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 15 जुलै 2005 रोजीच्या दुपारी 12.00 वाजे पर्यंत स्थगित झाली. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही